ॐ नमो भगवते वासुदेवाय पुरुषोत्तमाय।

# गीता-प्रवचनें

विनोबा

परंधाम प्रकाशन, पवनार

# दोन शब्द

गीता-प्रवचनें हें आता भारतीय जनतेचें पुस्तक झालें आहे. भूदानयज्ञाचें वातावरण निर्माण करण्याच्या कामीं त्याचा उपयोग होत असल्यामुळे त्याच्या प्रति गांवोगांव आणि घरोघर जात आहेत.

गीतेप्रमाणे हीं प्रवचनेंहि प्रत्यक्ष कर्म-क्षेत्रात प्रकट झालीं आहेत. १९३२ सालीं धुळ्याच्या जेलमधे अनेक संत, महंत आणि सेवक गोळा झाले होते. त्यांच्या सेवेत हीं रुजू झालीं आहेत. त्यामुळे साहजिकच रोजच्या उपयोगाच्या गोष्टींची यात चर्चा आहे. जीवनाशी संबंध नसलेले कोणतेहि वैचारिक वाद यात आलेले नाहीत. मला असा विश्वास आहे की खेड्यात किंवा शहरात सामान्य मजुरी करून जगणाऱ्या श्रमिकांनाहि यातून सांत्वना आणि श्रमपरिहार लाभेल.

या प्रवचनांच्या निमित्ताने गीतेची सेवा करण्याची विशेष संधि देवाने मला दिली ही मी त्याची मोठी कृपा समजतो. हीं टिपून घेण्याला साने गुरुजींसारखा सिद्ध-हस्त सत्पुरुष लाभला हीहि त्याचीच कृपा होय. हिंदुस्थानभर जिथे जिथे हीं प्रवचनें पोहोचलीं आहेत तिथे तिथे हृदयशुद्धीची आणि क्रिया पालटण्याची त्यांनी प्रेरणा दिली आहे. माझी वासना आहे की घरा-घरांत यांचें श्रवण, पठण, मनन व्हावें. यात माझें काहीच नाही. तुकाराम महाराजांच्या भाषेत म्हणतो –

**शिकवूनि बोल। केलें कवतुक नवल**
**आपणियां रंजविलें। बापें माझिया विठ्ठलें**

**– विनोबा**

# अनुक्रमणिका

**अध्याय 1 – प्रास्ताविक आख्यायिका – अर्जुनाचा विषाद 7–10**

1. मध्ये महाभारतम् 7,
2. अर्जुनाच्या भूमिकेचा संबंध 8,
3. गीतेचें प्रयोजन : स्वधर्मविरोधी मोहाचा निरास 9,
4. ऋजु बुद्धीचा अधिकारी 10;

**अध्याय 2 – सर्व उपदेश थोडक्यात : आत्मज्ञान आणि समत्वबुद्धि 11–17**

5. गीतेची परिभाषा 11,
6. जीवन-सिद्धांत – (1) देहाने स्वधर्माचरण 11,
7. जीवन-सिद्धांत – (2) देहातीत आत्म्याचें भान 12,
8. दोहोंचा मेळ साधण्याची युक्ति : फलत्याग 14,
9. फलत्यागाचीं दोन उदाहरणें 15,
10. आदर्श गुरुमूर्ति 16;

**अध्याय 3 – कर्मयोग 18–22**

11. फलत्यागी अनंत फळ मिळवितो 18,
12. कर्मयोगाचीं विविध प्रयोजनें 20,
13. कर्मयोग-व्रतातील अंतराय 21;

**अध्याय 4 – कर्मयोग-सहकारी-साधना : विकर्म 23–26**

14. कर्माला विकर्माची जोड हवी 23,
15. उभय संयोगाने अकर्म-स्फोट 24,
16. अकर्माची कला संतांस पुसावी 25;

**अध्याय 5 – दुहेरी अकर्मावस्था : योग आणि संन्यास 27–35**

17. बाह्य कर्म मनाचा आरसा 27,
18. अकर्म-दशेचें स्वरूप 28,
19. अकर्माची एक बाजू : योग 29,
20. अकर्माची दुसरी बाजू : संन्यास 30,
21. दोहोंची तुलना शब्दापलीकडे 31,
22. भूमितीचा आणि मीमांसकांचा दृष्टांत 32,
23. संन्यासी आणि योगी एकच : शुक-जनकवत् 32,
24. ‘विशेष चि परी योग संन्यासाहूनि मानिला’ 33;

**अध्याय 6 – चित्तवृत्ति–निरोध** **36–42**

25. आत्मोद्धाराची आकांक्षा 36,
26. चित्ताची एकाग्रता 37,
27. एकाग्रता कशी साधावी 38,
28. जीवनातील परिमितता 39,
29. मंगल–दृष्टि 40,
30. बालक गुरु 41,
31. अभ्यास–वैराग्य आणि श्रद्धा 42;

**अध्याय 7 – प्रपत्ति अथवा ईश्वर–शरणता** **43–48**

32. भक्तीचें भव्य दर्शन 43,
33. भक्तीने विशुद्ध आनंदाचा लाभ 44,
34. सकाम भक्तीलाहि किंमत आहे 45,
35. निष्काम भक्तीचे प्रकार आणि पूर्णता 47;

**अध्याय 8 – प्रयाण–साधना : सातत्ययोग** **49–54**

36. शुभ संस्कारांचा संचय 49,
37. मरणाचें स्मरण असावें 50,
38. 'सदा त्यांत चि रंगला' 52,
39. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग 53,
40. शुक्ल–कृष्ण गति 53;

**अध्याय 9 – मानवसेवेची राजविद्या : समर्पणयोग** **55–62**

41. प्रत्यक्ष अनुभवाची विद्या 55,
42. सोपा मार्ग 55,
43. अधिकार–भेदाची भानगड नाही 56,
44. कर्मफल देवाला अर्पण 57,
45. विशिष्ट क्रियेचा आग्रह नाही 58,
46. सारें जीवन हरिमय होऊ शकतें 59,
47. पापाचें भय नाही 61,
48. थोडेंहि गोड 62;

**अध्याय 10 – विभूति–चिंतन** **63–70**

49. गीतेच्या पूर्वार्धावर दृष्टिक्षेप 63,
50. परमेश्वर–दर्शनाची बाळबोध रीत 64,
51. मानवातील परमेश्वर 65,
52. सृष्टीतील परमेश्वर 66,
53. प्राण्यांतील परमेश्वर 67,
54. दुर्जनातहि परमेश्वराचें दर्शन 70;

**अध्याय 11 – विश्वरूप-दर्शन** **71–75**

55. विश्वरूप-दर्शनाची अर्जुनाची हौस 71,
56. लहान मूर्तीतहि पूर्ण दर्शन होऊ शकतें 72,
57. विराट् विश्वरूप पचणारहि नाही 73,
58. सर्वार्थ-सार 74;

**अध्याय 12 – सगुण-निर्गुण भक्ति** **76–84**

59. अध्याय सहा ते अकरा – एकाग्रतेपासून समग्रता 76,
60. सगुण उपासक आणि निर्गुण उपासक 76,
61. सगुण हें सुलभ आणि सुरक्षित 78,
62. निर्गुणाच्या अभावीं सगुणहि सदोष 79,
63. दोन्ही परस्पर पूरक : रामचरित्रातील दृष्टांत 80,
64. दोन्ही परस्पर पूरक : कृष्णचरित्रातील दृष्टांत 82,
65. सगुण-निर्गुणाच्या एकरूपतेविषयी स्वानुभवकथन 83,
66. सगुण-निर्गुण केवळ दृष्टिभेद,
म्हणून भक्तलक्षणें जिरवावीं हेंच सार 83;

**अध्याय 13 – आत्मानात्म-विवेक** **85–93**

67. कर्मयोगास उपकारक देहात्म-पृथक्करण 85,
68. सुधारणेचा मूलाधार 86,
69. देहासक्तीमुळे जीवन अडगळीचें 87,
70. तत्त्वमसि 89,
71. जुलमी लोकांची सत्ता गेली 89,
72. परमात्म-शक्तीवर विश्वास 90,
73. परमात्म-शक्तीचा उत्तरोत्तर अनुभव 90,
74. नम्रता, निर्दंभता इत्यादि मूलभूत ज्ञान-साधना 92;

**अध्याय 14 – गुणोत्कर्ष आणि गुणनिस्तार** **94–101**

75. प्रकृतीची चिकित्सा 94,
76. तमोगुण आणि त्यावर उपाय : शरीर-परिश्रम 94,
77. तमोगुणावर आणखी उपाय 96,
78. रजोगुण आणि त्यावर उपाय : स्वधर्म-मर्यादा 97,
79. स्वधर्म कसा ठरवावा 98,
80. सत्त्वगुण आणि त्यावर उपाय 99
81. शेवटची गोष्ट : आत्मज्ञान आणि भक्तीचा आश्रय 101;

**अध्याय 15 – पूर्णयोग : सर्वत्र पुरुषोत्तम–दर्शन 102–108**

82. प्रयत्नमार्गाहून भक्ति वेगळी नाही 102,
83. भक्तीने प्रयत्न सुकर होतो 103,
84. सेवेची त्रिपुटी : सेव्य, सेवक, सेवासाधनें 104,
85. अहंशून्य सेवा म्हणजेच भक्ति 106,
86. ज्ञानलक्षण : मी पुरुष, तो पुरुष, हाहि पुरुष 106,
87. सर्व वेद–सार माझ्याच हातात 107;

**अध्याय 16 – परिशिष्ट 1 :**
**दैवी आणि आसुरी वृत्तींचा झगडा 109–115**

88. पुरुषोत्तम–योगाची पूर्व प्रभा : दैवी संपत्ति 109,
89. अहिंसेची आणि हिंसेची सेना 110,
90. अहिंसेच्या विकासाचे चार टप्पे 111,
91. अहिंसेचा एक महान् प्रयोग : मांसाहार–परित्याग 112,
92. आसुरी संपत्तीची तिहेरी महत्त्वाकांक्षा : सत्ता, संस्कृति आणि संपत्ति 113,
93. काम–क्रोध–लोभ–मुक्तीचा शास्त्रीय संयम–मार्ग 114;

**अध्याय 17 – परिशिष्ट 2 : साधकाचा कार्यक्रम 116–123**

94. सुबद्ध वर्तनाने वृत्ति मोकळी राहते 116,
95. त्यासाठी त्रिविध क्रियायोग 116,
96. साधनेचें सात्त्विकीकरण 118,
97. आहार–शुद्धि 119,
98. अविरोधी जीवनाची गीतेची योजना 120,
99. समर्पणाचा मंत्र 122,
100. पापापहारि हरिनाम 123;

**अध्याय 18 – उपसंहार –**
**फलत्यागाची पूर्णता : ईश्वर–प्रसाद 124–131**

101. अर्जुनाचा शेवटचा प्रश्न 124,
102. फलत्याग सार्वभौम कसोटी 124,
103. क्रियेतून सुटण्याची खरी रीत 125,
104. साधकासाठी स्वधर्माचा उलगडा 127,
105. फलत्यागाचा एकूण फलितार्थ 128,
106. साधनेची पराकाष्ठा तीच सिद्धि 128,
107. सिद्ध पुरुषाची तिहेरी भूमिका 129,
108. ‘‘तुही…तुही…तुही’’ 131.

**साम्यसूत्र–वृत्तिः 132**

**परिशिष्ट 1 : गीता–प्रवचनांच्या जन्मस्थानीं 140**

**परिशिष्ट 2 : माझ्या जीवनाची गाथा 142**

**गीता–प्रवचनांच्या मासिक पारायणाचे विभाग 143**

# अध्याय 1

# प्रास्ताविक आख्यायिका : अर्जुनाचा विषाद

## १. मध्ये महाभारतम्

**1** प्रिय बंधूंनो! आजपासून मी श्रीमद्‌भगवद्‌गीतेविषयी सांगणार आहे. गीतेचा व माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझें शरीर आईच्या दुधावर पोसलें, त्यापेक्षाहि माझें हृदय व बुद्धि यांचें गीतेच्या दुधावर अधिक पोषण झालें आहे. जिव्हाळ्याचा जेथे संबंध असतो तेथे तर्कास वाव नसतो. तर्काला छाटून श्रद्धा व प्रयोग या दोन पंखांनीच गीतेच्या गगनात मी यथाशक्ति भराऱ्या मारीत असतो. मी प्राय: गीतेच्याच वातावरणात असतो. गीता म्हणजे माझें प्राण-तत्त्व. मी गीतेविषयी इतरांशी कधी बोलतो तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो, आणि एकटा असतो त्या वेळेस त्या अमृतसमुद्रात खोल बुडी मारून बसतो. अशा या गीतामाउलीचें चरित्र दर रविवारीं मी सांगावें असें ठरविण्यात आलें आहे.

**2** गीतेची योजना महाभारतात केलेली आहे. गीता महाभारताच्या मध्यभागीं सर्व महाभारतावर प्रकाश पाडीत उंच दीपाप्रमाणे उभी आहे. एकीकडे सहा पर्वें, दुसरीकडे बारा पर्वें अशा मध्यभागीं, तसेंच एकीकडे सात अक्षौहिणी सैन्य, दुसरीकडे अकरा अक्षौहिणी, अशाहि मध्यभागीं गीता उपदेशिली जात आहे.

**3** महाभारत व रामायण हे आमचे राष्ट्रीय ग्रंथ आहेत. त्यांतील व्यक्ति आमच्या जीवनाशी एकरूप झालेल्या आहेत. राम, सीता, धर्म, द्रौपदी, भीष्म, हनुमान इत्यादि रामायण-महाभारतांतील चरित्रांनी सर्व भारतीय जीवन आज हजारों वर्षें भारून टाकलें आहे. जगांतील इतर महाकाव्यांतील पात्रें अशीं लोक-जीवनात मिसळून गेलेलीं दिसत नाहीत. ह्या दृष्टीने महाभारत आणि रामायण हे नि:संशय अद्‌भुत ग्रंथ आहेत. रामायण हें मधुर नीतिकाव्य आहे, तर महाभारत हें व्यापक समाजशास्त्र आहे. व्यासांनी एक लक्ष संहिता लिहून असंख्य चित्रें, चरित्रें व चारित्र्यें मोठ्या कौशल्याने यथावत् रेखाटलीं आहेत. केवळ निर्दोष एका परमेश्वराशिवाय कोणीहि नाही; पण तसेंच ह्या जगात केवळ दोषपूर्ण असेंहि काही नाही, ही गोष्ट महाभारत स्पष्टपणें सांगत आहे. भीष्म-युधिष्ठिर अशासारख्यांचे येथे दोष दाखविले आहेत. उलट कर्ण-दुर्योधनादिकांचेहि गुण प्रकट केले आहेत. मानवी जीवन हें पांढऱ्या व काळ्या तंतूंचा पट आहे ही गोष्ट महाभारत सांगत आहे. अलिप्त राहून भगवान् व्यास जगातील विराट् संसाराचें छायाप्रकाशमय चित्र दाखवीत आहेत. व्यासांच्या ह्या अत्यंत अलिप्त व उदात्त ग्रथन-कौशल्यामुळे महाभारत ग्रंथ म्हणजे एक सोन्याची प्रचंड खाण बनला आहे. शोधन करून भरपूर सोनें लुटून घ्यावें.

**4** एवढें महाभारत व्यासांनी लिहिलें, पण व्यासांना स्वत:चें असें काही सांगावयाचें होतें कीं नाही? त्यांचा विशिष्ट संदेश त्यांनी कोठे सांगितला आहे का? कोणत्या ठिकाणीं व्यासांची समाधि लागली आहे? ठिकठिकाणीं अनेक तत्त्वज्ञानांचीं आणि उपदेशांचीं जंगलेंच्या जंगलें महाभारतात आलीं आहेत. पण ह्या सर्व तत्त्वज्ञानांचें, उपदेशांचें आणि एकंदर ग्रंथाचें सारभूत रहस्य त्यांनी कोठे मांडलें आहे का? होय, समग्र महाभारताचें नवनीत व्यासांनी भगवद्‌गीतेत दिलें आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण आणि त्यांच्या मननाची संपूर्ण सांठवण आहे. हिच्याच आधारें **'मुनींत मुनि मी व्यास'** ही विभूति सार्थ ठरावयाची आहे. प्राचीन काळापासून गीतेला 'उपनिषद्' ही पदवी मिळाली आहे. गीता उपनिषदांचेंहि उपनिषद् आहे. कारण सर्व उपनिषदांचें दोहन करून हें गीतारूपी दूध भगवंतांनी अर्जुनाच्या निमित्ताने जगताला दिलें आहे. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्राय: प्रत्येक विचार गीतेत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष आहे असें अनुभवी पुरुषांनी यथार्थपणें म्हटलें आहे. गीता हा लहानसाच, पण हिंदुधर्माचा मुख्य ग्रंथ आहे.

**5** गीता श्रीकृष्णाने सांगितली हें तर सर्वांना माहीतच आहे. ही थोर शिकवण ऐकणारा भक्त अर्जुन ह्या शिकवणीशी इतका समरस झाला, की त्यालाहि 'कृष्ण' संज्ञा प्राप्त झाली. देवा-भक्तांचें हें हृद्‌गत प्रकट करीत असता व्यासदेव इतके विरघळून गेले की त्यांनाहि लोक 'कृष्ण' ह्याच नांवाने ओळखू लागले. सांगणारा कृष्ण, ऐकणारा कृष्ण,

रचणारा कृष्ण, असें तिघांत जणू अद्वैत उत्पन्न झालें. तिघांची जणू समाधि लागली. गीतेच्या अभ्यासकाला अशीच एकाग्रता पाहिजे.

## 2. अर्जुनाच्या भूमिकेचा संबंध

**6** कित्येकांना वाटतें, गीतेचा आरंभ दुसऱ्या अध्यायापासून धरावा. दुसऱ्या अध्यायाच्या 11 व्या श्लोकापासून प्रत्यक्ष उपदेशाला सुरुवात होते. तेथूनच आरंभ समजायला काय हरकत आहे? एक जण तर मला म्हणाला, ''अक्षरांत अकार ही ईश्वरी विभूति भगवंतांनी सांगितली आहे. **'अशोच्यानन्वशोचस्त्वम्'**च्या आरंभीं आयताच अकारहि आहे. तेव्हा तेथूनच आरंभ धरावा.'' ही कोटी सोडून दिली तरी तो आरंभ अनेक प्रकारें योग्य आहे यांत शंका नाही. तरी पण तत्पूर्वीच्या प्रास्ताविक भागाचेंहि महत्त्व आहेच. अर्जुन कोणत्या भूमिकेवर आहे, कोणती गोष्ट सांगण्यासाठी गीतेची प्रवृत्ति झाली आहे, हें हा प्रास्ताविक कथाभाग नसता तर नीट लक्षात येतें ना.

**7** अर्जुनाचें क्लैब्य दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठी गीता सांगितली गेली असें काही लोक म्हणतात. त्यांच्या मतें गीता कर्मयोग सांगणारी आहे. एवढेंच नव्हे तर ती युद्धयोग सांगणारी आहे. जरा विचार केला तर ह्या म्हणण्यातील चूक दिसून येईल. अठरा अक्षौहिणी सैन्य लढायला सिद्ध होतें. अर्जुनाला सबंध गीता ऐकवून त्या सैन्याच्या लायकीचें केलें असें का आपण म्हणणार? अर्जुन घाबरला. तें सैन्य घाबरलें नव्हतें. तें का अर्जुनाहून अधिक योग्यतेचें? ही तर कल्पनाच करवत नाही. अर्जुन लढाईपासून परावृत्त होत होता तो भित्रा म्हणून नव्हे. शेंकडों लढाया खेळलेला तो महावीर होता. उत्तर-गोग्रहणाच्या वेळेस त्याने एकट्याने भीष्म-द्रोण-कर्णांना हतबल केलें होतें. नेहमी विजय मिळविणारा, सर्व नरांतील एकच खरा नर अशी त्याची ख्याति होती. वीरवृत्ति त्याच्या रोमरोमांत होती. अर्जुनाला डिंवचण्यासाठी क्लैब्याचा आरोप तर कृष्णानेहि करून पाहिला. पण तो बाण वाया जाऊन पुढे वेगळ्याच मुद्द्यांवर ज्ञानविज्ञानांचीं अनेक व्याख्यानें द्यावीं लागलीं आहेत. तेव्हा क्लैब्य-निरसनाइतकें सोपें तात्पर्य गीतेचें नाही हें निश्चित आहे.

**8** दुसरे काही म्हणतात, अर्जुनाची अहिंसा-वृत्ति दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठी गीता सांगितली आहे. माझ्या दृष्टीने हेंहि म्हणणें बरोबर नाही. तें कसें, हें पाहण्यासाठी आपणाला अर्जुनाची भूमिका तपासली पाहिजे. त्या कामीं पहिला अध्याय आणि त्याचें दुसऱ्या अध्यायात शिरलेलें आखात फार उपयोगी आहे.

अर्जुन रणांगणावर उभा राहिला तो कृतनिश्चयाने आणि कर्तव्यभावनेने उभा राहिला होता. क्षात्र-वृत्ति त्याच्या स्वभावांत होती. युद्ध टाळण्याचा शिकस्त प्रयत्न करून तें टळलें नव्हतें. कमींत कमी मागणी व कृष्णा-सारख्याची मध्यस्थी, दोन्ही वाया गेल्या होत्या. अशा स्थितीत देशोदेशींचे राजे जमवून आणि कृष्णाला सारथ्य पत्करायला लावून तो रणांगणावर उभा राहतो आणि वीर-वृत्तीच्या उत्साहाने कृष्णाला म्हणतो, ''दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं माझा रथ नेऊन उभा कर, म्हणजे कोण माझ्याबरोबर लढण्यासाठी जमले आहेत त्यांचीं तोंडें एकदा मी पाहून घेतो.'' कृष्ण त्याच्या म्हणण्याप्रमाणे करतो आणि अर्जुन सभोंवार नजर फिरवितो, तों त्याला काय दिसतें? दोन्हीं बाजूंना आपल्याच नातेवाईकांचा, सग्या-सोयऱ्यांचा प्रचंड मेळावा उभा आहे. 'आजे, बाप, मुलें, नातू' – आप्तसंबंधाच्या चार पिढ्या मारण-मरणाच्या अंतिम निश्चयाने एकत्र झाल्या आहेत असें त्याला दिसतें. ह्या गोष्टीची कल्पना आधी त्याला नसेल असें नाही. पण प्रत्यक्ष दर्शनाचा एक वेगळाच परिणाम असतो. तो सारा स्वजनसमूह पाहून त्याच्या हृदयाची कालवाकालव सुरू होते. त्याला फार वाईट वाटतें. आजपर्यंत त्याने अनेक लढायांत असंख्य वीरांचा संहार केला होता. त्या वेळीं त्याला वाईट वाटलें नाही. त्याचें गांडीव गळून पडलें नाही, त्याच्या शरीराला कापरें भरलें नाही, त्याचे डोळे ओले झाले नाहीत; मग आताच हें असें कां? त्याच्या ठिकाणीं का अशोकाप्रमाणे अहिंसावृत्तीचा उदय झाला होता? नाही, ही सारी स्वजनासक्ति होती. आजच्या घटकेलाहि जर समोर गुरु, बंधु, आप्त नसते तर त्याने शत्रूंचीं मुंडकीं चेंडूप्रमाणे उडविलीं असतीं. पण आसक्तिजन्य मोहाने त्याची कर्तव्यनिष्ठा ग्रासली आणि मग त्याला तत्त्वज्ञान आठवलें. कर्तव्यनिष्ठ मनुष्य मोहग्रस्त झाला तरी नागडी कर्तव्यच्युति त्याला सहन होत नाही. तो तिला एखादा सद्विचार नेसवितो. अर्जुनाचें असेंच झालें. तो आता युद्धच मुळात पाप आहे असें उसनें प्रतिपादन करू लागला. युद्धाने कुलक्षय

होईल, धर्म लोपेल, स्वैराचार माजेल, व्यभिचार-वाद पसरेल, दुर्भिक्ष ओढवेल, समाजावर संकटें येतील असे अनेक मुद्दे तो कृष्णालाच समजावून सांगू लागला.

**9** मला ह्या ठिकाणीं एका न्यायाधीशाची गोष्ट आठवते. एक न्यायाधीश होता. शेंकडों अपराध्यांना त्याने फांशीची शिक्षा दिली होती. परंतु एके दिवशीं त्याचा स्वत:चा मुलगा खुनी म्हणून त्याच्यासमोर उभा करण्यात आला. त्याच्यावरचा खुनाचा आरोप सिद्ध होऊन त्याला फांशीची शिक्षा देण्याची न्यायाधीशावर पाळी आली. पण तसें करतांना तो न्यायाधीश कचरला. तो बुद्धिवाद बोलू लागला, ''फांशीची शिक्षा अमानुष आहे. ती देणें मनुष्याला शोभत नाही. मनुष्याला सुधारण्याची आशा त्यामुळे नष्ट होते. खून करणाऱ्याने भावनेच्या भरात खून केला. परंतु त्याच्या डोळ्यावरचा खून उतरल्यावर त्या माणसाला गंभीरपणें उचलून फांसावर लटकवून मारावयाचें हें समाजाच्या माणुसकीला लाजिरवाणें व काळिमा फांसणारें आहे,'' वगैरे मुद्दे तो न्यायाधीश मांडू लागला. तो मुलगा समोर न येता तर मरेपर्यंत न्यायाधीशसाहेब खुशाल फांशीची शिक्षा देत राहते. मुलाबद्दलच्या ममत्वामुळे न्यायाधीश असें बोलू लागला. तें बोलणें आंतरिक नव्हतें. तें आसक्तिजन्य होतें. 'हा माझा मुलगा' ह्या ममत्वातून निर्माण झालेलें तें वाङ्मय होतें.

**10** अर्जुनाची ह्या न्यायाधीशासारखी गत झाली. त्याने मांडलेले मुद्दे चुकीचे नव्हते. गेल्या महायुद्धाचे नेमके हेच परिणाम जगाने पाहिले. पण विचाराची गोष्ट इतकीच की अर्जुनाचें तें तत्त्वज्ञान नव्हतें. तो त्याचा प्रज्ञावाद होता. कृष्ण हें जाणून होता. म्हणून त्या मुद्द्यांची मुळीच दखल न घेता त्याने सरळ मोहनाशाचा उपाय अवलंबिला. अर्जुन जर खरोखर अहिंसावादी झालेला असता तर अवांतर ज्ञानविज्ञानें कोणी कितीहि सांगितलीं तरी मूळ मुद्द्यांचें उत्तर मिळाल्याशिवाय त्याचें समाधान झालें नसतें. पण सबंध गीतेंत ह्या मुद्द्यांचें उत्तर नाही आणि अर्जुनाचें समाधान झालेलें आहे. ह्या सर्वांचा भावार्थ इतकाच की अर्जुनाची अहिंसावृत्ति नव्हती, तो युद्ध-प्रवृत्तच होता. युद्ध त्याच्या दृष्टीने त्याचें स्वभाव-प्राप्त आणि अपरिहार्य ठरलेलें कर्तव्य होतें. तें कर्तव्य आता तो मोहाने टाळू पाहत होता. आणि गीतेची ह्या मोहावरच मुख्य गदा आहे.

## 3. गीतेचें प्रयोजन : स्वधर्मविरोधी मोहाचा निरास

**11** अर्जुन अहिंसेचीच काय, पण संन्यासाचीहि भाषा बोलू लागला होता. ह्या रक्तलांछित क्षात्रधर्मापेक्षा संन्यास बरा असें अर्जुन म्हणतो. पण अर्जुनाचा तो स्वधर्म होता का? ती त्याची वृत्ति होती का? अर्जुनाला संन्याशाचा वेष सहज घेता आला असता; पण संन्याशाची वृत्ति कशी घेता आली असती? संन्यासाच्या नांवाने जर तो रानात जाऊन राहता तर तेथे तो हरणें मारू लागला असता. भगवान् स्पष्टच म्हणाले, ''अर्जुना, अरे लढाई करणार नाही म्हणतोस, तो तुझा भ्रम आहे. तुझा आजपर्यंतचा बनलेला स्वभाव तुला लढायला लावल्याशिवाय राहणार नाही.''

अर्जुनाला स्वधर्म विगुण वाटू लागतो; पण स्वधर्म कितीहि विगुण असला तरी त्यात राहूनच माणसाने आपला विकास करून घेतला पाहिजे. कारण त्यात राहूनच विकास होऊ शकतो. ह्यात अभिमानाचा प्रश्न नाही. हें विकासाचें सूत्र आहे. स्वधर्म मोठा म्हणून घ्यायचा नसतो आणि लहान म्हणून टाकायचा नसतो. वस्तुत: तो मोठाहि नसतो, आणि लहानहि नसतो. तो माझ्या बेताचा असतो. **'श्रेयान् स्वधर्मो विगुण:'** ह्या गीतावचनातील 'धर्म' शब्दाचा अर्थ हिंदु धर्म, मुसलमानी धर्म, ख्रिस्ती धर्म अशासारखा नाही. प्रत्येक व्यक्तीचा धर्म निरनिराळा आहे. येथे माझ्यासमोर असलेल्या दोनशें लोकांचे दोनशें धर्म आहेत. माझाहि धर्म दहा वर्षांपूर्वी होता तो आज नाही. आजचा दहा वर्षांनंतर टिकणार नाही. चिंतनाने आणि अनुभवाने वृत्ति पालटत जाते तसतसा पूर्वीचा धर्म गळत जातो आणि नवीन लाभत असतो. हट्टाने काहीच करावयाचें नसतें.

**12** दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ वाटला तरी तो स्वीकारण्यात माझें कल्याण नसतें. सूर्याचा प्रकाश मला प्रिय आहे. त्या प्रकाशाने माझी वाढ होते. सूर्य मला वंद्यहि आहे. पण म्हणून मी पृथ्वीवरचें वास्तव्य सोडून त्याच्याजवळ जाऊ पाहीन तर जळून जाईन. उलट पृथ्वीवर राहणें विगुण असेल, पृथ्वी सूर्यापुढे अगदीच तुच्छ असेल, ती स्वयंप्रकाशी नसेल, तथापि जोंपर्यंत सूर्याचें तेज सहन करण्याचें सामर्थ्य माझ्यामध्ये नाही तोंपर्यंत सूर्यापासून दूर पृथ्वीवर राहूनच मी माझा

विकास करून घेतला पाहिजे. माशाला जर कोणी म्हणेल, ''पाण्यापेक्षा दूध मोलवान् आहे, दुधात रहा,'' तर मासा तें कबूल करील का? मासा पाण्यातच वांचेल, दुधात मरेल.

**13** दुसऱ्याचा धर्म सोपा वाटला म्हणूनहि स्वीकारावयाचा नसतो. पुष्कळ वेळा सोपेपणाचा भासच असतो. संसारात बायकामुलांचें नीट रक्षण करता येत नाही म्हणून कंटाळून जर कोणी गृहस्थ संन्यास घेईल, तर तें ढोंग होईल व जडहि जाईल. संधि सांपडताच त्याच्या वासना जोर करतील. संसाराचें ओझें झेपत नाही म्हणून वनात जाणारा आधी तेथे लहानशी झोपडी बांधील, मग तिच्या रक्षणासाठी तो कुंपण करील. असें करता करता त्याला तेथे सवाई संसार उभा करण्याची पाळी येईल. वैराग्यवृत्ति असेल तर संन्यासातहि कठिण काय आहे? संन्यास सोपा म्हणून सांगणारींहि स्मृतिवचनें तर आहेतच. पण मुख्य मुद्दा वृत्तीचा आहे. ज्याची जी खरी वृत्ति असेल तदनुसार त्याचा धर्म राहील. श्रेष्ठ-कनिष्ठ, सोपें-कठिण, हा प्रश्न नाही. खरा विकास हवा. खरी परिणति हवी.

**14** पण कोणी भाविक विचारतात, ''संन्यास जर युद्ध करण्याच्या धर्माहून केव्हाहि श्रेष्ठच आहे, तर भगवंतांनी अर्जुनाला खरा संन्यासी कां बनविलें नाही? त्यांना काय तें अशक्य होतें?'' त्यांना अशक्य काहीच नव्हतें. पण त्यात अर्जुनाचा पुरुषार्थ तो काय राहिला असता? परमेश्वर मोकळीक देणारा आहे. ज्याने त्याने धडपड करावी. त्यातच गोडी आहे. लहान मुलाला स्वत: चित्र काढण्यात आनंद असतो. त्याचा हात धरलेला त्याला आवडत नाही. शिक्षक जर मुलांना भराभर गणितें सोडवून देऊ लागला तर मुलांची बुद्धि कशी वाढणार? आईबापांनी, गुरूंनी सूचना द्याव्या. परमेश्वर आंतून सूचना देत असतो. ह्याहून अधिक तो काही करीत नाही. देवाने कुंभाराप्रमाणे ठोकून, पिटून किंवा थापून प्रत्येकाचें मडकें तयार करण्यात काय स्वारस्य? आपण मडकीं नाही. आपण चिन्मय आहो.

**15** ह्या सर्व विवेचनावरून एक गोष्ट तुमच्या लक्षात आली असेल की, गीतेचा जन्म स्वधर्माच्या आड येणारा जो मोह, त्याच्या निवारणार्थ आहे. अर्जुन धर्म-संमूढ झाला होता. स्वधर्माच्या बाबतीत त्याला मोह पडला होता. ही गोष्ट कृष्णाने दिलेल्या पहिल्या ठपक्यानंतर अर्जुन स्वत:च कबूल करीत आहे. तो मोह, तें ममत्व, ती आसक्ति दूर करणें हें गीतेचें मुख्य काम. सारी गीता सांगितल्यावर भगवंतांनी प्रश्न केला, ''अर्जुना, गेला मोह?'' अर्जुन म्हणाला, ''देवा, मोह मेला, स्वधर्माचें भान झालें.'' अशा प्रकारें गीतेचा उपक्रम आणि उपसंहार जुळवून पाहिल्यास मोह-निराकरण हेंच फलित निघतें. गीतेचेंच नव्हे, तर महाभारताचेंहि हेंच उद्दिष्ट आहे. व्यासांनी महाभारताच्या आरंभींच म्हटलें आहे की लोकांच्या हृदयांतील मोहावरण घालविण्यासाठी मी हा इतिहास-प्रदीप पेटवीत आहे.

## 4. ऋजु बुद्धीचा अधिकारी

**16** पुढील सर्व गीता समजून घेण्यास अर्जुनाची ही भूमिका आपल्या उपयोगी पडली म्हणून आपण तिचे आभार मानूच. त्याशिवाय आणखीहि तिचा उपकार आहे. अर्जुनाच्या ह्या भूमिकेत त्याच्या मनाची अत्यंत ऋजुता दिसून येत आहे. 'अर्जुन' शब्दाचा अर्थच ऋजु किंवा सरळ स्वभावाचा असा आहे. त्याच्या मनात जे काही विकार आणि विचार आले ते सर्व त्याने मोकळ्या मनाने कृष्णापुढे मांडले. त्याने चित्तात काही शिल्लक ठेवलें नाही आणि शेवटीं तो कृष्णाला शरण गेला. वस्तुत: तो आधीचाच कृष्ण-शरण होता. कृष्णाला सारथि बनवून ज्या वेळेस त्याने आपल्या घोड्यांचे लगाम त्याच्या हातांत दिले, त्याच वेळीं त्याने आपल्या मनोवृत्तींचेहि लगाम त्याच्या हातांत सोंपविण्याची तयारी केली होती. आपणहि असेंच करू या. अर्जुनाजवळ कृष्ण होता, आपल्याला कृष्ण कोठून लाभणार, असें आपण म्हणू नये. कृष्ण म्हणून कोणी एक व्यक्ति आहे अशा ऐतिहासिक उर्फ भ्रामक समजुतीत आपण सांपडू नये. अंतर्यामीरूपाने कृष्ण प्रत्येकाच्या हृदयात विराजमान आहे. जवळात जवळ तोच आहे. आपल्या हृदयातील सर्व खळमळ आपण त्याच्यापुढे मांडू आणि म्हणू, ''देवा, मी तुला शरण आहे. तू माझा अनन्य गुरु आहेस. मला काय तो मार्ग दाखीव. तू दाखवशील त्याच मार्गाने मी जाईन.'' आपण असें करू तर तो पार्थसारथि आपलेंहि सारथ्य करील. आपल्या श्रीमुखाने तो आपल्याला गीता ऐकवील आणि विजय-लाभ करून देईल.

*रविवार, 21-2-'32*

# अध्याय 2

# सर्व उपदेश थोडक्यात : आत्मज्ञान आणि समत्वबुद्धि

## 5. गीतेची परिभाषा

**1** बंधूंनो, मागच्या वेळेस आपण अर्जुनाचा विषाद-योग पाहिला. अर्जुनासारखी ऋजुता आणि हरिशरणता असली म्हणजे विषादाचाहि योग बनतो. ह्यालाच हृदयमंथन म्हणतात. मी गीतेच्या ह्या भूमिकेला संकल्पकारांप्रमाणे अर्जुन-विषादयोग असें विशिष्ट नांव न देता विषाद-योग असें सर्वसामान्य नांव दिलें आहे. कारण गीतेला अर्जुन केवळ एक निमित्त आहे. पंढरीच्या पांडुरंगाचा अवतार पुंडलीकासाठी झाला असें नाही. पुंडलीकाचें निमित्त करून तो आम्हां जडजीवांच्या उद्धारासाठी आज हजारों वर्षें उभा आहे हें आम्ही पाहतो. त्याप्रमाणेच गीतेची दया अर्जुनाच्या निमित्ताने झाली तरी ती आपणां सर्वांसाठी आहे. म्हणून गीतेच्या पहिल्या अध्यायाला विषादयोग हें सामान्य नामच शोभतें. येथून गीतेचा वृक्ष वाढत वाढत शेवटच्या अध्यायातील प्रसादयोगरूप फळाला पोंचणार आहे. ईश्वराची इच्छा असेल तर आपल्या ह्या जेलच्या कारकीर्दीत आपणहि तेथपर्यंत जाऊन पोंचू.

**2** दुसऱ्या अध्यायापासून गीतेच्या शिकवणीस आरंभ झाला आणि आरंभींच भगवान् जीवनाचे महासिद्धांत सांगत आहेत. ज्यांवर जीवन उभारावयाचें तीं जीवनाचीं मुख्य तत्त्वें आधी गळीं उतरलीं म्हणजे पुढचा मार्ग सरळ होऊन जाईल अशी ह्यात दृष्टि आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील सांख्य-बुद्धि ह्या शब्दाचा अर्थ 'जीवनाचे मूलभूत सिद्धांत' असा मी करीत आहे. हे मूळ सिद्धांत आता आपणाला पहावयाचे आहेत. पण तत्पूर्वी ह्या सांख्य शब्दाच्या प्रसंगाने गीतेतील पारिभाषिक शब्दांच्या अर्थाविषयी थोडासा खुलासा करून घेणें बरें होईल.

गीतेला जुने शास्त्रीय शब्द नवीन अर्थाने वापरण्याची सवय आहे. जुन्या शब्दावर नवीन अर्थाचें कलम करणें ही विचारक्रांतीची अहिंसक प्रक्रिया आहे. व्यासांचा ह्या प्रक्रियेत हातखंडा आहे. त्यामुळे गीतेतील शब्दांना व्यापक सामर्थ्य येऊन गीता ताजी टवटवीत राहिली आणि अनेक विचारकांना त्यांच्या त्यांच्या गरजेप्रमाणे आणि अनुभवाप्रमाणे अनेक अर्थ घेता आले. हे सर्व अर्थ त्या त्या भूमिकेवरून योग्य असू शकतात आणि त्यांचा विरोध करण्याची गरज न पडता आपण स्वतंत्र अर्थ करू शकतो अशी माझी दृष्टि आहे.

**3** ह्या संबंधाने उपनिषदात एक सुंदर गोष्ट आहे. एकदा देव, दानव आणि मानव प्रजापतीकडे उपदेशार्थ गेले. प्रजापतीने सर्वांना 'द' हें एकच अक्षर दिलें. देव म्हणाले, ''आम्ही देव कामी, भोगांना चटावलेले. आम्हांला 'द' अक्षराने 'दमन करा' असें प्रजापतीने शिकविलें.'' दानव म्हणाले, ''आम्ही दानव क्रोधी, दयेला पारखे झालेले. आम्हांला 'द' अक्षराने 'दया करा' असें प्रजापतीने शिकविलें.'' मानव म्हणाले, ''आम्ही मानव लोभी, संचयाच्या मागे लागलेले. आम्हांला 'द' अक्षराने 'दान करा' असें प्रजापतीने शिकविलें.'' प्रजापतीने सर्वांचे अर्थ बरोबर मानले. कारण सर्वांना स्वानुभवातून ते लाभले होते. गीतेतील परिभाषेचा अर्थ करतांना उपनिषदातली ही गोष्ट आपण चित्तात बाळगावी.

## 6. जीवन-सिद्धांत – 1. देहाने स्वधर्माचरण

**4** दुसऱ्या अध्यायात जीवनाचे तीन महासिद्धांत मांडले आहेत – (1) आत्म्याची अमरता आणि अखंडता (2) देहाची क्षुद्रता (3) स्वधर्माची अबाध्यता. असे हे तीन सिद्धांत आहेत. ह्यांतील स्वधर्माचा सिद्धांत कर्तव्य-रूप आहे आणि बाकीचे दोन ज्ञातव्य आहेत. स्वधर्माविषयी मी मागच्या खेपेला थोडेसें सांगितलेंच होतें. हा स्वधर्म आपणांस निसर्गत:च प्राप्त होतो. स्वधर्म शोधावा लागत नाही. आपण आकाशातून पडलो व भूमीवर सांवरलो असा काही प्रकार नाही. आपला जन्म होण्यापूर्वी हा समाज होता, आपले आईबाप होते, शेजारी होते. अशा ह्या प्रवाहात आपण जन्मतो. ज्या आईबापांच्या पोटीं मी जन्म घेतला त्यांची सेवा करण्याचा धर्म मला जन्मत:च मिळाला आहे. ज्या समाजात जन्मलो त्या समाजाची सेवा करण्याचा धर्म मला ओघानेच प्राप्त झाला आहे. आपल्या जन्मा-बरोबरच स्वधर्महि जन्मतो, किंवा तो आपल्या जन्माच्या आधीच आपल्यासाठी तयार असतो असेंहि म्हणता येईल. कारण तो आपल्या

जन्माचा हेतु आहे. तो पार पाडण्यासाठी आपण जन्मलो आहो. स्वधर्माला कोणी पत्नीची उपमा देतात, आणि पत्नीचा संबंध ज्याप्रमाणे अविच्छेद्य मानला आहे त्याप्रमाणे स्वधर्माचा संबंध अविच्छेद्य आहे असें वर्णन करतात. मला हीहि उपमा गौण वाटते. मी स्वधर्माला आईची उपमा देतो. माझी आई मला ह्या जन्मात निवडावयाची उरलेली नाही. ती अगाऊचीच सिद्ध आहे. ती कशीहि असो, माझी टळू शकणार नाही. ही स्थिति स्वधर्माची आहे. आपणाला ह्या जगात स्वधर्माशिवाय दुसरा कोणताहि आश्रय नाही. स्वधर्माला टाळू पाहणें म्हणजे 'स्व'लाच टाळू पाहण्यासारखें आत्मघातकीपणाचें आहे. स्वधर्माच्या आश्रयानेच आपण पुढे जाऊ शकतो. म्हणून तो आश्रय कोणी कधीहि सोडू नये, हा जीवनाचा एक मूलभूत सिद्धांत ठरतो.

**5** स्वधर्म हा इतका सहजप्राप्त आहे की माणसाच्या हातून सहज त्याचेंच आचरण व्हावें. पण अनेक प्रकारच्या मोहांमुळे तें होत नाही, अथवा फार मुश्किलीने होतें. आणि झालें तरी त्यात विष कालवलें जातें. स्वधर्माच्या मार्गात कांटे पसरवणाऱ्या मोहाचीं बाह्य रूपें तर असंख्यच आहेत. तथापि त्यांचें विश्लेषण केलें म्हणजे त्या सर्वांच्या मुळाशी जी एक मुख्य गोष्ट दिसून येते ती संकुचित आणि उथळ देहबुद्धि. मी आणि माझ्या शरीर-संबंधाचीं माणसें एवढीच माझी व्याप्ति. ह्यांच्या बाहेरचे सर्व परके, अथवा दुष्मन, अशी भेदाची भिंत ती उभी करते, आणि मी किंवा माझे म्हणून मानलेले जे, त्यांचेंहि ती शरीरच पाहते. देहबुद्धीच्या ह्या दुहेरी कोंडीत सांपडून आपण तऱ्हेतऱ्हेचीं डबकीं निर्माण करू लागतो. बहुतेक सगळे ह्याच कार्यक्रमात असतात. कोणाचीं डबकीं लहान तर कोणाचीं मोठीं. परंतु काही झालें तरी तीं डबकींच. ह्या शरीराच्या चामडीइतकीच त्यांची खोली. कोणी कुटुंबाभिमानाचें डबकें करून राहतो, कोणी देशाभिमानाचें डबकें करून राहतो. ब्राह्मण-ब्राह्मणेतर डबकीं, हिंदु-मुसलमान डबकीं, एक ना दोन, अनंत डबकीं. जिकडे पहाल तिकडे तींच तीं. आपण ह्या जेलमध्ये सुद्धा राजकीय कैदी व इतर कैदी अशीं डबकीं केलींच आहेत. त्याशिवाय आपणांस जगवतच जसें नाही. परंतु ह्याचा परिणाम काय होतो? परिणाम एकच. हीन विचारांचे जंतु आणि स्वधर्मरूप आरोग्याचा नाश.

## 7. जीवन-सिद्धांत – 2. देहातीत आत्म्याचें भान

**6** अशा स्थितीत स्वधर्मनिष्ठा एकाकी पुरी पडत नाही. तिच्यासाठी दुसरे दोन सिद्धांत जागृत ठेवावे लागतात. मी मरतुकडा देह नव्हे, देह केवळ वरचा क्षुद्र पापुद्रा आहे, हा एक सिद्धांत. मी कधीहि न मरणारा, अखंड आणि व्यापक आत्मा आहे, हा दुसरा सिद्धांत. हे दोन्ही मिळून एक पूर्ण तत्त्वज्ञान होतें.

हें तत्त्वज्ञान गीतेला इतकें अगत्याचें वाटतें की गीता त्याचेंच आवाहन आधी करून स्वधर्माचा अवतार मागाहून करते. कोणी म्हणतात, हे तत्त्वज्ञानाचे श्लोक प्रारंभींच कशाला? पण जर गीतेतल्या कोणत्या श्लोकांची जागा मुळीच बदलता येण्यासारखी नसेल तर ती ह्या श्लोकांची असें मला वाटतें.

एवढें तत्त्वज्ञान जर चित्तात ठसलें तर स्वधर्म मुळीच जड जाणार नाही. इतकेंच काय, स्वधर्माहून दुसरें काही करणें जड जाईल. आत्मतत्त्वाची अखंडता आणि देहाची क्षुद्रता ह्या गोष्टी समजण्याला कठिण नाहीत. कारण त्या सत्य वस्तु आहेत. पण त्यांचा विचार केला पाहिजे. त्या वारंवार चित्तात घोळल्या पाहिजेत. ह्या कातडीचें महत्त्व कमी करून आत्म्याला महत्त्व द्यावयास आपण शिकलें पाहिजे.

**7** हा देह तर क्षणाक्षणाला बदलतो आहे. बाल्य, तारुण्य, जरा हें चक्र सर्वांच्या अनुभवाचें आहे. आधुनिक शास्त्रज्ञ तर सांगतात, सात वर्षांत शरीर पार बदलून रक्ताचा जुना थेंब शरीरात शिल्लक राहत नाही. बारा वर्षांत जुनें शरीर मरून जातें असें आपले पूर्वीचे लोक मानीत. आणि प्रायश्चित्तें, तपश्चर्या, अध्ययन इत्यादींच्या मुदती बारा-बारा वर्षांच्या राखीत. पुष्कळ वर्षांच्या वियोगानंतर मुलगा भेटला तर आई त्याला ओळखू शकली नाही, अशा गोष्टी आपण ऐकतो. असा हा प्रतिक्षणीं बदलणारा, प्रतिक्षणीं मरून राहिलेला देह, हें का तुझें रूप? रात्रंदिवस जेथे मलमूत्रांच्या मोऱ्या वाहत आहेत, आणि तुझ्यासारखा खंबीर धुणारा भेटला असून ज्याचें अस्वच्छतेचें व्रत सुटतच नाही, तो का तू? तो अस्वच्छ, तू त्याला स्वच्छ करणारा; तो रोगी, तू त्याला औषधपाणी देणारा; तो साडेतीन हात जागेत पडून राहिलेला, तू त्रिभुवनविहारी; तो नित्य परिवर्तनशील, तू त्याचीं परिवर्तनें पाहणारा; तो मरणारा, आणि तू त्याच्या मरणाचा

व्यवस्थापक. इतका तुझा आणि त्याचा भेद स्पष्ट असतांना, तू संकुचित कसा बनतोस? देहसंबंध तेवढेच माझे काय म्हणतोस, आणि देहाच्या मृत्यूबद्दल शोक तरी काय करतोस? भगवान् विचारतात, ''देहाचा नाश ही का शोक करण्यासारखी वस्तु आहे?''

**8** देह तर वस्त्रासारखा आहे. जुना फाटतो म्हणून नवा घेता तरी येतो. एकच एक देह आत्म्याला कायमचा बिलगून असता तर आत्म्याची धडगत नव्हती. सारा विकास थांबता, आनंद लोपता, ज्ञानप्रभा मंदावती. म्हणून देहाचा नाश शोचनीय नव्हे. आत्म्याचा नाश होत असता तर ती फार शोचनीय गोष्ट झाली असती. पण तो तर अविनाशी आहे. आत्मा एक अखंड वाहता झरा आहे. त्यावर अनेक देह येतात आणि जातात. म्हणून देहाच्या नात्यात व गोत्यात सांपडून शोक करणें, किंवा हे माझे आणि हे परके असे तुकडे पाडणें अत्यंत गैर आहे. ब्रह्मांड एक सुंदर विणलेलें सणंग आहे. लहान मूल कात्री हातात घेऊन सणंगाचे तुकडे करतें, त्याप्रमाणे देहाएवढी कात्री घेऊन ह्या विश्वात्म्याचे तुकडे करणें हा केवढा पोरकटपणा आणि केवढी हिंसा!

खरोखर फार खेदाची गोष्ट आहे की ज्या भरत-भूमीत ब्रह्मविद्या जन्मास आली, त्याच ह्या भूमीत लहानमोठ्या गटांचा आणि जातींचा नुसता बुजबुजाट दिसून येत आहे. आणि मरणाचा तर एवढा डर भरून राहिला आहे की तेवढा क्वचितच कोठे असेल. दीर्घकालीन पारतंत्र्याचा हा परिणाम आहे यात शंका नाही. पण तो त्या पारतंत्र्याचें एक कारणहि आहे हें विसरून चालणार नाही.

**9** मरण हा तर शब्दहि आम्हांला सहन होत नाही. मरणाचें नांव काढणें अभद्र वाटतें. **'अगा मर हा बोल न साहती। आणि मेलिया तरी रडती ।।'** असें ज्ञानदेवांना दुःखाने लिहावें लागलें आहे. कोणी मेलें तर काय तें रडणें आणि काय तें ओरडणें! आम्हांला तें जणू कर्तव्यच वाटतें. रडणारे मजुरीने बोलावण्यापर्यंत मजल आहे. मरण जवळ आलें तरी रोग्याला सांगणार नाहीत. डॉक्टरने जरी सांगितलें की हा वांचत नाही, तरी रोग्याला भ्रमात राखतील. डॉक्टरहि स्पष्ट सांगायचा नाही आणि शेवटपर्यंत औषध घशात ओतीत रहायचा. सत्य सांगून धीर देऊन ईश्वर-स्मरणाकडे वळवतील तर किती उपकार होईल! पण ह्यांना धास्ती की धक्का लागून मडकें आधीच फुटलें तर? पण फुटायच्या आधी का मडकें फुटायचें होतें? आणि दोन तासांनी फुटायचें तें थोडें आधी फुटलें म्हणून तरी काय झालें? ह्याचा अर्थ आपण कठोर आणि प्रेमशून्य व्हावें असा नाही. पण देहासक्ति हें प्रेम नव्हे. उलट देहासक्ति दूर सारल्याशिवाय खऱ्या प्रेमाचा उदयच होत नाही.

देहासक्ति जाईल तेव्हा देह हें सेवेचें साधन आहे ही गोष्ट कळेल, आणि मग देहाला त्याची योग्य प्रतिष्ठाहि लाभेल. परंतु आज देहाची पूजा हें आपण साध्य मानून राहिलो आहो. स्वधर्माचरण हें साध्य आहे ही गोष्ट आपण विसरूनच गेलो आहो. स्वधर्माचरणासाठी देहाला सांभाळलें पाहिजे, त्याला खायला-प्यायला दिलें पाहिजे. परंतु जिभेचे चोचले पुरविण्याची गरज नाही. पळी श्रीखंडात बुडवा कीं पिठल्यात बुडवा, तिला सुखदुःख नाही. तसें जिभेचें व्हायला पाहिजे. तिला रस-ज्ञान हवें, पण सुखदुःख नको. शरीराचें भाडें शरीराला देऊन टाकलें म्हणजे झालें. चरख्याकडून सूत कांतवून घ्यायचें आहे म्हणून त्याला तेल द्यायला हवें. तसें शरीरापासून काम घ्यायचें म्हणून त्यात कोळसा घालायचा. अशा रीतीने देह वापरला म्हणजे तो मूळचा क्षुद्र असला तरी किंमतीला चढू शकतो आणि त्याला प्रतिष्ठा लाभू शकते.

**10** पण देहाला साधन म्हणून न वापरता आम्ही त्या देहात बुडून आत्मसंकोच करून घेतो. त्यामुळे मूळचा क्षुद्र असलेला देह अधिकच क्षुद्र बनतो. म्हणून संत निकराने सांगतात, **'देह आणि देहसंबंधें निंदावीं; इतरें वंदावीं श्वानसूकरें ।'** अरे, देहाची आणि देहाशी ज्यांचा संबंध आला त्यांचीच नको तिन्हीत्रिकाळ पूजा करू. इतरांना ओळखायला शीक. संत आम्हांला अशा रीतीने व्यापक व्हावयास सांगत आहेत. आम्ही आपल्या आप्तेष्ट-मित्रांशिवाय इतरांजवळ स्वतःचा आत्मा थोडा घेऊन जातो का? **'जीव जीवांत घालावा, आत्मा आत्म्यांत मिसळावा'** असें आम्ही करतो का? आमच्या आत्म-हंसाला ह्या पिंजऱ्याच्या बाहेरची हवा दाखवितो का? माझ्या मानीव वर्तुळाला भेदून काल मी दहा नवे मित्र केले, आज पंधरा झाले, उद्या पन्नास होतील आणि असें करीत करीत एक दिवस सर्व विश्वच माझें आणि मी सर्व विश्वाचा असा अनुभव घेईन, असें येतें का कधी मनात? आम्ही तुरुंगातून नातेवाईकांना पत्र पाठवतो यात विशेष काय? पण तुरुंगातून सुटलेला एखादा नवीन मित्र – राजकीय कैदी नव्हे, चोर कैदी – त्याला पाठवाल का पत्र?

**11** आमचा आत्मा व्यापक होण्यासाठी तडफडत असतो. सर्व जगाला मिठी मारावी असें त्याला वाटत असतें. परंतु आम्ही त्याला कोंडतो. आत्म्याला आम्ही कैद करून ठेवलें आहे. आम्हांला त्याची स्मृतिच होत नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत देहाचीच सेवा. ह्या देहाची पुष्टि किती वाढली आणि किती विरघळली हाच विचार. दुसरा जणू आनंदच नाही. भोगाचा आणि स्वादाचा आनंद तर पशुहि उपभोगतात. आता त्यागाचा आणि स्वाद तोडण्याचा आनंद बघशील कीं नाही? स्वत:ला भूक असतांना भरलेलें ताट दुसऱ्या भुकेलेल्यास देण्यात काय आनंद असतो तें अनुभव. त्यातील गोडी चाख. आई जेव्हा मुलासाठी झिजते तेव्हा तिला ही गोडी अत्यल्प चाखायला सांपडते. मनुष्य 'माझें' म्हणून जें संकुचित वर्तुळ बनवीत असतो त्यात सुद्धा न कळत आत्मविकासाची गोडी चाखण्याचा उद्देश असतो. त्याने देहात गुंडाळलेला आत्मा थोडासा आणि थोडा वेळ बाहेर येतो. पण हें बाहेर येणें कसें? जसें जेलच्या कोठडीतल्या कैद्याचें कामानिमित्त जेलमधल्या अंगणात येणें. पण आत्म्याचें काम तेवढ्याने भागत नाही. आत्म्याला मुक्तानंद हवा आहे.

**12** सारांश, (1) अधर्म आणि परधर्म ह्या आडवाटा वर्जून साधकाने स्वधर्माचा सहज आणि सरळ मार्ग धरावा. स्वधर्माची कास कधीहि सोडू नये. (2) देह क्षणभंगुर आहे हें लक्षात घेऊन तो स्वधर्मकारणीं वापरावा, आणि स्वधर्मकारणींच जरूर तेव्हा फेकून द्यावा. (3) आत्म्याच्या अखंडतेचें आणि व्यापकतेचें भान सतत जागृत राखून चित्तातून स्व-पर-भेद काढून टाकावा. हे जीवनाचे मुख्य सिद्धांत भगवान् सांगत आहेत. ते आचरणात आणणारा मनुष्य एक दिवस **'नरदेहाचेनि साधनें, सच्चिदानंदपदवी घेणें'** हा अनुभव हस्तगत करील ह्यात शंका नाही.

## 8. दोहोंचा मेळ साधण्याची युक्ति : फलत्याग

**13** भगवंतांनी जीवनाचे सिद्धांत सांगितले खरे. पण नुसते सिद्धांत सांगून कार्य पुरें होत नाही. गीतेतील हे सिद्धांत उपनिषदांतून आणि स्मृतींतून पूर्वी आलेलेच होते. गीतेने तेच पुन्हा मांडले यात गीतेची अपूर्वता नाही. हे सिद्धांत आचरणात कसे आणायचे हें सांगण्यात गीतेची अपूर्वता आहे. हा महाप्रश्न सोडविण्यात गीतेची कुशलता आहे.

जीवनाचे सिद्धांत अंमलात आणण्याची जी हातोटी किंवा युक्ति, तिलाच योग म्हणतात. सांख्य म्हणजे सिद्धांत किंवा शास्त्र, आणि योग म्हणजे कला. **'योगियां साधली जीवनकळा'** म्हणून ज्ञानदेव ग्वाही देतच आहेत. गीता सांख्य व योग, शास्त्र व कला, दोहोंनी परिपूर्ण आहे. शास्त्र व कला, दोहोंनी मिळून जीवनसौंदर्य खुलतें. नुसतें शास्त्र हवेत रहायचें. संगीताचें शास्त्र समजलें तरी गळ्यांतून संगीत प्रकट करण्याची कला साधल्याशिवाय नादब्रह्म समजावयाचें नाही. ह्यासाठी भगवंतांनी सिद्धांता-बरोबर त्यांचा विनियोग शिकविणारी कलाहि सांगितली आहे. कोणती बरे ही कला? देह तुच्छ मानून आत्म्याची अमरता व अखंडता लक्षात आणून स्वधर्म आचरण्याची कोणती ही कला?

कर्म करणारांची दुहेरी वृत्ति असते. आम्ही कर्म केलें तर त्या कर्माचें फळ आम्ही अवश्य चाखणार, आमचा तो अधिकार आहे, ही एक वृत्ति. आणि उलटपक्षीं आम्हांला फळ चाखायला मिळणार नसेल तर आम्ही कर्म करीतच नाही, ही दुसरी वृत्ति. गीता तिसरीच वृत्ति सांगते. गीता म्हणते, ''कर्म तर कराच. पण फळाचा अधिकार राखू नका.'' कर्म करणाराला फळाचा अधिकार आहे. पण तो तुमचा अधिकार स्वेच्छेने सोडून द्या. रजोगुण म्हणतो, घेईन तर फळासकट घेईन. तमोगुण म्हणतो, टाकीन तर कर्मासकट टाकीन. दोन्ही एकमेकांचे भाऊच आहेत. दोहींच्या वर जाऊन शुद्ध सत्त्वगुणी व्हा. कर्म करून फळ सोडा, आणि फळ सोडून कर्म करा. पुढे किंवा मागे कुठेच फलाशा ठेवू नका.

**14** फलाशा ठेवू नका असें सांगतांना कर्म उत्कृष्ट झालें पाहिजे असें गीता बजावीत आहे. सकाम पुरुषाच्या कर्मापेक्षा निष्काम पुरुषाचें कर्म अधिक चांगलें झालें पाहिजे, ही अपेक्षा योग्यच आहे. कारण सकाम पुरुष फलासक्त असल्यामुळे फळाविषयीच्या स्वप्नचिंतनात त्याचा थोडाबहुत कालक्षय आणि शक्तिक्षय होणारच. परंतु फलेच्छारहित पुरुषाचा प्रत्येक क्षण आणि सर्व शक्ति कर्मातच उपयोजिली जाणार. नदीला सुटी नाही. वाऱ्याला विसावा नाही. सूर्याला सदैव जळणेंच माहीत. त्याप्रमाणे निष्काम कर्त्याला सतत सेवाकर्मच माहीत. अशा निरंतर कर्मरत असणाऱ्या पुरुषाचें कर्म उत्कृष्ट होणार नाही तर कोणाचें होणार? शिवाय चित्ताचें समत्व हा एक मोठाच कुशल गुण आहे, आणि तो तर निष्काम पुरुषाच्या मालकी हक्काचा आहे. एखादें अगदी बाह्य कारागिरीचें काम घेतलें तरी त्यातहि

हस्तकौशल्याबरोबर चित्ताच्या समत्वाची जोड असली तर काम अधिक सुंदर होणार ही गोष्ट उघड आहे. बरें, सकाम आणि निष्काम पुरुषाच्या कर्मदृष्टीत जो फरक आहे तोहि निष्काम पुरुषाच्या कर्माला अधिक अनुकूल आहे. सकाम पुरुष कर्माकडे स्वार्थी दृष्टीने पाहत असतो. माझेंच कर्म आणि माझेंच फळ. त्यामुळे कर्मात थोडें दुर्लक्ष झालें तरी त्याला तो नैतिक दोष वाटत नाही. फार तर व्यावहारिक दोष वाटतो. पण निष्काम पुरुषाची स्वकर्माविषयी नैतिक कर्तव्य-बुद्धि असल्यामुळे त्यात यत्किंचित् उणीव राहू नये, याविषयी तो तीव्रतेने जपत असतो. म्हणूनहि त्याचें कर्म अधिक निर्दोष राहील. कसेंहि पहा, फलत्याग हें अत्यंत कुशल व यशस्वी तत्त्व ठरतें. म्हणून फलत्याग हा योग किंवा जीवनाची कला म्हणावयाची.

**15** निष्काम कर्माची गोष्ट बाजूला ठेवली तरी एरव्हीसुद्धा प्रत्यक्ष कर्मात जो आनंद आहे तो त्याच्या फळात नाही. स्वकर्म करीत असतांना त्यात जी एक प्रकारची तन्मयता असते तो आनंदाचा झरा आहे. चित्रकाराला म्हणा, 'तू चित्र काढू नको, चित्र न काढण्याबद्दल तुला लागेल तो पैसा देऊ.' तो ऐकणार नाही. शेतकऱ्याला म्हणा, 'तू शेतात जाऊ नको, गुरें चारू नको, मोट हाकू नको, आम्ही तुला लागेल तेवढें धान्य देऊ.' तो जर हाडाचा शेतकरी असेल तर त्याला हा सौदा पटणार नाही. शेतकरी सकाळीं शेतात जातो. सूर्यनारायण त्याचें स्वागत करतो. पांखरें त्याच्यासाठी गाणीं गातात. गाईवासरें सभोंवती असतात. तो कौतुकाने त्यांना गोंजारतो. लावलेलीं झाडें बघतो. ह्या सर्व कार्यांत एक सात्त्विक आनंद आहे. हा आनंद हेंच त्या कर्माचें मुख्य आणि खरें फळ आहे. त्या मानाने त्याचें बाह्य फळ अगदीच गौण आहे.

गीता जेव्हा मनुष्याची कर्म-फलावरून दृष्टि खेंचून घेते तेव्हा ती ह्या युक्तीने त्याची कर्मातील तन्मयता शतगुणित करते. फलनिरपेक्ष पुरुषाची कर्मातील तन्मयता समाधीच्या कोटीची असते. त्यामुळे त्याचा आनंद इतरांहून शतगुणित असतो. अशा दृष्टीने पाहिलें म्हणजे निष्काम कर्म हें स्वत:च महान् फळ आहे हें लक्षात येतें. ''झाडाला फळें लागतात; परंतु फळाला आणखी कोणतें फळ लागणार?'' असें ज्ञानदेवांनी ठीकच विचारलें आहे. ह्या देहाच्या वृक्षाला निष्काम स्वधर्माचरणासारखीं सुंदर फळें लागल्यावर आणखी कोणत्या फळाची आणि कां अपेक्षा राखावी? शेतकऱ्याने शेतात गहूं पिकवून, ते गहूं विकून, ज्वारीची भाकर कां खावी? केळ्यांचा रसाळ मळा करून, तीं केळीं विकून मिरच्या कां खाव्या? अरे, तीं केळींच खा. पण लोकमताला हें कबूल नाही. केळीं खाण्याचें भाग्य असून लोक मिरच्याच खात बसतील. गीता सांगते, असें करू नका. कर्मच खा. कर्मच प्या. कर्मच पचवा. कर्म करणें यातच सारें काही आलें. मुलगा खेळण्याच्या आनंदासाठी खेळतो. त्यामुळे व्यायामाचें फळ त्याला सहजच मिळतें. परंतु त्या फळाकडे त्याचें लक्ष नसतें. त्याचा सर्व आनंद त्या खेळात असतो.

## 9. फलत्यागाचीं दोन उदाहरणें

**16** संतांनी आपल्या जीवनात हें दाखविलें आहे. तुकारामांची भक्ति पाहून शिवाजीमहाराजांना त्यांच्याविषयी फार आदर वाटे. एकदा त्यांनी तुकारामांकडे पालखी वगैरे पाठवून त्यांचें स्वागत आरंभिलें. तुकारामांना ही आपल्या स्वागताची तयारी पाहून तीव्र दु:ख झालें. त्यांनी आपल्या मनात विचार केला, 'हें का माझ्या भक्तीचें फळ? ह्यासाठी का मी देवाची भक्ति करीत असतो?' मानसन्मानाचें फळ हातावर ठेवून देव जणू आपणांस दूर करू पाहत आहे असें त्यांना भासलें. ते म्हणाले –

**'जाणोनि अंतर । टाळिसील करकर ।**
**तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ।।**

– ''देवा, ही तुझी खोड बरी नाही. तू असली चिरीमिरी देऊन मला घालवू पाहत असशील. ह्याची ब्याद दारातून एकदाची जाऊ दे, असें मनात म्हणत असशील. परंतु मी कच्चा नाही. मी तुझे पाय घट्ट धरून बसेन.'' भक्ति हा भक्ताचा स्वधर्म. आणि भक्तीला अवांतर फळांचे फाटे फुटू न देणें ही त्याची जीवनकला.

**17** पुंडलीकाचें चरित्र फलत्यागाचा ह्याहूनहि खोल आदर्श दाखवितें. पुंडलीक आईबापांची सेवा करीत होता. त्या सेवेने प्रसन्न होऊन पांडुरंग त्याच्या भेटीस धावून आला. परंतु पांडुरंगाच्या नादीं लागून हातातील सेवा सोडण्याचा

त्याने इनकार केला. ती आईबापांची सेवा म्हणजे त्याची जिव्हाळ्याची ईश्वरभक्ति होती. एखादा मुलगा इतरांस लुटून आईबापांस सुखवीत असेल, किंवा एखादा देशसेवक अन्य देशांचा द्रोह करून स्वदेशाचा उत्कर्ष इच्छीत असेल, तर त्या दोघांचीहि ती भक्ति होणार नाही; आसक्ति होईल. पुंडलीक अशा आसक्तीत नव्हता. देवाची मूर्ति समोर उभी राहिली, तोच का तेवढा परमेश्वर? तें रूप दिसण्यापूर्वी सृष्टि का मढें होती? पुंडलीक देवाला म्हणाला, ''देवा, तू देव माझ्या भेटीसाठी आला आहेस हें मी ओळखलें. पण मी 'हि-सिद्धांत' मानणारा आहे. तूच देव हें मी कबूल करीत नाही. तूहि देव आहेस आणि हे आईबापहि मला देव आहेत. ह्यांच्या सेवेत मी असतांना तुझ्याकडे मला लक्ष देता येत नाही ह्याबद्दल तू मला क्षमा कर.'' असें म्हणून त्याने एक वीट देवाला उभें राहण्यासाठी पुढे मांडली आणि स्वत: आपल्या सेवाकर्मात मग्न झाला. तुकाराम कौतुकाने आणि विनोदाने म्हणतात –

**'कां रे प्रेमें मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ।**
**ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ।।'**

**18** पुंडलीकाने वापरलेला हा 'हि-सिद्धांत' फलत्यागाच्या युक्तीचें एक अंग आहे. फलत्यागी पुरुषाची कर्म-समाधि खोल, तशी वृत्ति व्यापक, उदार आणि सम असते. त्यामुळे तो नाना तत्त्वज्ञानांच्या जंजाळात सांपडत नाही आणि स्वत:चें सोडीत नाही. **'नान्यदस्तीति वादिन:'** – 'हेंच आहे, दुसरें नाहीच' असा वाद तो घालीत नाही. 'हेंहि आहे आणि तेंहि आहे. पण माझ्यापुरतें हेंच आहे' अशी त्याची नम्र आणि निश्चयी वृत्ति राहते. एकदा एका साधूकडे एक गृहस्थ गेला आणि त्याला त्याने विचारलें, 'मोक्षासाठी का घर सोडावेंच लागतें?' साधु म्हणाला, 'कोण म्हणतो? जनकासारख्यांनी राजवाड्यात राहून मोक्ष जोडला. मग तुलाच घर सोडण्याची काय जरूर?' पुढे दुसरा एक गृहस्थ आला आणि साधूला त्याने विचारलें, 'महाराज, घर सोडल्याशिवाय मोक्ष मिळेल का हो?' साधु म्हणाला, 'कोण म्हणतो? घरात राहून सुखासुखी मोक्ष मिळता तर शुकासारख्यांनी गृहत्याग केला, ते काय मूर्ख होते?' पुढे त्या दोघां गृहस्थांची गांठ पडली व त्यांचें भांडण जुंपलें. एक म्हणे, साधूने घर सोडायला सांगितलें. दुसरा म्हणाला, घर सोडण्याची गरज नाही असें सांगितलें. दोघे साधूकडे आले. साधु म्हणाला, ''दोन्ही गोष्टी बरोबर आहेत. ज्याची जशी वृत्ति तसा त्याला मार्ग, आणि ज्याचा जसा प्रश्न तसें त्याला उत्तर. घर सोडण्याची गरज नाही हेंहि खरें; आणि घर सोडण्याची गरज आहे हेंहि खरें.'' ह्याचें नांव 'हि-सिद्धांत.'

**19** पुंडलीकाच्या उदाहरणावरून फलत्याग कोणती मजल गांठणारा आहे हें दिसून येतें. तुकारामाला देव जी चिरीमिरी देऊ पाहत होता त्यापेक्षा पुंडलीकाला देऊ केलेली चिरीमिरी अतिच मोहक समजली पाहिजे. पण तिलाहि तो भुलला नाही. भुलता तर फशीं पडता. एकदा साधननिश्चय झाला म्हणजे शेवटपर्यंत तें साधन आचरीत राहिलें पाहिजे. मध्यंतरीं देवदर्शन का आडवें येईना, त्यासाठी साधन सोडण्याची गरज असता कामा नये. देह जर उरला आहे तर तो साधनासाठीच आहे. देवदर्शन हातचेंच आहे. तें कोठे जातें? **'सर्वात्मकपण माझें हिरोनि नेतो कोण?'** **'मनीं भक्तीची आवडी'** – तीच पुरी करण्यासाठी हा जन्म आहे. **'मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि'** ह्या गीतावचनाचा अर्थ, निष्काम कर्म करीत असता अकर्माची म्हणजे अंतिम कर्ममुक्तीची, म्हणजे मोक्षाचीहि वासना राखू नको, येथपर्यंत अपेक्षित आहे. वासनेतून सुटका हाच मोक्ष. मोक्षाला वासनेची काय गरज आहे? फलत्यागाने ही मजल गांठली म्हणजे जीवनकलेची पूर्णिमा साधली.

## 10. आदर्श गुरुमूर्ति

**20** शास्त्र सांगितलें. कला सांगितली. तरी तेवढ्याने संपूर्ण चित्र डोळ्यांपुढे उभें राहत नाही. शास्त्र निर्गुण आहे. कला सगुण आहे. पण सगुणहि साकार झाल्याशिवाय व्यक्त होत नाही. नुसतें निर्गुण जसें हवेत राहतें तसें निराकार सगुणाचेंहि होऊ शकतें. गुण ज्याच्या ठायीं मूर्तिमंत झाला त्या गुणीचें दर्शन हाच ह्यावर उपाय आहे. म्हणून अर्जुन म्हणतो, ''देवा, जीवनाचे मुख्य सिद्धांत सांगितलेस. ते सिद्धांत आचरणात कसे आणावयाचे ती कलाहि सांगितलीस. तरी मला स्पष्ट कल्पना येत नाही. मला आता चरित्र ऐकायला हवें आहे. सांख्यनिष्ठा ज्याच्या बुद्धीत स्थिर झाली आहे, फलत्यागरूप योग ज्याच्या जीवनात मुरला आहे, अशा पुरुषाचीं लक्षणें मला सांग. फलत्यागाची पूर्ण खोली

दाखविणारा, कर्मसमाधीत मग्न झालेला, निश्चयाचा महामेरु – ज्याला स्थितप्रज्ञ म्हणावयाचें, तो बोलतो कसा, बसतो कसा, चालतो कसा, असें सर्व मला सांग. कशी असते ती मूर्ति? ती कशी ओळखावी? सांग, देवा!''

**21** ह्यासाठी भगवंतांनी दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं अठरा श्लोकांत स्थितप्रज्ञाचें गंभीर आणि उदात्त चरित्र वर्णिलें आहे. ह्या अठरा श्लोकांत गीतेच्या अठरा अध्यायांचें जणू सारच सांठविलें आहे. स्थितप्रज्ञ गीतेची आदर्शमूर्ति आहे. तो शब्दहि गीतेचा स्वतंत्र आहे. पुढे पांचव्या अध्यायात जीवन-मुक्ताचें, बाराव्यात भक्ताचें, चौदाव्यात गुणातीताचें, आणि अठराव्यात ज्ञाननिष्ठाचें असेंच वर्णन आलें आहे. पण त्याहून स्थितप्रज्ञाचें वर्णन अधिक विस्ताराने आणि खुलासेवार केलें आहे. त्यात सिद्ध-लक्षणाबरोबर साधक-लक्षणहि दाखविलें आहे. हजारों सत्याग्रही स्त्रीपुरुष सायंप्रार्थनेमध्ये हीं लक्षणें म्हणत असतात. प्रत्येक गांवात आणि प्रत्येक घरात तीं पोंचविता आलीं तर किती आनंद होईल! पण आधी तीं आपल्या हृदयात ठसतील तेव्हा बाहेर सहजच पोंचतील. रोज म्हटली जाणारी वस्तु यांत्रिक झाली तर चित्तात ठसण्याऐवजी पुसली जायची. पण हा नित्यपाठाचा दोष नसून मनन नसल्याचा दोष आहे. नित्यपाठाबरोबर नित्य मनन आणि नित्य आत्मपरीक्षण आवश्यक आहे.

**22** स्थितप्रज्ञ म्हणजे स्थिर बुद्धीचा मनुष्य, हें तर त्याचें नांवच सांगत आहे. पण संयमाशिवाय बुद्धि स्थिर कशी व्हावयाची? म्हणून स्थितप्रज्ञ संयममूर्ति वर्णिला आहे. बुद्धि आत्मनिष्ठ, आणि अंतर्बाह्य इंद्रियें बुद्धीच्या हातात, हा संयमाचा अर्थ. स्थितप्रज्ञ सर्वेंद्रियांना लगाम घालून तीं कर्मयोगात राबवतो. इंद्रियरूप बैलांकडून तो निष्काम स्वधर्माचरणाची शेती सुव्यवस्थित करून घेतो. त्याचा प्रत्येक श्वासोच्छ्वास तो परमार्थात खर्च करीत असतो.

**23** हा इंद्रिय-संयम सोपा नाही. इंद्रियें अजीबात न वापरणें एकपरी सोपें होऊ शकेल. मौन, निराहार इत्यादि गोष्टी तितक्या जड नाहीत. उलट इंद्रियें स्वैर सोडणें तर सर्वांना साधतेंच आहे. परंतु कासव ज्याप्रमाणे धोक्याच्या जागीं अवयव संपूर्णपणें आंत ओढून घेतो आणि बिनधोक्याच्या जागीं ते वापरतो, त्याप्रमाणे विषयभोगांतून इंद्रियें आवरून घेणें आणि परमार्थकार्यांत त्यांचा योग्य उपयोग करणें हा संयम बिकट आहे. त्यासाठी महान् प्रयत्न पाहिजे. ज्ञानहि पाहिजे. पण इतकेंहि करून तो सर्वदा नीट साधेलच असें नाही. मग काय निराश व्हावें? नाही. साधकाने निराश कधीच होऊ नये. त्याने आपली साधकाची सर्व युक्ति वापरून ती कमी पडेल तेथे भक्तीची जोड द्यावी, अशी फार मोलाची सूचना ह्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणांत भगवंतांनी देऊन ठेवली आहे. ही सूचना अगदी मोजक्या शब्दांत दिली आहे. पण भाराभर व्याख्यानांपेक्षा ती अधिक किंमतीची आहे. कारण भक्तीची जेथे नेमकी गरज, तेथेच ती उपस्थित केली आहे. स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचें सविस्तर विवरण आज आपणाला येथे करावयाचें नाहीं, पण आपल्या सर्व साधनेत भक्तीची ही नेमकी जागा आपण विसरू नये म्हणून तिकडे लक्ष वेधून घेतलें. पूर्ण स्थितप्रज्ञ ह्या जगात कोण होऊन गेला तें हरीलाच माहीत. पण सेवापरायण स्थितप्रज्ञाचें उदाहरण म्हणून पुंडलीकाची मूर्ति नेहमी माझ्या डोळ्यांसमोर येत असते. ती मी मांडलीच आहे.

**24** झालें. स्थितप्रज्ञाचीं लक्षणें संपलीं. आणि दुसरा अध्यायहि समाप्त झाला.

(निर्गुण) सांख्यबुद्धि + (सगुण) योगबुद्धि + (साकार) स्थितप्रज्ञ

मिळून

*संपूर्ण जीवन-शास्त्र*

ह्यातून फलित ब्रह्मनिर्वाण, उर्फ मोक्ष, ह्याशिवाय दुसरें काय असणार?

***रविवार, 28-2-'32***

# अध्याय 3

# कर्मयोग

### 11. फलत्यागी अनंत फळ मिळवितो

**1** बंधूंनो, दुसऱ्या अध्यायात आपण संपूर्ण जीवन-शास्त्र पाहिलें. तिसऱ्या अध्यायात याच जीवनशास्त्राचें स्पष्टीकरण आहे. पूर्वी तत्त्वें पाहिलीं. आता तपशील पहावयाचा. मागील अध्यायात कर्मयोगासंबंधी विवेचन केलें होतें. कर्मयोगात फलत्याग ही महत्त्वाची वस्तु आहे. आता प्रश्न असा की कर्मयोगात फलत्याग आहे, पण मग फळ मिळतें कीं नाही? तिसरा अध्याय सांगतो, कर्माच्या फळाचा त्याग केल्याने कर्मयोगी अनंतपट फळ मिळवितो.

मला लक्ष्मीची गोष्ट आठवते. तिचें होतें स्वयंवर. सारे देव-दानव आशेने आले होते. लक्ष्मीने पण जाहीर केला नव्हता. सभामंडपात ती आली आणि म्हणाली, ''ज्याला माझी इच्छा नसेल त्याला मी माळ घालणार आहे.'' ते तर सारे लालचावलेले होते. मग लक्ष्मी निरिच्छ वर शोधीत निघाली. शेषावर शांत पडलेली भगवान् विष्णूची मूर्ति तिला दिसली. विष्णूच्या गळ्यात माळ घालून त्यांचे चरण चुरीत ती अद्याप बसलीच आहे. **'न मागे तयाची रमा होय दासी'** हीच तर खुबी आहे.

**2** सामान्य मनुष्य आपल्या फळाभोंवती कुंपण घालतो. अनंत मिळणारें फळ अशामुळे तो गमावून बसतो. सांसारिक मनुष्य अपार कर्म करून अल्प फळ मिळवितो, आणि कर्मयोगी थोडेंसें करूनहि अनंतपट मिळवितो. हा फरक केवळ एका भावनेने होतो. टॉलस्टॉयने एके ठिकाणीं लिहिलें आहे, ''लोक ख्रिस्ताच्या त्यागाची स्तुति करतात. परंतु हे सांसारिक जीव रोज किती रक्त आटवतात, आणि काबाडकष्ट करतात! पक्क्या दोन गाढवांचा भार पाठीवर घेऊन आटाआटी करणारे हे सांसारिक जीव, यांना ख्रिस्तापेक्षा किती अधिक कष्ट! ख्रिस्तापेक्षा किती अधिक यांचे हाल! ह्यांच्या निम्मे कष्ट आणि हाल जर हे देवासाठी सोसतील तर ख्रिस्ताहून मोठे होतील.''

**3** सांसारिक मनुष्याची तपस्या मोठी असते; परंतु ती क्षुद्र फळासाठी असते. जशी वासना तसें फळ. आपल्या वस्तूची जी आपण किंमत करू, तिच्यापेक्षा त्या वस्तूची अधिक किंमत जगात होत नसते. सुदामदेव भगवंताकडे पोहे घेऊन गेले. त्या मूठभर पोह्यांची किंमत पैहि नसेल, परंतु सुदाम्याला ते अमोल वाटत होते. त्या पोह्यांत भक्तिभाव होता. ते मंतरलेले पोहे होते. त्या पोह्यांच्या कणाकणात भावना होती. लहानशी वस्तु, परंतु मंत्राने तिचें मोल, सामर्थ्य वाढतें. नोटेचें वजन कितीसें असेल? शिलगावली तर थेंबभरहि पाणी तापणार नाही. परंतु त्या नोटेवर शिक्का असतो. त्या शिक्क्यामुळे तिची किंमत.

कर्मयोगात हीच सारी खुबी आहे. कर्म हें नोटेप्रमाणे आहे. भावनेच्या शिक्क्याला किंमत आहे. कर्माच्या कपट्याला नाही. मी हें एक प्रकारें मूर्तिपूजेचेंच रहस्य सांगत आहे. मूर्तिपूजेच्या कल्पनेत फार सौंदर्य आहे. या मूर्तीचे कोण तुकडे करील? ही मूर्ति प्रथम तुकडाच होती. मी तिच्यात प्राण ओतला, माझी भावना ओतली. या भावनेचे का तुकडे करता येतात? तुकडे दगडाचे होतात, भावनेचे नाही. मी माझी भावना जेव्हा मूर्तीतून काढून घेईन तेव्हाच तेथे दगड उरेल व मग त्याचे तुकडे उडतील.

**4** कर्म म्हणजे दगड, कपटा, चिटोरें. आईने वेड्यावांकड्या चार ओळी कपट्यावर लिहून पाठविल्या, आणि दुसऱ्या कोणी पन्नास पानांचें सटरफटर पुडकें लिहून पाठविलें, तर वजन कशाचें अधिक? आईच्या त्या चार ओळींत जो भाव आहे तो अमोल आहे, पवित्र आहे. त्याची सर त्या दुसऱ्या रद्दीला येणार नाही. कर्मात ओलावा हवा. भावना हवी. आपण मजुरांच्या कामाची किंमत करतो व 'हे पैसे घेऊन जा' असें म्हणतो. परंतु दक्षिणेचें तसें नाही. दक्षिणा भिजवून द्यावी लागते. दक्षिणा किती दिली हा प्रश्न नाही. त्या दक्षिणेत ओलावा आहे का, ही महत्त्वाची वस्तु आहे. मनुस्मृतीत मोठी मौज केली आहे. बारा वर्षे गुरुगृहीं राहून पशूचा मनुष्य झालेला शिष्य. त्याने गुरूला काय द्यावें? पूर्वी आधी फी

घेत नसत. बारा वर्षें शिकल्यावर जें द्यावेंसें वाटेल तें द्यावें अशी पद्धत होती. मनु सांगतात, ''दे गुरूला एखादें फूल, एखादा पंखा, एखादा खडावांचा जोड, एखादा पाण्याने भरलेला कलश.'' ही काही थट्टा नाही. जें द्यावयाचें तें श्रद्धेचें चिह्न म्हणून द्यावयाचें. फुलाला वजन नाही. परंतु त्यातील भक्तीला ब्रह्मांडाचें वजन आहे.

**'रुक्मिणीनें एक्या तुळसीदळानें गिरिधर प्रभु तुळिला ।'**

सत्यभामेच्या खंडीभर दागिन्यांनी काम झालें नाही. परंतु भाव-भक्तीने भरलेलें एक तुळसीपत्र रुक्मिणीमातेने पारड्यात घालताच सारें काम झालें. तें तुळसीपत्र मंतरलेलें होतें. तें साधें राहिलें नव्हतें. कर्मयोग्याच्या कर्माचें असेंच आहे.

**5** गंगेवर दोन माणसें स्नानासाठी गेलीं आहेत अशी कल्पना करा. त्यांतील एक जण म्हणतो, ''गंगा गंगा म्हणजे काय? दोन भाग हायड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन असे दोन वायु एकत्र केले की झाली गंगा.'' दुसरा मनुष्य म्हणतो, ''भगवान् विष्णूच्या पदकमलातून ही निघाली, शंकराच्या जटाजूटात राहिली, हजारों ब्रह्मर्षींनी आणि राजर्षींनी हिच्या तीरावर तपश्चर्या केली, अनंत पुण्यकृत्यें हिच्या काठीं घडलीं; अशी ही पवित्र गंगामाई.'' या भावनेने ओला होऊन तो स्नान करतो. तो ऑक्सिजन-हायड्रोजनवालाहि स्नान करतो. देहशुद्धीचें फळ दोघांना मिळालेंच, परंतु त्या भक्ताला देहशुद्धीबरोबर चित्तशुद्धीचेंहि फळ मिळालें. गंगेत बैलालाहि देहशुद्धि मिळेल. अंगाची घाण जाईल. परंतु मनाची घाण कशी जाणार? एकाला देहशुद्धीचें तुच्छ फळ मिळालें, दुसऱ्याला हें फळ मिळून शिवाय चित्तशुद्धीचें अमोल फळ मिळालें.

सूर्याला स्नान करून नमस्कार घालणाऱ्याला व्यायामाचें फळ मिळेलच. परंतु तो नमस्कार आरोग्यासाठी घालीत नाही, उपासनेसाठी घालतो. त्यामुळे शरीराला आरोग्य तर लाभतेंच, परंतु त्याच्या बुद्धीची प्रभाहि फांकते. आरोग्याबरोबर स्फूर्ति व प्रतिभाहि त्याला सूर्यापासून मिळेल.

**6** कर्म तेंच. परंतु भावनाभेदामुळे अंतर पडतें. परमार्थी मनुष्याचें कर्म आत्मविकासक होतें. संसारी मनुष्याचें कर्म आत्मबंधक ठरतें. कर्मयोगी जो शेतकरी असेल तो शेती स्वधर्म म्हणून आचरील. त्यामुळे त्याच्या पोटाला मिळेलच. परंतु पोटाला मिळावें म्हणून तें कर्म तो करणार नाही. शेती करता यावी म्हणून खाणें तो साधन मानील. स्वधर्म हें त्याचें साध्य व खाणें साधन. परंतु दुसऱ्या शेतकऱ्याच्या बाबतीत पोटाला मिळणें हें साध्य व शेतकीचा स्वधर्म हें साधन असें होईल. अशी ही उलटापालट असते.

दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाच्या लक्षणांत हें गमतीने सांगितलें आहे. इतरांची जेथे जागृति तेथे कर्मयोगी निद्रित असतो. इतरांची जेथे निद्रा तेथे कर्मयोगी जागृत राहतो. आपण पोटाला मिळतें का नाही, यासाठी जागृत राहू, तर कर्मयोगी कर्मावांचून एक क्षण नाही ना गेला या बाबतीत जागृत राहील. नाइलाज म्हणून तो खातो. या मडक्यात काहीतरी ओतलेंच पाहिजे म्हणून ओततो. सांसारिकाला जेवतांना आनंद होतो. योगी पुरुषाला जेवतांना कष्ट होतात. म्हणून तो मिटक्या मारीत जेवणार नाही. संयम राखील. एकाची रात्र तो दुसऱ्याचा दिवस. एकाचा दिवस ती दुसऱ्याची रात्र. म्हणजे एकाचा जो आनंद तें दुसऱ्याचें दु:ख, आणि एकाचें जें दु:ख तो दुसऱ्याचा आनंद; असा हा अर्थ आहे. सांसारिक आणि कर्मयोगी, दोघांचीं कर्में तींच. परंतु कर्मयोगी फलासक्ति सोडून कर्मातच रमतो ही मुख्य गोष्ट आहे. सांसारिकाप्रमाणेच योगीहि खाईल, झोप घेईल. परंतु त्यासंबंधीची त्याची भावना निराळी राहील. म्हणून तर आरंभींच स्थितप्रज्ञाची संयममूर्ति, पुढे सोळा अध्याय पडले आहेत तरी, उभी करून ठेवली आहे.

सांसारिक पुरुष व कर्मयोगी यांच्या कर्मांतील साम्य व वैषम्य तेव्हाच दिसून येतें. समजा, कर्मयोगी गोरक्षणाचें काम करीत आहे. तें कोणत्या दृष्टीने करील? गाईची सेवा केल्याने समाजाला भरपूर दूध देऊ, मनुष्याहून खाली असलेली जी पशुसृष्टि तिच्याशी गाईच्या निमित्ताने तरी प्रेमाचा संबंध जोडू; अशा भावनेने तो गोरक्षण करील, पगार मिळावा म्हणून नाही करणार. पगार तर मिळेल; परंतु आनंद या दिव्य भावनेचा आहे.

**7** कर्मयोग्याचें कर्म त्याला विश्वाशी समरस करीत असतें. तुळशीच्या झाडाला पाणी घातल्याशिवाय जेवावयाचें नाही. वनस्पति-सृष्टीशी जोडलेला हा प्रेमसंबंध आहे. तुळशीला उपवाशी ठेवून मी का आधी जेवू? गाईशी एकरूपता,

वृक्ष-वनस्पतींशी एकरूपता असें करीत करीत विश्वाशी एकरूपता अनुभवावयाची. भारतीय युद्धात सायंसमय होताच सारे संध्या वगैरे करावयास जात. परंतु भगवान् श्रीकृष्ण रथाचे घोडे सोडून त्यांना पाण्यावर नेत, त्यांचा खरारा करीत, त्यांच्या अंगातील शल्यें काढीत. किती त्या सेवेत भगवंतांचा आनंद! कवीला हें वर्णन करणें पुरें वाटत नाही. पीतांबरात चंदी घेऊन घोड्यांना देणारा तो पार्थसारथि डोळ्यासमोर आणा, आणि कर्मयोगातील आनंदाची कल्पना समजून घ्या. प्रत्येक कर्म जणू आध्यात्मिक उच्चतर पारमार्थिक कर्म. खादीचें काम घ्या. खांद्यावर खादीचीं गांठोडीं घेऊन वणवण फिरणारा कंटाळतो का? नाही. अर्धपोटी कोट्यवधि बंधुभगिनी आहेत, त्यांना घास द्यावयाचा आहे, या कल्पनेत तो मस्त असतो. त्याचें तें वारभर खादी खपविणें सर्व दरिद्र-नारायणाशी जोडलेलें असतें.

## 12. कर्मयोगाचीं विविध प्रयोजनें

**8** निष्काम कर्मयोगात अद्‌भुत सामर्थ्य आहे. त्या कर्मामुळे व्यक्तीचें व समाजाचें परमकल्याण होतें. स्वधर्माचरण करणाऱ्या कर्मयोग्याची शरीरयात्रा तर चालतेच, परंतु नेहमी उद्योगात असल्यामुळे शरीर निरोगी व स्वच्छ राहतें. आणि त्याच्या त्या कर्मामुळे ज्या समाजात तो राहतो त्या समाजाचाहि योगक्षेम नीट चालतो. कर्मयोगी शेतकरी पैसे अधिक मिळतील म्हणून अफू व तंबाखू पेरणार नाही. स्वत:चें तें कर्म तो समाजाच्या मंगलाशी जोडीत असतो. स्वधर्मरूप कर्म समाजाच्या कल्याणाचेंच होईल. माझें व्यापाराचें कर्म जनतेच्या हितासाठी आहे असें मानणारा व्यापारी परदेशी कापड विकणार नाही. त्याचा व्यापार समाजोपकारक होईल. स्वत:ला विसरून आजूबाजूच्या समाजाशी समरस होणारे असे कर्मयोगी ज्या समाजात निपजतात त्या समाजात सुव्यवस्था, समृद्धि आणि सौमनस्य राहतें.

**9** कर्मयोग्याच्या कर्मामुळे त्याची शरीरयात्रा चालून देह व बुद्धि सतेज राहतात आणि समाजाचेंहि कल्याण होतें. या दोन फळांशिवाय चित्तशुद्धीचेंहि महान् फळ त्याला मिळतें. **'कर्मणा शुद्धिः'** असें म्हटलें आहे. कर्म चित्तशुद्धीचें साधन आहे. परंतु जें सर्व लोक करतात तें नाही. कर्मयोगी जें मंतरलेलें कर्म करतो, त्याने चित्तशुद्धि मिळते. महाभारतात तुलाधार वैश्याची कथा आहे. जाजलि नांवाचा एक ब्राह्मण तुलाधाराकडे ज्ञानासाठी जातो. तुलाधार त्याला म्हणतो, ''बाबा रे, या तराजूची दांडी नेहमी सरळ ठेवावी लागते.'' तें बाह्य कर्म करतांना तुलाधाराचें मनहि सरळ झालें. लहान मूल दुकानात येवो कीं मोठा माणूस येवो, दांडीचें एकच रूप. खाली वर काही नाही. उद्योगाचा मनावर परिणाम होतो. कर्मयोग्याचें कर्म म्हणजे एक प्रकारचा जपच तो. त्यातून चित्तशुद्धि मिळते आणि मग निर्मळ चित्तात ज्ञानाचें प्रतिबिंब उमटतें. त्या त्या कर्मातून ते ते कर्मयोगी शेवटीं ज्ञान मिळवितात. तराजूच्या दांडीतून तुलाधाराला समवृत्ति मिळाली. सेना न्हावी डोई करी. दुसऱ्यांच्या डोक्यांतला मळ काढता काढता सेना न्हाव्याला ज्ञान झालें. ''मी दुसऱ्यांच्या डोक्यांतील मळ काढतो आहे; परंतु माझ्या डोक्यातला, माझ्या बुद्धीतला मळ काढला आहे का?'' अशी आध्यात्मिक भाषा त्याला त्या कर्मातून स्फुरू लागली. शेतातील माजलेलें तण उपटता उपटता हृदयातील वासना-विकारांचे तण उपटण्याची कर्मयोग्याला बुद्धि होते. माती तुडवून समाजाला पक्कें मडकें देणारा गोरा कुंभार आपल्या जीवनाचेंहि पक्कें मडकें केलें पाहिजे अशी खूणगांठ मनात बांधतो. हातात थापटणें घेऊन ''मडकीं कच्चीं कीं पक्कीं'' अशी संतांची परीक्षा घेणारा तो परीक्षक बनतो. त्या त्या कर्मयोग्यांना त्या त्या धंद्यातील भाषेतूनच भव्य ज्ञान प्राप्त झालें. तीं कर्में म्हणजे त्यांच्या अध्यात्मशाला होत्या. तीं त्यांचीं कर्में उपासनामय, सेवामय होतीं. तीं दिसावयास व्यावहारिक, परंतु अंतरीं आध्यात्मिक होतीं.

**10** कर्मयोग्याच्या कर्मापासून आणखी एक उत्तम फळ मिळतें. तें म्हणजे समाजाला आदर्श लाभतो. समाजात आधी जन्मलेले, मागून जन्मलेले, असा भेद तर आहेच. आधी जन्मलेल्यांनी मागून जन्मलेल्यांस धडा घालून द्यावयाचा असतो. मोठ्या भावाने लहान भावास, आईबापांनी मुलास, पुढाऱ्याने अनुयायास, गुरूने शिष्यास कृतीने उदाहरण घालून द्यावयाचें असतें. असें उदाहरण कर्मयोग्याशिवाय कोण घालून देणार?

कर्मयोगी कर्मातच आनंद मानणारा असल्यामुळे सदैव कर्म करीत राहतो. त्यामुळे समाजात दंभ माजत नाही. कर्मयोगी स्वयंतृप्त असतो. तरीहि कर्म केल्याशिवाय राहत नाही. तुकाराम म्हणतात, ''भजनाने देव मिळाला म्हणून का भजन सोडू? भजन आता आमचा सहजधर्म झाला.''

**'आधीं होता संतसंग । तुका झाला पांडुरंग**
**त्याचें भजन राहीना । मूळस्वभाव जाईना'**

कर्माच्या शिडीवर चढून शिखर गांठलें; परंतु कर्मयोगी शिखर गांठल्यावरहि ही शिडी सोडीत नाही. त्याला सोडवतच नाही. त्याच्या इंद्रियांना त्या कर्माचें सहज वळणच पडून जातें. अशा रीतीने स्वधर्मकर्मरूप सेवेच्या शिडीचें महत्त्व तो समाजाला पटवीत राहतो.

समाजातील दंभ दूर होणें ही फारच मोठी वस्तु आहे. दंभाने समाज बुडतो. ज्ञानी स्वस्थ बसला तर त्याचें पाहून इतरहि स्वस्थ बसू लागतील. ज्ञानी नित्यतृप्त असल्यामुळे अंतरीं सुखाने डोलत स्वस्थ बसेल; परंतु दुसरा मनात रडत असून कर्मशून्य होईल. एक अंतस्तृप्त असून स्वस्थ आहे, दुसरा मनात कुंथत असून स्वस्थ आहे, अशी स्थिति भेसूर आहे. याने दंभ बळावेल. म्हणून सारे संत शिखर गांठूनहि साधनाची उत्कटपणें कास धरून राहिले. आमरण स्वकर्माचें आचरण करीत राहिले. आई मुलींच्या बाहुला-बाहुलीच्या खेळात रस घेते. हें लुटुपुटीचें आहे असें समजूनहि त्या मुलींच्या खेळात भाग घेऊन ती गोडी उत्पन्न करते. आई जर त्या खेळात दाखल होणार नाही तर मुलींना गोडी वाटणार नाही. कर्मयोगी तृप्त होऊन जर कर्म सोडील तर दुसरे अतृप्त असूनहि कर्म सोडतील; परंतु मनात उपाशी व निरानंद राहतील.

म्हणून सामान्य माणसाप्रमाणेच कर्मयोगी कर्म करीत राहतो. मी म्हणजे कोणी विशेष असें तो मानीत नाही. इतरांपेक्षा अनंतपट तो बाहेर राबतो. अमुक एक कर्म पारमार्थिक, असा काही शिक्का मारावयाचा नसतो. कर्माची जाहिरात द्यावयाची नसते. उत्कृष्ट ब्रह्मचारी असशील, तर तुझ्या कर्मात इतरांच्यापेक्षा शतपट उत्साह दिसू दे. कमी आहार मिळाला तरी तिप्पट काम होऊ दे. समाजाची सेवा तुझ्या हातून अधिक घडू दे. तुझें ब्रह्मचर्य कृतीत दिसू दे. चंदनाचा सुगंध बाहेर सुटू दे.

सारांश, कर्मयोगी फळाची इच्छा सोडून अशीं हीं अनंत फळें मिळवील. त्याची शरीरयात्रा चालेल, शरीर व बुद्धि सतेज राहतील, ज्या समाजात तो वावरतो तो समाज सुखी होईल, त्याला चित्त-शुद्धि लाभून ज्ञान मिळेल, आणि समाजातील दंभ टळून जीवनाचा पवित्र आदर्श प्रकटेल. असा हा कर्मयोगाचा अनुभवसिद्ध महिमा आहे.

## 13. कर्मयोग-व्रतातील अंतराय

**11** कर्मयोग्याचें कर्म इतरांपेक्षा उत्कृष्ट केलेलें असेल. कर्म हीच उपासना. कर्म हीच पूजा. मी देवाची पूजा केली. त्या पूजेचा नैवेद्य प्रसाद म्हणून घेतला. परंतु तो नैवेद्य हें का त्या पूजेचें फळ? जो नैवेद्यासाठी पूजा करील त्याला तो प्रसादाचा तुकडा ताबडतोब मिळेलच. परंतु कर्मयोगी त्या पूजाकर्माने परमेश्वर-दर्शनाचें फळ मागत असतो. नैवेद्य खावयास मिळणें, इतकी अल्प किंमत त्या कर्माची तो करीत नाही. आपल्या कर्माची किंमत कमी आंकावयास तो तयार नाही. स्थूल मापाने तो आपलें कर्म मापीत नाही. ज्याची स्थूल दृष्टि, त्याला स्थूल फळ. शेतीमध्ये एक म्हण आहे, ''खोलीं पेर, पण ओलीं पेर.'' खोल नांगरून भागणार नाही, खोलीत ओलहि हवी. खोली व ओली, दोन्ही असतील तर कणसें मनगटासारखीं येतील. कर्म खोल म्हणजे उत्कृष्ट केलेलें असावें. शिवाय त्यात ईश्वरभक्तीची, ईश्वरार्पणतेची ओलीहि असावी. कर्मयोगी खोल कर्म करून ईश्वराला अर्पण करतो.

आपल्यामध्ये परमार्थाच्या वेडगळ कल्पना उत्पन्न झाल्या आहेत. जो परमार्थी आहे त्याने हातपाय हालवायचे नाहीत, कामधाम करावयाचें नाही, असें लोकांना वाटतें. जो शेती करतो, खादी विणतो, तो कसचा परमार्थी, असें विचारतात. जो जेवतो तो कसचा परमार्थी, असें मात्र कधी विचारीत नाहीत! कर्मयोग्यांचा परमेश्वर तर खरारा करीत उभा आहे. राजसूय यज्ञाच्या वेळेस शेणगोळा हातात घेऊन उष्टीं काढीत आहे, रानात गाई चारावयास नेत आहे. द्वारकेचा राणा पुन्हा कधी गोकुळात गेला तर पांवा वाजवीत गाई चारी. असा हा घोडे खाजविणारा, गाई चारणारा, रथ हाकणारा, शेण लावणारा कर्मयोगी परमेश्वर संतांनी उभा केला आहे. आणि संतहि कोणी शिंपीकाम तर कुंभारकाम, विणकाम तर माळीकाम, दळण्याचें काम तर वाण्याचें काम, न्हाव्याचें काम तर ढोरें ओढण्याचें काम करीत मुक्त झाले आहेत.

**12** अशा या दिव्य कर्मयोगाच्या व्रतापासून मनुष्य दोन कारणांनी ढळतो. इंद्रियांचा विशिष्ट स्वभाव आपण लक्षात ठेवला पाहिजे. ''अमुक हवें आणि अमुक नको'' अशा द्वंद्वांनी इंद्रियें वेढलेलीं असतात. जें हवें असेल त्याच्याबद्दल राग म्हणजे प्रीति, आणि जें नको असेल त्याच्याबद्दल द्वेष उत्पन्न होतो. असे हे रागद्वेष, काम-क्रोध मनुष्याला फाडफाडून खातात. कर्मयोग किती सुंदर, किती रमणीय, किती अनंत फळ देणारा! परंतु हे काम-क्रोध ''हें घे व तें टाक'' हें लचांड पाठीस लावून आपला अहोरात्र पिच्छा पुरवितात. यांची संगत टाळा अशी धोक्याची सूचना या अध्यायाचे अंतीं भगवान् देत आहेत. स्थितप्रज्ञ ज्याप्रमाणे संयमाची मूर्ति त्याप्रमाणेच कर्मयोगी पुरुषाने बनलें पाहिजे.

***रविवार, 6-3-'32***

# अध्याय 4

# कर्मयोग-सहकारी साधना : विकर्म

## 14. कर्माला विकर्माची जोड हवी

**1** बंधूंनो, मागील अध्यायात निष्काम कर्मयोगाचें विवेचन आपण केलें. स्वधर्म टाळून अवांतर धर्म स्वीकाराल तर निष्कामतेचें फळ अशक्यच आहे. स्वदेशी माल विकणें हा व्यापाऱ्याचा स्वधर्म आहे. परंतु हा स्वधर्म सोडून जेव्हा तो सात हजार मैलांवरचा विदेशी माल विकू लागतो, तेव्हा अधिक नफा मिळेल हाच हेतु मुळीं त्याच्या डोळ्यांसमोर असतो. मग त्या कर्मात निष्कामता कोठून येणार? म्हणूनच कर्म निष्काम होण्यासाठी स्वधर्म आचरण्याची अत्यंत जरूर असते. परंतु हें स्वधर्माचरणहि सकाम असू शकतें. अहिंसेचीच गोष्ट आपण घेऊ या. जो अहिंसेचा उपासक आहे त्याला हिंसा तर वर्ज्य आहे; परंतु बाहेरून अहिंसक असूनहि तो हिंसामय असू शकेल. कारण हिंसा हा मनाचा धर्म आहे. बाहेरचें हिंसाकर्म न केल्यानेच मन अहिंसामय होईल असें नाही. तलवार धरल्याने हिंसावृत्ति दिसूनच येते. परंतु तलवार सोडल्याने मनुष्य अहिंसामय होतोच असें नाही. स्वधर्माचरणाचें हुबेहुब असेंच आहे. निष्कामतेसाठी परधर्म तर टाळलेच पाहिजेत. परंतु हा केवळ निष्कामतेचा आरंभ झाला. तेवढ्याने साध्य गांठलें असें नाही.

निष्कामता हा मनाचा धर्म आहे. हा मनाचा धर्म उत्पन्न होण्यास स्वधर्माचरण एवढें एकच साधन पुरेसें नाही. दुसऱ्या साधनांचाहि अवलंब करावा लागेल. केवळ तेलवातीने दिवा लागत नाही, तेथे ज्योतीची गरज असते. ज्योत असेल तरच अंधार दूर होईल. ही ज्योत कशी पेटवायची? त्यासाठी मानसिक संशोधन हवें. आत्मपरीक्षण करून चित्तावरील खळमळ धुऊन टाकले पाहिजेत. तिसऱ्या अध्यायाच्या शेवटीं हीच महत्त्वाची सूचना भगवंतांनी दिली होती. त्या सूचनेतूनच चौथ्या अध्यायाचा जन्म आहे.

**2** गीतेत 'कर्म' हा शब्द 'स्वधर्म' या अर्थाने वापरलेला आहे. आपण खातो, पितो, झोपतो, हीं कर्मेंच आहेत. परंतु या क्रिया गीतेतील 'कर्म' शब्दाने सुचविलेल्या नाहीत. कर्म शब्दाने स्वधर्माचरण घ्यावयाचें. परंतु हें स्वधर्माचरणरूपी कर्म करून निष्कामता पदरात पाडून घेण्यासाठी आणखी एक महत्त्वाची मदत पाहिजे. ती म्हणजे कामक्रोध जिंकणें ही होय. चित्त गंगाजलाप्रमाणे निर्मळ व प्रशांत झाल्याशिवाय निष्कामता नाही. अशा प्रकारें चित्त-संशोधनासाठी जीं कर्में करावयाचीं, त्यांना गीता 'विकर्म' अशी संज्ञा देते. कर्म, विकर्म व अकर्म हे तीन शब्द या चौथ्या अध्यायात महत्त्वाचे आहेत. कर्म म्हणजे बाहेरची स्वधर्माचरणाची स्थूल क्रिया. या बाहेरच्या कर्मात चित्त ओतणें म्हणजेच विकर्म. बाहेरून आपण नमस्कार करतो, परंतु ह्या बाहेरच्या शिर नमविण्याच्या क्रियेबरोबरच आंतून जर मन नमलें नसेल तर बाह्य क्रिया व्यर्थ होय. अंतर्बाह्य एक झालें पाहिजे. बाहेरून मी शंकराच्या पिंडीवर सतत धार धरून अभिषेक करतो. परंतु या जलधारे- बरोबर मानसिक चिंतनाची धार जर अखंड ओतली जात नसेल तर त्या अभिषेकाला काय किंमत? मग ती समोरची पिंडी म्हणजे दगड, आणि मीहि दगडच. दगडासमोर दगड बसला एवढाच अर्थ होईल. बाह्य कर्माशी आंतून चित्तशुद्धीचें कर्म जोडलें गेलें तर निष्काम कर्मयोग लाभतो.

**3** 'निष्काम कर्म' या शब्दप्रयोगात कर्म या पदापेक्षा निष्काम या पदालाच अधिक महत्त्व आहे, ज्याप्रमाणे 'अहिंसात्मक असहकार' या शब्दप्रयोगात असहकार या शब्दापेक्षा अहिंसात्मक या विशेषणालाच अधिक महत्त्व आहे. अहिंसा दूर करून जर असहकार पुकाराल तर ती एक भयानक वस्तु होऊ शकेल. त्याप्रमाणेच स्वधर्माचरणाचेंहि कर्म करीत असता मनाचें विकर्म जर तेथे नसेल तर तो धोका आहे.

आज सार्वजनिक सेवा करणारे स्वधर्माचेंच आचरण करीत असतात. ज्या वेळेस लोक दरिद्री, विपन्न असतात, त्या वेळेस त्यांची सेवा करून त्यांना सुखी करणें हा ओघप्राप्त धर्म आहे. परंतु हे सार्वजनिक सेवा करणारे सारे कर्मयोगी झाले असें अनुमान नाही काढायचें. लोक-सेवा करतांना मनात जर शुद्ध भावना नसेल तर ती लोक-सेवा भयानक होण्याचाहि संभव आहे. आपल्या कुटुंबाची सेवा करतांना जितका अहंकार, जितका द्वेष-मत्सर, जितका स्वार्थ आपण

निर्माण करतो तितका सर्व लोक-सेवेतहि आपण निर्माण करू. आणि याचें प्रत्यंतर आजच्या लोक-सेवकांच्या मेळाव्यात दिसूनहि येत आहे.

## 15. उभय-संयोगाने अकर्म-स्फोट

**4** कर्माबरोबर मनाचा मेळ पाहिजे. हा जो मनाचा मेळ, त्यालाच गीता 'विकर्म' म्हणते. बाहेरचें साधें कर्म, हें आंतलें विशेष कर्म. हें विशेष कर्म ज्याच्या त्याच्या मानसिक गरजेप्रमाणे वेगवेगळें असतें. विकर्माचे असे अनेक प्रकार उदाहरणादाखल चौथ्या अध्यायात दर्शविले असून त्याचाच विस्तार पुढे सहाव्या अध्यायापासून केला आहे. या विशेष कर्माची, या मानसिक अनुसंधानाची जोड देऊ तेव्हाच निष्कामतेची ज्योत पेटेल. कर्माबरोबर विकर्म आलें म्हणजे हळूहळू निष्कामता अंगीं बाणते. शरीर व मन या जर दोन वेगवेगळ्या वस्तु आहेत तर साधनेंहि दोहोंसाठी वेगवेगळीं असणार. या दोहोंचा मेळ बसला म्हणजे साध्य हातीं पडतें. मन एकीकडे व शरीर दुसरीकडे असें होऊ नये म्हणून शास्त्रकारांनी दुहेरी मार्ग सांगितला आहे. भक्तियोगात बाहेर तप सांगितलें व आंत जप सांगितला. उपवासादिक बाह्य तपस्या चालली असता जर आंतून मानसिक जप चालला नसेल तर तें तप सारें फुकट गेलें. कोणत्या भावनेने मी तप करीत आहे ती भावना आंत सारखी पेटत राहिली पाहिजे. उपवास या शब्दाचा अर्थच मुळीं देवाजवळ बसणें. परमेश्वराजवळ चित्त रहावें म्हणून बाहेरच्या भोगांना बंदी करायची. परंतु बाहेरचे भोग वर्ज्य करून मनात जर भगवंताचें चिंतन नसेल तर त्या बाह्य उपवासास काय किंमत? ईश्वराचें चिंतन न करता जर खाद्यपेयांचें मनात चिंतन करू तर तें फारच भयंकर भोजन झालें. हें जें मनाचें चाललेलें भोजन, मनात विषयचिंतन, यासारखी भयंकर वस्तु दुसरी नाही. तंत्राबरोबर मंत्र पाहिजे. केवळ बाह्य तंत्राला महत्त्व नाही. केवळ कर्महीन मंत्रालाहि महत्त्व नाही. हातात सेवा हवी व हृदयातहि सेवा हवी. तरच खरी सेवा हातून घडेल.

**5** हृदयातील ओलावा जर बाह्य कर्मात नसेल तर तें स्वधर्माचरण शुष्क राहील. त्याला निष्कामतेचीं फुलेंफळें लागणार नाहीत. आपण रोग्याच्या शुश्रूषेचें काम समजा सुरू केलें, परंतु त्या सेवाकर्माबरोबर जर कोमल दयाभाव नसेल तर ती रुग्णसेवा कंटाळवाणी व नीरस वाटेल, तो एक बोजा वाटेल. रोग्यालाहि त्या सेवेचा भार वाटेल. त्या शुश्रूषेत मनाचा सहकार नसेल तर त्या सेवेतून अहंकार निर्माण होईल. मी त्याच्या आज उपयोगी पडत आहे, तर त्याने माझ्या पडावें, त्याने माझी स्तुति करावी, लोकांनी माझें कौतुक करावें वगैरे अपेक्षा चित्तात उत्पन्न होतील. किंवा आपण इतकी सेवा करतो तरी हा रोगी चिरचिरच करतो वगैरे आपण त्रासिकपणाने म्हणू. आजारी मनुष्य साहजिकच चिरचिऱ्या असतो. त्याच्या चिरचिऱ्या स्वभावामुळे मनात खरा सेवा-भाव नसलेला सेवेकरी कंटाळा करील.

**6** कर्माच्या जोडीला आंतरिक मेळ असला म्हणजे तें कर्म निराळेंच होतें. तेल व वात यांच्या जोडीला ज्योत आली म्हणजे प्रकाश पडतो. कर्माच्या जोडीला विकर्म आलें म्हणजे निष्कामता येते. दारूला बत्ती लावली म्हणजे स्फोट होतो. त्या दारूत शक्ति निर्माण होते. कर्म ही वस्तु ह्या बंदुकीच्या दारूसारखी आहे. तेथे विकर्माची ज्योत लागली की कार्य होतें. विकर्म तेथे येत नाही तोंपर्यंत तें कर्म जड आहे, त्यात चैतन्य नाही. एकदा विकर्माची ठिणगी पडली म्हणजे त्या कर्मात जें सामर्थ्य निर्माण होतें तें अवर्णनीय आहे. चिमूटभर दारू खिशात राहते, हातात खेळते. परंतु तिला बत्ती लावताच शरीराच्या चिंधड्या उडतात. स्वधर्माचरणातील अनंत सामर्थ्य असेंच गुप्त असतें. त्याला विकर्माची जोड द्या म्हणजे मग कशा घडामोडी होतात तें दिसेल. अहंकार, काम, क्रोध यांचा त्या स्फोटाने मुडदा पडेल, आणि त्यातून त्या परम ज्ञानाची निष्पत्ति होईल.

**7** कर्म हें ज्ञानाचें पेटवण आहे. एखादा लाकडाचा ओंडका पडलेला असतो. परंतु त्या लाकडाला पेटवा. तो धगधगीत निखारा होतो. तें लाकूड व तो अग्नि यांत केवढा फरक! परंतु त्या लाकडाचाच तो अग्नि असतो. कर्मात विकर्म ओतलें म्हणजे कर्म दिव्य दिसू लागतें. आई मुलाच्या पाठीवरून हात फिरवते. एक पाठ व त्या पाठीवरून वेडावांकडा एक हात फिरला. परंतु त्या साध्या कर्माने त्या मायलेकरांच्या मनात ज्या भावना उचंबळल्या, त्यांचें कोण वर्णन करू शकेल? इतक्या लांबी-रुंदीच्या पाठीवरून अशा इतक्या वजनाचा एक गुळगुळीत हात फिरवावा म्हणजे तो आनंद निर्माण होईल, असें जर कोणी समीकरण बसवू पाहील तर ती थट्टा होईल. ती हात फिरवण्याची क्षुद्र क्रिया, परंतु

त्या क्रियेत आईचें हृदय ओतलेलें आहे. तें विकर्म ओतलेलें आहे म्हणून तो अपूर्व आनंद मिळतो. तुलसीरामायणात एक प्रसंग आहे. राक्षसांशी लढून वानर येतात. ते जखमी झालेले असतात. अंगातून रक्त वाहत असतें. परंतु प्रभु रामचंद्रांनी नुसतें प्रेमपूर्वक त्यांच्याकडे पाहिलें आणि त्या वानरांच्या वेदना नाहीशा झाल्या. त्या वेळेस रामाने डोळे किती उघडले होते त्याचा फोटो घेऊन त्याप्रमाणे दुसऱ्या कोणी आपले डोळे उघडून पाहिलें असतें तर तसा परिणाम झाला असता का? तसें करू पाहणें हास्यास्पद आहे.

**8** कर्माला विकर्माची जोड मिळाली म्हणजे शक्तिस्फोट होतो व त्यातून अकर्म निर्माण होतें. लाकूड जळल्यावर राख होते. तो पहिला भला मोठा ओंडका; पण चिमूटभर निरुपद्रवी राख होते त्याची! खुशाल हातात घ्यावी व अंगाला फांसावी. कर्माला विकर्माची ज्योत लावल्याने अकर्म होते. लाकूड कोठे व राख कोठे! **क: केन संबंध:!** त्यांच्या गुणधर्मांत आता बिलकुल साम्य नसतें. परंतु त्या ओंडक्याचीच ती राख यात संशय नाही.

**9** कर्मात विकर्म ओतलें म्हणजे अकर्म होतें. याचा अर्थ काय? याचा अर्थ हा की कर्म केल्यासारखें वाटतच नाही. त्या कर्माचा बोजा वाटत नाही. करून अकर्ते होतो. गीता म्हणते, मारूनहि तुम्ही मारीत नाही. आई मुलाला मारते म्हणून तुम्ही मारून पहा बरे. तुमचें मारणें मुलगा सहन करणार नाही. आईने मारलें तरी तिच्या पदरातच तो तोंड खुपशील. कारण आईच्या बाह्य कर्मात चित्तशुद्धि आहे. तिचें तें मारणें निष्काम आहे. तिचा स्वार्थ त्या कर्मात नाही. विकर्मामुळे, मनाच्या शुद्धीमुळे कर्माचा कर्मपणा उडून जातो. रामाचें तें पाहणें आंतरिक विकर्मामुळे केवळ प्रेमसुधासागर असें होतें. परंतु रामाला त्या कर्माचे श्रम नव्हते. चित्तशुद्धीने केलेलें कर्म निर्लेप असतें. त्याचें पापपुण्य काही उरत नाही.

नाही तर कर्माचा केवढा बोजा आपल्या बुद्धीवर व हृदयावर पडतो! किती ताण पडतो! उद्या सारे राजकीय कैदी सुटायचे अशी जर आता दोन वाजता बातमी आली तर कसा बाजार भरतो तें पहा. सगळीकडे गडबड. आपण कर्माच्या बरें-वाईटपणामुळे व्यग्र असतो. कर्म आपणांस सर्व बाजूंनी घेरतें. कर्म आपल्या मानगुटीस जणू बसतें. समुद्राचा प्रवाह जोराने जमिनीत घुसून जशीं आखातें निर्माण करतो, त्याप्रमाणे कर्माचा जोजार चित्तात घुसून तेथे क्षोभ निर्माण होतो. सुखदु:खाचीं द्वंद्वें निर्माण होतात. सारी शांति नष्ट होते. कर्म झालें, होऊन गेलें तरी त्याचा वेग शिल्लकच राहतो. कर्म चित्ताचा कबजा घेतें. मग त्याला झोप येत नाही.

परंतु अशा या कर्मात विकर्म मिळविलें तर कितीहि कर्म केलें तरी श्रम वाटत नाही. मन ध्रुवाप्रमाणे शांत, स्थिर व तेजोमय राहतें. कर्मात विकर्म ओतल्याने तें अकर्म होतें. कर्म करून पुसून टाकल्यासारखें होतें.

## 16. अकर्माची कला संतांस पुसावी

**10** हें कर्माचें अकर्म कसें होतें? ही कला कोणाजवळ पहावयास मिळेल? संतांजवळ. या अध्यायाच्या शेवटीं भगवान् सांगतात, ''संतांजवळ जाऊन बैस व धडे घे.'' कर्माचें अकर्म कसें होते हें सांगतांना भाषा संपून जाते. त्याची कल्पना येण्यास संतांच्या पायांशी गेलें पाहिजे. परमेश्‍वराचें वर्णन आहे ना –

**'शांताकारं भुजगशयनम्'**

– परमेश्‍वर सहस्र फणांच्या शेषावर पहुडला असताहि शांत आहे. संत सहस्रावधि कर्में करीत असूनहि इवलादेखील क्षोभतरंग मानससरोवरात उठू देत नाहीत. अशा प्रकारची खुबी संतांच्या गांवीं गेल्याशिवाय समजणार नाही.

**11** हल्लीच्या काळात पुस्तकें स्वस्त झालीं आहेत. आणा दोन आण्यांत गीता, मनाचे श्‍लोक मिळतात. गुरु भरपूर आहेत. शिक्षण उदार व स्वस्त आहे. विद्यापीठें ज्ञानाची खिरापत वांटीत आहेत. परंतु ज्ञानामृत-भोजनाची ढेकर कोणी देत नाही. पुस्तकांचा हा ढीग पाहून संतसेवेची अधिकच गरज दिवसेंदिवस भासू लागली आहे. पुस्तकांच्या मजबूत कापडी बाइंडिंगच्या बाहेर ज्ञान येत नाही. एक अभंग मला अशा प्रसंगीं नेहमी आठवतो – **'काम क्रोध आड पडिले पर्वत, राहिला अनंत पैलीकडे।।'** कामक्रोधांच्या पर्वतापलीकडे नारायण असतो. त्याप्रमाणे या पुस्तकांच्या राशीमागे ज्ञानराजा लपून बसला आहे. पुस्तकालयें व ग्रंथालयें सर्वत्र झळकत असता अजून मनुष्य सर्वत्र संस्कारहीन व ज्ञानहीन असा माकडच दिसून येत आहे. बडोद्यास मोठी लायब्ररी आहे. एकदा एक गृहस्थ भलें मोठें पुस्तक घेऊन जात

होते. त्या पुस्तकात चित्रें होतीं. इंग्रजी आहे असें त्या गृहस्थांस वाटून ते नेत होते. मी विचारलें, ''कसलें आहे पुस्तक?'' त्यांनी पुढे केलें. मी म्हटलें, ''हें तर फ्रेंच आहे.'' ते गृहस्थ म्हणाले, ''फ्रेंच निघालें वाटतें!'' परम पवित्र रोमन लिपि, सुंदर चित्रें, चांगलें बाइंडिंग, मग ज्ञानाला काय तोटा!

**12** इंग्रजी भाषेत दरसाल दहा दहा हजार नवीं पुस्तकें तयार होतात. इतर भाषांत तोच प्रकार. ज्ञानाचा एवढा प्रसार असताहि मनुष्याचें डोकें खोकें कसें? कोणी म्हणतात, स्मरणशक्ति कमी झाली. कोणी म्हणतात, एकाग्रता होत नाही. कोणी म्हणतात, जें जें वाचावें तें तें खरेंच वाटतें. कोणी म्हणतात, विचार करावयास वेळच नाही! श्रीकृष्ण म्हणतात, ''अर्जुना, ऐकून ऐकून घोटाळ्यात पडलेली तुझी बुद्धि स्थिर झाल्याशिवाय योग तुझ्या हातात पडणार नाही. ऐकणें-वाचणें आता पुरे करून संतांना शरण जा. तेथे जीवनाचा ग्रंथ तू वाचशील. तेथील मुकें प्रवचन ऐकून छिन्नसंशय होशील. सारखीं सेवाकर्में करूनहि अत्यंत शांत कसें रहावें, बाहेरच्या कर्मांचा जोर असताहि हृदयात अखंड संगीताची सतार कशी लावावी, हें तेथे गेल्याने कळेल.''

***रविवार, 13-3-'32***

# अध्याय 5

# दुहेरी अकर्मावस्था : योग आणि संन्यास

## 17. बाह्य कर्म मनाचा आरसा

**1** संसार ही फार भयानक वस्तु आहे. पुष्कळ वेळा त्याला समुद्राची उपमा देतात. समुद्रात जिकडे पहावें तिकडे पाणीच पाणी दिसतें. तसेंच संसाराचें आहे. संसार सर्वत्र भरून राहिला आहे. कोणी एखादा घरदार सोडून सार्वजनिक कामात पडतो तर तेथेहि त्याच्या मनात संसार ठाणें देऊन बसलाच असतो. एखादा मनुष्य गुहेत जाऊन बसला तरी तेथेहि त्याच्या वीतभर लंगोटीत ओतप्रोत संसार भरून राहिलेला असतो. ती लंगोटी त्याच्या ममतेचें सारसर्वस्व होऊन बसते. लहानशा नोटेत हजार रुपये जसे भरलेले असतात, त्याप्रमाणे त्या लहानशा लंगोटीतहि अपार आसक्ति असते. पसारा सोडला, व्याप कमी केला, एवढ्याने संसार कमी झाला असें नाही. दहापंचवीसांश काय किंवा दोनपंचमांश काय, दोहोंचा अर्थ एकच. घरात बसा वा वनात बसा, आसक्ति जवळच असते. संसार लेशमात्रहि कमी होत नाही. दोन योगी हिमालयाच्या गुहांत जाऊन बसले, तेथेहि परस्परांची कीर्ति परस्परांच्या कानांवर गेली तर ते जळफळू लागतील. सार्वजनिक सेवा करण्यातहि असाच प्रकार आढळतो.

**2** संसार हा असा हात धुऊन पाठीस लागला असल्यामुळे आपण स्वधर्माचरणाची मर्यादा जरी स्वत:ला घालून घेतली असली तरीहि तेथे संसार सुटत नाही. अनेक उलाढाली करण्याचें सोडून, इतर व्याप कमी करून स्वत:चा संसार जरी लहान केला तरी तेथेहि सारें ममत्व भरून राहतें. राक्षस जसे लहान होत, मोठे होत, तसेंच या संसाराचें. लहान मोठे झाले तरी राक्षस ते राक्षसच. दुर्निवारत्व हवेलीत किंवा झोपडीत सारखेंच आहे. स्वधर्माचें बंधन घालून जरी संसार प्रमाणबद्ध केला तरी तेथेहि अनेक झगडे उत्पन्न होतील व तुम्हास संसार नकोसा होईल. तेथेहि अनेक संस्था, अनेक व्यक्ति यांच्याशी संबंध येऊन तुम्ही त्रस्त व्हाल. तुम्हांस नको नको असें होईल. तुमच्या मनाची तेव्हाच कसोटी आहे. स्वधर्म आचरू लागलो एवढ्याने अलिप्तता येत नाही. कर्माची व्याप्ति कमी करणें म्हणजे अलिप्त होणें नव्हे.

**3** मग अलिप्तपणा कसा मिळवायचा? त्यासाठी मनोमय प्रयत्न पाहिजे. मनाचा सहकार असल्याशिवाय कोणतीहि गोष्ट सिद्ध होत नाही. एखाद्या संस्थेत आईबाप मुलाला ठेवतात. तेथे तो मुलगा पहाटे उठतो, नमस्कार घालतो, चहा घेत नाही. परंतु घरीं येताच दोन दिवसांत तें सारें सोडतो, असे अनुभव येतात. मनुष्य म्हणजे मातीचा गोळा नाही. जो आकार त्याच्या मनास देऊ पहाल तो त्याच्या मनाने घेतला तर पाहिजे ना! मन जर आकारात बसलें नाही, तर बाहेरची ती सर्व तालीम व्यर्थ गेली म्हणावयाची. त्यासाठी साधनांत मानसिक सहकाराची फार आवश्यकता आहे.

**4** साधन म्हणून बाह्य स्वधर्माचरण व आंतून मनाचें विकर्म, दोन्ही गोष्टी हव्यात. बाह्य कर्माचीहि आवश्यकता आहेच. कर्म केल्याशिवाय मनाची परीक्षा होत नाही. सकाळच्या प्रशांत वेळीं आपणांस आपलें मन अत्यंत शांत आहे असें वाटतें. परंतु जरा मूल रडू दे की ती मनाची शांति काय किंमतीची होती तें दिसून येईल. बाह्य कर्में टाळून उपयोगी नाही. बाह्य कर्मांतून आपल्या मनाचें स्वरूप प्रकट होतें. वरून पाणी निर्मळ दिसतें. परंतु त्यात दगड टाका, लगेच घाण वर येईल. तसेंच आपल्या मनाचें आहे. मनाच्या अंत:सरोवरात ढोपर ढोपर घाण सांचलेली असते. बाह्य वस्तूशी संबंध येताच ही घाण दिसून येते. त्याला राग आला असें आपण म्हणतो. राग का बाहेरून आला? तो आंत होताच मुळीं. मनात नसता तर दिसताच ना.

लोक म्हणतात, ''पांढरी खादी नको. ती मळते. रंगीत खादी मळत नाही.'' तीहि मळतेच; परंतु दिसत नाही. पांढरी खादी मळलेली दिसते. ती बोलते, ''मी मळले. मला धू.'' अशी ही बोलणारी खादी माणसास आवडत नाही. त्याप्रमाणेच आपलें कर्महि बोलतें. कर्म तुम्ही रागीट आहात कीं स्वार्थी आहात कीं आणिक काही आहात तें प्रकट करतें. कर्म आपलें स्वरूप दाखविणारा आरसा आहे. यासाठी कर्माचे आभार मानले पाहिजेत. आरशात तोंड मळलेलें दिसलें तर का आपण आरसा फोडू? नाही. उलट त्या आरशाचे आभार मानू. तोंड स्वच्छ करून पुन्हा पाहू. त्याप्रमाणे कर्मामुळे

आपल्या मनातील खळमळ बाहेर पडतात म्हणून का कर्म टाळावयाचें? तें कर्म टाळल्याने का मन निर्मळ होणार आहे? कर्म करावयाचें आणि निर्मळ होण्याची उत्तरोत्तर खटपट करावयाची.

**5** एखादा मनुष्य गुहेत जाऊन बसतो. तेथे कोणाशी संबंधच येत नाही. त्याला वाटतें, आपण आता अगदी शांतमति झालो आहोत. त्याला गुहा सोडून एखाद्या घरीं पुडीला जाऊ द्या. तेथे एखादें खेळकर मूल दाराची कडी वाजवतें. तें बालब्रह्म त्या नादब्रह्मात तल्लीन होतें. परंतु त्या निष्पाप मुलाची ती कडी वाजविण्याची क्रिया त्या योग्याला सहन होत नाही. तो म्हणतो, ''काय कार्ट्याने कटकट चालविली आहे!'' गुहेत राहून त्याने आपलें मन इतकें दुबळें केलेलें असतें की इवलाहि धक्का त्याला सहन होत नाही. जराशी कडी वाजली की पुरे, याच्या शांतीची बैठक मोडते. अशी दुबळी स्थिति काही चांगली नाही.

**6** सारांश, आपल्या मनाचें स्वरूप समजून घेण्यासाठी कर्माचा फार उपयोग आहे. दोष दिसले म्हणजे ते दूर करता येतील. दोष कळलेच नाहीत तर प्रगति खुंटली, विकास संपला. कर्म करतांना दोष दिसतील. ते दूर करण्यासाठी विकर्माची योजना करावयाची. आंत असे विकर्माचे प्रयत्न रात्रंदिवस चालू झाले म्हणजे मग कालांतराने स्वधर्म आचरीत असताच अलिप्त कसें रहावें; कामक्रोधातीत, लोभमोहातीत कसें रहावें, तें समजून येईल. कर्म निर्मळ करण्याचा सारखा प्रयत्न होऊ लागला म्हणजे पुढे निर्मळ कर्म सहज होऊ लागेल. निर्विकार कर्म वरच्यावर सहजतेने होऊ लागलें म्हणजे कर्म केव्हा झालें त्याचा पत्ताहि लागणार नाही. कर्म सहज झालें म्हणजे त्याचें अकर्म होतें. सहज कर्मालाच अकर्म म्हणतात हें आपण चौथ्या अध्यायात पाहिलें. कर्माचें अकर्म कसें होतें तें संतांच्या चरणांपाशी गेल्यास समजेल असेंहि चौथ्या अध्यायाच्या शेवटीं भगवंतांनी सांगितलें. ही जी अकर्म-स्थिति ती वर्णावयास वाणी अपुरी आहे.

## 18. अकर्म-दशेचें स्वरूप

**7** कर्माची सहजता समजण्यासाठी आपण परिचयाचा एक दृष्टांत घेऊ. लहान मूल प्रथम चालावयास शिकतें. त्या वेळेस त्याला किती कष्ट पडतात! त्याच्या चालण्याचें आपण कौतुक करतो. बाळ चालायला लागला, असें आपण म्हणतो. परंतु पुढे तें चालणें सहज होतें. एकीकडे चालतो व गप्पाहि मारतो. चालण्याकडे लक्षहि नसतें. तसेंच खाण्याचें. आपण लहान मुलांचें उष्टावण करतो. जणू खाणें म्हणजे मोठेंच काम. परंतु पुढे खाणें हें सहज कर्म होतें. मनुष्य पोहावयास शिकतो तेव्हा किती कष्ट होतात! प्रथम पोहतांना दमतो. परंतु पुढे इतर श्रम करून थकला तर म्हणतो, चला जरा पोहावयास जाऊ म्हणजे बरें वाटेल. पुढे पोहणें मेहनतीचें वाटत नाही. शरीर सहज तरंगतें. श्रमणें हा मनाचा धर्म आहे. मन त्या त्या कर्मात गुंतलेलें असलें तर श्रम होतो. परंतु कर्में सहज होऊ लागलीं म्हणजे बोजा वाटत नाही. कर्म जणू अकर्म होतें. कर्म आनंदमय होतें.

**8** कर्माचें अकर्म होणें हें आपलें ध्येय आहे. या ध्येयासाठी स्वधर्माचरणरूप कर्में करावयाचीं. तीं करीत असतांना दोष दिसतील. ते दूर करावयास विकर्माची कास धरावयाची. आणि असा अभ्यास करीत गेलें म्हणजे मनाची अशी एक ठेवण होते की, कर्माचा यत्किंचित्हि त्रास होत नाही. हजारों कर्में हातून होत असताहि मन निर्मळ, शांत राहतें. तुम्ही आकाशाला विचारा, ''बा आकाशा, तू उन्हाने करपून जात असशील, पावसात ओलेंचिंब होत असशील, थंडीत कुडकुडत असशील!'' आकाश काय म्हणेल? तें म्हणेल, ''मला काय काय होतें तें तुमचें तुम्ही ठरवा. मला काही माहीत नाही.'' **'पिसें नेसलें कीं नागवें लोकीं येऊन जाणावें।'** वेडा मनुष्य नागवा आहे कीं नेसलेला आहे तें लोकांनी ठरवावें. वेड्याला त्याचें भान नाही.

भावार्थ एवढाच की, स्वधर्माचरणाचीं कर्में विकर्माच्या साहाय्याने निर्विकार करण्याची सवय होता होता तीं स्वाभाविक होतात. मोठमोठे प्रसंगहि मग कठिण वाटत नाहीत. कर्मयोगाची अशी ही किल्ली आहे. किल्ली नसली तर कुलूप फोडता फोडता हाताला फोड येतील. परंतु किल्ली सांपडली की क्षणात मोकळा कारभार! कर्मयोगाच्या या किल्लीमुळे सर्व कर्में निरुपद्रवी वाटतात. ही किल्ली मनोजयाने मिळते. मनोजयाचा अविरत प्रयत्न हवा. कर्में करतांना जे मनोमळ दिसतील ते धुऊन टाकण्याचा प्रयत्न हवा. म्हणजे मग बाह्य कर्माची कटकट वाटत नाही. कर्माचा अहंकारच नाहीसा होतो. कामक्रोधाचे वेग नष्ट होतात. क्लेशांची जाणीव नाहीशी होते. कर्माचीहि जाणीव उरत नाही.

**9** एकदा मला एका भल्या मनुष्याने पत्र लिहिलें, ''अमुक इतका रामनामाचा जप करावयाचा आहे. तुम्हीहि यात भाग घ्या व रोज किती करणार तें कळवा.'' तो मनुष्य आपल्या बुद्धीप्रमाणे खटपट करीत होता. मी त्याचा दोष म्हणून सांगत नाही. परंतु रामनाम ही मोजावयाची वस्तु नाही. आई मुलाची सेवा करते. ती का तिचा रिपोर्ट प्रसिद्ध करते? रिपोर्ट प्रसिद्ध करील तर 'थँक यू' म्हणून तिच्या ऋणातून मुक्त होता येईल. परंतु आई रिपोर्ट देत नाही. ती म्हणते, ''मी काय केलें, मी काही केलें नाही. तें का मला ओझें आहे?'' विकर्माच्या साहाय्याने मन लावून हृदय ओतून जेव्हा मनुष्य कर्म करतो तेव्हा तें कर्मच राहत नाही. तें अकर्म होतें. तेथे क्लेश, कष्ट, वांकडें-तिकडें काही नाही.

**10** ही जी स्थिति तिचें वर्णन करता येणार नाही, या स्थितीची अंधुक कल्पना आणून देता येईल. सूर्य उगवतो. परंतु मी आता अंधार दूर करीन, पांखरांना उडायला लावीन, लोकांना कर्मे करावयास प्रवृत्त करीन, असें त्याच्या का मनात असतें? तो उगवतो, तेथे उभा राहतो. त्याचें तें अस्तित्व विश्वाला चालना देतें. परंतु सूर्याला त्याचें भान नाही. तुम्ही जर सूर्याला म्हणाल, ''बा सूर्या, तुझे अनंत उपकार, तू किती अंधार दूर केलास!'' तर तो सूर्य बुचकळ्यात पडेल. तो म्हणेल, ''चिमूटभर अंधार मला आणून दाखवा. मग तो जर मला दूर करता आला तर मी म्हणेन की हें माझें कर्तृत्व!'' अंधार सूर्याकडे घेऊन जाता येईल का? सूर्याच्या अस्तित्वाने अंधार दूर होत असेल, त्याच्या प्रकाशात कोणी सद्‌ग्रंथ वाचीत असतील, तर कोणी असद्‌ग्रंथहि वाचीत असतील; कोणी आगी लावतील तर कोणी परोपकार करतील. परंतु या पापपुण्याचा जबाबदार सूर्य नाही. सूर्य म्हणतो, ''प्रकाश हा माझा सहजधर्म आहे. माझ्याजवळ प्रकाश नसेल तर काय असेल? मी प्रकाश देतो असें मला माहीत नाही. मी असणें म्हणजेच प्रकाश. प्रकाश देण्याच्या क्रियेचे कष्ट मला नाहीत. मी काही करीत आहे असें मला वाटत नाही.''

सूर्याचें जसें हें प्रकाशदान स्वाभाविक आहे तसेंच संतांचें असतें. त्यांचें जगणें म्हणजेच मुळीं प्रकाश देणें. तुम्ही ज्ञानी पुरुषाला जर म्हणाल, ''तुम्ही महात्मे सत्यवादी आहात!'' तर तो म्हणेल, ''मी सत्याने चालणार नाही तर दुसरें करू तरी काय? मी विशेष काय करतो?'' ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणीं असत्यता संभवतच नाही.

**11** अकर्माची ही अशी भूमिका आहे. साधनें इतकीं नैसर्गिक व स्वाभाविक होतात की तीं झालीं आणि गेलीं हें समजतहि नाही. इंद्रियांना तें सहज वळणच पडतें. **''सहज बोलणें हितउपदेश''** असें होतें. अशी जेव्हा स्थिति प्राप्त होते तेव्हा कर्म हें अकर्म होतें. ज्ञानी पुरुषाला सत्कर्मे सहज होतात. किलबिल करणें हा पांखरांचा सहज-धर्म आहे. आईची आठवण होणें हा मुलाचा सहज-धर्म आहे. त्याप्रमाणेच ईश्वराचें स्मरण होणें हा संतांचा सहज-धर्म होतो. पहाटे कुकूऽऽकू करणें कोंबड्यांचा सहज-धर्म आहे. स्वर समजावून देतांना भगवान् पाणिनीने कोंबड्यांच्या आरवण्याचें उदाहरण दिलें आहे. पाणिनीच्या वेळेपासून आजपर्यंत कोंबडा पहाटे आरवत आहे, म्हणून का कोणी त्याला मानपत्र दिलें आहे? कोंबड्याचा तो सहज-धर्म आहे. त्याप्रमाणेच खरें बोलणें, भूतमात्रीं दया, कोणाचें उणें न पाहणें, सर्वांची शुश्रूषा करणें वगैरे सत्पुरुषाचें कर्म सहज चाललेलें असतें. तें केल्याशिवाय तो जगणारच नाही. कोणी जेवला म्हणजे का आपण त्याचा गौरव करतो? खाणें, पिणें, झोपणें हीं जशीं सांसारिकाचीं सहजकर्मे तशींच सेवाकर्मे ज्ञान्याचीं सहजकर्मे. उपकार करणें हा त्याचा स्वभाव होतो. मी उपकार करणार नाही असें जरी तो म्हणाला तरी त्याला तें अशक्य आहे. अशा ज्ञानी पुरुषाचें तें कर्म अकर्मदशेला आलें आहे असें समजावें. या दशेलाच संन्यास ही अति पवित्र पदवी दिलेली आहे. संन्यास म्हणजे अशी ही परमधन्य अकर्मदशा. या दशेलाच कर्मयोगहि म्हणावें. कर्म करीत असतो म्हणून तो योग; परंतु करूनहि करीत आहे असें वाटत नाही म्हणून तोच संन्यास. अशा काही युक्तीने तो कर्म करतो की त्याचा लेप लागत नाही म्हणून तो योग, व करूनहि काहीच केलें नाही म्हणून संन्यास.

## 19. अकर्माची एक बाजू : योग

**12** संन्यासाची कल्पना काय आहे? काही कर्मे सोडणें, काही कर्मे करणें, अशी कल्पना आहे काय? अशी कल्पना नाही. संन्यासाची व्याख्याच मुळीं अशी आहे की सर्व कर्मे सोडणें. सर्व कर्मांतून मुक्त होणें, कर्मे यत्किंचित्‌हि न करणें, म्हणजे संन्यास. पण कर्म न करणें म्हणजे काय? कर्म फार चमत्कारिक आहे. सर्व-कर्म-संन्यास होणार कसा? मागून पुढून सर्वत्र कर्म व्यापून आहे. अहो, बसलात तरीसुद्धा ती क्रिया झाली. बसणें हें क्रियापद झालें. केवळ

व्याकरणाच्या दृष्टीनेच ती क्रिया झाली असें नव्हे, तर सृष्टिशास्त्रातहि बसणें म्हणजे क्रियाच झाली. बसून बसून मांडी दुखायला लागते. बसण्यातहि श्रम आहेत. न करणें हेंसुद्धा जेथे कर्म ठरतें तेथे कर्मसंन्यास व्हावा तरी कसा? भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूप दाखविलें. तें सर्वत्र पसरून राहिलेलें विश्वरूप पाहून अर्जुन भ्याला व त्याने घाबरून डोळे मिटले. परंतु डोळे मिटून पाहतो तो तें आंत दिसू लागलें. डोळे मिटले तरीसुद्धा जें दिसतें तें कसें टाळावें? न केल्यानेहि जें होतें तें कसें टाळावें?

**13** एका मनुष्याची गोष्ट आहे. त्या माणसाजवळ सोन्याचे मोठमोठे मौल्यवान् दागिने होते. ते दागिने एका मोठ्या पेटीत तो बंद करून ठेवणार होता. नोकराने एक भली मोठी लोखंडाची पेटी करून आणली. ती पाहून तो गृहस्थ म्हणाला, ''काय मूर्ख आहेस, अरे अजागळा, तुला सौंदर्याची काही कल्पना आहे का? असे सुंदर मोलाचे दागिने आंत ठेवावयाचे, तर ते काय या घाणेरड्या लोखंडाच्या पेटीत ठेवावयाचे? चांगली सोन्याची पेटी करून आण.'' नोकराने सोन्याची पेटी करून आणली. ''आता कुलूपहि सोन्याचेंच आण. सोन्याच्या पेटीला सोन्याचेंच कुलूप शोभेल.'' तो गृहस्थ दागिने लपवावयास गेला. सोनें झांकायला गेला. परंतु तें सोनें झाकलें कीं फाकलें? चोरांना दागिने शोधण्याची गरजच नाही. उडवावी पेटी म्हणजे झालें. सारांश, कर्म न करणेंसुद्धा कर्म करण्याचाच एक प्रकार होतो, इतकें जें व्यापक कर्म त्याचा संन्यास कसा करायचा?

**14** अशा कर्माचा संन्यास करण्याची रीतच मुळीं ही की यच्चयावत् कर्में करीत राहूनदेखील तीं गळून पडतील अशी युक्ति साधायची. असें जेव्हा होईल त्या वेळेसच संन्यास लाभला. कर्में करूनहि तीं सर्वच्या सर्व गळून पडणें ही वस्तु कशी आहे? सूर्यासारखी आहे. सूर्य रात्रंदिवस कर्म करून राहिला आहे. रात्रींहि तो कर्म करतोच. त्याचा प्रकाश दुसऱ्या गोलार्धात काम करीत असतो. परंतु एवढीं कर्में करीत असताहि तो काहीच करीत नाही, असेंसुद्धा म्हणता येईल. म्हणून तर चौथ्या अध्यायात भगवान् म्हणतात, ''मी हा योग प्रथम सूर्याला सांगितला आणि मग विचार करणारा, मनन करणारा मनु सूर्यापासून हा योग शिकला.'' चोवीस तास कर्म करीत राहूनहि सूर्य लेशमात्रहि कर्म करीत नाही. खरोखर, ही स्थिति अद्‌भुत आहे यात शंका नाही.

## 20. अकर्माची दुसरी बाजू : संन्यास

**15** परंतु संन्यासाची ही फक्त एक तऱ्हा झाली. तो कर्म करून करीत नाही अशी स्थिति जशी वर्णन केली, तशी त्याची दुसरीहि बाजू आहेच. तो काहीएक कर्म करीत नाही, परंतु सर्व दुनियेला कर्म करावयाला लावतो, ही त्याची दुसरी बाजू आहे. त्याच्यामध्ये अपरंपार प्रेरक शक्ति आहे. अकर्माची खुबी तर हीच. अकर्मात अनंत कार्यास लागणारी शक्ति भरून राहिलेली असते. वाफेचें असेंच नसतें का? वाफ कोंडून ठेवली तर प्रचंड कार्य करते. त्या कोंडलेल्या वाफेत अपरंपार शक्ति येते. ती मोठमोठ्या आगगाड्या सहज लीलेने ओढते. सूर्याचें असेंच आहे. तो लेशमात्रहि कर्म करीत नाही. परंतु चोवीस तास सारखा कार्य करतो. त्याला विचाराल तर तो म्हणेल, ''मी काही करीत नाही.'' रात्रंदिवस कर्म करून काही न करणें ही जशी सूर्याची एक तऱ्हा, तशीच काही न करता रात्रंदिवस अनंत कर्में करणें ही दुसरी तऱ्हा. संन्यास ह्या दोन तऱ्हांनी नटलेला आहे.

दोन्ही असामान्य आहेत. एका तऱ्हेत कर्म प्रकट दिसतें व अकर्मावस्था गुप्त असते. दुसऱ्या तऱ्हेत अकर्मावस्था प्रकट दिसते; पण अनंत कर्में त्यायोगें होत असतात. या अवस्थेत अकर्मात कर्म खच्चून भरलेलें असतें व त्यामुळे प्रचंड कार्य होतें. ज्याची अशी अवस्था झाली त्याच्यात आणि आळशी मनुष्यात महदंतर आहे. आळशी मनुष्य थकेल, कंटाळेल. हा अकर्मी संन्यासी कर्म-शक्ति कोंडून ठेवतो. लेशमात्रहि कर्म करीत नाही. तो हातापायांनी, इंद्रियांनी काही कर्म करीत नाही; परंतु काही न करतांना तो अनंत कर्में करतो.

**16** एखादा मनुष्य रागावतो. आपल्या चुकीबद्दल रागावला तर आपण त्याच्याकडे जातो. पण तो बोलणेंच सोडून देतो. त्याच्या न बोलण्याचा, त्या कर्मत्यागाचा, केवढा प्रचंड परिणाम होतो! दुसरा एखादा तडातड बोलेल. दोघेहि रागावलेलेच. परंतु एक मुका आहे व दुसरा बोलत आहे. दोन्ही रागाच्याच तऱ्हा. न बोलणें हीसुद्धा रागावण्याचीच तऱ्हा. त्यानेहि कार्य होत असतें. बापाने किंवा आईने मुलाशी बोलणेंच सोडलें तर त्याचा परिणाम केवढा प्रचंड होतो! तें

बोलण्याचें कर्म टाकणें, तें कर्म न करणें, यामुळेच एवढें प्रचंड कर्म होतें की तेवढा परिणाम प्रत्यक्ष कर्म केलें असतें तर त्याचाहि होता ना. त्या अबोलण्याचा जो परिणाम झाला, तो बोलण्याने होणें शक्य नाही. ज्ञानी पुरुषाचें असेंच आहे. त्याचें अकर्म, त्याचें स्वस्थ बसणें प्रचंड कर्म करीत असतें. प्रचंड सामर्थ्य उत्पन्न करतें. अकर्मी राहून तो इतकें कर्म करतो की तितकें क्रियेने प्रकटच होणार नाही. अशी ही संन्यासाची दुसरी तऱ्हा आहे.

अशा संन्याशाचे सारे खटाटोप, सारे उद्योग एका आसनावर येऊन बसतात.

**''उद्योगाची धांव बैसली आसनीं**
**पडिलें नारायणीं मोटळें हें ।**
**सकळ निश्चिंती झाली हा भरंवसा**
**नाहीं गर्भवासा येणें ऐसा ।**
**आपुलिया सत्ते नाहीं आम्हां जिणें**
**अभिमान तेणें नेला देवें ।**
**तुका म्हणे चळे एकाचिये सत्ते**
**आपुलें मी रितेपणें असें ।।''**

तुकाराम म्हणतात, ''मी आता रिकामा आहे. पोतें होऊन पडलो आहे. सर्व उद्योग समाप्त झाले.'' तुकाराम रिते आहेत; परंतु त्या रित्या पोत्यात प्रचंड प्रेरक शक्ति आहे. सूर्य स्वत: काही हाकारे करीत नाही; परंतु तो दिसताच पांखरें उडू लागतात, कोंकरें नाचू लागतात, गाई रानात चरावयास निघतात, व्यापारी दुकानें उघडतात, शेतकरी शेतात जातात, जगातील नाना व्यवहार सुरू होतात. सूर्य आहे मात्र. तो असला म्हणजे पुरे. अनंत कर्में सुरू होतात. ह्या अकर्मावस्थेत अनंत कर्मांची प्रेरणा भरून राहिलेली असते. सामर्थ्य खच्चून भरलेलें असतें. अशी ही संन्यासाची दुसरी अद्‌भुत तऱ्हा आहे.

## 21. दोहोंची तुलना शब्दापलीकडे

**17** पांचव्या अध्यायात संन्यासाच्या दोन तऱ्हांची तुलना केलेली आहे. एक चोवीस तास कर्म करूनहि काहीच करीत नाही, व दुसरा क्षणभरहि कर्म न करून सर्व करतो. एक बोलून न बोलण्याची तऱ्हा, तर दुसरी न बोलून बोलण्याची तऱ्हा. अशा या दोन प्रकारांची येथे आता तुलना आहे. या ज्या दोन दिव्य तऱ्हा, त्यांचें अवलोकन करावें, त्यांचा विचार करावा, मनन करावें, यात अपूर्व आनंद आहे.

**18** हा विषयच अपूर्व व उदात्त आहे. खरोखरच ही संन्यासाची कल्पना फारच पवित्र व भव्य आहे. ज्याने हा विचार, ही कल्पना प्रथम शोधून काढली त्याला किती धन्यवाद द्यावेत! ही आहे उज्ज्वल कल्पना. आजपर्यंत मानवी बुद्धीने, मानवी विचाराने ज्या काही उंच अशा उड्या मारल्या त्यांतील सर्वांत उंच उडी ती या संन्यासापर्यंत गेली. त्यापलीकडे अजून कोणी उडी मारली नाही. उड्या मारणें चाललेंच आहे. परंतु विचाराची व अनुभवाची इतकी उंच उडी कोणी मारल्याचें मला माहीत नाही. या दोन तऱ्हांनी युक्त असलेल्या संन्यासाची नुसती कल्पनाहि डोळ्यांसमोर आणण्यात आनंद, अपूर्व आनंद आहे. भाषेच्या व व्यवहाराच्या जगात आलें म्हणजे तो आनंद कमी होतो. खाली पडल्यासारखें वाटतें. मी माझ्या मित्रांजवळ यासंबंधी नेहमी बोलतो. आज कित्येक वर्षें या दिव्य विचाराचें मी मनन करीत आहे. येथे भाषा अपुरी पडते. शब्दांच्या कक्षेत हें येतच नाही.

**19** न करून सारें केलें व सारें करून लेशमात्रहि केलें नाही. केवढी उदात्त, रसमय व काव्यमय कल्पना ही! आणखी काव्य तें काय राहिलें? काव्य काव्य तें सारें या काव्यासमोर फिकें आहे. या कल्पनेत जो आनंद, जो उत्साह, जी स्फूर्ति व जी दिव्यता आहे ती कोठल्याहि काव्यात नाही. असा हा पांचवा अध्याय खूप उंचच उंच अशा भूमिकेवर बसविला आहे. चौथ्या अध्यायापर्यंत कर्म-विकर्म सांगून येथे खूप उंच भरारी मारली. येथे अकर्म-दशेच्या दोन प्रकारांची प्रत्यक्ष तुलनाच केली. येथे भाषा लटपटते. कर्मयोगी श्रेष्ठ कीं कर्मसंन्यासी श्रेष्ठ? कर्म जास्त कोण करतो हें

सांगणें शक्यच नाही. सर्व करून काही न करणें, आणि काही न करता सर्व करणें. दोन्ही योगच. परंतु तुलनेसाठी एकाला योग म्हटलें व दुसऱ्याला संन्यास म्हटलें.

## 22. भूमितीचा आणि मीमांसकांचा दृष्टांत

**20** आता ह्यांची तुलना कशी करावयाची? काहीतरी उदाहरणें देऊनच ती करावी लागेल. उदाहरण देऊन सांगतांना खाली पडल्यासारखें वाटतें. परंतु खाली आलें पाहिजे. खरोखर पाहिलें तर पूर्ण कर्मसंन्यास किंवा पूर्ण कर्मयोग या कल्पना अशा आहेत की, त्या या देहात मावणार नाहीत. त्या कल्पना हा देह फोडून टाकतील. परंतु या कल्पनांच्या जवळ जवळ गेलेल्या महापुरुषांचीं उदाहरणें घेऊन चालायचें. उदाहरणें म्हटलीं की तीं अपूर्णच असायचीं; पण तींच पूर्ण आहेत असें घटकाभर समजायचें.

**21** जसें भूमितीमध्ये म्हणतात ना की 'अ ब क' हा त्रिकोण आहे असें 'समजा'. समजा कां? कारण, या त्रिकोणातील रेखा यथार्थ रेखा नाहीत म्हणून. रेखेची मुळीं व्याख्याच अशी आहे की तिला लांबी आहे, पण रुंदी नाही. ही रुंदीशिवाय लांबी फळ्यावर काढावयाची कशी? लांबी आली की रुंदी आलीच. जी रेखा काढाल तिला थोडी तरी रुंदी राहणारच. म्हणून भूमितिशास्त्रात रेखा 'मानल्या'शिवाय चालतच नाही. भक्तिशास्त्रात असेंच नाही का? तेथेहि या लहानशा शालिग्रामाच्या पिंडीत सर्व ब्रह्मांडाचा धनी आहे असें 'माना', असें भक्त म्हणतो. कोणी जर म्हणेल, हें काय खूळ? तर त्याला सांगा, तुझें हें भूमितीचें काय खूळ आहे? चांगली ठसठशीत जाड रेघ दिसत आहे व म्हणे, ''ही रुंदीशिवायची माना.'' हें काय खूळ आहे? सूक्ष्मदर्शकातून पाहिलें तर अर्धा इंच रुंद दिसेल.

**22** जसें तुम्ही तुमच्या भूमितीत मानता तसेंच भक्तिशास्त्र म्हणतें की माना. या शालिग्रामात परमेश्वर माना. ''परमेश्वर तर तुटत नाही, फुटत नाही. तुमचा शालिग्राम तर फुटेल. घाव घालू?'' असें जर कोणी म्हणेल तर तें विचाराचें ठरणार नाही. भूमितीत मात्र 'माना' चालतें; मग भक्तिशास्त्रात कां चालू नये? बिंदु म्हणे माना. आणि फळ्यावर बिंदु काढतात. बिंदु कसचा? तें एक चांगलें वर्तुळच असतें. बिंदूची व्याख्या म्हणजे ती ब्रह्माचीच व्याख्या. बिंदूला लांबी, रुंदी, जाडी, काहीच नाही. परंतु अशी त्याची व्याख्या करून फळ्यावर मात्र तो काढतात. बिंदु तर केवळ अस्तित्वमात्र आहे, त्रिपरिमाणरहित आहे. सारांश, खरा त्रिकोण, खरा बिंदु, हे व्याख्येतच आहेत. परंतु आपणांस गृहीत धरावे लागतात. भक्तिशास्त्रातहि शालिग्रामात न फुटणारा सर्वव्यापी देव मानावा लागतो. आपणहि तसेच काल्पनिक दृष्टांत घेऊन त्यांची तुलना करावयाची.

**23** मीमांसकांनी तर मोठी मौजच केली आहे. देव कोठे आहे याची मीमांसा करतांना त्यांनी मोठें सुंदर विवरण केलें आहे. वेदामध्ये इंद्र, अग्नि, वरुण वगैरे देवता आहेत. या देवतांचा मीमांसेत विचार चालला असता एक प्रश्न असा विचारण्यात येतो, ''हा इंद्र कसा आहे, त्याचें रूप काय, तो कुठे राहतो?'' मीमांसक उत्तर देतात, 'इंद्र' हा शब्द हेंच इंद्राचें रूप. 'इंद्र' या शब्दातच तो राहतो. 'इ' व तिच्यावर अनुस्वार आणि पुढे 'द्र' हें इंद्राचें स्वरूप. त्याची तीच मूर्ति. तेंच प्रमाण. वरुण देवता कशी? तशीच. प्रथम 'व' मग 'रु' मग 'ण' – व-रु-ण हें वरुणाचें रूप. याप्रमाणेच अग्नि वगैरे देवता. या सर्व देवता अक्षररूपधारी आहेत. देव हे सारे अक्षरमूर्ति आहेत. या कल्पनेत, या विचारात फार गोडी आहे. देव ही कल्पना, ही वस्तु आकारात न मावणारी आहे. ती कल्पना दाखविण्यासाठी अक्षर एवढीच खूण पुरे. ईश्वर कसा आहे, तर आधी ई मग श्व मग र. शेवटीं ॐ ने तर कमालच केली. ॐ हें एक अक्षर म्हणजेच ईश्वर. ईश्वराला एक संज्ञाच करून दिली. अशा संज्ञा निर्माण कराव्या लागतात. मूर्तीमध्ये, आकारामध्ये या विशाल कल्पना मावूच शकत नाहीत. परंतु मनुष्याची इच्छा मोठी दांडगी. तो या कल्पना मूर्तीत बसविण्याचा प्रयत्न करतोच.

## 23. संन्यासी आणि योगी एकच : शुक-जनकवत्

**24** संन्यास व योग या अत्युच्च भराऱ्या आहेत. पूर्ण संन्यास आणि पूर्ण योग या कल्पना या देहात मावणार नाहीत. देहात हीं ध्येयें मावलीं नाहीत तरी विचारात तीं मावतात. पूर्ण योगी व पूर्ण संन्यासी व्याख्येतच राहणार, ध्येयभूत व अप्राप्यच राहणार. परंतु उदाहरण म्हणून त्या कल्पनांच्या जास्तीत जास्त जवळ गेलेल्या व्यक्ति घ्यावयाच्या, आणि भूमितीप्रमाणे म्हणावयाचें की अमुक हा पूर्ण योगी व अमुक हा पूर्ण संन्यासी समजा. संन्यासाचें

उदाहरण देतांना शुक-याज्ञवल्क्यांचीं नांवें घेतात. जनक-श्रीकृष्ण हे कर्मयोगी म्हणून भगवद्गीतेतच म्हटलें आहे. लोकमान्यांनी गीतारहस्यात एक यादीच दिली आहे. ''जनक, श्रीकृष्ण, वगैरे या मार्गाने गेले. शुक, याज्ञवल्क्य वगैरे या मार्गाने गेले.'' परंतु थोडा विचार केला तर ही यादी ओल्या हाताने लिहिलेलें पुसावें तशी पुसून टाकता येईल. याज्ञवल्क्य संन्यासी होता. जनक कर्मयोगी होता. म्हणजे संन्यासी याज्ञवल्क्याचा कर्मयोगी जनक हा शिष्य होता. परंतु त्याच जनकाचा शिष्य शुकदेव संन्यासी निघाला. याज्ञवल्क्याचा जनक हा शिष्य व जनकाचा शुक हा शिष्य. संन्यासी, कर्मयोगी, संन्यासी अशी ही मालिका आहे. म्हणजे योग व संन्यास एकाच परंपरेत आले.

**25** शुकदेवांना व्यास म्हणाले, ''शुका, तू ज्ञानी आहेस. परंतु गुरूचा शिक्का तुझ्यावर बसला नाही. तू जनकाकडे जा.'' शुकदेव निघाले. जनक तिसऱ्या मजल्यावर दिवाणखान्यात होते. शुक वनात राहणारे. ते नगर पाहत पाहत चालले. जनकाने शुकदेवास विचारलें, 'कां आला?' शुक म्हणाले, 'ज्ञानासाठी.' 'कोणी पाठविलें?' 'व्यासांनी.' 'कोठून आला?' 'आश्रमातून.' 'आश्रमातून येतांना येथे बाजारात काय पाहिलें?' 'जिकडे तिकडे एकच साखरेची मिठाई मांडून ठेवलेली दिसली.' 'आणखी काय?' 'चालते बोलते साखरेचे पुतळे पाहिले.' 'पुढे काय पाहिलें?' 'येथे येतांना साखरेच्या टणक पायऱ्या लागल्या.' 'पुढे काय?' 'साखरेचीं चित्रें येथेहि सर्वत्र पाहिलीं.' 'आता काय पाहतोस?' 'एक साखरेचा पुतळा दुसऱ्या साखरेच्या पुतळ्याशी बोलत आहे.' जनक म्हणाले, ''जा, तुम्हांला सर्व ज्ञान मिळालें आहे.'' जनकाच्या सहीचें प्रमाण-पत्र पाहिजे होतें तें मिळालें. मुद्दा असा की, कर्मयोगी जनकांनी संन्यासी शुकदेवांना शिष्य म्हणून पास केलें. शुक हे संन्यासी; पण प्रसंगाची मौज पहा. परीक्षिताला शाप मिळाला, 'तू सात दिवसांनी मरशील.' परीक्षिताला मरावयाची तयारी करावयाची होती. कसें मरावें हें शिकविणारा गुरु त्याला पाहिजे होता. त्याने शुकदेवांची मागणी केली. शुकदेव येऊन बसले व सारखे 24×7 = 168 तास मांडी घालून भागवत सांगत बसले. त्यांनी आपली मांडी मोडली नाही. सारखे सांगत होते. यात विशेष काय आहे? विशेष हा की सात दिवस त्यांना राबवून घेण्यात आलें तरी त्यांना त्याचें काहीच वाटलें नाही. सतत कर्म करीत राहूनहि ते कर्म जणू करीतच नव्हते. श्रम ही भावनाच तेथे नव्हती. सारांश, संन्यास व कर्मयोग भिन्न नाहीतच मुळीं.

**26** म्हणून भगवान् सांगतात, **'एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति।'** – संन्यास व योग यांच्या ठिकाणीं जो एकरूपता पाहील तोच खरें रहस्य समजला. एक न करून करतो व एक करून करीत नाही. जो खरा थोर संन्यासी आहे, ज्याची सदैव समाधि लागून राहिली आहे, जो केवळ निर्विकार आहे, असा संन्यासी पुरुष दहा दिवस आमच्यात येऊन राहू द्या; केवढा प्रकाश देणारा, स्फूर्ति देणारा तो होईल! अनेक वर्षें कामाचे ढीग पाडून जें होणार नाही, तें त्याच्या केवळ दर्शनाने, अस्तित्वाने होईल. फोटो पाहून जर मनात पावनता उत्पन्न होते, मेलेल्या लोकांच्या चित्रांनी जर भक्ति, प्रेम, पवित्रता हृदयात उत्पन्न होतात, तर जिवंत संन्यासी पाहिल्यावर केवढी प्रेरणा प्राप्त होईल?

**27** संन्यासी व योगी दोघेहि लोकसंग्रह करतात. एके ठिकाणीं कर्मत्याग बाहेरून दिसला तरी त्या कर्मत्यागात कर्म खच्चून भरलेलें आहे. त्यात अनंत स्फूर्ति भरली आहे. ज्ञानी संन्यासी व ज्ञानी कर्मयोगी, हे दोघे एकाच सिंहासनावर बसणारे आहेत. संज्ञा निरनिराळ्या असल्या तरी अर्थ एकच. एकाच तत्त्वाच्या या दोन तऱ्हा आहेत. यंत्र जेव्हा वेगाने फिरत असतें तेव्हा तें स्थिर आहे, फिरत नाही असें दिसतें. जो संन्यासी असतो त्याचें असेंच असतें. त्याच्या शांतीतून, स्थिरतेतून अनंत शक्ति, अपार प्रेरणा बाहेर पडत असते. महावीर, बुद्ध, निवृत्तिनाथ या अशाच विभूति होत. संन्याशाच्या सर्व उद्योगाची धांव जरी एका आसनावर स्थिर झाली असली, तरी तो प्रचंड कर्म करतो. सारांश, योगी म्हणजे संन्यासी व संन्यासी म्हणजे योगी. दोहोंत मुळीच फरक नाही. शब्द निराळे, परंतु अर्थ एकच. दगड म्हणजे धोंडा व धोंडा म्हणजे दगड हें जसें, तसेंच कर्मयोगी म्हणजे संन्यासी आणि संन्यासी म्हणजे कर्मयोगी.

## 24. 'विशेष चि परी योग संन्यासाहूनि मानिला'

**28** इतकें जरी आहे तरी भगवंतांनी एक टिंब वर देऊन ठेवलेंच आहे. संन्यासापेक्षा कर्मयोग श्रेष्ठ असें भगवान् म्हणतात. दोन्ही सारखेच; मग भगवान् असें कां म्हणतात? ही काय गंमत आहे पुन्हा? कर्मयोग श्रेष्ठ आहे असें जेव्हा भगवान् म्हणतात, तेव्हा ते साधकाच्या दृष्टीने म्हणतात. मुळींच कर्म न करता सर्व कर्म करण्याची तऱ्हा सिद्धालाच

शक्य आहे; साधकाला नाही. परंतु सर्व कर्मे करून काही न करणें, या तऱ्हेचें थोडें तरी अनुकरण करता येण्यासारखें आहे. एक तऱ्हा साधकाला शक्य नाही, फक्त सिद्धालाच शक्य आहे. दुसरी साधकालाहि थोडीफार शक्य आहे. मुळींच कर्म न करता कसें करावयाचें हें साधकाला गूढच वाटेल, त्याला तें समजणार नाही. साधकाला कर्मयोग मार्गहि आहे आणि मुक्कामहि आहे. परंतु संन्यास हा मुक्कामावरच आहे, मार्गात नाही. म्हणून संन्यासापेक्षा कर्मयोग साधकाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे.

**29** याच न्यायाने भगवंतांनी पुढे बाराव्या अध्यायात निर्गुणापेक्षा सगुण विशेष मानलें आहे. सगुणात सर्व इंद्रियांना काम आहे. निर्गुणात तसें नाही. निर्गुणात हात रद्दी, पाय रद्दी, डोळे रद्दी; सर्व इंद्रियें कर्मशून्यच असतात. साधकाला तें साधत नाही. परंतु सगुणात तसें नाही. डोळ्यांनी रूप पाहता येतें, कानांनी कीर्तन ऐकता येतें, हातांनी पूजा करता येते, लोकांची सेवा करता येते, पायांनी तीर्थयात्रा होते. अशा रीतीने सर्व इंद्रियांना कामें देऊन तीं तीं त्यांच्याकडून करवीत, हळूहळू त्यांना हरिमय करावयाचें, हें सगुणात शक्य असतें. परंतु निर्गुणात सारें बंद. जीभ बंद, कान बंद, हातपाय बंद. हा सर्व बंदीचा प्रकार पाहून साधक घाबरावयाचा! त्याच्या चित्तात निर्गुण ठसणार कसें? तो स्वस्थ बसेल तर त्याच्या चित्तात भलते-सलते विचार खेळू लागतील. इंद्रियांचा असा स्वभावच आहे की त्यांना 'करू नका' असें सांगा म्हणजे तीं हटकून करतील. जाहिरातींचें असेंच नसतें का? वरती लिहितात, 'वाचू नका'. म्हणजे वाचक हटकून मनात म्हणतो, 'हें काय वाचायचें नाही, तें वाचू दे आधी'. तें 'वाचू नका' सांगणें वाचावें या उद्देशानेच असतें. मनुष्य नेमकें तें काळजीपूर्वक वाचतो. निर्गुणात मन भटकत राहील. सगुण भक्तीत तसें नाही. तेथे आरती आहे, पूजा आहे, सेवा आहे, भूतदया आहे. इंद्रियांना तेथे काम आहे. या सर्व इंद्रियांना नीट काम लावून द्या व मनास सांगा, 'जा वाटेल तेथे.' परंतु मग मन जाणार नाही; तेथेच रमेल, न कळत एकाग्र होईल. परंतु तें मुद्दाम एके ठिकाणीं बसवून ठेवू म्हणाल तर तें पळालेंच. निरनिराळ्या इंद्रियांना उत्तम सुंदर व्यवसाय लावून द्या व मग मनास खुशाल 'भटकावयास जा' असें सांगा. तें जाणार नाही. त्याला जाण्याची सदर परवानगी दिलीत तर तें म्हणेल, ''हें मी बसलें.'' 'गप्प बस' असा हुकूम त्याला सोडा की तें म्हणेल, ''मी उठून जाणार.''

**30** देहधारी मनुष्याला सुलभतेच्या दृष्टीने निर्गुणापेक्षा सगुण श्रेष्ठ. कर्म करीत राहून तें उडवावयाचें ही युक्ति कर्म न करता कर्म करावयाचें यापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण त्यात सुलभता आहे. कर्मयोगात प्रयत्न, अभ्यास यांना जागा आहे. सर्व इंद्रियांना वश करून घेऊन हळूहळू सर्व उद्योगांतून मन काढून घ्यावयाचें याचा अभ्यास कर्मयोगात करता येईल. ही युक्ति आज न साधली तरी साधण्यासारखी आहे, कर्मयोग हा अनुकरणसुलभ आहे. हा संन्यासापेक्षा त्याचा विशेष होय. परंतु पूर्णावस्थेत कर्मयोग व संन्यास दोन्ही सारखेच. पूर्ण संन्यास व पूर्ण कर्मयोग, दोन्ही एकच वस्तु आहेत. नांवें दोन, दिसावयास भिन्न, परंतु दोन्ही एकच आहेत. एका प्रकारात कर्माचें भूत बाहेर नाचतांना दिसतें, परंतु आंत शांति आहे. दुसऱ्या प्रकारात काही न करता त्रिभुवन हालवलें जाण्याची शक्ति आहे. जसें दिसावयाचें तसें नसावयाचें हें दोघांचें स्वरूप आहे. पूर्ण कर्मयोग हा संन्यास तर पूर्ण संन्यास हा कर्मयोग आहे. काही भेद नाही. परंतु साधकाच्या दृष्टीने कर्मयोग सुलभ. पूर्णावस्थेत दोन्ही एकच.

**31** ज्ञानदेवांकडे चांगदेवांनी एक पत्र पाठविलें. कोऱ्या कागदाचेंच तें पत्र होतें. चांगदेवांपेक्षा ज्ञानदेव वयाने लहान होते. 'चिरंजीव' असें लिहावें तर ज्ञानदेव ज्ञानाने श्रेष्ठ होते; 'तीर्थस्वरूप' लिहावें तर वयाने लहान होते. मायना काय लिहावयाचा हें ठरेना. म्हणून चांगदेवांनी कोराच कागद पाठविला. तो कागद निवृत्तिनाथांच्या हातात प्रथम पडला. त्यांनी तो कोरा कागद वाचला व ज्ञानदेवांच्या हातीं दिला. ज्ञानदेवांनी वाचला व मुक्ताबाईस दिला. मुक्ताबाईने वाचला व म्हणाली, ''चांग्या एवढा मोठा झाला तरी अजून कोराच!'' निवृत्तिनाथांनी निराळाच अर्थ वाचला होता. ते म्हणाले, ''चांगदेव कोरा आहे, शुद्ध आहे, निर्मळ आहे, उपदेश देण्यास योग्य आहे.'' असें म्हणून ज्ञानदेवांस उत्तर देण्यास सांगितलें. ज्ञानदेवांनी पासष्ट ओव्यांचें पत्र पाठविलें, त्याला चांगदेव-पासष्टी म्हणतात. अशी ह्या पत्राची मौजेची हकीगत आहे. लिहिलेलें वाचणें सोपें आहे, परंतु न लिहिलेलें वाचणें कठिण आहे. त्यातील वाचणें संपतच नाही. त्याप्रमाणे संन्यासी रिकामा, कोरा दिसला तरी अपरंपार कर्म त्याच्यात भरलेलें आहे.

**32** संन्यास व कर्मयोग, पूर्ण रूपात दोहोंची किंमत सारखीच; परंतु कर्मयोगाला शिवाय वरती व्यावहारिक किंमत आहे. एखादी नोट असते. तिची पांच रुपये किंमत. पांच रुपयाचें नाणेंहि असतें. जोंपर्यंत सरकार स्थिर आहे, तोंपर्यंत दोहोंची किंमत सारखीच. परंतु सरकार जर बदललें तर त्या नोटेला व्यवहारात पैची किंमत नाही. सोन्याच्या नाण्याची किंमत अर्थातच काहीतरी येईल, कारण तें सोनें आहे. पूर्णावस्थेत कर्मत्याग व कर्मयोग अगदी सारख्या किंमतीचे, कारण ज्ञान दोहों बाजूस आहे. ज्ञानाची किंमत अनंत आहे. अनंततेत काही मिळवा, किंमत अनंत राहते. गणित-शास्त्रातील हा सिद्धांत आहे. कर्मत्याग व कर्मयोग परिपूर्ण ज्ञानात मिळविल्यावर दोहोंची किंमत सारखीच होते. परंतु ज्ञान जर दोहोंकडचें काढून घेतलें, तर मात्र मग कर्मत्यागापेक्षा कर्मयोग हा साधकाच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरेल. भरीव, सोलीव ज्ञान दोहों बाजूस घातलें तर किंमत एकच. मुक्कामावर ज्ञान + कर्म = ज्ञान + कर्माभाव. परंतु ज्ञान दोहोंकडून वजा करा, मग कर्माच्या अभावापेक्षा कर्म हें साधकाच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरेल. साधकाला न करून करणें हें समजतच नाही. करून न करणें हें त्याला समजेल. कर्मयोग हा मार्गावरहि आहे आणि मुक्कामावरहि आहे. परंतु संन्यास फक्त मुक्कामावरच आहे, मार्गात नाही. शास्त्राच्या भाषेत हेंच मांडावयाचें झालें तर कर्मयोग साधनहि आहे व निष्ठाहि आहे. परंतु संन्यास निष्ठाच आहे. निष्ठा म्हणजे अंतिम अवस्था.

***रविवार, 20-3-'32***

# अध्याय 6

# चित्तवृत्ति-निरोध

## 25. आत्मोद्धाराची आकांक्षा

**1** पांचव्या अध्यायात मनुष्याची उंचात उंच उडी कोठपर्यंत जाऊ शकते हें कल्पनेने व विचाराने आपण पाहू शकलो. कर्म, विकर्म, अकर्म मिळून सर्व साधना पूर्ण होते. कर्म ही स्थूल वस्तु आहे. जें स्वधर्मकर्म आपण करू त्यामध्ये आपल्या मनाचा सहकार असावा. जें मानसिक शिक्षणाचें कर्म करावयाचें तें विकर्म, विशेष कर्म, किंवा सूक्ष्म कर्म होय. कर्म व विकर्म दोन्ही पाहिजेत. या दोहींचा प्रयोग करता करता अकर्माची भूमिका तयार होते. या भूमिकेत कर्म व संन्यास दोन्ही एकरूपच होतात हें मागच्या अध्यायात आपण पाहिलें. आता सहाव्या अध्यायाच्या आरंभीं पुन्हा सांगितलें आहे की कर्मयोगाची भूमिका ही संन्यासाच्या भूमिकेपेक्षा वेगळी दिसली तरी अक्षरशः एकरूप आहेत. फक्त दृष्टीत फरक आहे. पांचव्या अध्यायात वर्णन केलेल्या अवस्थेचीं साधनें पहावयाचीं, हा ह्यापुढील अध्यायांचा विषय आहे.

**2** परमार्थ, गीता वगैरे ग्रंथ साधूंसाठीच आहेत अशी एक भ्रामक कल्पना कित्येक लोकांची झालेली आहे. एक गृहस्थ म्हणाला, ''मी काही साधु नाही.'' याचा अर्थ असा की साधु नांवाचे काही प्राणी आहेत, त्यांच्यापैकी तो गृहस्थ नव्हता. जसे घोडे, सिंह, अस्वल, गाय वगैरे प्राणी आहेत तसे साधु नांवाचेहि प्राणी आहेत आणि परमार्थ ही कल्पना त्यांच्यासाठी फक्त आहे; बाकीचे व्यवहारात वागणारे ते जणू काही निराळे. त्यांचे विचार निराळे, आचार निराळे! ह्या कल्पनेमुळे साधुसंत व व्यावहारिक लोक वेगवेगळे केले गेले आहेत. गीता-रहस्यात टिळकांनी ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून घेतलें आहे. गीता हा ग्रंथ सर्वसाधारण व्यावहारिक लोकांसाठी आहे, ही टिळकांची भूमिका मी अक्षरशः खरी मानतो. भगवद्‌गीता ही तमाम दुनियेसाठी आहे. परमार्थातील सर्व साधन प्रत्येक व्यावहारिक माणसासाठी आहे. आपला व्यवहार शुद्ध व निर्मळ होऊन मनाचें समाधान व शांति कशी लाभावी हें शिकविणारा परमार्थ आहे. व्यवहार शुद्ध कसा करावा हें शिकविण्यासाठी गीता आहे. जेथे तुम्ही व्यवहार करीत आहात तेथे गीता येते; परंतु तेथे ती तुम्हांला ठेवू मात्र इच्छीत नाही. तुमचा हात धरून तुम्हांला शेवटच्या मुक्कामावरती घेऊन जाईल. ती प्रसिद्ध म्हण आहे ना की 'पर्वत जर महंमदाकडे येत नसेल तर महंमद पर्वताकडे जाईल.' आपला संदेश जड पर्वतासहि मिळावा अशी चिंता महंमदास आहे. पर्वत जड आहे म्हणून तो येण्याची वाट पाहत महंमद बसणार नाही. हीच गोष्ट गीता ग्रंथाची. गरीब, दुबळा, अडाण्यातलाहि अडाणी असो, त्याच्याजवळ गीता येईल. परंतु तेथेच त्याला कायम करावा म्हणून नव्हे; तर त्याचा हात धरून पुढे नेण्यासाठी, उंच नेण्यासाठी. मनुष्याने आपला व्यवहार शुद्ध करून परमोच्च स्थिति गांठावी हीच गीतेची इच्छा आहे. एवढ्यासाठीच गीता आहे.

**3** तेव्हा मी जड आहे, व्यावहारिक आहे, सांसारिक जीव आहे, असें म्हणून स्वतःभोंवती कुंपण घालू नका. माझ्या हातून काय होणार, या साडेतीन हात देहातच माझें सारसर्वस्व आहे, असें म्हणू नका. या बंधनाच्या भिंती अथवा तुरुंग आपल्याभोंवती उभारून, पशु वागतो त्याप्रमाणे वागू नका. पुढे जाण्याची, उंच चढण्याची हिंमत बाळगा. **''उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।''** मी स्वतःला अवश्य वर घेऊन जाईन अशी हिंमत बाळगा. मी क्षुद्र सांसारिक जीव आहे असें म्हणून मनाची शक्ति मारू नका. कल्पनेचे पंख तोडू नका. कल्पना विशाल करा. चंडोलाचें असेंच नसतें का? प्रातःकाळीं सूर्य पाहून तो म्हणतो की मी उड्डाण करून सूर्याला गांठीन. तसें आपलें असावें. चंडोल आपल्या दुबळ्या पंखांनी कितीहि जरी उंच गेला तरी सूर्याला कसा गांठणार? परंतु कल्पनाशक्तीने सूर्यास तो अवश्य गांठू शकतो. आपण याच्या उलट वागत असतो. आपण जितकें वर जाऊ शकलो असतो तितकेंहि न जाता कल्पनेला, भावनेला बांध घातल्यामुळे आपणच स्वतः आपणांस खाली पाडून घेतो. असलेली शक्ति हीन भावनेमुळे मारून टाकतो. कल्पनेचेच पाय मोडले तर खाली पडण्याशिवाय दुसरें काय होणार? कल्पनेचा झोक नेहमी वर असावा. कल्पनेच्या साह्याने मनुष्य पुढे जातो. म्हणून कल्पना आकुंचित करून घेऊ नका. **''धोपटमार्गा सोडू नको, संसारामधिं ऐस आपुला**

**उगा च भटकत फिरू नको''** हें रडगाणें गात बसू नका. आत्म्याचा अपमान करून घेऊ नका. साधकांत जर विशाल कल्पना असेल, आत्मविश्वास असेल, तरच साधकांचा टिकाव आहे. अशानेच उद्धार होईल. परंतु ''धर्म हा संतांसाठीच आहे, संतांकडे जावयाचें तेंसुद्धा 'तुमच्या भूमिकेला तुम्ही जसें वागता तेंच योग्य आहे' असें त्यांच्याकडून प्रशस्तिपत्र घेण्यासाठी'' अशा कल्पना सोडून द्या. अशा भेदात्मक कल्पना करून स्वत:ला बंधन घालू नका. उच्च आकांक्षा बाळगली नाही तर पुढे पाऊल कधीहि जावयाचें नाही.

ही दृष्टि, ही आकांक्षा, ही महान् भावना जर असेल तर मग साधनांची उठाठेव अवश्य ठरेल; नाही तर साराच ग्रंथ आटोपला. बाहेरच्या कर्माच्या जोडीला मानसिक साधन विकर्म हें सांगितलें. कर्माच्या मदतीला विकर्म सतत पाहिजे. ह्या दोहोंच्या साहाय्याने जी अकर्माची दिव्य स्थिति प्राप्त होते ती व तिचे प्रकार पांचव्या अध्यायात पाहिले. या सहाव्या अध्यायापासून विकर्माचे प्रकार सांगितले आहेत. मानसिक साधना सांगितली आहे. ही मानसिक साधना समजावून सांगण्याच्या अगोदर ''बा जीवा, तू देव होऊ शकशील. तू ही दिव्य आकांक्षा जवळ बाळग. मन मोकळें राखून पंख खंबीर ठेव'' असें गीता सांगत आहे. साधनेचे, विकर्माचे निरनिराळे प्रकार आहेत. भक्तियोग, ध्यान, ज्ञानविज्ञान, गुणविकास, आत्मानात्मविवेक वगैरे नाना प्रकार आहेत. सहाव्या अध्यायात ध्यानयोग हा साधनेचा प्रकार सांगितला आहे.

## 26. चित्ताची एकाग्रता

**4** ध्यानयोगात तीन प्रमुख गोष्टी आहेत : (1) चित्ताची एकाग्रता, (2) चित्ताच्या एकाग्रतेस उपयुक्त अशी जीवनाची परिमितता आणि (3) साम्यदशा किंवा समदृष्टि. या तीन वस्तु असल्याशिवाय खरी साधना होणार नाही. चित्ताची एकाग्रता म्हणजे चित्ताच्या चंचलतेवर अंकुश. जीवनाची परिमितता म्हणजे सर्व क्रियांचा मोजकेपणा. समदृष्टि म्हणजे विश्वाकडे पाहण्याची उदार दृष्टि. या तीन गोष्टींनी ध्यानयोग बनतो. ह्या तीन साधनांनाहि साधनें आहेत. तीं म्हणजे अभ्यास आणि वैराग्य. या पांचहि गोष्टींचा थोडा ऊहापोह करू.

**5** प्रथम चित्ताची एकाग्रता. कोणत्याहि कामात चित्ताची एकाग्रता अवश्य लागते. व्यावहारिक गोष्टीतसुद्धा एकाग्रता लागते. व्यवहारातले गुण निराळे व परमार्थातले गुण निराळे असें काही नाही. व्यवहार शुद्ध करणें म्हणजेच परमार्थ. कोठलाहि व्यवहार असो, तेथील यशापयश तुमच्या एकाग्रतेवर अवलंबून आहे. व्यापार, व्यवहार, शास्त्रशोधन, राजकारण, मुत्सद्देगिरी, काहीहि घ्या; प्रत्येक ठिकाणीं जें यश मिळेल तें त्या त्या पुरुषाच्या चित्ताच्या एकाग्रतेवर आहे. नेपोलियनची अशी गोष्ट सांगतात की युद्धाची व्यवस्था एकदा नीट लावून दिली म्हणजे तो समरभूमीवर गणिताचे सिद्धांत सोडवीत बसे. तंबूवर गोळे पडत, माणसें मरत; पण नेपोलियनचें चित्त गणितातच मग्न. नेपोलियनची एकाग्रता फार मोठी होती असें मी म्हणत नाही. त्याहून उच्च एकाग्रतेच्या गोष्टी सांगता येतील; परंतु ती त्याच्याजवळ किती होती तें पहा. खलिफा उमरची अशीच गोष्ट सांगतात. लढाई चालू असतांना जर प्रार्थनेची वेळ झाली तर लगेच चित्त एकाग्र करून गुडघे टेकून भर रणांगणात तो प्रार्थना करू लागे व प्रार्थनेत त्याचें चित्त इतकें निमग्न होई की कोणाचीं माणसें कापलीं जात आहेत याची जाणीव त्याला नसे. पहिल्या मुसलमानांच्या या परमेश्वरनिष्ठेमुळे, या एकाग्रतेमुळेच इस्लाम धर्माचा प्रसार झाला.

**6** परवां मी एक गोष्ट ऐकली. एक मुसलमान साधु होता. त्याच्या अंगात बाण रुतला. त्या बाणामुळे फार वेदना होत होत्या. बाण काढावयास जावें तर हात लावताच जास्त वेदना होत. अशा रीतीने तो बाण काढतासुद्धा येईना. हल्लीसारखे क्लोरोफॉर्म हें गुंगीचें औषध त्या वेळीं नव्हतें. मोठा प्रश्न पडला. त्या साधूची ज्या काही माणसांना माहिती होती त्यांपैकी काही पुढे येऊन म्हणाले, ''बाण काढणें तूर्त राहू द्या. हा साधु प्रार्थनेस बसला म्हणजे मग तो बाण काढू.'' सायंकाळीं प्रार्थनेची वेळ झाली. साधु प्रार्थनेस बसला. एका क्षणात त्याच्या चित्ताची एवढी एकाग्रता झाली की तो बाण त्याच्या शरीरातून काढला तरी त्याला त्याचें भानहि नव्हतें. केवढी ही एकाग्रता!

**7** सारांश, व्यवहार असो वा परमार्थ असो, त्यात चित्ताची एकाग्रता असल्याशिवाय यश मिळविणें कठिण आहे. चित्त जर एकाग्र होईल तर मात्र सामर्थ्य कधीहि कमी पडणार नाही. तुम्ही साठ वर्षांचे झालेले असला तरीहि एखाद्या

तरुणाप्रमाणे तुमचा उत्साह व सामर्थ्य दिसू लागेल. मनुष्य जसजसा वृद्ध होत जातो तसतसें मन टणक होत गेलें पाहिजे. फळाचें पहा ना! तें हिरवें असतें, पिकतें, सडतें, कुजतें, नाहीसें होतें; परंतु तें आंतलें बीं टणक टणक होत जातें. बाहेरचें शरीर सडेल, झडेल; पण बाहेरचें शरीर म्हणजे फळाचें सारसर्वस्व नव्हे. फळाचें सारसर्वस्व, फळाचा आत्मा बीं आहे. शरीराचें असेंच आहे. शरीर जरी वृद्ध झालें तरी स्मरणशक्ति वाढतच गेली पाहिजे. बुद्धि तेजस्वी झाली पाहिजे. परंतु तसें होत नाही. मनुष्य म्हणतो, ''अलीकडे आठवण राहत नाही.'' कां? ''आता वय झालें आहे.'' तुझें ज्ञान, विद्या, स्मरण हें तुझें बीं आहे. शरीर वृद्ध झालें म्हणजे तें जसजसें ढिलें पडत जाईल, तसतसा आंतील आत्मा बलवान् झाला पाहिजे. एवढ्यासाठी एकाग्रता पाहिजे.

## 27. एकाग्रता कशी साधावी

**8** एकाग्रता हवी, परंतु ती कशी करावयाची? त्यासाठी काय केलें पाहिजे? भगवान् सांगतात, आत्म्यात मन रोवून **'न किञ्चिदपि चिन्तयेत्'** – दुसरें कांहींच चिंतू नये. परंतु ही गोष्ट कशी साधावयाची? मन निवांत करणें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. विचारांचीं चक्रें जोराने थांबविल्याशिवाय एकाग्रता कोठली? बाहेरचें चक्र एक वेळ कसें तरी थांबविता येईल; पण आंत चक्र सुरूच असतें. चित्ताच्या एकाग्रतेला बाह्य साधनें जसजशीं सांगू तसतसें हें आंतील चक्र अधिकच वेगाने चालू लागतें. तुम्ही आसन घाला, ताठ बसा, डोळे स्थिर करा, परंतु एवढ्यानेच मन एकाग्र करता येणार नाही. मुख्य वस्तु ही आहे की मनातील चक्र बंद करणें साधलें पाहिजे.

**9** बाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो. तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य. आपल्या आत्म्याची अपार ज्ञानशक्ति बाह्य क्षुद्र वस्तूंतच आपण खर्च करतो. परंतु असें होता कामा नये. ज्याप्रमाणे दुसऱ्याला न लुटता स्वत:च्या प्रयत्नाने श्रीमंत झालेला मनुष्य अनाठायीं खर्चणार नाही, त्याप्रमाणेच आपण आपल्या आत्म्याची ज्ञानशक्ति क्षुद्र वस्तूंच्या चिंतनात खर्च करू नये. ही ज्ञानशक्ति हा आपला अमूल्य ठेवा आहे; परंतु स्थूल विषयांत ती आपण खर्च करतो. ही भाजी म्हणे चांगली नाही झाली. हिच्यात मीठ कमी झालें. किती गुंजा बाबा कमी झालें? मीठ अर्धा कण कमी पडलें या महान् विचारातच आमचें ज्ञान खर्च होतें. लहान मुलांना शाळेच्या चार भिंतींच्या आंत शिकवितात. झाडाखाली घेऊन बसतील तर कावळे चिमण्या पाहून त्यांचें मन म्हणे एकाग्र होणार नाही. लहान मुलेंच तीं. कावळा चिमणी दिसली नाही म्हणजे झाली त्यांची एकाग्रता. परंतु आम्ही झालो घोडे. आम्हांला शिंगें फुटलीं. आमची एकाग्रता सात सात भिंतींच्या आंत कोणी आम्हांस ठेवलें तरी व्हावयाची नाही. कारण दुनियेतील बारीकसारीक गोष्टींची आम्ही चर्चा करणार. जें ज्ञान परमेश्वरास गांठू शकतें तें भाजीच्या चवीची चर्चा करण्यातच आम्ही दवडणार व त्यात कृतार्थता मानणार!

**10** अहोरात्र असा हा भयानक संसार आपल्याभोंवती अंतर्बाह्य घोंघावत आहे. प्रार्थना किंवा भजन करण्यातहि आमचा हेतु बाह्य. परमेश्वराशी तन्मय होऊन एक क्षणभर तरी संसाराचा विसर पडू दे, ही भावनाच नाही. प्रार्थना म्हणजेहि देखावा. अशी जेथे मनाची स्थिति आहे, तेथे आसनमांडी घातलीत काय आणि डोळे मिटलेत काय, सारें व्यर्थ आहे. मनाची धाव सारखी बाहेरच वाहत राहिल्याने मनुष्याचें सारें सामर्थ्य नष्ट होतें. कोणत्याहि प्रकारची व्यवस्था, नियंत्रणशक्ति माणसात राहत नाही. ह्या गोष्टीचा अनुभव आमच्या देशात आज पदोपदी येत आहे. वास्तविक भारतवर्ष म्हणजे तर परमार्थाची भूमि. येथील माणसें आधीच उंच हवेतील अशीं समजलीं जातात; परंतु या देशात तुमची आमची काय दशा! अगदी बारीकसारीक गोष्टीत इतकी काळजीपूर्वक चिकित्सा आम्ही चालवितो की खेद वाटतो. क्षुद्र विषयांत चित्त गढून राहिलें आहे –

**''कथा पुराण ऐकतां । झोंपें नाडिलें तत्त्वतां**
**खाटेवरी पडतां । व्यापी चिंता तळमळ**
**ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती''**

कथा-पुराण ऐकावयास गेला तर झोप येऊन गांठते, व झोपेची गांठ घ्यावयास गेला तर तेथे चिंता, विचारचक्र सुरू होतें. एकीकडे शून्याग्रता तर दुसरीकडे अनेकाग्रता. एकाग्रता कोठेच नाही. इतका हा मनुष्य इंद्रियांचा गुलाम आहे.

एकदा एकाने मला विचारलें, ''डोळे अर्धोन्मीलित ठेवावेत असें कां सांगितलें आहे?'' मी त्याला म्हटलें, ''साधेंच उत्तर देतो. डोळे जर पुरते मिटले तर झोप लागते. ताठ ठेवले तर चोहींकडे दृष्टि जाऊन एकाग्रता होणार नाही. डोळे मिटले तर झोप लागते, हा तमोगुण आहे. ताठ ठेवले तर दृष्टि सर्वत्र जाते, हा रजोगुण आहे. यासाठी मधली स्थिति सांगितली.'' तात्पर्य, मनाची ठेवण बदलल्याशिवाय एकाग्रता नाही. मनाची ठेवण शुद्ध पाहिजे. ती केवळ आसन घालून मिळणार नाही. त्यासाठी सर्व व्यवहार शुद्ध करावयास पाहिजेत. व्यवहार शुद्ध करावयाचा म्हणजे त्याचा उद्देश बदलला पाहिजे. व्यवहार व्यक्तिगत फायद्यासाठी, वासनातृप्तीसाठी, किंवा अशा बाह्य गोष्टींसाठी करावयाचा नाही.

**11** आपण दिवसभर व्यवहार करतो. या दिवसभर चाललेल्या आटाआटीचा काय हेतु? **'याजसाठीं केला होता अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा।।'** सारा अट्टाहास, सारी धावपळ शेवटचा दिवस गोड व्हावा म्हणून करायची. जन्मभर कडू विष पचवायचें. कां? ती शेवटची घडी, तें मरण पवित्र यावें म्हणून. दिवसाचा शेवटचा क्षण सायंकाळीं येतो. आजच्या दिवसाचें सारें कर्म जर पवित्र भावनेने केलेलें असेल तर रात्रीची प्रार्थना गोड होईल. तो दिवसाचा शेवटचा क्षण जर गोड झाला तर दिवसाचें सारें कर्म सफल झालें. मग माझ्या मनाची एकाग्रता होईल.

एकाग्रतेसाठी अशी जीवन-शुद्धि हवी. बाह्य वस्तूचें चिंतन सुटलें पाहिजे. मनुष्याचें आयुष्य म्हणजे फारसें नाही. परंतु एवढ्याशाहि आयुष्यात परमेश्वरी सुखाचा अनुभव घेण्याचें सामर्थ्य आहे. दोन माणसें अगदी एका सांच्याचीं, एका ठशाचीं. दोन डोळे, त्या डोळ्यांमध्ये तें एक नाक, व त्या नाकाला दोन नाकपुड्या. असें अगदी सारें सारखें असतांना एक मनुष्य देवतुल्य होतो व दुसरा पशुतुल्य होतो. असें कां व्हावें? एकाच परमेश्वराचीं लेकरें – **'अवघी एकाचीच वीण'** असें असून असा फरक कां पडतो? या दोन माणसांची जात एक आहे असें पटत नाही. एक नराचा नारायण तर दुसरा नराचा वानर!

**12** मनुष्य किती उंच जाऊ शकतो हें दाखविणारीं माणसें पूर्वी होऊन गेलीं व आजहि आपणांत आहेत, ही अनुभवाची गोष्ट आहे. या नरदेहाची काय शक्ति आहे हें दाखविणारे संत मागे झाले व आजहि आहेत. या देहात राहून मनुष्य जर एवढी अचाट करणी करू शकतो तर मग माझ्या हातून कां बरे होणार नाही? मी माझ्या कल्पनेला मर्यादा कां बरे घालू? ज्या नरदेहात राहून दुसरे नरवीर झाले, त्याच नरदेहात मीहि आहे. मग मी असा कां? काहीतरी माझें चुकतें आहे. हें माझें चित्त सारखें बाहेर जात आहे. दुसऱ्याचे दोष पाहण्यात तें मोठें फाजील झालें आहे. परंतु मी दुसऱ्याचे दोष कशाला पहावे? **'कासया गुणदोष पाहों आणिकांचें। मज काय त्यांचें उणें असे।।'** माझ्या ठिकाणीं दोष का कमी आहेत? मी सदैव दुसऱ्यांचेच बारीकसारीक दोष पाहण्यात दंग झालो तर चित्ताची एकाग्रता कशी साधणार? मग मला दोनच स्थिति प्राप्त होतील – शून्यावस्था, म्हणजे झोप, किंवा अनेकाग्रता. तमोगुण व रजोगुण यांतच मी गुरफटणार.

भगवंतांनी असा बस, असे डोळे ठेव, असें आसन घाल इत्यादि सूचना एकाग्रतेसाठी दिल्या नाहीत असें नाही. परंतु चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हें पटलें तर या सर्वांची उपयुक्तता. चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हें प्रथम एकदा मनुष्याला पटू दे; म्हणजे मग तो स्वत:च साधना शोधून काढील.

## 28. जीवनातील परिमितता

**13** चित्ताची एकाग्रता होण्यास सहाय्यक अशी दुसरी गोष्ट म्हणजे जीवनातील परिमितता. जीवन मोजकें असावें. गणितशास्त्राचें रहस्य सर्व क्रियांत ओतावयाचें. मात्रेचे वळसे जसे मोजून द्यावयाचे तसें आहारनिद्रांचें करावयाचें. सर्वत्र मोजमाप. प्रत्येक इंद्रियावर पहारा ठेवा. मी जास्त नाही ना खात, फार नाही ना झोपत, फाजील नाही ना बघत डोळा, असें सारखें बारकाईने तपासलें पाहिजे.

**14** मला एका गृहस्थाविषयी एक जण सांगत होता की तो कोणाच्या खोलीत शिरला तर एका मिनिटात त्या खोलीत कोठे काय आहे हें त्याच्या लक्षात येई. मी मनात म्हटलें, ''देवा, हा महिमा मला प्राप्त न होवो.'' पांचपन्नास वस्तूंची मनात नोंद ठेवणारा मी का त्याचा चिटणीस आहे? का मला चोरी करायची आहे? तो साबू तेथे होता, घड्याळ तेथे होतें, याच्याशी मला काय करायचें आहे? मला हवें कशाला हें ज्ञान? डोळ्यातील हा फाजीलपणा मी टाकला

पाहिजे. तसेंच कानाचें. कानावर पहारा ठेवा. काहींना तर वाटतें की, ''कुत्र्याच्या कानासारखा आपला कान असता तर किती बरें झालें असतें! क्षणात वाटेल त्या दिशेला हलवता आला असता. माणसाच्या कानात देवाने ही उणीव ठेवली.'' परंतु असा हा कानाचा फाजीलपणा नको. तसेंच हें मन फार जबरदस्त आहे. जरा खुट्ट झालें की गेलेंच लक्ष.

**15** जीवनात नियमन आणि परिमितता आणा. वाईट वस्तु नयेच पाहू. वाईट पुस्तकें नयेच वाचू. निंदास्तुति नयेच ऐकू. सदोष वस्तु नकोतच; परंतु निर्दोष वस्तूंचें सुद्धा फाजील सेवन नको. चवचालपणा कोणताच नको. दारू, भजीं, रसगुल्ले तर नकोतच; परंतु संत्रीं, केळीं, मोसंबीहि फार नकोत. फलाहार हा शुद्ध आहार आहे, परंतु तोहि यथेच्छ नको. जिभेचा यथेच्छपणा आंतील मालकाने सहन करता कामा नये. वेडींवांकडीं वागू तर आंतील मालक सजा करील असा इंद्रियांना धाक वाटला पाहिजे. नियमित आचरणालाच जीवनाची परिमितता म्हणतात.

## 29. मंगल-दृष्टि

**16** तिसरी गोष्ट, समदृष्टि होणें. समदृष्टि म्हणजेच शुभदृष्टि. शुभदृष्टि आल्याशिवाय चित्त एकाग्र होणारच नाही. एवढा मोठा वनराज सिंह; परंतु चार पावलें चालतो आणि मागे बघतो. हिंसक सिंहाची एकाग्रता कशी होणार? वाघ, कावळे, मांजर यांचे डोळे सारखे फिरत असतात. त्यांची कावरीबावरी नजर. हिंस्र प्राण्यांची अशीच स्थिति असणार. साम्यदृष्टि आली पाहिजे. ही सर्व सृष्टि मंगल भासली पाहिजे. माझा स्वत:वर विश्वास आहे तसा सर्व सृष्टीवर माझा विश्वास असला पाहिजे.

**17** येथे भिण्यासारखें काय आहे? सारें शुभ व पवित्र आहे. **'विश्वं तद् भद्रं यदवन्ति देवा:'** – हें विश्व मंगल आहे, कारण परमेश्वर तें सांभाळीत आहे. इंग्लंडमधील ब्राउनिंग कवीने असेंच म्हटलें आहे, ''ईश्वर आकाशात विराजमान आहे. आणि जग सर्व नीटच चाललें आहे.'' जगात काही बिघडलेलें नाही. बिघडलेलें जर काही असेल तर ती माझी दृष्टि. जशी माझी दृष्टि तशी सृष्टि. मी लाल रंगाचा चष्मा लावीन तर सृष्टि लालच दिसेल, पेटल्यासारखी दिसेल.

**18** रामदास रामायण लिहीत व तें शिष्यांस वाचून दाखवीत. मारुतिहि गुप्तरूपाने तें ऐकावयास येऊन बसे. समर्थांनी लिहिलें होतें, ''मारुति अशोकवनात गेला. तेथे त्याने पांढरी फुलें पाहिलीं.'' हें ऐकताच मारुति प्रकट झाला व म्हणाला, ''मी पांढरीं फुलें मुळीच पाहिलीं नाहीत. मी फुलें पाहिलीं तीं लाल होतीं. तुम्ही चुकीचें लिहिलें आहे, तें शुद्ध करा.'' समर्थ म्हणाले, ''मी लिहिलें तें बरोबर आहे; तू पांढरीच फुलें पाहिलीस.'' मारुति म्हणाला, ''मी स्वत: तेथे गेलो होतो. मी सांगणारा का खोटा?'' शेवटीं तक्रार रामरायाकडे गेली. रामचंद्र म्हणाले, ''फुलें पांढरींच होतीं, परंतु मारुतीचे डोळे त्या वेळेस रागाने लाल झालेले होते, म्हणून तीं शुभ्र फुलें त्याला लाल दिसलीं.'' या गोड गोष्टीचा सारांश एवढाच की जगाकडे पाहण्याची आपली जशी दृष्टि असेल तसें आपणांस जग दिसेल.

**19** ही सृष्टि शुभ आहे अशी जर मनाची खात्री पटली नाही तर चित्ताची एकाग्रता होणार नाही. सृष्टि बिघडलेली आहे असें जोंपर्यंत मला वाटत आहे, तोंपर्यंत साशंक होऊन मी चौफेर पाहत राहणार. कवि पांखरांच्या स्वातंत्र्याचीं गाणीं गातात. एकदा पांखरू होऊन पहा म्हणावें, म्हणजे काय किंमतीचें तें स्वातंत्र्य आहे तें कळेल. पांखरांची मान सारखी पुढे मागे नाचत असते. सारखी दुसऱ्याची भीति. चिमणीला आसनावर बसवा. तिची का एकाग्रता होईल? मी जरा जवळ जाताच चिमणी उडेल. हा डोक्यात दगड तर नाही घालणार, असें तिला वाटेल. सारी दुनिया भक्षक आहे, संहार करणारी आहे, अशी भेसूर कल्पना ज्यांच्याजवळ आहे त्यांना कोठली शांति? माझा रक्षक काय तो मी एकटा, बाकी सारे माझे भक्षक, ही कल्पना नाहीशी झाल्याशिवाय एकाग्रता होणार नाही. समदृष्टीची भावना करणें हाच एकाग्रतेचा उत्तम उपाय आहे. सर्वत्र मांगल्य पहा म्हणजे आपोआप चित्त शांत होईल.

**20** एखादा मनुष्य दु:खी असावा, त्याला झुळझुळ वाहणाऱ्या नदीकाठीं घेऊन जा. त्या स्वच्छ शांत पाण्याकडे पाहून त्याची तळमळ कमी होईल. तो दु:ख विसरेल. त्या झऱ्यात एवढी कोठून शक्ति आली? परमेश्वराची शुभशक्ति त्याच्यात प्रकट झालेली आहे. वेदामध्ये झऱ्यांचें सुंदर वर्णन आहे – **'अतिष्ठन्तीनां अनिवेशनानाम्'** असे हे झरे आहेत.

झरा अखंड वाहतो. त्याला स्वत:चें घरदार नाही. तो संन्यासी आहे. असा पवित्र झरा माझ्या मनाची क्षणात एकाग्रता करतो. ह्या सुंदर झऱ्याला पाहून प्रेमाचा, ज्ञानाचा झरा माझ्या मनात मी कां निर्माण करू नये?

**21** हें बाहेरचें जड पाणीहि जर माझ्या मनाची शांति करू शकतें तर माझ्या मानस-दरीत जर भक्तिज्ञानाचा चिन्मय झरा वाहू लागला, तर केवढी शांति मला लाभेल! माझा एक मित्र मागे हिमालयात, काश्मिरात हिंडत होता. तो तेथील पवित्र पर्वतांचीं, सुंदर प्रवाहांचीं वर्णनें लिहून पाठवी. मी त्याला उत्तर पाठविलें, ''जे झरे, जे पर्वत, जे शुभ वारे तुला तेथे अनुपम आनंद देतात, त्या सर्वांचा अनुभव मी माझ्या हृदयात घेऊ शकतो. माझ्या अंत:सृष्टीत हें सारें रमणीय दृश्य मी रोज पाहत आहे. माझ्या हृदयातील भव्य दिव्य हिमालय सोडून तू तिकडे बोलावलेंस तरी मी येणार नाही. **'मी स्थिरांत हिमालय'** – स्थिरतेची मूर्ति म्हणून ज्या हिमालयाची उपासना स्थिरता येण्यासाठी करावयाची, त्या हिमालयाचें वर्णन ऐकून मी माझें कर्तव्य जर सोडलें तर काय उपयोग?''

**22** सारांश, चित्त जरा शांत करा, सृष्टीकडे मंगलतेने बघा. म्हणजे अनंत झरे हृदयात वाहू लागतील. कल्पनांचे दिव्य तारे हृदयाकाशात चमकू लागतील. दगडाची, मातीची शुभ वस्तु पाहून जर चित्त शांत होतें तर मग अंत:सृष्टीतील दृश्यें पाहून कां शांत होणार नाही? मी मागे त्रावणकोरला गेलो होतो. तिथे एक दिवस सायंकाळीं समुद्रकिनाऱ्यावर बसलो होतो. तो अपार सागर, ती धो धो गर्जना, सायंकाळची वेळ, मी केवळ स्तब्ध बसलो होतो. माझ्या मित्राने मला समुद्रतीरींच फळें वगैरे खाण्यासाठी आणलीं. त्या वेळेस तो सात्त्विक आहारहि मला विषासारखा वाटला. ती समुद्राची ॐ ॐ गर्जना मला **'मामनुस्मर युध्य च'** या गीतावचनाची आठवण देत होती. समुद्र सारखें स्मरण करीत होता व कर्म करीत होता. एक लाट आली, गेली. पुन्हा दुसरी आली. क्षणभर विश्रांति नाही. तो देखावा पाहून माझी तहानभूक हरपली होती. असें त्या समुद्रात होतें तरी काय? त्या खारट पाण्याच्या लाटा उसळतांना पाहून जर माझें हृदय उचंबळतें तर ज्ञान-प्रेमाचा अथांग सागर उसळल्यावर मी किती नाचेन! वेदातील ऋषींच्या हृदयात असाच समुद्र उसळला होता –

**... अंत:समुद्रे हृदि अंतरायुषि**
**... घृतस्य धारा अभिचाकशीमि...**
**समुद्रादूर्मिर्मधुमानुदारत्...**

या दिव्य भाषेवर भाष्यें लिहितांना बिचाऱ्या भाष्यकारांची त्रेधातिरपिट उडाली. कोणती ही घृताची धारा? कोणती मधाची धारा? माझ्या अंत:समुद्रात का खारट लाटा उसळतील? नाही नाही. माझ्या हृदयात दुधातुपाच्या, मधाच्या लाटा उसळून राहिल्या आहेत.

## 30. बालक गुरु

**23** हा हृदयातील समुद्र पहावयास शिका. बाहेरचें निरभ्र निळेंनिळें आकाश पाहून चित्तहि निर्लेप व निर्मळ करा. वास्तविक चित्ताची एकाग्रता हा खेळ आहे. चित्ताची व्यग्रता हीच अस्वाभाविक व अनैसर्गिक आहे. लहान मुलांच्या डोळ्यांकडे टक लावून पहा. लहान मूल सारखें टक लावून बघतें. तुम्ही दहा वेळा डोळे मिटाल. मुलाची एकाग्रता ताबडतोब होते. चार-पांच महिन्याचें मूल झालें म्हणजे त्याला बाहेरची हिरवी हिरवी सृष्टि दाखवा. तें सारखें पाहत राहतें. बायकांची तर अशी समजूत आहे की बाहेरच्या हिरव्यागार पाल्याकडे पाहून त्याच्या विष्ठेलाहि हिरवा रंग येतो. जणू सर्वेंद्रियांचे डोळे करून तें बघतें. लहान मुलांच्या मनावर कोणत्याहि गोष्टीचा फार परिणाम होतो. पहिल्या दोन-चार वर्षांत मुलांस जें शिक्षण मिळतें तेंच खरें शिक्षण असें शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतात. तुम्ही विद्यापीठें, शाळा, संघ, संस्था कितीहि काढा. जें पहिलें शिक्षण मिळालें तसें पुढे मिळणार नाही. शिक्षणाशी माझा संबंध आहे. दिवसेंदिवस माझा असा ग्रह होत चालला आहे की ह्या बाहेरच्या शिक्षणाचा परिणाम शून्यवत् आहे. पहिले संस्कार वज्रलेप होतात. पुढचें शिक्षण म्हणजे वरचा रंग, वरची झिलई. साबण लावला तर वरचा डाग जातो; परंतु कातडीचा काळा रंग जाईल का? त्याप्रमाणे मूळचे संस्कार जाणें फार कठिण असतें.

हे पहिले संस्कार बलवान् कां, आणि पुढचे कमजोर कां? कारण लहानपणीं चित्ताची एकाग्रता नैसर्गिक असते. एकाग्रता असल्यामुळे जे संस्कार उठतात ते पुसले जात नाहीत. असा हा चित्ताच्या एकाग्रतेचा महिमा आहे. ही एकाग्रता ज्याला साधली त्याला काय अशक्य आहे?

**24** आपलें सारें जीवन आज कृत्रिम झालें आहे. बालवृत्ति मेली आहे. जीवनात खरी सरसता नाही. जीवन शुष्क झालें आहे. वेडेवांकडें कसें तरी वागत आहोत. मनुष्याचे पूर्वज वानर होते हें डार्विनसाहेब नाही सिद्ध करीत; तर आपण आपल्या कृतीने सिद्ध करीत आहोत.

लहान मुलात विश्वास असतो. आई जें सांगेल तें प्रमाण. सांगितलेल्या गोष्टी कधी त्याला असत्य वाटत नाहीत. कावळा बोलला, चिमणी बोलली, सारें त्याला खरें वाटतें. मुलांच्या या मंगल वृत्तीमुळे त्यांची एकाग्रता लवकर होते.

## 31. अभ्यास-वैराग्य आणि श्रद्धा

**25** सारांश, ध्यानयोगाला चित्ताची एकाग्रता, जीवनातील परिमितता, शुभ साम्यदृष्टि, हीं पाहिजेत. याशिवाय आणखीहि दोन साधनें सांगितलीं आहेत. तीं म्हणजे वैराग्य व अभ्यास. एक विध्वंसक साधन व दुसरें विधायक. शेतातील गवत उपटून टाकणें हें विध्वंसक काम. यालाच वैराग्य म्हणावयाचें. पेरावयाचें हें विधायक काम. मनात सद्विचारांचें पुन:पुन्हा चिंतन करावयाचें हा अभ्यास. वैराग्य विध्वंसक क्रिया, अभ्यास ही विधायक क्रिया.

**26** वैराग्य अंगीं कसें बाणेल? आपण म्हणतो, आंबा गोड आहे. परंतु गोडी का केवळ आंब्यात आहे? नुसत्या आंब्यात गोडी नाही. आपल्या आत्म्यातील गोडी आपण वस्तूत ओततो व मग ती वस्तु गोड लागते. म्हणून आंतील गोडी चाखावयास शिका. केवळ बाह्य वस्तूत गोडी नसून तो **'रसानां-रसतम:'** माधुर्यसागर आत्मा माझ्याजवळ आहे त्यामुळे गोड वस्तूंना गोडी आली आहे. अशी भावना करीत गेल्याने वैराग्य अंगीं बाणेल. मारुतीला मोत्यांचा हार सीतेने दिला. मारुति मोतीं चावी, पाही, फेकून देई. त्यात त्याला राम दिसेना. राम त्याच्या हृदयात होता. त्या मोत्यांसाठी मूर्ख लोकांनी लाख रुपये दिले असते.

**27** भगवंतांनी हा ध्यानयोग सांगतांना एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आरंभींच सांगितली आहे की, ''मला स्वत:चा उद्धार करून घ्यावयाचा आहे. मी पुढे जाणार. वर उंच उडी घेणार. या नरदेहात मी असाच पडून राहणार नाही. परमेश्वराच्या जवळ जाण्याचा मी हिंमत धरून प्रयत्न करीन,'' असा दृढ संकल्प हवा.

हें सर्व ऐकत असतांना अर्जुनाला शंका आली. तो म्हणतो, ''देवा, आता मोठे झालो. दोन दिवसांनी मरून जाऊ. या साधनेचा काय उपयोग?'' भगवान् म्हणाले, ''मरण म्हणजे मोठी झोप. रोजच्या उद्योगानंतर आपण सात-आठ तास झोपतो, त्या झोपेची का भीति वाटते? उलट झोप आली नाही तर चिंता वाटते. झोपेची जरूरी आहे, तशीच मरणाची. झोपून उठल्यावर पुन्हा आपलें काम आपण सुरू करतो तसेंच मरणोत्तरहि पूर्वीची सर्व साधना आपणांस मिळेल.''

**28** ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत जणू आत्मचरित्रच या प्रसंगीच्या ओव्यांत लिहिलें आहे असें वाटतें. **'बालपणींच सर्वज्ञता। वरी तयातें'**, **'सकल शास्त्रें स्वयंभें। निघतीं मुखें'** वगैरे चरणांत ही गोष्ट दिसून येते. पूर्वजन्मींचा अभ्यास तुम्हांस खेचून घेतो. एखाद्याचें चित्त विषयांकडे जातच नाही. त्याला मोह कसा तो वाटतच नाही. कारण पूर्वजन्मीं त्याने साधना केलेली असते. भगवंतांनी आश्वासन दिलें आहे, **'शुभकारी कुणी बापा दुर्गतीस न जातसे'** – कल्याणमार्गाचें सेवन करणाऱ्याचें काही फुकट जात नाही, अशी ही श्रद्धा शेवटीं दिली आहे. अपूर्ण शेवटीं पुरें होईल. भगवंतांच्या या उपदेशातील स्वारस्य घ्या आणि आपापल्या जीवनाचें सार्थक करा.

*रविवार, 27-3-'32*

# अध्याय 7

# प्रपत्ति अथवा ईश्वर-शरणता

## 32. भक्तीचें भव्य दर्शन

**1** बंधूंनो, अर्जुनापुढे स्वधर्माचा प्रसंग उभा असता स्वकीय व परकीय असा मोह पडून तो स्वधर्माचरण टाळू पाहत होता. हा वृथा मोह पहिल्या अध्यायात दाखविला. त्या मोहाचें निरसन करावें म्हणून दुसऱ्या अध्यायाची सुरुवात झाली. अमर आत्मा सर्वत्र भरलेला आहे, देह नाशिवंत आहे, व स्वधर्म कधीहि सोडू नये, असे तीन सिद्धांत तेथे मांडले व त्या सिद्धांतांची अंमलबजावणी करण्यास शिकविणारी कर्मफलत्यागाची युक्तिहि सांगितली. या कर्मयोगाचें विवरण करतांना त्यातून कर्म, विकर्म, अकर्म या तीन वस्तु उत्पन्न झाल्या. कर्म-विकर्माच्या संगमापासून उत्पन्न होणारे दोन प्रकारचें अकर्म पांचव्या अध्यायात पाहिलें. सहाव्या अध्यायापासून भिन्न भिन्न विकर्में सांगण्याचा आरंभ झाला आहे. सहाव्या अध्यायात साधनेला लागणारी एकाग्रता सांगितली.

आता आज सातवा अध्याय आहे. या अध्यायात विकर्माचें एक नवीनच भव्य दालन उघडलें आहे. सृष्टिदेवीच्या मंदिरात, एखाद्या विशाल वनात, ज्याप्रमाणे नाना मनोहर देखावे आपण पाहत जातो, तसेंच गीता-ग्रंथात आहे. सहाव्या अध्यायात एकाग्रतेचें दालन पाहिलें. आता जरा निराळ्या दालनात शिरू या.

**2** दालन उघडण्यापूर्वीच या मोहकारक जगद्रचनेचें रहस्य समजावून दिलें आहे. एकाच प्रकारच्या कागदावर, एकाच कुंचलीने चित्रकार नानाविध चित्रें काढतो. एखादा सतार वाजविणारा सात सुरांतूनच अनेक राग आळवतो. वाङ्मयात बावन अक्षरांच्या साहाय्याने आपण नानाविध विचार व भावना प्रकट करतो. तसेंच ह्या सृष्टीतहि आहे. सृष्टीत अनंत वस्तु व अनंत वृत्ति दिसतात. परंतु ही सारी अंतर्बाह्य सृष्टि एकच एक अखंड आत्मा व एकच एक अष्टधा प्रकृति या दुहेरी मसाल्यातून निर्माण झाली आहे. क्रोधी माणसाचा क्रोध, प्रेमी माणसाचें प्रेम, दु:खिताचें रडणें, आनंदी माणसाचा आनंद, आळशाचा झोपेकडील कल, उद्योगी माणसाचें कर्मस्फुरण, हे सारे एकाच चैतन्यशक्तीचे खेळ आहेत. ह्या परस्परविरुद्ध भावांच्या मुळाशी एकच चैतन्य भरून राहिलेलें आहे. आंतील चैतन्य एकच, त्याप्रमाणे बाह्य आवरणाचेंहि स्वरूप एकच. चैतन्यमय आत्मा व जड प्रकृति या दुहेरी मसाल्यातून सारी सृष्टि जन्मली आहे असें आरंभींच भगवान् सांगून राहिले आहेत.

**3** आत्मा व देह, परा व अपरा प्रकृति सर्वत्र एकच. असें असूनहि माणसास मोह कां पडावा? भेद कां दिसावा? प्रेमी माणसाचा चेहरा गोड वाटतो, दुसऱ्याचा कंटाळवाणा वाटतो. एकाला भेटावें, दुसऱ्याला टाळावें, असें कां वाटतें? एकच पेन्सिल, एकच कागद, एकच चित्रकार. परंतु नाना चित्रांनी नाना भाव उत्पन्न होतात. चित्रकाराची यातच कुशलता आहे. चित्रकाराच्या, सतार वाजविणाऱ्याच्या त्या बोटांत अशी कुशलता आहे की ते तुम्हाला रडवतात, हंसवतात. त्यांच्या त्या अंगुलीत सारी खुबी आहे.

हा जवळ असावा, हा जवळ नसावा; हा माझा, हा परका – असे जे विचार मनात येतात व ज्यामुळे मनुष्य प्रसंगीं कर्तव्यहि टाळू पाहतो, त्याला कारण मोह आहे. हा मोह टाळावयाचा असेल तर सृष्टि निर्मिणाऱ्याच्या करांगुलीची करामत समजून घेतली पाहिजे. बृहदारण्यक उपनिषदात नगाऱ्याचा दृष्टांत दिला आहे. एकाच नगाऱ्यातून नाना नाद निघतात. काहींनी मी भितो, काहींनी मी नाचतो. हे सारे भाव जिंकून घ्यावयाचे असतील तर नगारा वाजविणाऱ्याला पकडलें पाहिजे. त्याला पकडलें की सारे आवाज पकडले. भगवान् एका वाक्यात सांगतात, ''जो मायेस तरू इच्छील त्याने मला शरण यावें.'' **'येथ एक चि लीला तरले। जे सर्वभावें मज भजले। तयां ऐली चि थडी सरलें। मायाजळ'**. ही माया म्हणजे काय? माया म्हणजे परमेश्वराची शक्ति, त्याची कला, त्याची कुशलता. प्रकृति व आत्मा, किंवा जैन परिभाषेत म्हणायचें तर जीव व अजीव या मसाल्यातून ज्याने ही अनंत रंगांची सृष्टि रचली, त्याची जी शक्ति किंवा कला तीच माया. तुरुंगात ज्याप्रमाणे ती एकजिनसी एकच एक भाकर व ती एकच सर्वरसी डाळ, त्याप्रमाणे एकच अखंड आत्मा व एकच अष्टधा शरीर. यातून परमेश्वर नाना जिनसा करून राहिला आहे. या जिनसा पाहून नाना विरोधी

बरेवाईट भाव आपण अनुभवतो. यांच्या पलीकडे जाऊन खरी शांति अनुभवावयाची असेल तर या जिनसा निर्माण करणाऱ्याला पकडलें पाहिजे. त्याची ओळख करून घेतली पाहिजे. ती ओळख होईल तरच भेदजनक, आसक्तिजनक मोह टाळता येईल.

**4** तो परमेश्वर समजून घेण्याचें एक महान् साधन, एक थोर विकर्म सांगण्यासाठी या सातव्या अध्यायात भक्तीचें भव्य दालन उघडलें आहे. चित्तशुद्धीसाठी यज्ञ-दान, जप-तप, ध्यान-धारणा इत्यादि अनेक विकर्मे सांगितलीं जातात. या साधनांना मी सोडा, साबू, रिठे यांची उपमा देईन. परंतु भक्ति म्हणजे पाणी आहे. सोडा, साबू, रिठे स्वच्छता देतात, परंतु पाण्याशिवाय त्यांचें चालणार नाही. पाणी नसलें तर त्यांचें काय करायचें? परंतु सोडा, साबू, रिठे नसले तरीहि नुसतें पाणी निर्मळत्व देऊ शकतें. त्या पाण्याच्या जोडीला ते आले तर **'अधिकस्य अधिकं फलम्'** असें होईल. दुधात साखर पडली म्हणू. यज्ञयाग, ध्यान, तप या सर्वांत जिव्हाळा नसेल तर चित्तशुद्धि कशी होणार? जिव्हाळा म्हणजेच भक्ति.

भक्तीची सर्व उपायांना गरज आहे. भक्ति हा सार्वभौम उपाय आहे. सेवेचें शास्त्र शिकलेला, उपचारांची नीट माहिती असलेला मनुष्य रोग्याचे शुश्रूषेस जावा; परंतु त्याच्या मनात जर कळकळ नसेल तर खरी सेवा होईल का? बैल चांगला धष्टपुष्ट आहे; परंतु त्याला गाडी ओढावयाची इच्छाच नसेल तर तो अडून बसेल, खड्ड्यातहि गाडी घालील. जिव्हाळ्या-शिवाय केलेल्या कर्माने तुष्टिपुष्टि नाही.

## 33. भक्तीने विशुद्ध आनंदाचा लाभ

**5** ही भक्ति असेल तर त्या महान् चित्रकाराची कला पहावयास सांपडेल. त्याच्या हातातील तें कलम पहावयास मिळेल. तो उगमाचा झरा व तेथील अपूर्व गोडी एकदा चाखली म्हणजे बाकीचे सारे रस तुच्छ व नीरस वाटतील. खरें केळें ज्याने खाल्लें तो लाकडाचें रंगीत केळें क्षणभर हातात घेईल, सुंदर आहे म्हणेल व ठेवून देईल. खरें केळें चाखल्यामुळे लाकडी केळ्याविषयी त्याला फारसा उत्साह राहत नाही. त्याप्रमाणेच मूळच्या झऱ्याची ज्याने गोडी घेतली तो बाहेरच्या गूळ-खोबऱ्याने मिटक्या मारणार नाही.

**6** एका तत्त्वज्ञान्याला लोक म्हणाले, ''चला महाराज, शहरात आज मोठी आरास आहे.'' तो तत्त्वज्ञानी म्हणाला, ''आरास म्हणजे काय? एक दिवा, त्याच्यापुढे दुसरा, त्याच्यापुढे तिसरा; असे लाख, दहा लाख, कोटी, वाटेल तेवढे समजा. समजली मला आरास.'' गणितश्रेणीत 1+2+3 याप्रमाणे अनंतापर्यंत असतें. संख्यांमध्ये ठेवावयाचें अंतर कळलें म्हणजे सर्व संख्या मांडण्याची गरज नाही. तसे ते दिवे एकापुढे एक ठेवले, त्यात एवढें गढून जाण्यासारखें काय आहे? पण मनुष्याला असले आनंद आवडतात. तो लिंबू आणील, साखर आणील, पाण्यात मिसळील व मिटकी मारून म्हणेल, ''काय छान झालें आहे सरबत!'' जिभेला चाखण्याशिवाय धंदा नाही. हें त्यात मिसळ, तें ह्यात मिसळ. असल्या मिसळी खाण्यातच सारें सुख. मी लहानपणीं एकदा सिनेमा पहावयास गेलो होतो. जातांना बरोबर तरट नेलें होतें. झोप आली तर त्यावर निजावें हा हेतु. ती पडद्यावरची डोळे दिपविणारी आग मी पाहू लागलो. दोन-चार मिनिटें तीं आगीचीं चित्रें पाहून डोळा थकून गेला. मी तरटावर निजलो व सांगितलें, संपलें की उठवा. रात्रीच्या वेळीं बाहेर मोकळ्या हवेत आकाशातील चंद्र, तारे पाहणें सोडून, तो शांत सृष्टीतील पवित्र आनंद सोडून, त्या कोंदट थिएटरात आगीच्या बाहुल्या नाचतांना पाहून टाळ्या पिटतात. मला तें काही समजेना!

**7** मनुष्य इतका निरानंद कसा? त्या निर्जीव बाहुल्या पाहून शेवटीं क्षणभर बिचारा आनंद मिळवितो. जीवनात आनंद नाही, मग कृत्रिम आनंद शोधतात. एकदा आमच्या शेजारीं टमटम सुरू झालें. मी विचारलें, ''कां बाजा?'' सांगण्यात आलें की ''मुलगा झाला!'' जगात का तुला एकट्यालाच मुलगा झाला? परंतु टमटम करून जगाला जाहीर करतो की मला मुलगा झाला म्हणून. उड्या मारतो, नाचतो, गाणें करतो, मुलगा झाला म्हणून. असला हा पोरखेळ आहे, आनंदाचा जणू दुष्काळ आहे. दुष्काळात सांपडलेले लोक कोठे शीत दिसताच जशी उडी घालतात, त्याप्रमाणे मुलगा झाला, सर्कस आली, सिनेमा आला, की हे आनंदाचे बुभुक्षित उड्या मारतात.

हा का खरा आनंद? गाणें कानात शिरून त्या लहरी मेंदूला धक्का देतात. डोळ्यांत रूप शिरून मेंदूला धक्का बसतो. हा धक्का बसण्यात बिचाऱ्यांचा आनंद सामावलेला असतो. कोणी तंबाखू कुटून नाकात कोंबतो, कोणी ती वळून विडीरूपाने तोंडात धरतो. त्या तपकिरीचा किंवा त्या धुराचा ठसका बसला की त्यांना आनंदाचा जणू ठेवा मिळतो. त्यांच्या आनंदाला विडीचें थोटूक मिळताच सीमा उरत नाही. टॉलस्टॉय लिहितो, ''त्या विडीच्या धुंदीत तो मनुष्य सहज एखाद्याचा खूनहि करील.'' एक प्रकारचा कैफच तो.

अशा आनंदात मनुष्य कां दंग होतो? खऱ्या आनंदाचा त्याला पत्ता लागलेला नसतो. मनुष्य पडछायेला भुलून राहिला आहे. आज पंच-ज्ञानेंद्रियांचेच आनंद तो उपभोगीत आहे. डोळ्यांचें इंद्रिय नसतें तर जगात चारच आनंद इंद्रियांचे आहेत असें तो मानता. उद्या मंगळावरून एखादा सहा ज्ञानेंद्रियांचा मनुष्य खाली आला तर मग हें पंचज्ञानेंद्रियवाले खिन्न होतील व रडत म्हणतील, ''त्याच्या मानाने आपण किती दुबळे!''

सृष्टीतील संपूर्ण अर्थ पंचज्ञानेंद्रियांना कसा समजणार? त्यातल्या त्यात पंचविषयांत निवड करून माणूस रमत असतो बिचारा. गाढवाचें ओरडणें कानांत गेलें तर म्हणतो, अशुभ कानांत गेलें. आणि तुझें दर्शन झाल्यामुळे त्या गाढवाचें नाही का काही अशुभ होणार? तुझें तेवढें बिघडतें, दुसऱ्याचें नाही का तुझ्यामुळे बिघडत? मानून घेतो की गाढवाचें ओरडणें अशुभ! एकदा मी बडोदा कॉलेजात असता युरोपियन गाणारे आले. ते चांगले गाणारे होते. ते शिकस्त करीत होते; परंतु केव्हा पळ काढावयास मिळेल याची मी वाट पाहत होतो. तीं गाणीं ऐकण्याची मला सवय नव्हती. टाकलीं नापास करून. आपले गवई तिकडे गेले तर कदाचित् तिकडे नापास ठरतील. संगीताने एकाला आनंद होतो, दुसऱ्याला होत नाही. म्हणजे हा खरा आनंद नव्हे. हा फसवा आनंद आहे. खऱ्या आनंदाचें दर्शन नाही तोंपर्यंत या फसव्या आनंदावरच झुलू. खरें दूध नव्हतें मिळालें तोंपर्यंत कालवलेलें पीठच अश्वत्थामा दूध म्हणून पीत होता. त्याप्रमाणे खरें स्वरूप तुम्ही समजलात, त्याचा आनंद चाखलात, म्हणजे इतर सारें फिकें वाटेल.

**8** त्या आनंदाला शोधून काढण्यासाठी भक्ति हा उत्कृष्ट मार्ग आहे. या मार्गाने जाता जाता परमेश्वरी कुशलता कळेल. ती दिव्य कल्पना आली म्हणजे बाकी कल्पना आपोआप ओसरतील. मग क्षुद्र आकर्षण राहणार नाही. मग जगात एकच आनंद भरून राहिलेला दिसेल. मिठाईचीं शेंकडों दुकानें असलीं तरी मिठाईचा प्रकार एकच. जोंपर्यंत खरी वस्तु मिळाली नाही तोंपर्यंत चंचल चिमण्यांप्रमाणे एक कण इथे खाऊ, एक कण तिथे, असें करू. मी पहाटे तुलसीरामायण वाचीत होतो. दिव्याजवळ किडे जमले होते. तेथे ती पाल आली. माझ्या रामायणाचें तिला काय होय! किडा पाहून तिला किती आनंद झाला होता! आता ती किडा मटकावणार तों मी जरा हात हालवला व ती गेली. परंतु तिचें सारखें त्या किड्याकडे लक्ष होतें. मी स्वत:ला विचारलें, ''खातोस का तू तो किडा? सुटते का तुझ्या जिभेला लाळ?'' माझ्या जिभेला लाळ सुटली नाही. मला जो रस भेटला होता त्याचा पालीला कोठे होता पत्ता! तिला रामायणातील रस चाखता येत नव्हता. त्या पालीप्रमाणे आपली दशा आहे. नाना रसांत दंग आहोत. परंतु खरा रस लाभेल तर किती बहार होईल! तो खरा रस चाखावयास मिळण्याचें भक्ति हें एक साधन भगवान् दाखवीत आहेत.

## 34. सकाम भक्तीलाहि किंमत आहे

**9** भगवंतांनी भक्तांचे तीन प्रकार सांगितले, (1) सकाम भक्ति करणारा, (2) निष्काम परंतु एकांगी भक्ति करणारा, (3) ज्ञानी म्हणजे संपूर्ण भक्ति करणारा. निष्काम परंतु एकांगी भक्ति करणाऱ्यांत पुन्हा तीन प्रकार आहेत : 1. आर्त, 2. जिज्ञासु, 3. अर्थार्थी. अशा या भक्तिवृक्षाच्या निरनिराळ्या शाखा आहेत.

सकाम भक्ति करणारा म्हणजे काय? काही इच्छा मनात ठेवून देवाकडे जाणारा. ही भक्ति निकृष्ट प्रकारची आहे म्हणून तिची मी निंदा करणार नाही. पुष्कळ लोक मान मिळावा म्हणून सार्वजनिक सेवेत पडतात. बिघडलें कोठे? तुम्ही त्यांना मान द्या, चांगला मान द्या. मान देण्याने काही बिघडणार नाही. असा मान मिळत गेल्याने पुढे सार्वजनिक कामात ते स्थिर होतील. पुढे त्या कामातच त्यांना आनंद वाटू लागेल. मान मिळावा असें वाटतें याचा अर्थ काय? याचा अर्थ हा की आपण जें काम करतो तें उत्तम आहे अशी मान मिळाल्यामुळे खात्री पटते. ज्याच्याजवळ आपली सेवा चांगली कीं वाईट हें समजण्यास आंतरिक साधन नाही तो ह्या बाह्य साधनावर विसंबून राहतो. आईने मुलाला शाबासकी दिली की

त्याला आईचें आणखी काम करावेसें वाटतें. सकाम भक्तीचें असेंच आहे. सकाम भक्त सरळ देवाकडे जाऊन म्हणेल, 'दे.' देवाजवळ जाऊन सारें मागणें ही गोष्ट सामान्य नाही. ही असामान्य वस्तु आहे. ज्ञानदेवाने नामदेवाला विचारलें, ''यात्रेला येतोस का?'' नामदेवाने म्हटलें, ''यात्रा कशाला?'' ज्ञानदेव म्हणाले, ''साधु-संतांच्या भेटीगांठी होतील.'' नामदेव म्हणाला, ''देवाला विचारून येतो.'' नामदेव देवळात जाऊन देवासमोर उभा राहिला. त्याच्या डोळ्यातून अश्रु गळू लागले, देवाच्या त्या समचरणांकडे तो पाहत राहिला. शेवटीं रडत रडत त्याने विचारलें, ''देवा, जाऊ का मी?'' ज्ञानदेव जवळच होते. या नामदेवाला का तुम्ही वेडा म्हणाल? बायको घरीं नाही म्हणून रडणारे पुष्कळ आहेत. परंतु देवाजवळ रडणारा भक्त सकाम असला तरी तो असामान्य आहे. जी वस्तु खरोखर मागावयाची ती तो मागत नाही हें त्याचें अज्ञान होय; म्हणून त्याची सकाम भक्ति त्याज्य ठरत नाही.

**10** बायका सकाळीं उठून नाना व्रतें करतात, काडवातीने ओवाळतात, तुळशीला प्रदक्षिणा घालतात. कशासाठी? तर देवाने मेल्यावर कृपा करावी म्हणून. त्यांच्या मनाच्या त्या वेड्या समजुती असतील; परंतु त्यासाठी त्या व्रतवैकल्यें, उपासतापास करतात. अशा व्रतशील घराण्यात थोर पुरुष जन्मतात. तुलसीदासांच्या कुळात रामतीर्थ जन्मले. रामतीर्थ फारसी भाषेचे ज्ञाते. कोणी म्हटलें, ''तुलसीदासांच्या कुळातील, आणि तुम्हांस संस्कृत येऊ नये?'' रामतीर्थांच्या मनावर याचा परिणाम झाला. कुलस्मृतीत एवढें सामर्थ्य होतें. पुढे रामतीर्थांनी त्या स्मृतीने संस्कृतचा अभ्यास केला. बायका जी भक्ति करतात तिची चेष्टा करू नये. भक्तीचे असे कण कण जेथे सांठतात तेथे तेजस्वी संतति उत्पन्न होते. म्हणून भगवान् म्हणतात, ''माझा भक्त सकाम असला, तरी मी त्याची भक्ति दृढ करीन. त्याच्या मनात घोटाळे उत्पन्न करणार नाही. माझा रोग बरा कर देवा, असें तो कळवळून म्हणेल तर त्याची आरोग्याची भावना राखून मी त्याचा रोग बरा करीन. कोणत्याहि निमित्ताने तो मजकडे आला तरी मी त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याचें कौतुकच करीन.'' ध्रुवाची गोष्ट पहा. बापाच्या मांडीवर जागा मिळाली नाही म्हणून त्याच्या आईने 'देवाजवळ माग' असें त्याला सांगितलें. तो उपासना करू लागला. देवाने त्याला अढळ पदावर बसविलें. मन निष्काम जरी नसलें तरी काय झालें? मनुष्य कोणाकडे जातो, कोणाजवळ मागतो, हें महत्त्वाचें आहे. जगापुढे तोंड न वेंगाडता देवाला आळविण्याची वृत्ति महत्त्वाची आहे.

**11** कोणत्याहि निमित्ताने भक्तीच्या मंदिरात एकदा पाय ठेवा म्हणजे झालें. प्रथम कामनेने आलात तरी पुढे निष्काम व्हाल. प्रदर्शन मांडलेलें असतें व चालक म्हणतात, ''अहो, येऊन तर पहा कशी छान खादी निघू लागली आहे ती! पहा निरनिराळे नमुने.'' मनुष्य जातो. त्याच्या मनावर परिणाम होतो. तसेंच भक्तीचें. भक्तीच्या मंदिरात एकदा या म्हणजे तेथील सौंदर्य व सामर्थ्य समजेल. धर्मराजाबरोबर स्वर्गात जातांना शेवटीं कुत्राच राहिला. भीम, अर्जुन सारे वाटेत गळून पडले. स्वर्गद्वाराजवळ धर्माला सांगण्यात आलें, ''तुला प्रवेश आहे. परंतु कुत्र्याला मज्जाव आहे.'' धर्म म्हणाला, ''माझ्या कुत्र्याचा प्रवेश होत नसेल तर माझाहि होणार नाही.'' अनन्य सेवा करणारा कुत्रा कां असेना, तो इतर मी मी म्हणणाऱ्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. तो कुत्रा भीमार्जुनांपेक्षा श्रेष्ठ ठरला. देवाकडे जाणारा किडा का असेना, तो परमेश्वराकडे न जाणाऱ्या मोठमोठ्यांहून थोर आहे. देवळामध्ये कासव बसविलेलें असतें, नंदी असतो. परंतु त्या नंदीबैलाला सारे नमस्कार करतात. तो सामान्य बैल नाही. तो देवासमोरचा आहे. बैल असला तरी देवाचा आहे हें विसरता येणार नाही. मोठ्या अक्कलवंतापेक्षा तो श्रेष्ठ आहे. देवाचें स्मरण करणारा बावळा जीव विश्ववंद्य ठरतो.

**12** एकदा मी रेल्वेने जात होतो. यमुनेच्या पुलावर गाडी आली. हृदय पुलकित होऊन जवळच्या एका माणसाने नदीत दिडकी टाकली. शेजारीं एक चिकित्सक गृहस्थ होते. ते म्हणाले, ''आधीच देश दरिद्री. हे लोक असे पैसे व्यर्थ दवडतात.'' मी त्यांना म्हटलें, ''तुम्ही त्या माणसाचा हेतु नाही ओळखला. ज्या भावनेने त्या दोन दिडक्या त्याने फेकल्या त्या भावनेची किंमत दोन-चार पैसे होईल कीं नाही? ते पैसे इतर सत्कार्यास दिले असते तर जास्त चांगलें दान झालें असतें तें सारें मागून पाहू. परंतु ही नदी म्हणजे ईश्वराची जणू करुणा वाहून राहिली आहे, असें मनात येऊन त्या भाविकाच्या मनात काही भावना उत्पन्न होऊन त्याने त्याग केला. त्या भावनेला तुमच्या अर्थशास्त्रात काही स्थान आहे का? देशातील एक नदी पाहून त्याचें अंत:करण द्रवलें. ही भावना तुम्हांस समजेल तर मग मी तुमच्या देशभक्तीची पारख करीन.'' देशभक्ति म्हणजे का भाकर? देशातील महान् नदी पाहून सारी संपत्ति तिच्यात बुडवू दे, तिच्या चरणीं

अर्पू दे, असें मनात येणें ही केवढी देशभक्ति! तो सारा पैसा, ते पांढरे, तांबडे, पिवळे दगड, तीं किड्यांच्या विष्ठेपासून झालेलीं मोतीं-पोवळीं, त्या सर्वांची पाण्यात बुडविण्याइतकीच किंमत आहे. परमेश्वराच्या पायांपुढे ही सारी धूळ तुच्छ माना. तुम्ही म्हणाल, नदीचा व परमेश्वराच्या पायांचा काय संबंध? तुमच्या सृष्टीत देवाचा संबंध आहे का कोठे? नदी म्हणजे ऑक्सिजन व हायड्रोजन. सूर्य म्हणजे किटसन बत्तीचा एक मोठा प्रकार. त्याला काय नमस्कार करावयाचा? नमस्कार फक्त तुमच्या भाकरीला. मग त्या भाकरीत तरी काय आहे? ती भाकर म्हणजे तरी एक पांढरी मातीच. तिच्यासाठी कां मिटक्या मारता? एवढा सूर्य उगवला, अशी ही सुंदर नदी दिसली, तेथे परमेश्वरी अनुभव नाही यावयाचा तर कोठे यावयाचा? तो इंग्रज कवि वर्डस्वर्थ रडत म्हणतो, ''पूर्वी मी इंद्र-धनुष्य बघे तेव्हा नाचे, कुदे. माझें हृदय उचंबळें. आज कां बरें नाचत नाही? पूर्वीची जीवनातील माधुरी गमावून मी का दगड बनलो?''

सारांश, सकाम भक्ति किंवा अडाणी मनुष्याच्या भावना यांचेंहि महत्त्व फार मोठें आहे. परिणामीं त्यातून महान् सामर्थ्य निघतें. जीव कोणताहि व केवढाहि असो; तो परमेश्वराच्या दरबारात एकदा आला म्हणजे मान्य झाला. अग्नीत कोणतेंहि लाकूड टाका, तें पेट घेणार. परमेश्वराची भक्ति ही अपूर्व साधना आहे. सकाम भक्तीचेंहि परमेश्वर कौतुक करील. पुढे ती भक्ति निष्काम होऊन पूर्णतेकडे जाईल.

## 35. निष्काम भक्तीचे प्रकार आणि पूर्णता

**13** सकाम भक्त हा एक प्रकार. आता निष्काम भक्ति करणारे पाहू. यात पुन्हा एकांगी आणि पूर्ण. आणि एकांगीत तीन तऱ्हा. पहिली तऱ्हा आर्त भक्तांची. आर्त म्हणजे ओलावा पाहणारा; देवासाठी रडणारा, विव्हळणारा; जसा नामदेव. देवाचें प्रेम केव्हा मिळेल, त्याला मिठी केव्हा मारीन, त्याच्या पायीं केव्हा जडेन, अशी तगमग असणारा. प्रत्येक कार्यात हा भक्त जिव्हाळा आहे कीं नाही, प्रेम आहे कीं नाही, या भावनेने पाहील.

**14** दुसरी तऱ्हा जिज्ञासूंची. ही तऱ्हा सांप्रत आपल्या देशात फारशी नाही. कोणी गौरीशंकर पुन:पुन्हा चढतील व मरतील. कोणी उत्तर ध्रुवाच्या शोधार्थ जातील व आपले शोध कागदावर लिहून बाटल्यांत घालून त्या पाण्यावर सोडून मरून जातील. कोणी ज्वालामुखीच्या आंत उतरतील. हिंदुस्थानातील लोकांना मरण म्हणजे बाऊ. कुटुंब पोसणें याहून पुरुषार्थच उरला नाही. जिज्ञासु भक्ताजवळ अदम्य जिज्ञासा असते. प्रत्येक वस्तूतील गुणधर्म तो शोधतो. मनुष्य नदीमुखाने सागराला मिळतो, त्याप्रमाणे हा जिज्ञासुहि शेवटीं परमेश्वराला मिळेल.

**15** तिसरी तऱ्हा अर्थार्थीची. अर्थार्थी म्हणजे प्रत्येक गोष्टीत अर्थ पाहणारा. अर्थ म्हणजे पैसा नव्हे. अर्थ म्हणजे हित, कल्याण. कोणत्याहि गोष्टीची परीक्षा करतांना ''याने समाजाचें कल्याण काय होईल'' ही कसोटी तो लावील. माझें लेखन, भाषण, सारें कर्म जगाच्या मंगलासाठी आहे कीं नाही हें तो बघेल. निरुपयोगी, अहितकर क्रिया त्याला पसंत नाही. जगाच्या हिताची चिंता करणारा केवढा हा महात्मा! जगाचें कल्याण हाच त्याचा आनंद. प्रेमाच्या दृष्टीने सर्व क्रियांकडे पाहणारा तो आर्त, ज्ञानाच्या दृष्टीने पाहणारा तो जिज्ञासु आणि सर्वांच्या कल्याणाच्या दृष्टीने पाहणारा तो अर्थार्थी.

**16** हे तिन्ही भक्त निष्काम खरे; परंतु एकांगी. एक कर्मद्वारा, दुसरा हृदयद्वारा, तिसरा बुद्धिद्वारा देवाकडे येतो. आता उरला प्रकार तो पूर्ण भक्ताचा. यालाच ज्ञानी भक्त म्हणावयाचें. या भक्ताला जें दिसेल तें सारें देवाचेंच रूप. कुरूप-सुरूप, राव-रंक, स्त्री-पुरुष, पशु-पक्षी, सर्वत्र परमात्म्याचें पावन दर्शन. **''नर नारी बाळे अवघा नारायण। ऐसें माझें मन करीं देवा।।''** अशी तुकाराम महाराजांची प्रार्थना आहे. नागाची पूजा, हत्तीचें तोंड असलेल्या देवाची पूजा, झाडाची पूजा, हे जसे पागलपणाचे मासले हिंदुधर्मात आहेत, त्यापेक्षाहि त्या ज्ञानी भक्ताच्या ठिकाणीं पागलपणाची कमाल झालेली असते. त्याला काहीहि भेटो; किडामुंगीपासून तों चंद्र-सूर्यापर्यंत सर्वत्र एकच परमात्मा त्याला दिसतो. त्याचें हृदय उचंबळतें. **''मग तया सुखा अंत नाहीं पार। आनंदें सागर हेलावती।''** असें जें हें दिव्य भव्य दर्शन, त्याला भ्रम म्हणा वाटेल तर, परंतु हा भ्रम सौख्याची राशी आहे, आनंदाचा ठेवा आहे. गंभीर सागरात त्याला देवाचा विलास दिसतो. गाईत त्याला देवाची वत्सलता दिसते, पृथ्वीत त्याची क्षमता दिसते, निरभ्र आकाशात त्याची निर्मळता दिसते, रवि-चंद्र-ताऱ्यांत त्याचें तेज व भव्यता दिसते, फुलात त्याची कोमलता दिसते, दुर्जनात कसोटी पाहणारा तो देव

दिसतो. अशा रीतीने एकच परमात्मा सर्वत्र नटलेला आहे, हें पाहण्याचा ज्ञानी भक्ताचा अभ्यास चालू असतो. असें करता करता एक दिवस तो ज्ञानी ईश्वरातच मिसळून जातो.

***रविवार, 3-4-'32***

# अध्याय 8

# प्रयाण-साधना : सातत्ययोग

### 36. शुभ संस्कारांचा संचय

**1** मनुष्याचें जीवन हें अनेक संस्कारांनी भरलेलें असतें. आपल्या हातून असंख्य क्रिया होत असतात. त्यांचा हिशेब करावयास बसू तर अंतहि लागणार नाही. चोवीस तासांतीलच क्रिया स्थूल मानाने पाहू लागलो तर किती तरी दिसतील. खाणें, पिणें, बसणें, झोपणें, चालणें, हिंडणें, काम करणें, लिहिणें, बोलणें, वाचणें; याशिवाय नाना प्रकारचीं स्वप्नें, रागद्वेष, मानापमान, सुखदु:ख असे अनंत प्रकार आपणांस दिसून येतील. त्या सर्वांचे मनावर संस्कार होत असतात. म्हणून जीवन म्हणजे काय, असें जर कोणी विचारील तर जीवन म्हणजे संस्कारसंचय अशी मी व्याख्या करीन.

**2** चांगले संस्कार तसे वाईट संस्कार, दोघांचाहि मनुष्याच्या जीवनावर परिणाम झालेला असतो. बाळपणींच्या क्रियांचें तर स्मरणच नाही; सारें लहानपण पाटीवरचें पुसावें त्याप्रमाणे होऊन जातें. पूर्वजन्मींचे संस्कार तर अगदीच साफ पुसल्यासारखे होतात; इतके की पूर्वजन्म होता कीं नाही याचीहि शंका येऊ शकते. या जन्मींचें लहानपण आठवत नाही तर पूर्वजन्मींची गोष्टच कशाला? पूर्वजन्म राहो, याच जन्माचा विचार करू. आपल्या जेवढ्या क्रिया लक्षात राहतात तेवढ्याच घडल्या असें नाही. अनेक क्रिया व अनेक ज्ञानें होत असतात. परंतु या क्रिया व हीं ज्ञानें मरून शेवटीं काही संस्कार फक्त उरतात. रात्रीं निजावयाच्या वेळेस आपण दिवसातील सर्व क्रिया आठवू लागलो तरी आठवत नाहीत. कोणत्या आठवतात? ज्या कृति अधिक ठळक असतात त्याच डोळ्यांसमोर येतात. फार भांडलो असलो तर तेंच आठवतें. त्या दिवसाची तीच मुख्य कमाई. ठळक गोष्टींचे संस्कार मनावर जोराने उमटतात. मुख्य क्रिया आठवते, बाकीच्या फिक्या पडतात. जर रोजनिशी लिहू तर दोन-चार महत्त्वाच्या गोष्टी आपण लिहू. प्रत्येक दिवसाचे असे संस्कार घेऊन मग जर आठवड्याचा आपण आढावा घेऊ तर आणखीहि त्यांतून गळून आठवड्यातील म्हणून काही ठळक गोष्टी शिल्लक राहतील. पुढे महिन्याने आपण काय केलें हें पहावयास बसू तर सर्व महिन्यात ज्या महत्त्वाच्या गोष्टी असतील तेवढ्याच डोळ्यांसमोर येतील. असें मग सहा महिन्यांचें, वर्षाचें, पांच वर्षांचें. पाहता पाहता आढावा म्हणून फारच थोड्या ठळक गोष्टी लक्षात राहतात व त्यांचेच संस्कार होतात. असंख्य क्रिया व अनंत ज्ञानें होऊन शेवटीं मनाजवळ फारच थोडी शिल्लक आढळून येते. तीं तीं कर्में व तीं तीं ज्ञानें आलीं व आपलें काम करून मरून गेलीं. सर्व कर्मांचे दहा-पांच दृढ संस्कार काय ते शिल्लक उरतात. हे संस्कार म्हणजे आपली पुंजी. जीवनाचा व्यापार करून ही संस्कार-संपत्ति काय ती मिळविली. जसा एखादा व्यापारी रोजचा, महिन्याचा व सालाचा जमाखर्च करून शेवटीं इतका नफा किंवा इतका तोटा असा एक आंकडा काढतो, हुबेहुब तसेंच जीवनाचें आहे. अनेक संस्कारांची बेरीज-वजाबाकी होता होता अत्यंत सुटसुटीत व आटोपशीर असें काही शिल्लक राहतें. जीवनाचा शेवटचा क्षण आला म्हणजे आत्मा जीवनाची शिल्लक आठवू लागतो. जन्मभर काय केलें याची आठवण करतांना त्याला केलेली कमाई दोनचार गोष्टींत दिसून येते. याचा अर्थ असा नाही की तीं तीं कर्में व ज्ञानें फुकट गेलीं. त्यांचें काम होऊन गेलेलें असतें. हजारों उलाढाली करून शेवटीं पांच हजारांचें नुकसान किंवा दहा हजारांचा फायदा एवढेंच सार व्यापाऱ्याजवळ उरतें. नुकसान झालें तर छाती दडपली जाते. नफा असेल तर आनंद होतो.

**3** आपलें तसेंच आहे. मरणाच्या वेळीं जर खाण्यावर वासना गेली तर सर्व जीवनात अन्नाची चव घेण्याचा अभ्यास केला असें सिद्ध होईल. अन्नाची वासना ही जीवनाची केलेली कमाई. एखाद्या आईला मरतांना मुलाची आठवण झाली तर तो पुत्रविषयक संस्कारच बलवान् ठरला. बाकीचीं असंख्य कर्में गौण झालीं. अंकगणितात अपूर्णांकांचें उदाहरण असतें. किती मोठमोठे आंकडे! परंतु संक्षेप देता देता शेवटीं एक किंवा शून्य असें उत्तर येतें. त्याप्रमाणे जीवनात संस्कारांचे अनेक आंकडे जाऊन शेवटीं बलवान् असा एक संस्कार साररूप उरतो. जीवनाच्या उदाहरणाचें तें उत्तर. अंतकाळींचें स्मरण हें सर्व जीवनाचें फलित होय.

जीवनाचें हें शेवटचें सार मधुर निघावें, ही शेवटची घडी गोड व्हावी; म्हणून जीवनावधि खटपट असावी. ज्याचा शेवट गोड तें सारें गोड. त्या शेवटच्या उत्तराकडे ध्यान ठेवून जीवनाचे गणित सोडवा. जीवनाची योजना हें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून करा. उदाहरण सोडवितांना जो विशिष्ट प्रश्न विचारला असेल तो डोळ्यांसमोर ठेवून तें सोडवावें लागतें. त्या प्रकारच्या रीति योजाव्या लागतात. मरणाच्या वेळेस जो संस्कार उमटावा अशी इच्छा असेल त्याला अनुसरून सर्व जीवनाचा ओघ वळवा. तिकडे अहोरात्र कल असू द्या.

## 37. मरणाचें स्मरण असावें

**4** या आठव्या अध्यायात हा सिद्धांत मांडला आहे की जो विचार मरणकाळीं स्पष्ट ठसठशीतपणें उमटला तोच विचार पुढच्या जन्मात बलवत्तर ठरतो. ती शिदोरी घेऊन जीव पुढील यात्रेला निघतो. आजच्या दिवसाची कमाई घेऊन झोपेनंतर उद्याच्या दिवसास आपण आरंभ करतो. त्याप्रमाणे या जन्माची शिदोरी घेऊन मरणाच्या मोठ्या झोपेनंतर फिरून आपली यात्रा सुरू होते. या जन्माचा अंत ती पुढील जन्माची सुरुवात. म्हणून मरणाचें स्मरण सदैव राखून वागा.

**5** मरणाचें स्मरण करण्याची आणखी जरूर यासाठी आहे की मरणाच्या भयानकतेला तोंड देता यावें, त्यावर तोड काढता यावी. एकनाथांची एक गोष्ट आहे. एका गृहस्थाने नाथांस विचारलें, ''महाराज, आपलें जीवन किती साधें, किती निष्पाप; आमचें असें कां नाही? तुम्ही कधी रागावत नाही, कोणाशी भांडण नाही, तंटा नाही. किती शांत पवित्र प्रेमळ तुम्ही!'' नाथ म्हणाले, ''माझी गोष्ट तूर्त राहू दे. तुझ्याविषयी मला एक गोष्ट कळली आहे. तुझें आजपासून सात दिवसांनी मरण आहे!'' नाथांनी सांगितलेली गोष्ट खोटी कोण मानणार? सात दिवसांनी मरण. फक्त 168 च तास बाकी. अरेरे! तो मनुष्य घाईने घरीं गेला. त्याला काही सुचेना. निरवानिरवीच्या गोष्टी बोलत होता, करीत होता. तो आजारी झाला. आंथरुणावर होता. सहा दिवस गेले. सातव्या दिवशीं नाथ त्याच्याजवळ आले. त्याने नमस्कार केला. नाथांनी विचारलें, ''कसें काय?'' तो म्हणाला, ''जातो आता.'' नाथांनी विचारलें, ''या सहा दिवसांत किती पाप झालें? पापाचे किती विचार मनात आले?'' तो आसन्नमरण मनुष्य म्हणाला, ''नाथ, पापाचा विचार करावयास वेळच झाला नाही. सारखें डोळ्यांसमोर मरण होतें.'' नाथ म्हणाले, ''आमचें जीवन निष्पाप कां असतें याचें उत्तर तुला आता मिळालें.'' मरणाचा वाघोबा सदैव समोर उभा असला म्हणजे पाप करावयास कसें सुचेल? पाप करावयासहि निश्चिंतता लागते. मरणाचें स्मरण नेहमी ठेवणें हा पापापासून मुक्त होण्यास उपाय आहे. मरण समोर दिसत असेल तर कोणत्या हिंमतीवर मनुष्य पाप करील?

**6** परंतु मनुष्य मरणाचें स्मरण टाळतो. पास्कल म्हणून एक फ्रेंच तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्याचें 'पांसे' म्हणून एक पुस्तक आहे. 'पांसे' म्हणजे विचार. निरनिराळे स्फुट विचार या ग्रंथात त्याने मांडले आहेत. त्या पुस्तकात तो एके ठिकाणीं लिहितो, ''मृत्यु सतत पाठीशी उभा आहे; परंतु मृत्यूस विसरावें कसें याचा प्रयत्न माणसाने सतत चालवला आहे. मृत्यूस स्मरून कसें वागावें हें नजरेसमोर तो राखीत नाही.'' माणसास मरण हा शब्दहि खपत नाही. जेवतांना मरण हा शब्द उच्चारला तर म्हणतात, ''काय अभद्र बोलतोस रे.'' पण इतकें असून मरणाकडे सारखीं पावलें चाललींच आहेत. मुंबईचें तिकिट काढून एकदा आगगाडीच्या डब्यात बसलात म्हणजे तुम्ही बसलेले असलात तरी गाडी तुम्हांला मुंबईत नेऊन फेकणार. आपण जन्मताच मरणाचें तिकीट घेतलेलें आहे. तुम्ही बसा किंवा धावा. बसलात तरी मृत्यु, धावलात तरी मृत्यु. तुम्ही मृत्यूचा विचार धरा कीं सोडा, तो टळत नाही. मरण निश्चित आहे; बाकी अनिश्चित असेल. सूर्य अस्तास चालला की आयुष्याचा एक तुकडा खाऊन जातो. जीवनाचे तुकडे कुरतडले जात आहेत. जीवन झिजत आहे, घटत आहे, तरी माणसाला त्याचा विचार नाही. ज्ञानदेव म्हणतात, **'कौतुक दिसतसे'**. मनुष्याला कसली एवढी निश्चिंतता वाटते असें मनात येऊन ज्ञानदेवांना आश्चर्य वाटत आहे. मरणाचा विचारहि सहन न होण्याइतकें मरणाचें भय माणसास वाटतें. ह्या विचारास तो टाळीत असतो. डोळ्यांवर कातडें ओढून बसतो. लढाईवर जाणारे शिपाई मरणाचा विचार टाळण्यासाठी खेळतील, नाचतील, गातील, सिगारेट ओढतील. पास्कल लिहितो, ''प्रत्यक्ष मरण सर्वत्र दिसत असूनहि हा टॉमी, हा शिपाई तें विसरण्यासाठी खात, पीत, आलापीत बसेल.''

**7** आपण सारे या टॉमीसारखेच आहोत. चेहरा गोल हसतमुख राखण्याचा प्रयत्न करावयाचा, सुकलेला असेल तर तेले पोमेडें चोळावयाचीं, केस पिकले तर कलप लावावयाचे, असा हा माणसाचा प्रयत्न असतो. छातीवर मृत्यु नाचत असूनहि त्याला विसरण्याचा प्रयत्न आपण सारे टॉमी अक्षय करून राहिलो आहोत. इतर वाटेल तें बोलतील; परंतु मरणाचा विषय काढू नका म्हणतील. मॅट्रिक झालेल्या मुलाला जर विचारलें, ''पुढे काय करणार?'' तर तो म्हणतो, ''सध्या नका विचारू. हल्ली फर्स्ट इयरला आहे.'' पुढील वर्षीं पुन्हा विचाराल तर तो म्हणेल, ''आधी इंटर तर होऊ दे, पुढे पाहू.'' असें त्याचें चाललेलें असतें. पुढचें असतें तें अगाऊ पहावयास नको का? पुढच्या पावलाची आधी तजवीज हवी. नाही तर तें खड्ड्यात घालील. परंतु विद्यार्थी टाळतो हें सारें. बिचाऱ्याचें शिक्षणच इतकें अंधकारमय असतें की त्या शिक्षणातून पलीकडचें भविष्य त्याला दिसतच नाही. म्हणून पुढे काय करावयाचें हा विचारच तो डोळ्यांसमोर आणीत नाही. कारण अंधारच दिसतो सारा. परंतु तें पुढचें टाळता येत नाही. तें मानगुटीस येऊन बसतें.

**8** कॉलेजमध्ये प्रोफेसर तर्कशास्त्र शिकवितो. ''मनुष्य मर्त्य आहे. सॉक्रेटिस मनुष्य आहे, अर्थात् तो मरणार'' असें अनुमान प्रोफेसर शिकवितो. तो सॉक्रेटिसाचें उदाहरण देतो. स्वत:चें कां देत नाही? प्रोफेसरहि मर्त्यच आहे. ''सर्व माणसें मर्त्य आहेत. म्हणून मी प्रोफेसरहि मर्त्य आहे, व शिष्या, तूहि मर्त्य आहेस'' असें तो प्रोफेसर शिकविणार नाही. तें मरण सॉक्रेटिसावर ढकलून देतो. कारण सॉक्रेटिस मरून चुकलेला आहे. तो हजर नसतो तक्रार करावयास. शिष्य व गुरु सॉक्रेटिसास मरण अर्पून स्वत:च्या बाबतीत 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असे राहतात. आपण अति सुरक्षित आहोत असें जणू त्यांना वाटत असतें.

**9** असा हा मृत्यूला विसरण्याचा सर्वत्र अहोरात्र जाणूनबुजून प्रयत्न आहे. परंतु मृत्यु का टळतो? उद्या आई मेली म्हणजे मृत्यु समोर उभा आहेच. निर्भयपणें मरणाचा विचार करून त्याच्यावर तोड काढण्याची हिंमतच मनुष्य करीत नाही. हरणाच्या पाठीमागे वाघ लागलेला असावा. तें हरण चपळ असतें, परंतु त्याची ताकत कमी पडते. तें थकतें शेवटीं. पाठीमागून वाघोबा, तें मरण, येतच असतें. त्या क्षणीं त्या हरणाची काय स्थिति होते? तें वाघाकडे पाहू शकत नाही. मातीत तोंड व शिंगें खुपसून डोळे मिटून उभें राहतें. ''ये बाबा, घाल आता झडप!'' असें जणू निराधार होऊन तें सांगतें. आपण मरणाला समोर पाहू शकत नाही. त्याला चुकविण्याच्या कितीहि युक्त्या केल्या तरी त्या मरणाचा जोर इतका असतो की तें शेवटीं गांठतेंच गांठतें.

**10** आणि मग मरण आलें म्हणजे मनुष्य जीवनाची शिल्लक पाहू लागतो. परीक्षेला बसलेला आळशी मठ्ठ विद्यार्थी दौतीत टांक घालतो, बाहेर काढतो. परंतु पांढऱ्यावर काळें करील तर शपथ! लिहिशील कीं नाही थोडें, का सरस्वती येऊन लिहिणार आहे सारें? तीन तास संपतात. कोरा पेपर देतो, किंवा शेवटीं खरडतो काहीतरी. प्रश्न सोडवावयाचे, उत्तरें लिहावयाचीं, याचा विचार नाही. इकडे बघतो, तिकडे बघतो. तसेंच आपलें. जीवनाचें टोंक मरणाकडे गेलेलें आहे हें लक्षात ठेवून तो शेवटचा क्षण पुण्यमय, अत्यंत पावन व गोड कसा होईल याचा अभ्यास आयुष्यभर केला पाहिजे. उत्कृष्टांतले उत्कृष्ट संस्कार मनावर कसे राहतील याचा विचार आजपासूनच झाला पाहिजे. परंतु चांगल्या संस्कारांचा कोण करतो अभ्यास? वाईट गोष्टींचा मात्र पदोपदी अभ्यास होत आहे. जीभ, डोळा, कान यांना चवचालपणा शिकवून राहिलो आहोत. चित्ताला निराळा अभ्यास लावला पाहिजे. चांगल्याकडे चित्त नेलें पाहिजे. तेथे रंगविलें पाहिजे. ज्या क्षणीं आपलें चुकतें आहे असें समजलें त्या क्षणापासून सुधारण्यास लागलें पाहिजे. चूक कळल्यावरहि का तशीच करीत रहायचें? ज्या क्षणीं चूक कळली तो क्षण पुनर्जन्माचा. तें तुझें नवीन बालपण, ती तुझ्या जीवनाची नवीन सकाळ असें मान. आता खरा जागा झालास. आता रात्रंदिवस जीवनाचें परीक्षण कर, जप. तसें न करशील तर पुन्हा घसरशील, पुन्हा वाईटाचा अभ्यास सुरू होईल.

**11** मी पुष्कळ वर्षांपूर्वी आजीला भेटावयास गेलो होतो. ती अगदी म्हातारी झाली होती. ती मला म्हणे, ''विन्या, आठवत नाही रे अलीकडे. तुपाचें भांडें आणण्यासाठी जाते, पण न आणताच परत येते.'' परंतु पन्नास वर्षांपूर्वीची दागिन्यांची एक गोष्ट ती मला सांगे. पांच मिनिटांपूर्वीचें स्मरण नाही; परंतु पन्नास वर्षांपूर्वीचा बलवान् संस्कार शेवटपर्यंत सतेज आहे. याचें कारण काय? ती दागिन्यांची गोष्ट आजपर्यंत तिने प्रत्येकाजवळ सांगितली असेल. त्या

गोष्टीचा सतत उच्चार झाला. ती गोष्ट जीवनाला चिकटून बसली. जीवनाशी एकरूप झाली. मी मनात म्हटलें, ''परमेश्वर करो व आजीला मरणकाळीं हे दागिने न आठवोत म्हणजे झालें.''

## 38. 'सदा त्यांत चि रंगला'

**12** ज्या गोष्टीचा अभ्यास रात्रंदिवस चालला आहे ती चिकटून कां नाही राहणार? त्या अजामिळाच्या गोष्टी वाचून भ्रमात नका पडू. तो वरून पापी होता. परंतु त्याच्या जीवनाच्या आंतून पुण्याचा प्रवाह होता. तें पुण्य शेवटच्या क्षणीं जागें झालें. नेहमी पापें करून शेवटीं रामनाम अचूक तोंडात येईल अशा भ्रमात नका राहू. लहानपणापासून कसोशीने अभ्यास करा. एकेक चांगला संस्कार उमटेल अशी काळजी घ्या. याने काय होणार, त्याने काय होणार, असें म्हणू नकोस. चार वाजताच कां उठावयाचें? सात वाजता उठलें म्हणून काय बिघडलें? असें म्हणून चालणार नाही. मनाला अशी सारखी मोकळीक देत गेलास तर शेवटीं फसशील. मग सत्संस्कारांचे ठसे उमटणार नाहीत. कण कण लक्ष्मी मिळवावी लागते. क्षण क्षण फुकट न दवडता विद्यार्जनात वेंचावा लागतो. दर क्षणीं घडणारा संस्कार चांगलाच होत आहे ना याचा विचार करा. वाईट बोल उच्चारला, झाला लगेच वाईट संस्कार. प्रत्येक कृतीची छिन्नी जीवनाच्या दगडाला आकार देत आहे. दिवस चांगला गेला तरी वाईट कल्पना स्वप्नात येतात. दहा-पांच दिवसांतलेच विचार स्वप्नात दिसतील असें नाही. पुष्कळ वाईट संस्कार बेसावधपणें उमटून गेलेले असतात. कोणत्या घडीला ते उठून पडतील याचा नेम नसतो. म्हणून बारीकसारीक गोष्टीतहि जपावें. बुडत्याला काडीचाहि आधार होतो. संसारात आपण बुडत आहोत. जरा चांगलें बोललास, तेवढाच आधार. चांगलें केलेलें फुकट जाणार नाही. तें तुला तारील. लेशमात्रहि वाईट संस्कार नको. डोळा पवित्र राखीन, कान निंदा ऐकणार नाही, चांगलें बोलेन, अशी सदैव खटपट करा. अशी दक्षता राखाल तर शेवटच्या क्षणाला हुकमी डाव पडेल. आपण जीवनाचे व मरणाचे स्वामी होऊ.

**13** पवित्र संस्कार उमटण्यासाठी उदात्त विचार मनात खेळवावे. हात पवित्र कर्मात गुंतवावेत. आंत ईश्वराचें स्मरण, बाहेर स्वधर्माचरण. हाताने सेवेचें कर्म, मनात विकर्म, असें रोज करीत राहिलें पाहिजे. गांधीजी पहा, रोज कांततात. दररोजच्या कांतण्यावर त्यांनी भर दिला आहे. रोज कां कांतावयाचें? कपड्यापुरतें केव्हा तरी कांतलें म्हणजे नाही का चालणार? परंतु हा व्यवहार झाला. रोज कांतण्यात आध्यात्मिकता आहे. देशासाठी मला काहीतरी करावयाचें आहे याचें तें चिंतन आहे. तें सूत दरिद्रनारायणाशी रोज जोडतें. तो संस्कार दृढ होतो.

**14** डॉक्टरने रोज डोस घ्यावयास सांगितलें. परंतु आपण तें औषध एकदम घेतलें तर? तें चमत्कारिक होईल. औषधाचा हेतु सफळ होणार नाही. औषधाचा रोज संस्कार होऊन प्रकृतीतील विकृति दूर केली पाहिजे. त्याप्रमाणेच जीवनाचें आहे. शंकरावर हळूहळू अभिषेक करावयाचा. माझा हा आवडता दृष्टांत आहे. लहानपणीं ती क्रिया मी रोज पहावयाचा. चोवीस तास मिळून तें एकंदर पाणी फार तर दोन बादल्या होईल. पटकन् दोन बादल्याच पिंडीवर ओतल्या तर? या प्रश्नाचें उत्तर लहानपणींच मला मिळालें. पाणी एकदम ओतून कर्म सफळ होणार नाही. थेंब थेंब ती संतत धार पडत असणें म्हणजेच उपासना. समान संस्कारांची सारखी संतत धार असली पाहिजे. जो संस्कार सकाळीं, तोच दुपारीं, तोच सायंकाळीं. जो दिवसा तोच रात्रीं. जो काल तोच आज व जो आज तोच उद्या. जो या वर्षीं तोच पुढील वर्षीं. जो या जन्मीं तोच पुढील जन्मीं. जो जगतांना तोच मरतांना. अशी एकेका सत्संस्काराची दिव्य धारा सर्व जीवनातून सतत वाहत राहिली पाहिजे. असा प्रवाह अखंड चालू राहील तरच शेवटीं आपण जिंकू. तेव्हाच निशाण मुक्कामावर नेऊन रोवू. एकाच दिशेने संस्कार-प्रवाह वाहिला पाहिजे. नाही तर डोंगरावर पडलेलें पाणी जर बारा वाटांनी फांकून गेलें तर नदी होणार नाही. परंतु सारें एका दिशेने वाहत जाईल तर धारेचा ओहोळ होईल, ओहोळाचा प्रवाह होईल, प्रवाहाची नदी होईल, नदीची गंगा होऊन ती समुद्राला मिळेल. एका दिशेने वाहत जाणारें पाणी सागरास मिळालें; चोहोंबाजूस जाणारें आटून गेलें. संस्कारांचें असेंच आहे. संस्कार आले व गेले तर काय उपयोग? संस्कारांचा पवित्र प्रवाह सतत जीवनात वाहत राहील तरच शेवटीं मरण महानंदाचें निधान वाटेल. जो प्रवासी वाटेत फार न थांबता वाटेतील मोह दूर करून कष्टाने पावलें रोवीत शिखरावर जाऊन पोंचला, वर जाऊन छातीवरचीं सर्व बंधनें फेकून

तेथल्या मोकळ्या वाऱ्याचा जो अनुभव घेता झाला, त्याच्या आनंदाची इतरांस कल्पना येणार नाही. जो प्रवासी मध्येच थांबला त्याचा सूर्य काही थांबला नाही.

## 39. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग

**15** सारांश, बाहेरून सतत स्वधर्माचरण व आंतून चित्तशुद्धीची, हरिस्मरणाची क्रिया, असे अंतर्बाह्य कर्मविकर्मांचे प्रवाह जेव्हा काम करतील तेव्हा मरण आनंदाची गोष्ट वाटेल. म्हणून भगवान् सांगतात – **'म्हणूनि सगळा काळ मज आठव झुंज तूं'** – माझें अखंड स्मरण कर व झगडत रहा. **'सदा त्यांत चि रंगला'** – नेहमी ईश्वरात मिसळून रहा. ईश्वरी प्रेमाने जेव्हा अंतर्बाह्य रंगशील, तो रंग जेव्हा सर्व जीवनावर चढेल, तेव्हा पवित्र गोष्टीत सदैव आनंद वाटू लागेल. वाईट वृत्ति मग समोर उभीच राहणार नाही. सुंदर मनोरथांचे अंकुर मनात उगवतील. चांगल्या कृति सहज होऊ लागतील.

**16** ईश्वराच्या स्मरणाने चांगल्या कृति सहज होऊ लागतील हें खरें. परंतु झगडत रहा अशी भगवंतांची आज्ञा आहे. तुकाराम महाराज म्हणतात – **'रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।'** आंत व बाहेर अनंत सृष्टि भरलेली आहे. या सृष्टीशी मनाचा सारखा झगडा सुरू आहे. या झगड्यात प्रत्येक क्षणीं जयच येईल असें नाही. जो अखेर साधील तोच खरा. शेवटचा निकाल तो खरा. यशापयश अनेक वेळा मिळेल. अपयश आलें म्हणून निराश होण्याचें कारण नाही. दगडावर एकोणवीस घाव घातले, तरी तो फुटला नाही. विसाव्या घावाने फुटला समजा. मग ते पहिले घाव का अपेशी समजावयाचे? त्या विसाव्या घावाच्या यशाची तयारी पहिले एकोणवीस घाव करीत होते.

**17** निराश होणें म्हणजे नास्तिक होणें. परमेश्वर पाठीराखा आहे. विश्वास ठेवा. मुलाला हिंमत यावी म्हणून आई त्याला इकडे तिकडे जाऊ देते. परंतु ती त्याला पडू देणार नाही. पडू लागलें तर हळूच येऊन उचलील. ईश्वरहि तुमच्याकडे पाहत आहे. तुमच्या जीवनाच्या पतंगाची दोरी त्याच्या हातात आहे. पतंगाची दोरी कधी तो तंग धरतो, कधी सैल सोडतो; परंतु सूत्र त्याच्या हातात आहे ही खात्री बाळगा. गंगेच्या घाटावर पोहावयास शिकवितात. घाटावरच्या झाडास सांखळी बांधलेली असते. ती सांखळी कंबरेला बांधून, देतात पाण्यात फेकून. वस्ताद पाण्यात असतातच. तो नवशिक्या चार गटांगळ्या खातो; परंतु शेवटीं ती कला शिकतो. परमेश्वर जीवनाची कला आपणांस शिकवून राहिला आहे.

## 40. शुक्ल-कृष्ण गति

**18** परमेश्वरावर श्रद्धा ठेवून कायावाचामनें अहोरात्र झगडत रहाल तर अंतकाळची घडी अतिशय उत्तम येईल. त्या वेळेस सर्व देवता अनुकूल होतील. या अध्यायाच्या शेवटीं हें रूपकाने सांगितलें आहे. हें रूपक समजून घ्या. ज्याच्या मरणाच्या वेळेस अग्नि पेटलेला आहे, सूर्य प्रकाशत आहे, शुक्लपक्षातील चंद्रमा वाढून राहिला आहे, उत्तरायणातील निरभ्र व सुंदर आकाश पसरलें आहे, तो ब्रह्मात विलीन होतो. आणि ज्याच्या मरणाच्या वेळेस धूर धुमसून राहिला आहे, अंतर्बाह्य अंधार आहे, कृष्णपक्षातील चंद्रमा क्षीण होत आहे, दक्षिणायनातील तें अभ्राच्छादित मलिन आकाश पसरलेलें आहे, तो जन्ममरणाच्या फेऱ्यात पुन्हा पडेल.

**19** पुष्कळ लोक या रूपकाने घोटाळ्यात पडतात. पुण्य-मरण यावें अशी इच्छा असेल तर अग्नि, सूर्य, चंद्र, आकाश, या देवतांची कृपा असली पाहिजे. अग्नि हें कर्माचें चिह्न आहे. यज्ञाची खूण आहे. अंतकाळींसुद्धा यज्ञाची ज्वाला पेटलेली पाहिजे. न्यायमूर्ति रानडे म्हणत, ''सारखें कर्तव्य करीत असता मरण आलें तर तें धन्य होय. काहीतरी वाचीत आहे, लिहीत आहे, कर्म करीत आहे, असें काम करता करता मला मरण आलें म्हणजे पुरे.'' पेटलेला अग्नि याचा हा अर्थ आहे. मरणकाळींहि कर्म करीत राहणें ही अग्नीची कृपा. सूर्याची कृपा म्हणजे बुद्धीची प्रभा शेवटपर्यंत झगझगीत राहणें. चंद्राची कृपा म्हणजे मरणवेळीं पवित्र भावना वाढत जाणें. चंद्र ही मनाची, भावनांची देवता आहे. शुक्लपक्षातील चंद्राप्रमाणे मनातील प्रेम, भक्ति, उत्साह, परोपकार, दया इत्यादि शुद्ध भावनांचा पूर्ण विकास व्हावा. आकाशाची कृपा म्हणजे हृदयाकाशात आसक्तीचे ढग जरादेखील नसणें. एकदा गांधीजी म्हणाले, ''मी सारखा चरखा चरखा करून राहिलो आहे. मी चरखा पवित्र वस्तु मानतो. परंतु अंतकाळीं त्याचीहि वासना नको. ज्याने मला चरखा

सुचविला तो त्याची चिंता वाहण्यास सर्वतोपरि समर्थ आहे. चरखा आता दुसऱ्या भल्या भल्या माणसांच्या हातात गेला आहे. चरख्याची चिंता सोडून परमेश्वरास भेटण्यास मी तयार असलें पाहिजे.'' सारांश, उत्तरायण असणें म्हणजे हृदयात आसक्तीचे ढग नसणें.

**20** शेवटच्या श्वासोच्छ्वासापर्यंत हातून सेवा होऊन राहिली आहे, भावनांची पौर्णिमा फुलली आहे, हृदयाकाशात यत्किंचित्हि आसक्ति नाही, बुद्धि सतेज आहे, अशा प्रकारें मरण ज्याला येईल तो परमात्म्यात मिळाला. असा परम मंगल शेवट होण्यास रात्रंदिवस दक्ष राहून लढत राहिलें पाहिजे. क्षणभरसुद्धा अशुद्ध संस्कार मनावर उमटू देता कामा नये. आणि असें बळ मिळावें म्हणून त्या परमेश्वराची प्रार्थना करीत राहिलें पाहिजे. नामस्मरण, तत्त्व-स्मरण पुन:पुन्हा केलें पाहिजे.

***रविवार, 10-4-'32***

# अध्याय 9

# मानवसेवेची राजविद्या : समर्पणयोग

## 41. प्रत्यक्ष अनुभवाची विद्या

**1** माझा घसा दुखत आहे. माझा आवाज ऐकू येईल कीं नाही याविषयी जरा शंका वाटते. ह्या प्रसंगीं साधुचरित थोरले माधवराव पेशवे यांच्या अंतकाळची गोष्ट आठवते. हा महापुरुष मरणशय्येवर होता. फार कफ झाला होता. कफाचें पर्यवसान अतिसारात करता येतें. माधवराव वैद्यास म्हणाले, ''माझा कफ दूर करून मला अतिसार होईल असें करा, म्हणजे रामनाम घेण्यास तोंड मोकळें होईल.'' मीहि आज परमेश्वराची प्रार्थना करीत होतो. देव म्हणाला, ''जसा घसा चालेल तसा बोल.'' मी जी येथे गीता सांगत आहे ती कोणास उपदेश करावा ह्या हेतूने नाही. लाभ करून घेणाऱ्यास त्यापासून अवश्य लाभ होईल. परंतु मी गीता सांगत आहे ती रामनाम म्हणून सांगत आहे. गीता सांगतांना माझी हरिनामाची भावना असते.

**2** मी जें हें सांगत आहे त्याचा आजच्या नवव्या अध्यायाशी संबंध आहे. हरिनामाची अपूर्व थोरवी या नवव्या अध्यायात सांगितली आहे. हा अध्याय गीतेच्या मध्यावर उभा आहे. सर्व महाभारताच्या मध्यावर गीता, व गीतेच्या मध्यावर नववा अध्याय. अनेक कारणांमुळे या अध्यायाला पावनत्व आलें आहे. ज्ञानदेवांनी शेवटीं जेव्हा समाधि घेतली त्या वेळेस हा अध्याय जपत ते समाधिस्थ झाले असें म्हणतात. या अध्यायाच्या केवळ स्मरणाने माझे डोळे भरून येतात व हृदय उचंबळतें. व्यासांचा हा केवढा उपकार! भरतखंडावरच नव्हे, तर सर्व मानवजातीवर हा उपकार आहे. जी वस्तु भगवंतांनी अर्जुनास सांगितली ती अपूर्व वस्तु शब्दांनी सांगण्यासारखी नव्हती. परंतु दयेने प्रेरित होऊन व्यासांनी ती वस्तु संस्कृत भाषेत प्रकट केली. गुह्य वस्तूला वाणीचें रूप दिलें.

**3** या अध्यायाच्या आरंभींच भगवान् सांगतात, **'राज-विद्या महा-गुह्य उत्तमोत्तम पावन'** – ही जी राजविद्या, ही जी अपूर्व वस्तु, ती प्रत्यक्ष अनुभवण्याची गोष्ट आहे. भगवान् तिला 'प्रत्यक्षावगम' म्हणत आहेत. शब्दात न मावणारी, परंतु प्रत्यक्ष अनुभवाच्या कसावर कसलेली अशी गोष्ट या अध्यायात सांगितली असल्यामुळे त्यास फार गोडी आली आहे. तुलसीदासांनी म्हटलें आहे – **'को जानै को जैहै जमपुर को सुरपुर पर-धाम को; तुलसिहिं बहुत भलो लागत जग जीवन रामगुलाम को।'** मेल्यानंतर मिळणारा स्वर्ग, त्याच्या कथा येथे काय कामाच्या? स्वर्गात कोण जातो, यमपुरास कोण जातो, तें कोणी सांगावें? येथे चार दिवस रहावयाचें आहे तर तें रामाचे गुलाम होऊन रहावें यातच मला आनंद आहे, असें तुलसीदास सांगतात. रामाचे गुलाम होऊन राहण्याची गोडी या अध्यायात आहे. प्रत्यक्ष याच देहीं याच डोळां अनुभवास येणारें फळ, जिवंतपणीं अनुभवास येणाऱ्या गोष्टी या अध्यायात सांगितल्या आहेत. गूळ खातांना गोडी प्रत्यक्ष समजते. त्याप्रमाणे रामाचे गुलाम होऊन राहण्यातील गोडी येथे आहे. अशी ही मर्त्यलोकींच्या जीवनातील गोडी प्रत्यक्ष अनुभवास आणून देणारी राजविद्या या अध्यायात आहे. ती राजविद्या गूढ आहे; परंतु भगवान् सर्वांस सुलभ, उघडी करून ठेवीत आहेत.

## 42. सोपा मार्ग

**4** ज्या धर्माचें गीता सार आहे त्या धर्माला वैदिक धर्म म्हणतात. वैदिक धर्म म्हणजे वेदापासून निघालेला धर्म. जगाच्या पाठीवर जें काही प्राचीन लिखाण आहे त्यात वेद हें पहिलें लिखाण म्हणून मानलें जातें. म्हणून भाविक लोक त्याला अनादि मानतात. यामुळे वेदाला पूज्यता मिळाली. आणि इतिहासाच्या दृष्टीने पाहिलें तरीहि वेद हें आपल्या समाजाच्या प्राचीन भावनांचें जुन्यातील जुनें चिह्न आहे. ताम्रपट, शिलालेख, नाणीं, भांडीं, प्राण्यांचे अवशेष इत्यादि साधनांपेक्षा हें लेखी साधन अत्यंत महत्त्वाचें आहे. पहिला ऐतिहासिक पुरावा म्हणजे वेद. अशा या वेदात जो धर्म बीजरूपाने होता त्याचा वृक्ष होत होत शेवटीं त्याला गीतेचें दिव्य मधुर फळ लागलें. फळाशिवाय झाडाचें आपण काय खाणार? वृक्षास फळ लागेल तेव्हाच काय खावयाचें तें मिळेल. वेदधर्माच्या साराचेंहि सार म्हणजे ही गीता.

**5** हा जो वेदधर्म प्राचीन काळापासून रूढ होता, त्यात नाना यज्ञयाग, क्रियाकलाप, नाना तपश्चर्या, नाना साधना सांगितल्या आहेत. हें जें सर्व कर्मकांड, तें जरी निरुपयोगी नसलें, तरी त्याला अधिकाराची गरज असे. तें कर्मकांड सर्वांना मोकळें नसे. झाडावरचा उंच नारळ चढून कोणी तोडावा, तो पुढे कोणी सोलावा, कोणी फोडावा? मला खूप भूक लागली असली तरी तो उंच झाडावरचा नारळ मला मिळावा कसा? मी खालून नारळाकडे बघतो, नारळ वरून माझ्याकडे बघतो. पोटातील आग अशाने का शमते? त्या नारळाची व माझी प्रत्यक्ष भेट होईपर्यंत सारें फुकट. या वेदांतील नाना क्रियांतून अत्यंत सूक्ष्म विचार असावयाचे. सामान्य जनांस ते कसे कळणार? वेदमार्गाशिवाय मोक्ष नाही; परंतु वेदाचा तर अधिकार नाही. मग इतरांचें कसें व्हावयाचें?

**6** म्हणून कृपाळू संत पुढे सरसावून म्हणाले, ''या वेदांचा रस काढू. या वेदांचें सार थोडक्यात काढून दुनियेला देऊ या.'' म्हणून तुकाराम महाराज म्हणतात – **'वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाचि साधिला।'** कोणता हा अर्थ? हरिनाम. हरिनाम हें वेदांचें सार. रामनामाने मोक्ष ठरला. स्त्रिया, मुलें, शूद्र, वैश्य, अडाणी, दुबळे, रोगी, पंगु, सर्वांना मोक्ष मोकळा झाला. वेदांच्या कपाटात अडकलेला मोक्ष भगवंतांनी राजमार्गावर आणून ठेवला. मोक्षाची साधी सोपी युक्ति. ज्याचें जें साधें जीवन, जें स्वधर्म-कर्म, सेवाकर्म, तेंच यज्ञमय कां करता येणार नाही? दुसरे यज्ञयाग कशाला? तुझें साधें रोजचें सेवाकर्म हेंच यज्ञरूप कर.

**7** हा राजमार्ग आहे. **'यानास्थाय नरो राजन् न प्रमाद्येत कर्हिचित्। धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह।।'** या मार्गाने डोळे मिटून धावत गेलात तरी पडणार नाही. दुसरा मार्ग **'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया'** असा आहे. तलवारीची धारहि जरा बोथट असेल, इतका वैदिक मार्ग बिकट आहे. रामाचे गुलाम होऊन राहण्याचा मार्ग सोपा आहे. एखादा इंजिनिअर हळूहळू उंची वाढवीत रस्ता वर वर नेतो व आपणांस उंच शिखरावर बसवतो, आणि इतकें उंच जात आहोत हें समजूनहि येत नाही. ही जशी त्या इंजिनिअराची खुबी, तशीच या राजमार्गाची आहे. जो मनुष्य जेथे कर्म करीत उभा आहे, तेथे त्या साध्या कर्मानेच परमात्मा गांठता येईल असा हा मार्ग आहे.

**8** परमेश्वर का कोठे लपलेला आहे? एखाद्या दरीत, एखाद्या घळीत, एखाद्या नदीत, एखाद्या स्वर्गात, असा का कोठे तो दडून बसला आहे? हिरे-माणकें, चांदी-सोनें पृथ्वीच्या पोटात लपलेलें असतें. मोतींपोवळीं रत्नाकर समुद्रात लपलेलीं असतात. तसें का हें परमेश्वररूपी लाल-रतन लपलेलें आहे? देव का कोठून खणून वर काढावयाचा आहे? हा सर्वत्र समोर देवच उभा आहे. हे तमाम लोक देवाच्याच मूर्ति. भगवान् सांगत आहेत – ''ह्या मानवरूपाने प्रकट झालेल्या हरिमूर्तीचा अवमान करू नका रे!'' ईश्वरच चराचरात प्रकट होऊन राहिला आहे. त्याला शोधण्याचे कृत्रिम उपाय कशाला? साधा उपाय आहे. अरे, तू जी जी सेवा करशील, तिचा संबंध रामाशी जोड म्हणजे झालें. रामाचा गुलाम हो. तो कठिण वेदमार्ग, तो यज्ञ, ती स्वाहा, ती स्वधा, तें श्राद्ध, तें तर्पण, सारें मोक्षाकडे नेईल. परंतु अधिकारी अनधिकारी भानगड तेथे उत्पन्न होते. आपल्याला नकोच तें. तू एवढेंच कर की जें काही करशील तें परमेश्वराला अर्पण कर. प्रत्येक कृतीचा संबंध त्याच्याशी जोड. असें नववा अध्याय सांगतो. म्हणून तो भक्तांना फार गोड वाटतो.

## 43. अधिकार-भेदाची भानगड नाही

**9** कृष्णाच्या सर्व जीवनात बाळपण अत्यंतच गोड. बाळकृष्णाची विशेष उपासना. तो गुराख्यांबरोबर गाई घेऊन जाई, त्यांच्याबरोबर खाई, त्यांच्याबरोबर हसे, खेळे. इंद्राची पूजा करावयास गवळी निघाले तर तो त्यांना म्हणाला, ''कोणी पाहिला आहे इंद्र? त्याचे काय उपकार? हा गोवर्धन पर्वत तर प्रत्यक्ष दिसत आहे. तेथे गाई चरतात. तेथून नद्या वाहतात. त्याची करा पूजा.'' असें तो शिकवी. ज्या गोपाळांत तो खेळला, ज्या गोपींबरोबर बोलला, ज्या गाईगुरांत रंगला, त्या सर्वांस त्याने मोक्ष मोकळा करून दिला. कृष्णपरमात्म्याने अनुभवाने हा सोपा मार्ग सांगितला आहे. लहानपणीं त्याचा गाईंशी संबंध, मोठेपणीं घोड्यांशी. मुरलीचा आवाज ऐकताच गाई गहिंवरत, आणि कृष्णाने पाठीवर हात फिरवताच घोडे फुरफुरत. त्या गाई, ते रथाचे घोडे केवळ कृष्णमय होऊन जात. 'पापयोनि' मानलेल्या त्या पशूंनाहि जणू मोक्ष मिळे. मोक्षावर केवळ मानवांचाच हक्क नसून पशुपक्ष्यांचाहि आहे ही गोष्ट श्रीकृष्णांनी स्पष्ट केली आहे. त्यांनी जीवनात ती गोष्ट अनुभवली.

**10** जो भगवंतांचा अनुभव तोच व्यासांचा. कृष्ण व व्यास एकरूपच आहेत. दोघांच्या जीवनाचें सार एक. मोक्ष विद्वत्तेवर, कर्मकलापावर अवलंबून नाही. साधी भोळी भक्तिहि पुरे. भोळ्या भाविक स्त्रिया मी मी म्हणणाऱ्या ज्ञान्यास मागे टाकून पुढे गेल्या आहेत. पवित्र मन व भोळा शुद्ध भाव, मग मोक्ष अवघड नाही. महाभारतात जनक-सुलभा-संवाद म्हणून एक प्रकरण आहे. जनकराजा ज्ञानासाठी एका स्त्रीकडे गेला आहे, असा प्रसंग व्यासांनी उभा केला आहे. तुम्ही चर्चा करीत बसा की स्त्रियांना वेदांचा अधिकार आहे कीं नाही. सुलभा तर प्रत्यक्ष जनकास ब्रह्मविद्या देत आहे. ती एक सामान्य स्त्री. जनक केवढा सम्राट्! किती विद्यांनी संपन्न! परंतु महाज्ञानी जनकाजवळ मोक्ष नाही. त्यासाठी त्याला सुलभेचे चरण धरावयास व्यासांनी लावलें आहे. तसाच तो तुलाधार वैश्य. तो जाजलि ब्राह्मण त्याच्याकडे ज्ञानासाठी जातो. तुलाधार म्हणतो, ''तराजूची दांडी सरळ राखण्यात माझें सारें ज्ञान आहे.'' तशीच ती व्याधाची कथा. व्याध तर कसाई. पशु मारून समाजाची सेवा करीत होता. एका अहंकारी तपस्वी ब्राह्मणाला त्याच्या गुरूने व्याधाकडे जावयास सांगितलें. ब्राह्मणाला आश्चर्य वाटलें. कसाई काय ज्ञान देणार? ब्राह्मण व्याधाकडे आला. व्याध काय करीत होता? तो मांस कापीत होता, धूत होता, स्वच्छ करून विक्रीस ठेवीत होता. तो ब्राह्मणाला म्हणाला, ''माझें हें कर्म जितकें धर्ममय करता येईल तितकें मी करीत आहे. जेवढा आत्मा या कर्मात ओतता येईल तेवढा ओतून मी हें कर्म करतो व आईबापांची सेवा करतो.'' अशा या व्याधाच्या रूपाने व्यासांनी आदर्शमूर्ति उभी केली आहे.

**11** महाभारतात ह्या ज्या स्त्रिया, वैश्य व शूद्र ह्यांच्या कथा आलेल्या आहेत त्या अशासाठी की सर्वांना मोक्ष मोकळा आहे हें उघड दिसावें. त्या गोष्टींतील तत्त्व या नवव्या अध्यायात सांगितलें आहे. त्या गोष्टींवर शिक्का या अध्यायात मारला गेला. रामाचा गुलाम होऊन राहण्यातच जी गोडी तीच त्या व्याधाच्या जीवनात आहे. तुकाराम महाराज अहिंसक; परंतु सजन कसायाने कसायाचें काम करून मोक्ष मिळविला हें मोठ्या कौतुकाने त्यांनी वर्णिलें आहे. ''पशूंना मारणाऱ्यांची, देवा, काय गति होईल?'' असें अन्यत्र तुकारामांनी म्हटलें आहे. परंतु **'सजन कसाया विकूं लागे मांस'** असा चरण लिहून भगवान् सजन कसायास मदत करतात असें वर्णिलें आहे. नरसी मेहत्याची हुंडी पटवणारा, नाथांकडे कावडी भरून आणणारा, दामाजीसाठी महार होणारा, महाराष्ट्राची आवडती जनाबाई – तिला दळणकांडणात मदत करणारा, असा तो भगवान् सजन कसायासहि तितक्याच प्रेमाने मदत करी, असें तुकाराम सांगत आहेत. सारांश, सर्व कृत्यांचा संबंध परमेश्वराशी जोडावा. कर्म शुद्ध भावनेने केलेलें आणि सेवेचें असावें म्हणजे तें यज्ञरूपच आहे.

## 44. कर्मफल देवाला अर्पण

**12** नवव्या अध्यायात हीच विशेष गोष्ट आहे. या अध्यायात कर्मयोग व भक्तियोग यांचा मधुर मिलाफ आहे. कर्मयोग म्हणजे कर्म करावयाचें व फळाचा त्याग करावयाचा. कर्म अशा खुबीने करा की फळाची वासना जडणार नाही. अक्रोडाचें झाड लावण्यासारखें हें आहे. अक्रोडाच्या झाडास पंचवीस वर्षांनी फळें यावयाचीं. झाड लावणारास तीं चाखावयास मिळणार नाहीत. तरीहि झाड लावावयाचें, तें प्रेमाने वाढवावयाचें. कर्मयोग म्हणजे झाड लावणें, व फळाची अपेक्षा न राखणें. भक्तियोग म्हणजे काय? भावपूर्वक ईश्वराशी जोडलें जाणें म्हणजे भक्तियोग. राजयोगात कर्मयोग व भक्तियोग एकत्र मिसळतात. राजयोगाच्या अनेकांनी अनेक व्याख्या केल्या आहेत. परंतु राजयोग म्हणजे थोडक्यात कर्मयोग व भक्तियोग यांचें मधुर मिश्रण अशी माझी व्याख्या आहे.

कर्म तर करावयाचें, परंतु फळ टाकावयाचें नाही, तें देवाला अर्पण करावयाचें. फळ टाका असें म्हणणें म्हणजे फळाचा निषेध झाला. अर्पणात तसें नाही. फार सुंदर अवस्था आहे ही. अपूर्व गोडी आहे ह्यात. फळाचा त्याग करावयाचा याचा अर्थ असा नाही की फळ कोणी घेणारच नाही. कोणी तरी तें फळ घेणारच, कोणाला तरी तें मिळणारच. मग ज्याला हें फळ मिळणार तो लायक आहे कीं नाही वगैरे तर्क निघावयाचे. कोणी भिकारी आला तर आपण लगेच म्हणतो, ''गलेलठ्ठ आहेस, शोभत नाही भीक मागणें. चालता हो.'' त्याचें भीक मागणें योग्य आहे कीं नाही हें आपण बघतो. तो भिकारी शरमून जातो बिचारा. सहानुभूतीचा पूर्ण अभाव आपणांजवळ. त्या भीक मागणाऱ्याची लायकी आपणांस कशी कळणार?

**13** मी लहानपणीं आईला अशीच शंका विचारली होती. तिचें उत्तर अद्याप माझ्या कानात घुमून राहिलें आहे. मी तिला म्हटलें, ''हा तर धट्टाकट्टा दिसतो. ह्याला भीक घालू तर व्यसनें व आळस मात्र वाढतील.'' गीतेतील **'देशे काले च पात्रे च'** हा श्लोकहि म्हणून दाखविला. ती म्हणाली, ''जो भिकारी आला तो परमेश्वरच होता. आता पात्रापात्रतेचा कर विचार. भगवान् का अपात्र आहे? पात्रापात्रतेचा विचार करण्याचा तुला मला काय अधिकार? मला अधिक विचार करण्याची जरूरच वाटत नाही. मला तो भगवान् आहे.'' आईच्या त्या उत्तरावर अजून मला उत्तर सुचलेलें नाही.

दुसऱ्याला जेवण घालतांना त्याच्या पात्रापात्रतेचा मी विचार करतो. परंतु स्वत:च्या घशात घालतांना आपणांस तरी अधिकार आहे का याचा विचार कधी मनात येत नाही. जो आपल्या दारीं आला तो अभद्र भिकारीच कां मानावा? आपण ज्याला देतो तो भगवानच आहे असें कां समजू नये?

**14** राजयोग सांगतो, ''तुझ्या कर्माचें फळ कोणी तरी चाखणारच ना? तें मुळीं देवाला देऊन टाक. त्याला अर्पण कर.'' राजयोग योग्य जागा दाखवून देत आहे. फळाचा त्याग करण्याचें निषेधात्मक कर्महि येथे नाही, व भगवंतास अर्पण करावयाचें, यामुळे पात्रापात्रतेचा प्रश्नहि उलगडतो. भगवंतास दिलेलें दान सदासर्वदा शुद्धच आहे. तुझ्या कर्मात दोष असला तरीहि तें त्याच्या हातात पडताच पवित्र होईल. आपण कितीहि दोष दूर केले तरी दोष राहतोच. तरी आपणांस जितकें शुद्ध होऊन कर्म करता येईल तितकें करावें. बुद्धि ही ईश्वराची देणगी आहे. ती जितकी शुद्ध वापरता येईल तितकी वापरणें हें कर्तव्यच आहे. तसें न करणें गुन्हा होईल. म्हणून पात्रापात्र-विवेकहि केलाच पाहिजे. पण भगवद्भावनेने तो सोपा होतो.

**15** फळाचा विनियोग चित्तशुद्धि करण्याकडे योजावा. जें कार्य जसें होईल तसें तें भगवंताला दे. प्रत्यक्ष क्रिया जसजशी होईल, तसतशी ती देवास अर्पण करून मनाची पुष्टि मिळवीत गेलें पाहिजे. फळ टाकायचें नाही. तें देवास अर्पण करावयाचें. किंबहुना मनात येणाऱ्या वासना आणि कामक्रोधादि विकारहि देवाला द्यावयाचे व मोकळें व्हावयाचें. **'कामक्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं।'** येथे संयमाग्नीत घालून जाळणें पोळणें काही नाही. चट् अर्पण करून मोकळा हो. कुटाकूट, मारामार नाही. **'रोग जाय दुधें साखरें। तरी निंब कां पियावा।'**

**16** इंद्रियेंसुद्धा साधनें आहेत. तीं ईश्वरार्पण करा. कान म्हणे ताब्यात येत नाही. मग का ऐकायचेंच नाही? ऐक, पण हरिकथाच ऐक. न ऐकणें कठिण. परंतु हरिकथा हा ऐकण्याचा विषय देऊन कानाचा उपयोग करणें हें अधिक सुलभ, मधुर व हितकर आहे. रामाला तुझा कान दे. मुखाने रामनाम घे. इंद्रियें दुष्मन नाहीत. तीं चांगलीं आहेत. त्यांच्यात फार सामर्थ्य आहे. प्रत्येक इंद्रिय ईश्वरार्पण बुद्धीने वापरणें हा राजमार्ग आहे. हाच राजयोग.

## 45. विशिष्ट क्रियेचा आग्रह नाही

**17** अमुकच क्रिया देवाला अर्पण करावयाची असें नाही. सारें कर्मजात त्याला द्या. शबरीचीं तीं बोरें. रामाने स्वीकारलीं तीं. परमेश्वराची पूजा करावयास गुहेत जावयास नको. जेथे जें कर्म करीत आहात, तेथे तें देवाला द्या. आई मुलाची काळजी घेते, ती जणू देवाचीच घेते. मुलाला स्नान म्हणजे जणू देवावर रुद्राभिषेक. हा बालक परमेश्वरी कृपेची देणगी म्हणून आईने परमेश्वरभावनेने बालकाचें संगोपन करावें. कौसल्या रामचंद्राची, यशोदा कृष्णाची किती प्रेमाने काळजी वाही, ह्याचें वर्णन करतांना शुक, वाल्मीकि, तुलसीदास स्वत:ला धन्य मानते झाले. त्यांना त्या क्रियेचें अपार कौतुक वाटत आहे. माउलीची ती सेवेची क्रिया फार थोर आहे. तें बालक म्हणजे परमेश्वराची मूर्ति. त्या मूर्तीच्या सेवेहून दुसरें भाग्य तें कोणतें? आपण एकमेकांच्या सेवेत जर ही भावना वापरली तर आपल्या कर्मात केवढें परिवर्तन होईल! ज्याला जी जी सेवा लाभली ती ईश्वराची सेवा असें त्याने भावीत जावें.

**18** शेतकरी बैलाची सेवा करतो. हा बैल का तुच्छ आहे? नाही. वेदांमध्ये वामदेवाने शक्तिरूपाने विश्वात भरून राहिलेल्या ज्या बैलाचें वर्णन केलें आहे, तोच बैल त्या शेतकऱ्याच्या बैलातहि आहे.

**'चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा: द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य**
**त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्यां आ विवेश ।'**

ज्याला चार शिंगें आहेत, तीन पाय आहेत, दोन डोकीं आहेत, सात हात आहेत, तीन ठिकाणीं जो बांधलेला आहे, जो महान् तेजस्वी असून सर्व मर्त्य वस्तूंत भरून राहिला आहे, असा हा जो गर्जना करणारा विश्वव्यापी बैल तोच शेतकरी पूजीत आहे. या एका ऋचेचे टीकाकारांनी पांच-सात निरनिराळे अर्थ दिले आहेत. हा बैल आहेच विचित्र. आकाशात गर्जना करून पाऊस पाडणारा जो बैल तोच मलमूत्राची वृष्टि करून शेत पिकविणाऱ्या ह्या शेतकऱ्याच्या बैलात आहे. शेतकरी अशा थोर भावनेने जर आपल्या बैलाची सेवा-चाकरी करील तर ती साधी बैलाची सेवा ईश्वराला अर्पण होईल.

**19** त्याचप्रमाणे घरामध्ये जी गृहलक्ष्मी आहे तिने पोतेरें घालून जें स्वयंपाकघर स्वच्छ केलें आहे, तेथे जी चूल पेटली आहे, त्या चुलीवर स्वच्छ व सात्त्विक अशी जी पोळी ती भाजून राहिली आहे, आपल्या घरातील सर्वांना ही रसोई पुष्टिदायक व तुष्टिदायक व्हावी अशी जी तिची इच्छा आहे, तें सारें तिचें कर्म यज्ञरूपच आहे. तो लहानसा यज्ञच जणू त्या माउलीने पेटविला आहे. परमेश्वराला तृप्त करावयाचें आहे ही भावना मनात ठेवून जो स्वयंपाक होईल तो किती स्वच्छ व पवित्र होईल त्याची कल्पना करा. त्या गृहलक्ष्मीच्या मनात जर अशी थोर भावना असेल तर भागवतातील ऋषिपत्न्यांच्याच तोलाची तीहि होईल. अशा कितीक माता सेवा करून उद्धरून गेल्या असतील, आणि मी मी म्हणणारे ज्ञानी व पंडित कोपऱ्यात पडून राहिले असतील!

## 46. सारें जीवन हरिमय होऊ शकतें

**20** आपले रोजचें घडीघडीचें जीवन साधें दिसलें तरी तें साधें नाही. त्यात महान् अर्थ आहे. सर्व जीवन म्हणजे एक महान् यज्ञकर्म आहे. तुमची निद्रा म्हणजेहि ती एक समाधि आहे. सर्व भोग ईश्वराला अर्पण करून मग जी निद्रा आपण घेऊ ती समाधीच नसेल तर काय? आपणात अशी रूढि आहे की स्नान करतांना पुरुषसूक्त म्हणावयाचें. या पुरुषसूक्ताचा स्नानाच्या क्रियेशी असा काय संबंध आहे? संबंध पहाल तर दिसेल. ज्याला हजार हात आहेत, हजार डोळे आहेत, अशा त्या विराट् पुरुषाचा माझ्या स्नानाशी काय संबंध? संबंध असा की तू जो लोटा डोक्यावर ओतीत आहेस, त्यात हजारों बिंदु आहेत. ते बिंदु तुझें मस्तक धूत आहेत, निष्पाप करीत आहेत. तो तुझ्या मस्तकावर ईश्वराचा आशीर्वाद आहे. परमेश्वराच्या सहस्र हातांतील सहस्रधारा जणू तुझ्यावर वर्षत आहेत; बिंदूंच्या रूपाने परमेश्वरच जणू तुझ्या डोक्यातील मळ दूर करीत आहे. अशी दिव्य भावना त्या स्नानात ओता म्हणजे तें स्नान निराळेंच होईल. त्या स्नानात अनंत शक्ति येईल.

**21** कोणतेंहि कर्म तें परमेश्वराचें आहे ह्या भावनेने केलें तर तें साधेंच कर्म पवित्र होतें. ही अनुभवाची गोष्ट आहे. आपल्या घरीं आलेला ईश्वररूप आहे अशी भावना तर करून पहा. साधा एखादा मोठा माणूस घरीं आला तरी किती स्वच्छता आपण करतो, कसा सुंदर स्वयंपाक करतो. मग परमेश्वर आहे अशी भावना केलीत तर किती बरें त्या क्रियेत फरक पडेल? कबीर वस्त्रें विणीत असे. तो तल्लीन होऊन जाई. **'झीनी झीनी बिनी चदरिया'** – असें गाणें गात डोले. परमेश्वरास पांघरवण्यासाठी जणू तो चादर विणीत आहे. ऋग्वेदातील ऋषि म्हणतो, **'वस्त्रेव भद्रा सुकृता वसूयुः'** – हें माझें स्तोत्र सुंदर हातांनी विणलेल्या वस्त्राप्रमाणे मी ईश्वरास लेववीत आहे. कवीने स्तोत्र करावयाचें तें देवासाठी व विणकराने वस्त्र करावयाचें तेंहि देवासाठी. किती हृदयंगम कल्पना! केवढा हृदय विशुद्ध करणारा, हृदय उचंबळविणारा विचार! ही भावना एकदा जीवनात आली म्हणजे जीवन किती निर्मळ होईल! अंधारात वीज आली म्हणजे त्या अंधाराचा एका क्षणात प्रकाश होतो. त्या अंधाराचा हळूहळू का प्रकाश होतो? नाही. एका क्षणात सारें अंतर्बाह्य परिवर्तन. त्याप्रमाणेच प्रत्येक क्रिया ईश्वराशी जोडून दिल्याबरोबर जीवनात एकदम अद्भुत शक्ति येते. प्रत्येक क्रिया मग विशुद्ध होऊ लागेल. जीवनात उत्साह संचरेल. आज आपल्या जीवनात उत्साह आहे कुठे? आपण मरत नाही म्हणून जगत आहोत. उत्साहाचा सर्वत्र दुष्काळ. रडकें, कळाहीन जिणें. परंतु सर्व क्रिया ईश्वराशी जोडावयाच्या आहेत हा भाव मनात आणा. तुमचें जिणें मग रमणीय व नमनीय होईल.

**22** परमेश्वराच्या एका नांवाने एकदम परिवर्तन होतें यात शंका नको. 'राम' म्हणण्याने काय होणार असें नको म्हणू. म्हणून तर पहा. कल्पना करा की सायंकाळीं शेतकरी काम करून घरीं येत आहे. वाटेत त्याला कोणी वाटसरू

भेटतो. त्याने त्या वाटसराला म्हणावें, **'चाल घरा उभा राहें नारायणा'** – ''अरे वाटसरू बंधो, अरे नारायणा, थांब. आता रात्र होत आली. माझ्या घरीं चल देवा.'' त्या शेतकऱ्याच्या तोंडून असे शब्द निघू देत तर खरे. तुमच्या त्या वाटसराचें रूप बदलतें कीं नाही तें पहा. तो वाटसरू वाटमाऱ्या असला तरीहि पवित्र होईल. हा फरक भावनेने होतो. भावनेत सारें सांठवून ठेवलेलें आहे. जीवन भावनामय आहे. एक वीस वर्षांचा परका मुलगा घरीं येतो. पिता त्याला कन्या देतो. तो मुलगा वीस वर्षांचा असला तरी पन्नास वर्षांचा तो मुलीचा बाप त्याच्या पाया पडतो. हें काय आहे? कन्या अर्पण करण्याचें तें कर्मच किती पवित्र आहे! ती ज्याला द्यावयाची तो देवच वाटतो. ही जी भावना जामाताच्या, नवरदेवाच्या, बाबतीत तीच भावना आणखी वर न्या, वाढवा.

**23** कोणी म्हणेल, ही खोटी कल्पना करण्यात काय अर्थ? खोटी-खरी प्रथम नका म्हणू. आधी अभ्यास करा, अनुभव घ्या व मग खरें-खोटें कळेल. तो नवरदेव खरोखर परमात्मा आहे अशी शाब्दिक नव्हे तर खरी भावना त्या कन्यादानात असू दे. म्हणजे मग काय फरक पडतो तें दिसून येईल. या पवित्र भावनेने वस्तूंचें पूर्वरूप व उत्तररूप यांत जमीनअस्मानाचें अंतर पडेल. कुपात्र सुपात्र होईल. दुष्ट सुष्ट होईल. वाल्या कोळ्याचें असेंच नाही का झालें? वीणेवर अंगुली फिरत आहे, मुखाने नारायणनाम चाललें आहे आणि मारायला धावला तरी शांति ढळत नाही, उलट प्रेमपूर्ण नेत्रांनी पाहत आहे, असें दृश्यच वाल्याने कधी पूर्वी पाहिलें नव्हतें. आपली कुऱ्हाड पाहून पळून जाणारे, किंवा अंगावर उलट हल्ला करणारे, दोनच प्रकारचे प्राणी वाल्या कोळ्याने त्या क्षणापर्यंत पाहिले होते; परंतु नारदांनी हल्लाहि केला नाही किंवा ते पळूनहि गेले नाहीत. ते शांत उभे राहिले. वाल्याची कुऱ्हाड थांबली. नारदांची भुंवई हलली नाही. डोळा मिटला नाही. मधुर भजन चाललेंच होतें. नारद वाल्याला म्हणाले, ''कुऱ्हाड कां थांबली?'' वाल्या म्हणाला, ''तुम्हांला शांत पाहून.'' नारदांनी वाल्याचें रूपांतर करून टाकलें. तें रूपांतर खरें कीं खोटें?

**24** खरोखर दुष्ट म्हणून कोणी आहे का, याचा निर्णय तरी कोणी करावयाचा? खरोखरचा दुष्ट समोर उभा राहिला तरी तो परमात्मा आहे अशी भावना करा. तो दुष्ट असला तरी तो संत होईल. म्हणजे खोटीच भावना करावयाची? मी म्हणतो, 'कोणाला माहीत तो दुष्टच आहे म्हणून?' 'सज्जन लोक स्वत: चांगलें असतात म्हणून त्यांना सारें चांगलेंच दिसतें; वास्तविक तसें नसतें' असें कोणी म्हणतात. मग काय तुला जें दिसतें तें खरें मानावयाचें? सृष्टीचें सम्यक् ज्ञान व्हावयाचें साधन जणू दुष्टाच्याच तेवढें हातात आहे! सृष्टि चांगली आहे, पण तू दुष्ट म्हणून तुला ती दुष्ट दिसते, असें कां म्हणू नये? अरे, सृष्टि म्हणजे आरसा आहे. तू जसा असशील तसा या समोरच्या सृष्टीत उमटून दिसशील. आपली जशी दृष्टि तसें सृष्टीचें रूप. यासाठी सृष्टि चांगली आहे, पवित्र आहे, अशी कल्पना करा. साध्या क्रियेतहि ही भावना ओता. मग काय चमत्कार होतो तो दिसेल. भगवंतांना हेंच सांगावयाचें आहे – **'जें खासी होमिसी देसी जें जें आचरिसी तप। जें कांहीं करिसी कर्म तें करीं मज अर्पण।'** – जें जें काही करशील तें सारें जसेंच्या तसें भगवंतास दे.

**25** आमची आई लहानपणीं एक गोष्ट सांगत असे. ती गोष्ट गमतीची आहे. परंतु तिच्यातील रहस्य मोलाचें आहे. एक होती बाई. तिचें आपलें ठरलेलें होतें की जें काही होईल तें कृष्णार्पण करावयाचें. उष्ट्याला शेण लावून तो शेणगोळा तिने बाहेर फेकावा व कृष्णार्पण म्हणावें. लगेच तो शेणगोळा तेथून उठे व मंदिरातील मूर्तीच्या तोंडावर जाऊन बसे. तो पुजारी मूर्तीला घांसून घांसून दमला. परंतु करणार काय? शेवटीं कळलें की हा महिमा त्या बाईचा आहे. ती जिवंत आहे तोंपर्यंत मूर्ति साफ व्हावयाची नाही. एक दिवस बाई आजारी पडली. मरणाचा शेवटचा क्षण जवळ आला. तिने मरणहि कृष्णार्पण केलें. त्या क्षणीं देवळात मूर्तीचे तुकडे झाले. मूर्ति भंगून पडली. वरून विमान आलें बाईला नेण्यासाठी. तिने विमानहि कृष्णार्पण केलें. विमान मंदिरावर ताडकन् जाऊन आपटलें व त्याचेहि तुकडे झाले. स्वर्ग श्रीकृष्णाच्या ध्यानापुढे कुचकामाचा आहे.

**26** सारांश काय, की जें जें बरेंवाईट कर्म हातून घडलें, तें तें ईश्वरार्पण केल्याने त्या कर्मात काही निराळेंच सामर्थ्य उत्पन्न होतें. ज्वारीचा पिवळसर लालसर दाणा असतो, परंतु तो भाजला तर किती सुंदर लाही होते! पांढरी स्वच्छ, अष्टकोनी, परीटघडी करून आणलेली ती डौलदार लाही त्या दाण्याजवळ ठेवा पाहू. किती फरक! परंतु त्या दाण्याचीच ती लाही यात संशय नाही. हा फरक एका अग्नीमुळे झाला. तसेंच तो टणक दाणा जात्यात घालून भरडा, त्याचें मऊ पीठ होईल. अग्नीच्या संपर्काने लाही झाली, जात्यात घातल्याने मऊ पीठ झालें. त्याप्रमाणेच आपल्या

लहानशा क्रियेवर हरिस्मरणाचा संस्कार करा की ती क्रिया अपूर्व होईल. भावनेने मोल वाढतें. तें रद्दी जास्वंदीचें फूल, तो बेलाचा पाला, ती तुळशीची मंजरी, ती दुरव; त्यांना तुच्छ मानू नका. **'तुका म्हणे चवी आलें। जें कां मिश्रित विठ्ठलें।'** प्रत्येक गोष्टीत परमात्मा मिसळा व मग अनुभव घ्या. ह्या विठ्ठलाच्या मसाल्याच्या तोडीचा दुसरा आहे का कोठला मसाला? ह्या दिव्य मसाल्यापुढे दुसरें कोणतें आणाल? ईश्वराचा मसाला प्रत्येक क्रियेत घाला, म्हणजे सारें रूचकर व सुंदर होईल.

**27** रात्रीं आठ वाजता देवळात आरती चाललेली असावी, गंध सुटला आहे, धूप जळतो आहे, दिवे लावले आहेत, आरती ओवाळली जात आहे, अशा वेळेस खरोखरच आपण परमात्मा पाहत आहोत अशी भावना होते. देव दिवसभर जागला, आता निजावयाचा. **'आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा'** असे भक्त म्हणू लागतात. शंका घेणारा विचारतो, ''देव का कोठे झोपतो?'' अरे, देवाला काय नाही? मूर्खा, देव झोपणार नाही, जागणार नाही, तर काय दगड झोपणार व जागणार? अरे, देवच जागतो, देवच निजतो व देवच खातो-पितो. तुलसीदासजी सकाळच्या वेळीं देवाला उठवीत आहेत, विनवीत आहेत – **'जागिये रघुनाथ कुंवर पंछी बन बोले'**. आपल्या बंधुभगिनींना, नरनारींना, रामचंद्रांच्या मूर्ति कल्पून ते म्हणत आहेत, ''माझ्या रामरायांनो, उठा आता.'' किती सुंदर विचार! नाही तर बोर्डिंग असावें, तेथे मुलांना उठवतांना ''उठतोस कीं नाही'' असें दरडावून विचारतात. प्रात:काळची मंगल वेळ, त्या वेळेस कठोर वाणी शोभते का? विश्वामित्रांच्या आश्रमात रामचंद्र निजले आहेत, विश्वामित्र त्यांना उठवीत आहेत. वाल्मीकि रामायणात वर्णन आहे –

**'रामेति मधुरां वाणीं विश्वामित्रोऽभ्यभाषत ।**
**उत्तिष्ठ नरशार्दूल पूर्वा संध्या प्रवर्तते ।।'**

''रामा वत्सा, ऊठ आता'' अशी गोड हाक विश्वामित्र मारीत आहेत. किती गोड आहे हें कर्म! आणि बोर्डिंगातील तें उठवणें किती कर्कश! त्या झोपेत असलेल्या मुलाला वाटतें की कोणी साता जन्मांचा वैरीच जणू उठवावयाला आला आहे. आधी हळू हाक मारा, मग जरा मोठ्याने; परंतु कर्कशता, कठोरता नको. उठला नाही तर पुन्हा दहा मिनिटांनी जा. आज नाही उठला तर उद्या उठेल अशी आशा करा. त्याने उठावें म्हणून गोड गाणें, भूपाळी, श्लोक, स्तोत्रें म्हणा. उठवण्याची एक साधी क्रिया, परंतु ती किती काव्यमय, सहृदय व सुंदर करता येईल! जणू देवालाच उठवावयाचें आहे. परमेश्वराच्या मूर्तीलाच हलकें जागें करावयाचें आहे. झोपेतून कसें उठवावें तेंहि एक शास्त्र आहे.

**28** सर्व व्यवहारात ही कल्पना आणा. शिक्षणशास्त्रात तर या कल्पनेची फारच आवश्यकता आहे. मुलें म्हणजे प्रभूच्या मूर्ति. या देवांची मी सेवा करून राहिलो आहे अशी गुरूची भावना असावी. मग तो मुलाला ''जा घरीं, चालता हो, उभा रहा तासभर, हात पुढे कर, किती मळला सदरा, शेंबूड किती नाकाला'' असें म्हणणार नाही. तो मुलाचें नाक हळू हाताने साफ करील. त्याचे मळके कपडे धुईल, फाटके शिवील. शिक्षक असें करील तर त्याचा केवढा परिणाम होईल! मारून का कोठे परिणाम होतो? मुलांनी सुद्धा याच दिव्य भावनेने गुरूकडे पहावें. गुरूने ह्या हरिमूर्ति आहेत आणि मुलांनी ही हरिमूर्ति आहे असें परस्पर भावून जर वर्तणूक ठेवली तर विद्या तेजस्वी होईल. मुलेंहि देव व गुरुहि देव. हा गुरु म्हणजे शंकराची मूर्ति आहे, त्याच्याजवळून आपण बोधामृत घेत आहोत, त्याची सेवा करून ज्ञान घेत आहोत, अशी मुलांची कल्पना झाली तर मग मुलें कशीं वागतील?

## 47. पापाचें भय नाही

**29** सर्वत्र हरि-भावना चित्तात ठसली म्हणजे परस्परांनी परस्परांशी कसें वागावें तें सारें नीतिशास्त्र अंत:करणात सहज स्फुरेल. त्याची गरजच राहणार नाही. मग दोष दुरावतील. पापें पळतील. दुरितांचें तिमिर जाईल.

तुकारामांनी म्हटलें आहे – **'चाल केलासी मोकळा। बोल विठ्ठल वेळोवेळां। तुज पाप चि नाही ऐसें। नाम घेतां जवळीं वसे।'** चल, मोकळा आहेस पापें करावयास. तू पाप करावयास दमतोस, का पाप जाळतांना हरिनाम दमतें तें पाहूच या. हरिनामापुढे टिकेल एवढें धटिंगण मगरूर पाप आहे तरी कुठे? **'करीं तुजसी करवती'** – जेवढीं पापें करवतील तेवढीं कर. सदर परवाना आहे. नामाचें व तुझ्या पापाचें होऊनच जाऊ देत दोन हात. अरे, या नामात याच जन्मींची नाही तर अनंत जन्मींचीं पापें एका क्षणात भस्म करण्याचें सामर्थ्य आहे. गुहेत अनंत युगांचा अंधार असला

तरी एक काडी ओढली की पुरे, तो नाहीसा होतो. अंधाराचा प्रकाश होतो. जितकीं जुनीं पापें तितकीं तीं लवकर मरतात. तीं मरायलाच टेकलेलीं असतात. जुनीं लाकडें लगेच खाक होतात.

**30** रामनामाजवळ पाप राहूच शकत नाही. मुलें म्हणतात ना, ''राम म्हणताच भुतें पळतात.'' आम्ही लहानपणीं रात्रीं स्मशानात जाऊन येत असू. स्मशानात जाऊन मेख ठोकून यायचें अशा आमच्या शर्यती लागत. रात्रीं साप असायचे, कांटे असायचे, बाहेर अंधार, तरी काही वाटायचें नाही. भूत कधी दिसलें नाही. कल्पनेतील भुतें. तीं का दिसणार? एक दहा वर्षांचा बच्चा, परंतु त्याच्या अंगात रात्रीं स्मशानात जाऊन येण्याचें सामर्थ्य कोठून आलें? रामनामाने. तें सामर्थ्य सत्यरूप परमात्म्याचें होतें. परमेश्वर जवळ आहे ही भावना असली म्हणजे सारी दुनिया उलटली तरी हरीचा दास भिणार नाही. त्याला कोणता राक्षस खाईल? राक्षस त्याचे गाल खाईल व पचवील; परंतु राक्षसाला सत्य पचणार नाही. सत्याला पचविणारी शक्ति जगात नाही. ईश्वरी नामासमोर पाप टिकूच शकत नाही. म्हणून ईश्वराला जोडा. त्याची कृपा प्राप्त करून घ्या. सर्व कर्में त्याला अर्पण करा. त्याचे व्हा. सर्व कर्मांचा नैवेद्य प्रभूला अर्पण करावयाचा आहे ही भावना उत्तरोत्तर अधिक उत्कट करीत चाललात म्हणजे क्षुद्र जीवन दिव्य होईल, मलिन जीवन सुंदर होईल.

## 48. थोडेंहि गोड

**31 'पत्रं पुष्पं फलं तोयम्'** – काहीहि असो. भक्ति असली म्हणजे पुरे. किती दिलेत हाहि मुद्दा नाही. कोणत्या भावनेने, हा मुद्दा आहे. एकदा एका प्रोफेसराजवळ माझी चर्चा चालली होती. ती शिक्षणशास्त्रासंबंधीची होती. आमचा दोघांचा विचारभेद होता. शेवटीं प्रोफेसर म्हणाले, ''अहो, मी अठरा वर्षें काम करतो आहे.'' त्या प्रोफेसरांनी मला पटवून दिलें पाहिजे होतें. परंतु तें न करता मी इतकीं वर्षें शिक्षणाचें काम करतो आहे असें जेव्हा ते म्हणाले त्या वेळेस मी विनोदाने म्हटलें, ''अठरा वर्षें बैल यंत्राबरोबर फिरला म्हणून तो यंत्रशास्त्रज्ञ होईल का?'' यंत्रशास्त्रज्ञ निराळा व तो गरगर फिरणारा बैल निराळा. शिक्षणशास्त्रज्ञ निराळा व शिक्षणाची हमाली करणारा निराळा. जो शास्त्रज्ञ आहे तो सहा महिन्यांतच असा अनुभव मिळवील की जो अठरा वर्षें काम करणाऱ्या मजुरासहि समजून येणार नाही. सारांश, त्या प्रोफेसराने दाढी दाखविली की मी इतकीं वर्षें काम केलें. दाढीने सत्य सिद्ध होत नाही. तसें परमेश्वरापुढे किती राशी ओतल्या त्याला महत्त्व नाही. मापाचा, आकाराचा, किंमतीचा मुद्दा नाही. मुद्दा भावनेचा आहे. किती, काय अर्पण केलेत हा मुद्दा नसून कसें अर्पण केलेत हा मुद्दा आहे. गीतेमध्ये तर सातशेंच श्लोक आहेत. दहा दहा हजार श्लोक ज्यांत आहेत असे देखील दुसरे ग्रंथ आहेत. परंतु वस्तु मोठी असली म्हणजे तिचा उपयोग मोठाच असतो असें नाही. वस्तूत तेज काय आहे, सामर्थ्य काय आहे तें पहावयाचें असतें. जीवनात किती क्रिया केल्यात त्याचें महत्त्व नाही. परंतु ईश्वरार्पण बुद्धीने एकच क्रिया केली तर ती एकच क्रिया भरपूर अनुभव देईल. एका पवित्र क्षणात एखाद्या वेळेस इतका अनुभव मिळतो की तेवढा बारा बारा वर्षांतहि मिळणार नाही.

**32** सारांश, जीवनातील साधीं कर्में, साध्याच क्रिया, त्या परमेश्वराला द्या; म्हणजे जीवनात सामर्थ्य येईल. मोक्ष हातास चढेल. कर्म करावयाचें आणि त्याचें फळ न टाकता ईश्वराला तें अर्पण करावयाचें असा हा राजयोग कर्मयोगाच्याहि पुढे पाऊल टाकतो. कर्मयोग म्हणतो, ''कर्म करा व फळ टाका, फळाची आशा धरू नका.'' येथे कर्मयोग संपला. राजयोग म्हणतो, ''कर्माचीं फळें टाकू नकोस. सर्व कर्में देवाला वहा. तीं फुलें आहेत, पुढे नेणारीं साधनें आहेत. तीं त्या मूर्तीवर वहा. एकीकडून कर्म, दुसरीकडून भक्ति, असा मेळ करून जीवन सुंदर करीत चल. त्याग नको करू फळाचा. फळ फेकावयाचें नाही, तर तें देवाशी जोडावयाचें.'' कर्मयोगात तोडलेलें फळ राजयोगात जोडलें जातें. पेरलें आणि फेकून दिलें यांत फरक आहे. पेरलेलें थोडेंहि अनंत पटींनी भरभरून मिळालें. फेकलेलें तसेंच गेलें. ईश्वराला जें कर्म अर्पण केलें तें पेरलें गेलें. त्यामुळे जीवनात अपार आनंद भरेल. अपार पवित्रता येईल.

*रविवार, 17-4-'32*

# अध्याय 10

# विभूति-चिंतन

## 49. गीतेच्या पूर्वार्धावर दृष्टिक्षेप

**1** मित्रांनो, गीतेचा पूर्वार्ध संपला. उत्तरार्धात शिरण्यापूर्वी जो भाग झाला त्याचें थोडक्यात सार आपण पाहून घेऊ म्हणजे बरें पडेल. पहिल्या अध्यायात गीता ही मोहनाशार्थ व स्वधर्मप्रवृत्त्यर्थ आहे असें सांगितलें. दुसऱ्या अध्यायात जीवनाचे सिद्धांत, कर्मयोग व स्थितप्रज्ञ यांचें आपणांस दर्शन झालें. तीन, चार व पांच या अध्यायांत कर्म, विकर्म व अकर्म यांचा उलगडा केला. कर्म म्हणजे स्वधर्माचरण करणें, विकर्म म्हणजे स्वधर्माचरणाचें कर्म बाहेरून चाललें असता त्याला मदत म्हणून जें मानसिक कर्म करावयाचें तें. कर्म व विकर्म दोन्ही एकरूप होऊन जेव्हा चित्ताची पूर्ण शुद्धि होते, सर्व खळमळ धुऊन जातो, वासना मावळतात, विकार शमतात, भेदभाव नाहीसा होतो, तेव्हा अकर्मदशा प्राप्त होते. ही अकर्मदशा पुन्हा दुहेरी सांगितली. रात्रंदिवस कर्म करीत असून लेशमात्रहि कर्म करीत नाही असें अनुभवणें ही एक तऱ्हा. ह्याच्या उलट काही न करता अव्याहत कर्म करीत असणें ही दुसरी तऱ्हा. अशा या दोन तऱ्हांनी अकर्मदशा परिणत होते. ह्या दोन तऱ्हा दिसावयास अलग दिसल्या तरी त्या संपूर्णपणें एकरूपच आहेत. कर्मयोग व संन्यास अशीं दोन नांवें या दोन तऱ्हांचीं असलीं तरी आंतील सार एकच आहे. अकर्मदशा हें शेवटचें अंतिम साध्य आहे. या स्थितीलाच मोक्ष ही संज्ञा आहे. म्हणून गीतेच्या पहिल्या पांच अध्यायांपर्यंत जीवनाचा सर्व शास्त्रार्थ संपून गेला.

**2** त्यानंतर हें अकर्मरूपी साध्य मिळविण्यासाठी विकर्माचे जे अनेक मार्ग असतात, मनाला आंतून शुद्ध करण्याचीं जीं अनेक साधनें असतात, त्यांतील ठळक ठळक साधनें सांगण्यास सहाव्या अध्यायापासून सुरुवात झाली आहे. सहाव्या अध्यायात चित्ताच्या एकाग्रतेसाठी ध्यानयोग सांगून अभ्यास व वैराग्य यांची त्याला जोड दिली आहे. सातव्या अध्यायात विशाल असें भक्तीचें थोर साधन सांगितलें. ईश्वराकडे प्रेमाने जा, जिज्ञासुबुद्धीने जा, विश्वाच्या कल्याणाच्या तळमळीने जा, किंवा व्यक्तिगत कामनेने जा; कसेंहि जा, परंतु एकदा त्याच्या दरबारात प्रवेश करा म्हणजे झालें. ह्या अध्यायातील या गोष्टीला मी प्रपत्तियोग, म्हणजे ईश्वराला शरण जा असें सांगणारा योग, असें नांव देतो. सातव्यात प्रपत्तियोग सांगून आठव्यात सातत्ययोग सांगितला. हीं जीं नांवें मी देऊन राहिलो आहे तीं तुम्हांला पुस्तकात आढळणार नाहीत; परंतु मला उपयोगी अशीं नांवें मी देत आहे. सातत्ययोग म्हणजे आपली साधना अंतकाळपर्यंत सतत चालू ठेवणें. जो रस्ता एकदा घेतला, त्यावर सारखीं पावलें पडत गेलीं पाहिजेत. धरसोडीचें वर्तन मनुष्य करील तर मुक्कामावर पोंचण्याची कधीच आशा नाही. कोठपर्यंत साधना करावयाची, असें निराशेने किंवा कंटाळून म्हणता कामा नये. फळ मिळालें नाही तोंपर्यंत साधना चालू असली पाहिजे.

**3** असा हा सातत्ययोग सांगून नवव्या अध्यायात एक साधीच, परंतु जीवनाचा सारा रंग पालटून टाकणारी अशी वस्तु भगवंतांनी दिली. ही वस्तु म्हणजे राजयोग. 'जीं जीं कर्में क्षणोक्षणीं होतात तीं ईश्वरार्पण कर' असें नववा अध्याय सांगतो. या एका गोष्टीमुळे शास्त्रसाधन, सारीं कर्में, विकर्में, सारें बुडून गेलें. सर्व कर्मसाधना या समर्पणयोगात बुडून गेली. समर्पणयोग म्हणजे राजयोग. येथे सारें साधन खलास झालें. अशी जी ही व्यापक व समर्थ अशी ईश्वरार्पण करण्याची गोष्ट ती दिसावयास साधी व सोपी दिसते, परंतु ही साधीच गोष्ट फार कठिण होऊन बसली आहे. ही साधना अगदी घरच्या घरीं, आणि अगदी अडाणी खेडवळापासून तों मोठ्या विद्वानांपर्यंत सर्वांना विशेष श्रमाशिवाय साध्य होण्यासारखी आहे, म्हणून सोपी आहे. परंतु जरी ती सोपी असली तरी ती साधावयास अतिशय पुण्याई पदरीं असावी लागते.

**'बहुतां सुकृतांची जोडी। म्हणुनी विठ्ठलीं आवडी'**

– अनंत जन्मांची पुण्याई पदरीं असेल तरच ईश्वराची आवड उत्पन्न होते. डोळ्यांतून जरा काही झालें तर घळघळा अश्रु येतात. परंतु परमेश्वराचें नांव उच्चारताच दोन अश्रुबिंदु डोळ्यांत उभे राहिले आहेत असें कधी होत नाही. याला

उपाय काय? संत म्हणतात त्याप्रमाणे एकपरी ही साधना अत्यंत सोपी आहे; परंतु दुसऱ्या परी ती कठिणहि आहे. आणि हल्लीच्या काळात तर फारच कठिण होऊन बसली आहे.

**4** आज जडवादाचा सारा डोळ्यांवर चढला आहे. ईश्वर आहे तरी कोठे, येथून आज सुरुवात आहे. तो कोणाला कोठे प्रतीतच होत नाही. सारें जीवन विकारमय, विषयलोलुप आणि विषमतेने भरलेलें आहे. हल्ली उंचातील उंच विचार करणारे जे तत्त्वज्ञानी आहेत त्यांचेसुद्धा विचार सर्वांना भाकर कशी पोटभर मिळेल यापलीकडे जाऊ शकत नाहीत. ह्यात त्यांचा दोष नाही. कारण आज अनेकांना खाण्यासहि मिळत नाही अशी स्थिति आहे. आजची मोठी समस्या म्हणजे भाकरी. ही समस्या सोडविण्यात सारी बुद्धि आज गढून गेली आहे. सायणाचार्यांनी **'बुभुक्षमाण: रुद्ररूपेण अवतिष्ठते'** अशी रुद्राची व्याख्या केली आहे. भुकेलेले लोक म्हणजेच रुद्राचा अवतार. त्यांच्या क्षुधाशांतीसाठी नाना तत्त्वज्ञानें, नाना वाद, नाना राजकारणें उभीं राहिलीं आहेत. या प्रश्नातून बाहेर पडण्यास आज अवसरच नाही. एकमेकांशी न भांडता दोन सुखाचे घास मोकळ्या मनाने लोक कसे खातील याचा विचार करण्यात आज प्रयत्नांची शिकस्त होऊन राहिली आहे. अशी चमत्कारिक समाजरचना ज्या काळात आहे तेथे ईश्वरार्पणतेची साधी सोपी गोष्टच अतिशय कठिण होऊन बसली यात आश्चर्य नाही. परंतु याला उपाय काय? ईश्वरार्पणयोग कसा साधावा, तो कसा सोपा करावा, ही गोष्ट आज दहाव्या अध्यायात आपणांस पहावयाची आहे.

## 50. परमेश्वर-दर्शनाची बाळबोध रीत

**5** लहान मुलांना शिकविण्यासाठी जे उपाय आपण योजतो तेच उपाय सर्वत्र परमात्मा दिसावा म्हणून या दहाव्या अध्यायात सांगितले आहेत. मुलांना अक्षरें दोन रीतींनी शिकवितात. एक रीत म्हणजे प्रथम अक्षरें मोठमोठीं काढून शिकवायचीं. पुढे हींच मोठीं अक्षरें लहान काढून शिकवायचीं. तोच 'क', तोच 'ग'. परंतु पूर्वी मोठा होता, आता बारीक झाला. ही एक तऱ्हा. दुसरी तऱ्हा म्हणजे आधी बिनघोटाळ्याचीं साधीं अक्षरें शिकवायचीं आणि घोटाळ्यांचीं जोडाक्षरें मागून शिकवायचीं. तसेंच हुबेहूब परमेश्वर पहावयास शिकावयाचें. आधी ठळक परमेश्वर पहावयाचा. समुद्रपर्वतादि महान् विभूतींत प्रकट झालेला परमेश्वर पटकन् डोळ्यांत भरेल. हा ठळक परमेश्वर पटला म्हणजे मग एखाद्या जलबिंदूत, एखाद्या मातीच्या कणातसुद्धा तोच आहे हेंहि पुढे कळेल. मोठा 'क' व बारीक 'क' यांत फरक नाही. जें स्थूलात तेंच सूक्ष्मात. हा एक प्रकार झाला. आणि दुसरा प्रकार म्हणजे बिनघोटाळ्याचा सरळ परमात्मा आधी पहावयाचा, मग जरा गुंतागुंतीचा. जेथे शुद्ध परमेश्वरी आविर्भाव सहज प्रकट झाला आहे, त्याचें ग्रहण पटकन् होतें. जसा रामाच्या ठिकाणीं प्रकट झालेला परमेश्वरी आविर्भाव पटकन् समजतो. राम हें साधें अक्षर आहे. हा बिनभानगडीचा परमेश्वर आहे. परंतु रावण? तें जोडाक्षर आहे. तेथे काहीतरी मिसळ आहे. रावणाची तपस्या, कर्मशक्ति थोर आहेत; परंतु त्यांत क्रूरपणा मिसळलेला आहे. आधी राम हें सरळ अक्षर शिका. जेथे दया आहे, वत्सलता आहे, प्रेम आहे, असा जो हा राम तो सरळ परमेश्वर आहे. त्याचें पटकन् ग्रहण होईल. रावणाच्या ठिकाणचा परमेश्वर पहावयास जरा वेळ लागेल. आधी सरळ अक्षर, मग जोडाक्षर. सज्जनात परमात्मा पाहून मग दुर्जनातहि शेवटीं पहावयास शिकावयाचें. समुद्रातील विशाल परमेश्वरच त्या पाण्याच्या थेंबात आहे. रामचंद्रातीलच परमेश्वर रावणातहि आहे. जें स्थूलात तेंच सूक्ष्मात, जें सोप्यात तेंच कठिणात. अशा दोन तऱ्हांनी हा जगाचा ग्रंथ वाचावयास आपणांस शिकावयाचें आहे.

**6** ही अपार सृष्टि म्हणजे ईश्वराचें पुस्तक आहे. डोळ्यांवर जाड पडदे आले म्हणजे हें पुस्तक आपणांस बंद झाल्यासारखें वाटतें. या सृष्टीच्या पुस्तकात सुंदर अक्षरांनी परमेश्वर सर्वत्र लिहिलेला आहे; परंतु तो आपणांस दिसत नाही. ईश्वराचें दर्शन होण्यात एक मोठें विघ्न आहे तें हें की साधें जवळचें ईश्वरस्वरूप मनुष्यास पटत नाही व दूरचें प्रखर रूप पचत नाही. मातेच्या ठिकाणीं ईश्वर पहा असें म्हटलें तर तो म्हणतो, ईश्वर का इतका साधा व सोपा? परंतु प्रखर परमात्मा प्रकट झाला तर तो तुला झेपेल का? कुंतीला वाटलें, तो दूरचा सूर्य जवळ येऊन भेटावा. परंतु तो जवळ येऊ लागताच ती जळू लागली. तिला तो सहन होईना. ईश्वर जर सर्व सामर्थ्यानें समोर येऊन उभा राहिला तर तो पचणार नाही. आईच्या सौम्य रूपाने उभा राहिला तर तो पटत नाही. पेढे बर्फी पचत नाही व साधे दूध रुचत नाही.

ही लक्षणें करंटेपणाचीं, मरणाचीं आहेत. परमेश्वराच्या दर्शनाला ही असली रोगट मन:स्थिति म्हणजे मोठेंच विघ्न आहे. या मन:स्थितीचा त्याग केला पाहिजे. प्रथम आपणाजवळ ठळक व सरळ असलेला परमात्मा वाचावयाचा आणि मग सूक्ष्म व जरा गुंतागुंतीचा असा परमेश्वर वाचावयाचा.

## 51. मानवातील परमेश्वर

**7** अगदी पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ति म्हणजे आई आपणाजवळ आहे. श्रुति म्हणते, **'मातृदेवो भव.'** जन्मताच मुलाला आईशिवाय दुसरें कोण दिसतें? वत्सलतेच्या रूपाने ती परमेश्वराचीच मूर्ति तेथे उभी असते. ह्या मातेचीच व्याप्ति आपण वाढवू व **'वंदे मातरम्'** म्हणून राष्ट्रमातेची, व पुढे सर्व भूमातेची, पृथ्वीची पूजा करू. परंतु आरंभीं उंचात उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणें अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई निमित्तमात्र आहे. परमेश्वर तिच्या ठिकाणीं आपली वत्सलता ठेवून तिला नाचवितो. तिला बिचारीला कळतहि नाही की कां एवढी माया आंतून वाटते. म्हातारपणीं आपल्या उपयोगी पडेल असा हिशेब करून का ती त्या मुलाची सेवा करीत असते? छे छे. तिने त्या मुलाला जन्म दिला. तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला त्या मुलाचें वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती लाचार आहे. ती माउली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ति. उत्कृष्टांतील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला 'आई' या नांवानेच हाक मारावयाची. 'आई' या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठे? आई हें पहिलें ठळक अक्षर. तेथे ईश्वर पहावयास शिक. मग पिता, गुरु यांच्याहि ठिकाणीं पहा. गुरु शिक्षण देतो, पशूचा आपणांस मनुष्य करतो. किती त्याचे उपकार! प्रथम माता, मग पिता, मग गुरु, मग कृपाळु संत. अत्यंत ठळक रूपाने उभा असलेला हा परमेश्वर आधी पहावयाचा. येथे परमेश्वर नाही दिसला तर मग दिसावयाचा तरी कोठे?

**8** आई, बाप, गुरु व संत यांच्या ठिकाणीं परमात्मा पहा. तसेंच लहान मुलांच्या ठिकाणीं जर परमात्मा पाहता आला तर केवढी बहार होईल! ध्रुव, प्रह्लाद, नचिकेत, सनक, सनंदन, सनत्कुमार, सारीं लहान लहान मुलें. परंतु त्यांना कोठे ठेवू, कोठे न ठेवू, असें पुराणकारांना, व्यासादिकांना झालें आहे. शुकदेव, शंकराचार्य बालपणींच विरक्त. ज्ञानदेवहि तसेच. सारीं हीं पोरें. परंतु त्यांच्या ठिकाणीं परमेश्वर जितक्या शुद्ध रूपाने अवतीर्ण झाला तितक्या शुद्ध रूपाने अन्यत्र प्रकट झाला नाही. ख्रिस्ताला मुलांचा फार लळा असे. एकदा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारलें, ''तुम्ही नेहमी देवाच्या राज्याविषयी बोलत असता. या देवाच्या राज्यात प्रवेश तरी कोणाला मिळेल?'' जवळ एक मुलगा होता. ख्रिस्ताने त्याला टेबलावर उभें करून म्हटलें, ''या मुलासारखे जे असतील त्यांचा प्रवेश तेथे होईल.'' ख्रिस्ताने म्हटलें तें सत्य आहे. रामदासस्वामी एकदा मुलांबरोबर खेळत होते. मुलांबरोबर समर्थ खेळत आहेत हें पाहून काही पोक्त मंडळींस आश्चर्य वाटलें. एकाने त्यांना विचारलें, ''हें काय आज आपण करीत आहात?'' समर्थ म्हणाले,

**'वयें पोर ते थोर होऊन गेले।**
**वयें थोर ते चोर होऊन ठेले'**

वय वाढतें व शिंगें फुटतात. मग ईश्वराचें स्मरणहि होत नाही. लहान मुलाच्या मनावर लेप नसतात. त्याची बुद्धि निर्मळ असते. मुलाला शिकवितात, ''खोटें बोलू नये.'' तो विचारतो, ''खोटें बोलणें म्हणजे काय?'' मग त्याला सिद्धांत सांगतात, ''जसें असेल तसें सांगावें.'' त्या मुलाला पंचाईत पडते. जसें असेल तसें सांगायचें या प्रकाराहून काही निराळा प्रकार आहे कीं काय? जसें नसेल तसें कसें सांगायचें? चौकोनाला चौकोन म्हण, गोल म्हणू नको, असेंच सांगण्यासारखें हें आहे. त्या मुलाला आश्चर्य वाटतें. मुलें म्हणजे विशुद्ध परमेश्वराच्या मूर्ति आहेत. मोठीं माणसें खोटें शिक्षण त्यांना देतात. सारांश, आई, बाप, गुरु, संत व मुलें यांच्या ठिकाणीं आम्हांला जर परमेश्वर पाहता आला नाही तर मग कोणत्या रूपाच्या ठिकाणीं दिसणार? परमेश्वराचीं याहून उत्कृष्ट रूपें अन्य नाहीत. हीं परमेश्वराचीं साधीं सौम्य रूपें आधी शिकावयाचीं. या ठिकाणीं परमेश्वर ठळक अक्षरांनी लिहिलेला आहे.

## 52. सृष्टीतील परमेश्वर

**9** मानवातील सौम्यतम आणि पावन मूर्तीत ईश्वराला आधी पहावयास शिकावयाचें. त्याप्रमाणेच या सृष्टीतहि जीं विशाल आणि मनोहर रूपें आहेत तेथेहि त्याला आधी पहावयास शिकावयाचें.

**10** ती उषा! सूर्योदयाच्या पूर्वीची ती दिव्य प्रभा! त्या उषादेवतेचीं गाणीं गातांना ऋषि नाचू लागत. ''हे उषे, तू परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी दिव्य दूतिका आहेस. तू दंवबिंदूंनी न्हाली आहेस. तू अमृतत्वाची पताका आहेस.'' – अशीं भव्य हृदयंगम वर्णनें ऋषींनी केलीं आहेत. तो वैदिक ऋषि म्हणतो, ''परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी जी तू, त्या तुला पाहून जर परमेश्वराचें रूप मला न पटेल, न समजेल, तर परमेश्वर मला कोण समजावू शकेल?'' इतक्या सुंदर रूपाने ती उषा नटून तेथे उभी आहे, परंतु आमची दृष्टि जाते कोठे तेथे?

**11** तसेंच तो सूर्य पहा. त्याचें दर्शन म्हणजे परमात्म्याचें दर्शन. तो नाना प्रकारचीं चित्रें आकाशात रंगवीत असतो. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाचीं चित्रें रंगवितात. सकाळीं उठून जरा पहा ती परमेश्वराची कला. त्या दिव्य कलेला, त्या अनंत सौंदर्याला उपमा तरी देता येईल का? पण पाहतो कोण? तिकडे तो सुंदर भगवान् उभा आहे आणि हा आणखी पांघरूण अंगावर घेऊन झोपतो! तो सूर्य म्हणतो, ''आळशा, तू निजू पाहशील, परंतु मी तुला उठविणार आहे.'' असें म्हणून आपलें उबदार किरण गजांतून शिरवून तो त्या आळशाला उठवितो. **'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च'** – स्थावरजंगमाचा सूर्य हा आत्मा आहे. चराचराचा तो आधार आहे. ऋषींनी त्याला 'मित्र' असें नांव दिलें आहे. **'मित्रो जनान् यातयति ब्रुवाणो मित्रो दाधार पृथिवीमुत द्याम्।'** – ''हा मित्र लोकांना हाक मारतो, त्यांना काम करावयास लावतो. त्याने स्वर्ग-पृथ्वीचें धारण केलें आहे.'' खरोखरच तो सूर्य जीवनाचा आधार आहे. त्याच्या ठिकाणीं परमात्मा पहा.

**12** आणि ती पावन गंगा! मी काशीत असतांना गंगेच्या कांठावर जाऊन बसावयाचा. रात्रीच्या एकांत वेळीं मी जात असे. किती सुंदर व प्रसन्न तो प्रवाह. तिचा तो भव्य गंभीर प्रवाह व तिच्या पोटात सांठवलेले ते आकाशातील अनंत तारे. मी मुग्ध होऊन जात असे. शंकराच्या जटाजुटातून, म्हणजेच त्या हिमालयातून वाहत येणारी ती गंगा, जिच्या तीरावर राज्यें तृणवत् समजून फेकून देऊन राजे तपश्चर्येसाठी येऊन बसत, अशी ती गंगा पाहून मला शांत शांत वाटे. त्या शांतीचें मी कसें वर्णन करू? बोलण्याची तेथे सीमा होई. मेल्यावर आपल्या अस्थि तरी गंगेत पडाव्या असें हिंदु मनुष्यास कां वाटतें तें समजून येई. तुम्ही हसा. तुम्ही हसलात म्हणून काही बिघडत नाही; परंतु मला या भावना फार पावन व संग्रह करण्यासारख्या वाटतात. मरतांना दोन थेंब गंगेचे तोंडात घालतात. ते दोन थेंब म्हणजे परमेश्वरच मुखात अवतीर्ण होतो. ती गंगा म्हणजे परमात्मा. परमेश्वराची ती करुणा वाहून राहिली आहे. तुमची सारी अंतर्बाह्य घाण ही माउली धुऊन राहिली आहे. गंगेच्या ठिकाणीं परमेश्वर प्रकट झालेला न दिसेल तर तो कोठे दिसणार? सूर्य, नद्या, तो धो धो करणारा, उचंबळणारा विशाल सागर, या साऱ्या परमेश्वराच्याच मूर्ति.

**13** आणि ते वारे! कोठून येतात, कोठे जातात, काही कळत नाही. वारे हे भगवंताचे दूत आहेत. हिंदुस्थानातील काही वारे स्थिर हिमालयावरून येतात तर काही गंभीर सागराकडून येतात. हे पवित्र वारे आपल्या छातीस स्पर्श करतात. ते आपणांस जागृत करतात. आपल्या कानांत गुणगुणतात. परंतु या वाऱ्यांचा संदेश कोण ऐकतो? जेलरने आपलें चार ओळींचें आलेलें पत्र न दिलें तर आपण खट्टू होतो. अरे कपाळकरंट्या, काय आहे त्या चिटोऱ्यात? हे परमेश्वराचे प्रेमळ संदेश घटकोघटकीं वाऱ्याबरोबर येत आहेत, ते ऐक.

**14** वेदामध्ये अग्नीची उपासना सांगितली आहे. अग्नि हा नारायण आहे. काय त्याची देदीप्यमान मूर्ति! दोन लाकडें घांसा, प्रकट होतो. पूर्वी कोठे लपला होता कोणास माहीत. किती ऊबदार, किती तेजस्वी! वेदांचा पहिला ध्वनि निघाला तोच मुळीं अग्नीच्या उपासनेने.

**'अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्। होतारं रत्नधातमम्।।'**

ज्या अग्नीच्या उपासनेने वेदांना आरंभ झाला, त्या अग्नीकडे तुम्ही पहा. त्या त्याच्या ज्वाळा पाहिल्या म्हणजे मला जीवात्म्याच्या धडपडीची आठवण होते. त्या ज्वाळा घरातल्या चुलीतील असोत वा जंगलातल्या वणव्यातील

असोत. वैराग्याला घरदार असें नसतें. त्या ज्वाळा जेथे असतील तेथे त्यांची ती धडपड सुरूच आहे. त्यांना सारखी तळमळ लागली आहे. त्या ज्वाळा वर जाण्यासाठी अधीर असतात. त्या ज्वाळा ईथरमुळे हलतात, हवेच्या दाबामुळे हलतात, असें तुम्ही शास्त्रज्ञ काही म्हणाल; परंतु माझा तरी अर्थ हा आहे – तो वर जो परमात्मा आहे, तो तेज:समुद्र सूर्यनारायण जो वर आहे, त्याला भेटण्यासाठी त्या सारख्या उड्या घेत असतात. जन्मल्यापासून मरेपर्यंत सारखी त्यांची धडपड सुरू असते. सूर्य हा अंशी व ह्या ज्वाळा म्हणजे अंश. अंश अंशीकडे जाण्यासाठी तडफडत असतो. त्या ज्वाळा विझतील तेव्हाच ती धडपड बंद होते, तोंपर्यंत नाही. सूर्यापासून आपलें अंतर फार आहे हा विचार त्यांच्या मनात नसतो. पृथ्वीवरून आपल्या शक्तीप्रमाणे उडी मारणें हेंच त्यांना माहीत. असा हा अग्नि म्हणजे त्याच्या रूपाने धगधगीत वैराग्यच प्रकट झालें आहे असें वाटतें. म्हणून वेदांचा पहिला ध्वनि 'अग्निमीळे' निघाला.

## 53. प्राण्यांतील परमेश्वर

**15** आणि आपलीं कामकाज करणारीं गुरें! ती गाय, किती वत्सल, मायाळु व प्रेमळ! वासरासाठी दोन-दोन तीन-तीन मैलांवरून रानावनांतून धावत येते. वेदांतील ऋषींना डोंगरांतून, पर्वतांतून स्वच्छ पाण्याच्या धो धो धावत येणाऱ्या नद्या पाहून वत्सासाठी भरलेल्या स्तनांनी हंबरत येणाऱ्या वत्सल गाईंची आठवण होते. तो ऋषि नदीला म्हणतो, ''हे देवी, दुधासारखें पवित्र पावन मधुर असें पाणी आणणारी तू धेनूप्रमाणे आहेस. गाईला वनात राहवत नाही, तशा तुम्ही नद्याहि डोंगरांत राहू शकत नाही. तुम्ही उड्या मारीत तहानेल्या बाळास भेटावयास येता.'' – **'वाश्रा इव धेनव: स्यंदमाना:'**. वत्सल गाईच्या रूपाने भगवान् दारात उभा आहे.

**16** आणि तो घोडा! किती उमदा, किती प्रामाणिक, किती स्वामिनिष्ठ! अरब लोकांचे घोड्यावर किती प्रेम! ती त्या अरबाची गोष्ट तुम्हांला आहे ना माहीत? तो अडचणीत सांपडलेला अरब सौदागरास घोडा विकण्यास तयार होतो. हातात मोहरांची थैली घेऊन तो तबेल्यात जातो. परंतु घोड्याच्या त्या गंभीर प्रेमळ डोळ्यांकडे त्याची नजर जाते; मग ती थैली तो फेकतो व म्हणतो, ''जीव गेला तरी हा घोडा मी विकणार नाही. माझें काय व्हायचें तें होईल. नाही जेवायला मिळालें तर नाही. परमात्मा पाहून घेईल.'' पाठीवर थाप मारताच कसा प्रेमाने फुरफुरतो! कशी त्याची ती आयाळ! खरोखरच घोड्यात अमोल गुण आहेत. त्या सायकलीत काय आहे? घोड्याचा खरारा करा, तो तुमच्यासाठी मरेल. तो तुमचा मित्र होईल. माझा एक मित्र घोड्यावर बसावयास शिकत होता. घोडा त्याला पाडी. तो मजकडे येऊन म्हणाला, ''घोडा पाठीवर बसूच देत नाही.'' मी त्याला म्हटलें, ''तुम्ही घोड्यावर फक्त बसावयास जाता. परंतु त्याची सेवा करता का? सेवा दुसऱ्यांनी करायची आणि तुम्ही पाठीवर बसायचें, हें कसें जमेल? तुम्ही स्वत: त्याला दाणापाणी द्या, त्याचा खरारा करा आणि मग बसा.'' तो मित्र तसें करू लागला. काही दिवसांनी तो मजकडे येऊन म्हणाला. ''आता घोडा पाडीत नाही.'' घोडा हा परमेश्वर आहे. तो भक्ताला का पाडील? त्याची भक्ति पाहून घोडा नमला. हा भक्त आहे का तिऱ्हाईत आहे हें घोडा बघतो. भगवान् श्रीकृष्ण स्वत: खरारा करावयाचे व पीतांबरातून चंदी चारावयाचे. टेकडी आली, नाला आला, चिखल आला की सायकल अडली. परंतु घोडा उड्या मारीत जातो. सुंदर प्रेमळ घोडा म्हणजे परमेश्वराचीच मूर्ति.

**17** आणि तो सिंह! मी बडोद्यास होतो. तेथे पहाटे त्याच्या गर्जनेचा तो गंभीर ध्वनि कानीं यावयाचा. तो आवाज इतका गंभीर व उत्कृष्ट असे की हृदय हलत असे. देवळाच्या गाभाऱ्यात जसा आवाज घुमतो तसा तो हृदय-गाभाऱ्यातील खोल आवाज असे. आणि सिंहाची ती धीरोदात्त व दिलदार मुद्रा! त्याची ती बादशाही ऐट, बादशाही वैभव! ती भव्य सुंदर आयाळ! जणू चवऱ्याच त्या वनराजावर ढाळल्या जात आहेत! बडोद्यास बगिच्यात सिंह होता. तेथे तो मोकळा नसे. फेऱ्या घालीत असे पिंजऱ्यात. त्याच्या डोळ्यांत क्रौर्याचा लेशहि नसे. त्या मुद्रेत व दृष्टीत कारुण्य भरलेलें दिसे. त्याला जगाची पर्वा जणू नसे, आपल्याच ध्यानात तो दंग दिसे. सिंह म्हणजे परमेश्वराची पावन विभूति आहे असें खरोखर वाटतें. आंद्रोक्लिस व सिंह ही गोष्ट मी लहानपणीं वाचली. किती सुंदर आहे ती गोष्ट! तो भुकेलेला सिंह आंद्रोक्लिसाचे पूर्वीचे उपकार स्मरून त्याचा दोस्त बनतो व त्याचे पाय चाटू लागतो. हें काय आहे?

आंद्रोक्लिसाने सिंहातील परमेश्वर पाहिला होता. शंकराच्या जवळ सिंह सदैव असतो. सिंह ही भगवंताची दिव्य विभूति आहे.

**18** आणि वाघाची काय कमी मौज आहे? त्याच्या ठिकाणीं फार ईश्वरी तेज प्रकट झालें आहे. त्याच्याशी मैत्री राखणें अशक्य नाही. भगवान् पाणिनि अरण्यात शिष्यांस पाठ देत होते. इतक्यात वाघ आला. मुलें घाबरून म्हणालीं, 'व्याघ्र: व्याघ्र:'. पाणिनि म्हणाले, ''होय, व्याघ्र म्हणजे काय? **'व्याजिघ्रतीति व्याघ्र:'** – ज्याचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण तो व्याघ्र.'' वाघाची मुलांना काय भीति वाटली असेल ती असो; परंतु भगवान् पाणिनींना वाघ म्हणजे एक निरुपद्रवी आनंदमय शब्द झाला होता. वाघ पाहून त्या शब्दाची व्युत्पत्ति ते देऊ लागले. वाघाने पाणिनींस भक्षिलें. वाघाने खाल्लें म्हणून काय झालें? पाणिनींच्या देहाचा त्याला गोड वास आला. त्याने मटकावलें. पण पाणिनि पळून गेले नाहीत. शब्दब्रह्माची उपासना करणारे ते. त्यांनी सर्व अद्वैतमय केलें होतें. व्याघ्राच्या ठिकाणींहि ते शब्दब्रह्म अनुभवून राहिले होते. पाणिनींची ही जी महनीयता आहे तीमुळेच भाष्यात जेथे जेथे त्यांचा उल्लेख येतो तेथे तेथे 'भगवान् पाणिनि' असा पूज्यभावाने तो केलेला असतो. पाणिनींचे अत्यंत उपकार मानतात.

**'अज्ञानान्धस्य लोकस्य ज्ञानाञ्जनशलाकया।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै पाणिनये नम:।।'**

असे भगवान् पाणिनि व्याघ्राच्या ठिकाणीं परमात्मा पाहून राहिले आहेत. ज्ञानदेवांनी म्हटलें आहे –

**'घरा येवो पां स्वर्ग। कां वरिपडो व्याघ्र**
**परी आत्मबुद्धीसी भंग। कदा नोहे'**

अशी महर्षि पाणिनींची स्थिति झाली होती. व्याघ्र ही दैवी विभूति आहे ही गोष्ट ते समजले होते.

**19** तसाच तो साप. सापाला फार भितात. परंतु साप म्हणजे कडकडीत सोवळा ब्राह्मण आहे. किती स्वच्छ, किती सुंदर! यत्किंचित्हि घाण त्याला खपत नाही. घाणेरडे ब्राह्मण किती तरी आढळतात! परंतु घाणेरडा सर्प कोणी पाहिला आहे? एकांतात राहणारा जणू ऋषिच. निर्मळ, सतेज, मनोहर हारासारखा हा साप, त्याला का भ्यायचें? आपल्या पूर्वजांनी तर त्याची पूजा करावयास सांगितलें आहे. काय काय हिंदुधर्मात खुळें, असें तुम्ही म्हणा. परंतु नागपूजा करावयास सांगितली आहे खरी. लहानपणीं मी आईला गंधाचा नाग काढून द्यावयाचा. मी आईला म्हणे, ''बाजारात चांगलें चित्र मिळतें.'' आई म्हणे, ''तें रद्दी, ते नको. मुलाच्या हातचें तें चांगलें.'' मग त्या नागाची पूजा करावयाची. काय आहे हा पागलपणा? परंतु विचार तर करा. तो सर्प श्रावण महिन्यात अतिथि म्हणून आपल्या घरीं येत असतो. त्याचें बिचाऱ्याचें घर पावसाळी पाण्याने सारें भरून गेलेलें असतें. मग काय करील तो? दूर एकांतात राहणारा तो ऋषि. तुम्हांस उगीच फार त्रास होऊ नये म्हणून वळचणीस लाकडांत पडून राहतो. कमीत कमी जागा तो व्यापतो; परंतु आपण दंडा घेऊन धावतो. संकटात सांपडल्यामुळे अतिथि घरीं आला तर त्याला का मारायचें? सेंट फ्रान्सिसची गोष्ट सांगतात की जंगलात साप दिसला म्हणजे तो प्रेमाने म्हणायचा, ''ये, भाऊ ये.'' ते साप त्याच्या मांडीवर खेळत, अंगावर रूळत. हें खोटें नका समजू. प्रेमामध्ये ही शक्ति आहे. साप म्हणे विषारी आहे. आणि माणूस काय कमी विषारी आहे? साप चावला तरी क्वचित् चावतो. तो मुद्दाम चावत नाही. शेंकडा 90 तर निर्विषच असतात. तो तुमच्या शेतीची रक्षा करतो. शेतीचा नाश करणारे असंख्य किडे व जंतु यावर तो जगतो. असा हा उपकारी, शुद्ध, तेजस्वी, एकांतप्रिय सर्प म्हणजे भगवंताचें रूप आहे. आमच्या सर्व देवांत साप कोठे ना कोठे तरी आहेच आहे. गणपतीच्या कमरेला नागाचा कडदोरा आम्ही दिला आहे. शंकराच्या गळ्यात ते घातले आहेत. आणि भगवान् विष्णूला तर नागाचा बिछाना दिला आहे. यांतील गोडी तर पहा. या सर्व गोष्टींचा भावार्थ हा की नागाच्या ठिकाणीं ईश्वराची मूर्ति प्रकट झाली आहे. सापातील परमेश्वराचा परिचय करून घ्या.

**20** अशा किती गोष्टी सांगू! मी कल्पना देऊन राहिलो आहे. रामायणाचें सारें सार अशा प्रकारच्या रमणीय कल्पनेतच आहे. रामायणात पितापुत्रांचें प्रेम, मायलेकरांचें प्रेम, भावाभावांतील प्रेम, पतिपत्नींचें प्रेम, हें सारें आहे. परंतु मला रामायण यासाठी नाही प्रिय वाटत. रामाची वानरांशी दोस्ती झाली या गोष्टीमुळे तें मला आवडतें. हल्ली म्हणतात की वानर म्हणजे नागलोक होते. जुनें उकरावयाचें हें इतिहासज्ञांचें कामच आहे. मी त्यांच्या कामाविषयी तक्रार नाही

करीत; परंतु रामाने खरोखरच्या वानरांशी मैत्री जोडली यात काय अशक्य आहे? राम व वानर दोस्त झाले यातच खरोखर रामाचें रामत्व व रमणीयत्व आहे. तसाच कृष्णाचा गाईंशी संबंध. सर्व कृष्णपूजा यावर उभारलेली आहे. श्रीकृष्णाचें चित्र म्हटलें म्हणजे सभोंवती गाई असावयाच्याच. गोपालकृष्ण! गोपालकृष्ण! कृष्णापासून गाय अलग कराल तर कृष्ण काय उरला? आणि रामापासून वानर दूर केले तर रामात तरी काय राम उरला? रामाने वानरांच्या ठिकाणचाहि परमात्मा पाहिला व त्यांच्याशी प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही किल्ली सोडाल तर गोडी गमवाल. पितापुत्रांचे, मायलेकरांचे संबंध अन्यत्रहि दिसतील. परंतु नरा-वानरांची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणात आहे. वानराच्या ठिकाणचा देव रामायणाने पचनीं पाडला. वानरांना पाहून ऋषींना कौतुक वाटे. रामटेकापासून तो कृष्णाकांठापर्यंत जमिनीवर पाय न ठेवता झाडांवरच्या झाडांवर उड्या मारीत हे वानर हिंडत खेळत. अशीं तीं घनदाट जंगलें व तेथे खेळणारे ते वानर पाहून प्रेमळ ऋषींस काव्य स्फुरे, कौतुक वाटे. उपनिषदात 'ब्रह्माचे डोळे कसे असतात' हें सांगतांना वानराच्या डोळ्यांप्रमाणे असतात असें म्हटलें आहे. वानराचे डोळे चंचळ. चौफेर त्याची नजर. ब्रह्माचे असेच डोळे हवेत. ईश्वराला डोळे स्थिर ठेवून चालणार नाही. तुम्ही आम्ही ध्यानस्थ बसावें; परंतु ईश्वर ध्यानस्थ बसला तर सृष्टीचें कसें होणार? वानराच्या ठिकाणीं सर्वांची काळजी घेणारे ब्रह्माचे डोळे ऋषींना दिसत आहेत. वानराच्या ठिकाणीं देव पहावयास शिका.

**21** आणि तो मोर! महाराष्ट्रात मोर फारसे नाहीत. परंतु गुजरातमध्ये फार आहेत. मी गुजरातमध्ये होतो. मला रोज दहा-बारा मैल हिंडण्याची सवय. हिंडतांना मला मोर दिसावयाचे. आकाशात अभ्रें आलेलीं असावीं, पाऊस पडण्याची तयारी असावी, आकाशात काळा गर्द रंग चढलेला असावा आणि मग तो मोर आवाज काढतो. हृदय पिळवटून निघालेला तो टाहो ऐका म्हणजे समजेल. आमचें सारें संगीतशास्त्र मोराच्या या ध्वनीवर उभारलें आहे. मोराचा आवाज म्हणजे ''षड्जं रौति.'' हा पहिला षड्ज मोराने दिला व मग कमी-अधिक प्रमाणात आपण इतर स्वर बसविले. त्याची ती मेघाकडे असलेली दृष्टि, त्याचा तो खोल आवाज व मेघांचा धिमिधिमि गडगड आवाज होऊ लागताच त्याचा उभारला जाणारा तो पिसारा! अहाहा! त्या पिसाऱ्यासमोर माणसाची सारी ऐट फिकी पडते. बादशहा नटतो. परंतु मोराच्या पिसाऱ्यासमोर तो काय अधिक नटणार? केवढा तो भव्य पिसारा, ते सहस्र डोळे, ते नाना रंग, त्या अनंत छटा, ती अद्‌भुत सुंदर मृदु रमणीय रचना, ती वेलबुट्टी! पहा पहा तो पिसारा आणि तेथे परमात्माहि पहा. ही सारी सृष्टि अशी नटली आहे. सर्वत्र परमात्मा दर्शन देत उभा आहे; परंतु आपण न पाहणारे अभागी. तुकारामांनी म्हटलें आहे – **'देव आहे सुकाळ देशीं, अभाग्यासी दुर्भिक्ष।।'** संतांना सर्वत्र सुकाळ आहे; परंतु आम्हांला सर्वत्र दुष्काळ.

**22** आणि ती कोकिळा! मी कशी विसरू? कोणाला ती हाक मारते? उन्हाळ्यात नदी-नाले आटले; परंतु वृक्षांना पल्लव फुटले. कोणी हें वैभव दिलें, कोठे आहे तो वैभवदाता असें का ती विचारते? कसा उत्कट मधुर आवाज! हिंदुधर्मात कोकिळेचें व्रतच घालून दिलें आहे. कोकिळेचा आवाज ऐकल्याशिवाय जेवायचें नाही असें बायका व्रत घेतात. कोकिळेच्या रूपाने प्रकट झालेला परमात्मा पहावयास शिकविणारें हें व्रत आहे. ती कोकिळा किती सुंदर ध्वनि काढते! जणू उपनिषदच गाते. तिचा ध्वनि कानावर येतो, परंतु ती दिसत नाही. तो इंग्रज कवि वर्डस्वर्थ तिच्यासाठी वेडा होतो. तिला शोधत रानोमाळ भटकतो. इंग्लडमधील थोर कवि कोकिळेला शोधतो. परंतु भारतात तर घरातील सामान्य स्त्रिया कोकिळा न दिसली तर जेवतहि नाहीत! कोकिळाव्रतामुळे भारतीय स्त्रियांनी थोर कवीची पदवी प्राप्त करून घेतली आहे. जी कोकिळा परम आनंदाचा मधुर ध्वनि ऐकविते, तिच्या रूपाने सुंदर परमात्माच प्रकट झाला आहे.

**23** कोकिळा सुंदर आणि तो कावळा का रद्दी? कावळ्याचेंहि कौतुक करा. मला तर तो फार आवडतो. त्याचा काळा कुळकुळीत रंग, तो तीव्र आवाज. तो आवाज का वाईट आहे? तोहि गोड आहे. पंख फडफडवीत येतो तेव्हा किती छान दिसतो तो कावळा! लहान मुलांचें चित्त वेधून घेतो. लहान मुलगा बंद केलेल्या घरात जेवत नाही. त्याला बाहेर अंगणात नेऊन भरवावें लागतें व काऊ चिऊ दाखवीत घांस द्यावा लागतो. कावळ्याबद्दल प्रेम वाटणारें तें मूल, तें का पागल आहे? तें पागल नाही. ज्ञान त्याच्यात भरलेलें आहे. कावळ्याच्या रूपाने प्रकट झालेल्या परमेश्वराशी तें मूल पटकन् एकरूप होतें. आई भातावर दही घालो, दूध घालो, साखर घालो; त्यात त्या मुलाला गोडी नाही. कावळ्याचें पंख फडफडवणें, त्याच्या त्या वांकुल्या, त्यात त्या मुलाला आनंद आहे. सृष्टीबद्दल लहान मुलाला जें हें कौतुक वाटतें

त्यावर तर सारी इसापनीति उभारलेली आहे. इसापाला सर्वत्र ईश्वर दिसत होता. माझ्या आवडत्या ग्रंथांच्या यादीत मी इसापनीति आधी घालीन, विसरणार नाही. इसापाच्या राज्यात दोन हातांचा, दोन पायांचा हा मनुष्य-प्राणीच तेवढा नाही; तेथे कोल्हे-कुत्रीं, ससे-लांडगे, कावळे-कासवें सारे आहेत. सारे बोलतात, हंसतात. एक प्रचंड संमेलनच आहे तें. इसापाशी सारी चराचर सृष्टि बोलत आहे. त्याला दिव्य दर्शन झालें आहे. रामायणहि याच तत्त्वावर, याच दृष्टीवर उभारलेलें आहे. तुलसीदासांनी रामाचें बालपण वर्णिलें आहे. राम अंगणात खेळत आहे. जवळच कावळा आहे. राम हळूच त्याला पकडू बघतो. कावळा दूर जातो. शेवटीं राम थकतो. परंतु रामाला एक युक्ति सुचते. हातात बर्फीचा तुकडा घेऊन राम कावळ्याच्या जवळ जातो. राम तुकडा पुढे करतो. कावळा जरा जवळ येतो. असें हें वर्णन करण्यात तुलसीदास ओळींच्या ओळी भरून राहिले आहेत. कारण तो कावळा परमेश्वर आहे. रामाच्या मूर्तीमधील अंशच त्या कावळ्यातहि आहे. रामाची व कावळ्याची ती ओळख म्हणजे परमात्मा-परमात्म्याची ओळख होय.

## 54. दुर्जनातहि परमेश्वराचें दर्शन

**24** सारांश, अशा प्रकारें या सृष्टीत नाना रूपांनी, पवित्र नद्यांच्या रूपाने, विशाल पर्वताच्या रूपाने, गंभीर सागराच्या रूपाने, वत्सल गाईच्या रूपाने, उमद्या घोड्याच्या रूपाने, दिलदार सिंहाच्या रूपाने, मधुर कोकिळेच्या रूपाने, सुंदर मोराच्या रूपाने, स्वच्छ व एकांतप्रिय सर्पाच्या रूपाने, पंख फडफडवणाऱ्या कावळ्याच्या रूपाने, धडपडणाऱ्या ज्वाळांच्या रूपाने, प्रशांत तारकांच्या रूपाने, सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे. डोळ्यांना तें पाहण्याची सवय लावावयाची. प्रथम ठळक व सरळ अक्षरें, मग बारीक व जोडाक्षरें शिकलीं पाहिजेत. जोडाक्षरें शिकेपर्यंत वाचनात प्रगति होणार नाही. जोडाक्षरें पदोपदी येतील. दुर्जनांच्या ठिकाणचा परमेश्वरहि पहावयास शिकलें पाहिजे. राम पटतो; परंतु रावणहि पटला पाहिजे. प्रह्लाद पटतो; हिरण्यकश्यपुहि पटला पाहिजे. वेदात म्हटलें आहे – **'नमो नमः स्तेनानां पतये नमो नमः... नमः पुंजिष्ठेभ्यो... नमो निषादेभ्यः...' 'ब्रह्म दाशा ब्रह्म दासा, ब्रह्मैवेमे कितवाः।'** ''त्या दरवडेखोरांच्या नायकाला नमस्कार; त्या क्रूरांना, त्या हिंसकांना नमस्कार. हे ठग, हे दुष्ट, हे चोर, सारे ब्रह्मच आहेत. सर्वांना नमस्कार.''

याचा अर्थ काय? याचा अर्थ हा की सोपीं अक्षरें पचनीं पाडलींत, कठिण अक्षरेंहि पचनीं पाडा. कार्लाईल या ग्रंथकाराने विभूतिपूजा म्हणून ग्रंथ लिहिला. त्यात त्याने नेपोलियनलाहि विभूति म्हटलें आहे. येथे शुद्ध परमात्मा नाही, मिसळ आहे. परंतु हाहि परमेश्वर पचनीं पडला पाहिजे. म्हणून तुलसीदासांनी रावणाला रामाचा विरोधी भक्त असें म्हटलें आहे. या भक्ताची तऱ्हा जरा निराळी. अग्नीमुळे पाय भाजतो व सुजतो. परंतु सुजलेला भागहि शेकून सूज उतरते. एकच तेज. आविर्भाव निराळे. राम आणि रावण यांच्या ठिकाणीं आविर्भाव निराळा दिसला तरी तो एकाच परमेश्वराचा आहे.

स्थूल व सूक्ष्म, सरळ व मिसळ, सोपीं अक्षरें व जोडाक्षरें, सारें शिका, आणि शेवटीं परमेश्वराशिवाय एकहि स्थळ नाही हें अनुभवा. अणुरेणूतहि तोच आहे. मुंगीपासून तों ब्रह्मांडापर्यंत सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे. सर्वांची सारखीच काळजी वाहणारा, कृपाळु, ज्ञानमूर्ति, वत्सल, समर्थ, पावन, सुंदर असा परमात्मा सभोंवती सर्वत्र उभा आहे.

***रविवार, 24-4-'32***

# अध्याय 11

# विश्वरूप-दर्शन

## 55. विश्वरूप-दर्शनाची अर्जुनाची हौस

**1** बंधूंनो, गेल्या खेपेस या विश्वातील अनंत वस्तूंत भरून राहिलेला परमात्मा कसा ओळखावा, हें जें विराट् प्रदर्शन डोळ्यांना दिसतें तें कसें पचवावें, त्याचा अभ्यास आपण केला. आधी ठळक मग बारीक, आधी सरळ मग मिसळ, अशा प्रकारें सर्व वस्तूंतील परमात्मा पहावयाचा, त्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा, अहर्निश अभ्यास करून सर्व विश्व आत्मरूप पहावयास शिकावयाचें असें मागच्या अध्यायात आपण पाहिलें.

आज अकरावा अध्याय पहावयाचा आहे. या अध्यायात भगवंतांनी प्रत्यक्ष आपलें रूप दाखवून अर्जुनावर परम कृपा प्रकट केली आहे. अर्जुन देवाला म्हणाला, ''देवा, तुझें तें संपूर्ण रूप मला पहावेंसें वाटतें. ज्या रूपात तुझा सर्व महान् प्रभाव प्रकट झालेला आहे, असें रूप मला डोळ्यांनी पहावयास मिळो.'' अर्जुनाची ही विश्वरूपदर्शनाची मागणी होती.

**2** आपण विश्व, जग, हे शब्द वापरतो. हें जग म्हणजे विश्वाचा एक लहानसा भाग आहे. या लहानशा तुकड्याचेंहि आकलन आपणांस नीट होत नाही. विश्वाच्या हिशोबाने पाहिलें तर हें आपणांस मोठें वाटणारें जग म्हणजे अतिशय तुच्छ वस्तु आहे असें कळून येईल. आकाशात रात्रींच्या वेळीं वर जरा दृष्टि फेकली तर ते अनंत गोल दिसतात. आकाशाच्या अंगणातील ती रांगोळी, तीं छोटीं छोटीं सुंदर फुलें, त्या लुकलुक करणाऱ्या लाखों तारका, त्यांचें स्वरूप माहीत आहे का? त्या लहान तारका प्रचंड आहेत. अनंत सूर्य त्यांच्यात मावतील. रसरसलेले तेजोमय ज्वलंत धातूंचे ते गोल आहेत. अशा या अनंत गोलांचा हिशेब कोण करील? ना अंत, ना पार. नुसत्या डोळ्यांना हजारों गोल दिसतात. दुर्बिणीतून पाहू तर कोट्यवधि दिसतात. आणखी मोठी दुर्बीण आणाल तर परार्धावधि दिसतील. आणि शेवटीं याचा अंत कोठे आहे व कसा आहे, हें समजणार नाही. ही जी अनंत सृष्टि खाली वर सर्वत्र पसरलेली आहे, तिचा लहानसा तुकडा म्हणजे हें जग. परंतु हें जगहि किती विशाल दिसतें!

**3** ही विशाल सृष्टि ही परमेश्वरी स्वरूपाची एक बाजू झाली. आता दुसरी बाजू आहे, ती म्हणजे काळाची. आपण पाठीमागचा काळ जर लक्षात घेतला तर इतिहासाच्या मर्यादेत फार फार तर दहा हजार वर्षें आपण मागे जातो. आणि पुढचा काळ तर लक्षातच येत नाही. इतिहासाचा काळ दहा हजार वर्षांचा व स्वत:चें जें जीवन, त्याचा काळ तर जेमतेम शंभर वर्षें! वास्तविक काळाचा विस्तार अनादि व अनंत आहे. किती काळ झाला त्याचा हिशेब नाही. पुढे किती आहे त्याची कल्पना नाही. आपलें जग जसें विश्वाच्या मानाने तुच्छ, त्याप्रमाणे हीं इतिहासाचीं दहा हजार वर्षें अनंत काळाच्या मानाने काहीच नाहीत. भूतकाळ अनादि आहे व भविष्यकाळ अनंत आहे. लहानसा वर्तमानकाळ बोलता बोलता भूतकाळात जात आहे. वर्तमानकाळ खरोखर कोठे आहे हें दाखवायला जावें तों तो भूतकाळात बुडून जातो. असा अत्यंत चपळ वर्तमानकाळ तेवढा आपला आहे. मी आता बोलत आहे; परंतु तोंडातून शब्द आला नाही तोंच तो भूतकाळात गडप होतो. अशी ही महान् काल-नदी सारखी वाहत आहे. तिचा उगम माहीत नाही, अंत माहीत नाही. मध्यंतरींचा थोडासा प्रवाह मात्र दृष्टीस पडतो.

**4** अशा रीतीने एका बाजूस स्थळाचा प्रचंड विस्तार व दुसऱ्या बाजूस काळाचा प्रचंड ओघ, अशा दोन्ही दृष्टींनी सृष्टीकडे पाहू लागलो म्हणजे कल्पनेस कितीहि ताण दिला तरी तिचा अंत लागणार नाही हें कळून येतें. तिन्ही काळांत व तिन्ही स्थळांत, भूत-भविष्य-वर्तमानात, त्याप्रमाणेच वर, खाली व येथे, असा सर्वत्र भरून राहिलेला जो विराट् परमेश्वर, तो एकदम एकाच वेळीं पहावयास सांपडावा, परमेश्वराचें त्या रूपात दर्शन व्हावें, अशी अर्जुनास इच्छा झाली आहे. या इच्छेतून हा अकरावा अध्याय प्रकट झाला आहे.

**5** अर्जुन भगवंतास अत्यंत प्रिय होता. किती प्रिय होता? इतका प्रिय की दहाव्या अध्यायात कोणत्या कोणत्या स्वरूपात माझें चिंतन कर हें सांगतांना, पांडवांत जो अर्जुन आहे त्याच्या ठिकाणीं माझें चिंतन करीत जा, असें भगवान् सांगत आहेत. **'पांडवांत धनंजय'** असें श्रीकृष्ण म्हणतात. यापेक्षा प्रेमाचा पागलपणा, प्रेमवेडेपणा कोठे असेल? प्रेम किती वेडें होऊ शकतें याचें हें उदाहरण आहे. अर्जुनावर भगवंतांची अपार प्रीति. त्या प्रीतीसाठी हा अकरावा अध्याय प्रसादरूप आहे. दिव्य रूप पहावयाची अर्जुनाची इच्छा, त्याला दिव्य दृष्टि देऊन भगवंतांनी पुरी केली. अर्जुनाला त्यांनी प्रेमाचा प्रसाद दिला.

## 56. लहान मूर्तीतहि पूर्ण दर्शन होऊ शकतें

**6** त्या दिव्य रूपाचें सुंदर वर्णन, भव्य वर्णन या अध्यायात आहे. हें सारें जरी खरें, तरी या विश्वरूपाबद्दल विशेष लोभ मला दाखविता येत नाही. मी लहान रूपावर संतुष्ट आहे. जें लहान साजिरें गोजिरें रूप मला दिसतें, त्यातील गोडी अनुभवावयास मी शिकलो आहे. परमेश्वराचे तुकडे नाहीत. परमेश्वराचें जें रूप पहावयास सांपडलें, तें त्याचा एक तुकडा आहे व बाकीचा परमेश्वर बाहेर उरला आहे, असें मला भासत नाही. जो परमेश्वर विराट् विश्वात भरून राहिला आहे तो संपूर्ण तसाच्या तसा लहानशा मूर्तीत, एखाद्या मातीच्या कणातहि आहे, कमी नाही. अमृताच्या सिंधूत जी गोडी, तीच एका बिंदूतहि असते. अमृताचा जो लहानसा बिंदु मला लाभला आहे, त्याची गोडी चाखावी असें मला वाटतें. मी मुद्दाम अमृताचा दृष्टांत घेतला आहे. पाण्याचा किंवा दुधाचा नाही. पेलाभर दुधात जी गोडी, तीच लोटाभर दुधात असणार. परंतु गोडी तीच असली, तरी पुष्टि तेवढीच नाही. थेंबभर दुधापेक्षा पेलाभर दुधात अधिक पुष्टि आहे. परंतु अमृताच्या दृष्टांतात तसें नाही. अमृताच्या समुद्रातील गोडी अमृताच्या एका थेंबात आहेच, शिवाय तेवढीच पुष्टिहि आहे. थेंबभर अमृत घशाखाली गेलें तरी अमृतत्वच मिळणार.

त्याप्रमाणे जी दिव्यता, जी पवित्रता परमेश्वराच्या विराट् स्वरूपात आहे, तीच लहानशा मूर्तीतहि आहे. एक मूठभर गहूं नमुन्यादाखल मला कोणी दिले, त्यावरून गव्हाची ओळख मला जर झाली नाही तर गव्हाचें पोतें जरी माझ्यासमोर आणून टाकलें तरी ती कशी होणार? जो लहान ईश्वराचा नमुना डोळ्यांसमोर उभा आहे, त्याने जर ईश्वराची ओळख पटली नसेल तर विराट् परमेश्वर पाहून ती कशी पटेल? धाकटें, मोठें यांत काय आहे? धाकट्या रूपाची ओळख पटली की मोठ्याची पटेल. म्हणून देवाने मोठें रूप दाखवावें अशी मला हौस नाही. अर्जुनाप्रमाणे विश्वरूप-दर्शनाची मागणी करण्याची माझी योग्यताहि नाही. शिवाय मला जें दिसत आहे, तें म्हणजे विश्वरूपाचा तुकडा आहे असें नाही. तसबिरीचा एखादा फुटलेला तुकडा आणला तर त्यावरून सर्व तसबिरीची कल्पना आपणांस येणार नाही. परंतु परमात्मा काही असा तुकड्यांचा बनलेला नाही. परमात्मा कापलेला नाही, खंड खंड केलेला नाही. लहानशा स्वरूपातहि तो अनंत परमेश्वर साराच्या सारा सांठवलेला आहे. छोटा फोटो व मोठा फोटो यांत काय फरक? जें मोठ्यात तेंच सारें तसेंच्या तसें छोट्यातहि असतें. छोटा फोटो म्हणजे मोठ्या फोटोचा काही तुकडा नव्हे. लहान टाईपात अक्षरें असलीं तरी अर्थ तोच. मोठ्या टाईपात असलीं तरी अर्थ तोच. मोठ्या टाईपात मोठा अर्थ आणि छोट्यात छोटा असें काही नाही. याच विचार-पद्धतीचा मूर्तिपूजेला आधार असतो.

**7** मूर्तिपूजेवर अनेकांनी हल्ले चढविले आहेत. बाहेरच्या व इथल्याहि कित्येक विचारकांनी मूर्तिपूजेला दोष दिला आहे. परंतु मी जसजसा विचार करतो, तसतशी मूर्तिपूजेतील दिव्यता माझ्यासमोर स्पष्ट उभी राहते. मूर्तिपूजा म्हणजे काय? एका लहानशा वस्तूत सर्व विश्व अनुभवण्यास शिकणें म्हणजे मूर्तिपूजा. लहानशा खेड्यातहि ब्रह्मांड पहावयास शिकणें ही गोष्ट का खोटी आहे? ही कल्पना नसून प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट आहे. विराट् स्वरूपात जें आहे तेंच लहानशा मूर्तीत, तेंच एखाद्या मृत्कणात. त्या मातीच्या ढेकळात आंबे, केळीं, गहूं, सोनें, तांबें, रुपें, सारें आहे. सर्व सृष्टि त्या कणात आहे. ज्याप्रमाणे एखाद्या लहानशा नाटक-मंडळीत तींच तीं पात्रें निरनिराळीं रूपें घेऊन रंगभूमीवर येतात, त्याप्रमाणेच परमेश्वराचें आहे. किंवा जसा एखादा नाटककार स्वत: नाटक लिहितो व नाटकात कामहि करतो, त्याप्रमाणेच परमात्माहि अनंत नाटकें लिहितो व आपण अनंत पात्रांनी नटून तीं रंगभूमीवर दाखवितो. या अनंत नाटकांतील एक पात्र ओळखलें की सारें ओळखल्यासारखें होईल.

**8** काव्यातील उपमा-दृष्टांतांना जो आधार तोच मूर्तिपूजेसहि आधार. एखादी गोल वस्तु पाहिली म्हणजे आनंद होतो. कारण तेथे व्यवस्थितपणा असतो. व्यवस्थितपणा हें ईश्वराचें स्वरूप आहे. ईश्वराची सृष्टि सर्वांगसुंदर आहे. तिच्यात व्यवस्थितपणा आहे. ती गोल वस्तु म्हणजे व्यवस्थित ईश्वराची मूर्ति. परंतु जंगलात वाढलेलें वाकडें झाड, तीहि ईश्वराचीच मूर्ति. तेथे ईश्वराचा स्वच्छंदीपणा आहे. त्या झाडाला बंधन नाही. ईश्वराला कोण बंधन घालणार? तो बंधनातीत परमेश्वर त्या वाकड्या झाडात आहे. एखादा सरळ खांब पाहिला तर ईश्वराची समता तेथे दिसते. नक्षीचा खांब पाहिला तर आकाशात नक्षत्रांची रांगोळी काढणारा परमेश्वर तेथे दिसतो. कापून छाटून व्यवस्थित केलेल्या एखाद्या बागेत ईश्वराचें संयमी स्वरूप दिसतें, तर विशाल जंगलात ईश्वराची भव्यता व स्वतंत्रता दिसते. जंगलातहि आनंद होतो, व्यवस्थित बगिच्यातहि होतो. मग आपण का वेडे आहोत? वेडे नाही. आनंद दोहोंतहि होतो, कारण ईश्वरी गुण प्रत्येकात प्रकट झाला आहे. गुळगुळीत शाळिग्रामात जें ईश्वरी तेज, तेंच त्या ओबडधोबड नर्मद्या गणपतीत आहे. मला तें विराट् रूप निराळें दिसलें नाही तरी चालेल.

**9** परमेश्वर सर्वत्र निरनिराळ्या वस्तूंत निरनिराळ्या गुणांनी प्रकट झालेला आहे व म्हणून आपणांस आनंद होतो. त्या वस्तूंविषयी आत्मीयता वाटते. आनंद होतो म्हणजे उगीचच नव्हे. आनंद कां होतो? काहीतरी नातें असतें म्हणून आनंद होतो. मुलाला पाहताच आईला आनंद होतो. कारण ती नातें ओळखते. प्रत्येक वस्तूशी परमात्म्याचें नातें जोडा. माझ्यामध्ये जो परमेश्वर आहे तोच त्या वस्तूत आहे. असा हा संबंध वाढविणें म्हणजेच आनंद वाढविणें. आनंदाची अन्य उपपत्ति नाही. प्रेमाचा संबंध सर्वत्र जोडू लागा म्हणजे मग पहा कशी मौज होते ती. मग अनंत सृष्टीतील परमात्मा अणुरेणूतहि दिसेल. एकदा ही दृष्टि आली म्हणजे मग काय हवें? परंतु यासाठी इंद्रियांना वळण लावलें पाहिजे. भोगवासना सुटून प्रेमाची पवित्र दृष्टि आली म्हणजे मग प्रत्येक वस्तूत ईश्वरच दिसेल. उपनिषदात आत्म्याचा रंग कसा असतो, याचें सुंदर वर्णन आहे. आत्म्याचा रंग कोणता सांगावयाचा? ऋषि प्रेमाने म्हणतात, **'यथा अयं इंद्रगोप:'** – हा जो लाल लाल रेशमासारखा मऊ मृगाचा किडा, त्याच्यासारखें आत्म्याचें रूप आहे. तो मृगाचा किडा पाहिला म्हणजे किती आनंद होतो! हा आनंद कां होतो? माझ्या ठिकाणीं जो भाव आहे, तोच त्या इंद्रगोपाच्या ठिकाणीं आहे. त्याचा माझा संबंध नसता तर मला आनंद होता ना. माझ्या ठिकाणीं जो सुंदर आत्मा आहे तोच इंद्रगोपाच्या ठिकाणीं आहे, म्हणून त्याची उपमा दिली. उपमा कां देतो? तिने आनंद कां होतो? त्या दोन्ही वस्तूंत साम्य असतें म्हणून आपण उपमा देतो आणि त्यामुळे आनंद होतो. जर उपमेय व उपमान अगदी निराळ्या वस्तु असतील तर आनंद होणार नाही. ''मीठ तिखटा-सारखें आहे,'' असें कोणी म्हटलें तर त्याला आपण वेडा म्हणू. परंतु ''तारे फुलासारखे आहेत,'' असें कोणी म्हटलें तर साम्य दिसून आनंद होतो. मीठ तिखटासारखे आहे असें म्हणण्यात सादृश्य अनुभवास येत नाही. परंतु एखाद्याची दृष्टि तितकी मोठी झाली असेल, जो परमात्मा मिठात तोच तिखटात हें दर्शन ज्याला झालें असेल, तो 'मीठ कसें? तर तिखटासारखें', या म्हणण्यातहि आनंद अनुभवील. सारांश, ईश्वरी रूप प्रत्येक वस्तूत ओतप्रोत भरलेलें आहे, तेवढ्यासाठी विराट् दर्शनाची आवश्यकता नाही.

## 57. विराट् विश्वरूप पचणारहि नाही

**10** शिवाय तें विराट् दर्शन मला सहन तरी कसें होईल? लहान सगुण सुंदर रूपात मला जें प्रेम वाटतें, जी आपुलकी वाटते, जी गोडी वाटते, तिचा अनुभव विश्वरूप पाहतांना कदाचित् येणार नाही. अर्जुनाची तीच स्थिति झाली. तो थरथर कांपत शेवटीं म्हणतो, ''देवा, तुझें तें पूर्वीचें गोड रूप दाखव.'' विराट् स्वरूप पाहण्याची इच्छा करू नका, असें अर्जुन स्वानुभवाने सांगत आहे. ईश्वर तिन्ही काळीं, तिन्ही स्थळीं व्यापून राहिला आहे तेंच बरें. तो सर्व एकवटून धगधगीत गोळा माझ्यासमोर येऊन उभा राहिला तर माझी काय दशा होईल? तारका कशा शांत दिसतात! जणू त्या माझ्याजवळ दुरून बोलताहेत असें वाटतें. परंतु दृष्टीला शांत करणारी ती तारका जवळ आली तर? ती जळती आग आहे. मी मग भाजूनच निघेन. ईश्वराचीं हीं अनंत ब्रह्मांडें जेथे आहेत तेथे तीं तशींच असू देत. तीं सारीं एका खोलीत आणण्यात काय मौज? मुंबईच्या त्या कबुतरखान्यात हजारों कबुतरें राहतात. तेथे का मोकळेपणा आहे? तें दृश्य चमत्कारिक वाटतें. खाली, वर, येथे, तिन्ही स्थळीं सृष्टि विभागून राहिली आहे, यातच गोडी आहे.

**11** जसें स्थलात्मक सृष्टीचें, तसेंच कालात्मक सृष्टीचें. आपणांस भूतकाळाचें आठवत नाही व पुढचें कळत नाही हें आपल्या कल्याणाचेंच आहे. ज्या वस्तु खास परमेश्वराच्या सत्तेच्या असतात, ज्यांवर मनुष्य-प्राण्याची सत्ता कधी नसते, अशा पांच वस्तु कुराणात सांगितल्या आहेत. त्यात एक वस्तु 'भविष्यकाळाचें ज्ञान' ही सांगितली आहे. आपण अंदाज करतो; परंतु अंदाज म्हणजे ज्ञान नव्हे. भविष्याचें ज्ञान आपल्याला नाही हें आपल्या कल्याणाचेंच आहे. तसेंच भूतकाळ आठवत नाही हेंहि खरोखरच चांगलें आहे. एखादा दुर्जन मनुष्य जरी चांगला होऊन माझ्या समोर आला तरी मला त्याचा भूतकाळ आठवून त्याच्याबद्दल आदर वाटत नाही. त्याने किती जरी सांगितलें तरी त्याचीं तीं पूर्वीचीं पापें मला विसरता येत नाहीत. तो मनुष्य मरून, रूप बदलून परत येईल तेव्हाच त्याच्या पापाची जगाला विस्मृति पडेल.

पूर्व-स्मरणाने विकार वाढतो. हें पूर्वीचें सारें ज्ञानच जर नष्ट झालें तर सगळें संपलें. पापपुण्याची विस्मृति पडावयास एखादी युक्ति पाहिजे. ती युक्ति म्हणजे मरण. ह्या जन्माच्या वेदनाच जर असह्य होत आहेत, तर मागच्या जन्मींचा कचरा कशाला तपासतोस? याच जन्माच्या खोलीत का कचरा कमी आहे? बाळपणसुद्धा आपण पुष्कळ विसरतो. विस्मरण पडणें चांगलें. हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी भूतकाळचें विस्मरण हाच उपाय आहे. औरंगजेबाने जुलूम केला. किती दिवस घोकीत बसणार हें? रतनबाईचें गुजरातीत गरबा-गीत आहे तें आपण येथे पुष्कळ वेळा ऐकत असतो. त्यात शेवटीं म्हटलें आहे, ''जगात सर्वांचें यश शेवटीं राहील. पापाचें विस्मरण पडेल.'' काळ चाळणी मारीत आहे. इतिहासातील चांगलें तेवढें घेतलें पाहिजे, पाप फेकून दिलें पाहिजे. वाईट सोडून चांगलेंच जर मनुष्य लक्षात ठेवील तर सोनें होईल. परंतु तसें होत नाही. म्हणून विस्मरणाची फार जरूरी आहे. त्यासाठी देवाने मरण निर्मिलें आहे.

**12** सारांश, जग जसें आहे तसेंच मंगल आहे. कालस्थलात्मक जग एके ठिकाणीं सारें जवळ आणण्याची जरूर नाही. अति परिचयात स्वारस्य नाही. काही वस्तूंची सलगी करावयाची असते, काहींपासून दूर अंतरावर रहावयाचें असतें. गुरु असला तर नम्रतेने दूर बसू. आईच्या मांडीवर जाऊन बसू. ज्या मूर्तीजवळ जसें वागावयास हवें तसें वागलें पाहिजे. फुलाला जवळ करावें, अग्नीला बेतात राखावें. तारका दुरूनच सुंदर. तसेंच सृष्टीचें. अति दूर असलेली ती सृष्टि अति जवळ आणण्यात अधिक आनंद होईल असें नाही. जी वस्तु जेथे आहे ती तेथेच असू दे. त्यातच स्वारस्य आहे. दुरून जी वस्तु दिसते ती जवळ आणल्याने सुखावह होईलच असें नाही. ती तशी दूर ठेवूनच तिच्यातील रस चाख. धटिंगण होऊन, फार सलगी करून अति परिचय करून घेण्यात अर्थ नाही.

**13** सारांश, तिन्ही काळ आपणांसमोर उभे नाहीत हें चांगलें आहे. तिन्ही काळांतील ज्ञान होण्यात आनंद किंवा कल्याण आहेच असें नाही. अर्जुनाने प्रेमाने हट्ट घेतला, प्रार्थना केली, व देवाने ती पुरविली. भगवंतांनी आपलें तें विराट् स्वरूप त्याला दाखविलें. परंतु मला परमेश्वराचें छोटें रूप पुरेसें आहे. हें छोटें रूप म्हणजे काही परमेश्वराचा तुकडा तर नाहीच. आणि समजा, हा परमेश्वराचा एक तुकडा असला तरी त्या अफाट विशाल पुतळ्याचा एक पाय, किंवा एका पायाची अंगुलीच मला दिसली तरीसुद्धा मी म्हणेन, ''अहोभाग्य माझें!'' मी हें अनुभवाने शिकलो आहे. जमनालालजींनी जेव्हा वर्ध्याला लक्ष्मीनारायणाचें मंदिर अस्पृश्यांसाठी खुलें केलें त्या वेळेस मी दर्शनास गेलो होतो. पंधरा-वीस मिनिटें तें रूप पाहत होतो. माझी समाधि लागल्यासारखी स्थिति झाली. देवाचें तें मुख, ती छाती, ते हात, पाहत पाहत मी पायांशी आलो आणि चरणांवरच माझी दृष्टि शेवटीं स्थिर झाली. 'गोड तुझी चरण-सेवा' हीच भावना शेवटीं राहिली. लहानशा रूपात जर तो महान् प्रभु मावत नसेल तर त्या महापुरुषाचे चरण दिसले तरी पुरे. अर्जुनाने ईश्वराला प्रार्थना केली. त्याचा अधिकार मोठा होता. त्याची किती सलगी, किती प्रेम, कसा सख्यभाव! माझी काय योग्यता आहे? मला चरणच पुरे. माझा अधिकार तितकाच.

## 58. सर्वार्थ-सार

**14** त्या परमेश्वराच्या दिव्य रूपाचें जें वर्णन आहे तेथे बुद्धि चालविण्याची माझी इच्छा नाही. तेथे बुद्धि चालविणें म्हणजे पाप आहे. त्या विश्वरूप वर्णनाचे ते पवित्र श्लोक वाचावे व पवित्र व्हावें. बुद्धि चालवून परमेश्वराच्या त्या रूपाचे तुकडे करावे असें मला वाटत नाही. ती अघोर उपासना होईल. अघोरपंथी लोक स्मशानात जाऊन प्रेतें फाडतात व तंत्रोपासना करतात, तसेंच तें होईल. तें परमेश्वराचें दिव्य रूप – **'विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुख: विश्वतोबाहुरुत**

**विश्वतस्पात्'** असें तें विशाल व अनंत रूप, त्याच्या वर्णनाचे श्लोक गावे, ते श्लोक गाऊन मन निष्पाप व पवित्र करावें.

**15** परमेश्वराच्या ह्या सर्व वर्णनात एके ठिकाणींच बुद्धि विचार करू लागते. परमेश्वर अर्जुनाला म्हणतो, ''अर्जुना, हे सारे मरणारे आहेत. तू निमित्तमात्र हो. मी सर्व काही करणार आहे.'' एवढाच आवाज मनात घुमतो. ईश्वराच्या हातातलें आपणांस हत्यार व्हावयाचें हा विचार मनात आला म्हणजे बुद्धि विचार करू लागते. ईश्वराच्या हातातील हत्यार कसें व्हावयाचें? ईश्वराच्या हातातील मी मुरली कसें व्हावयाचें? त्याने मला ओठाशी धरून माझ्यातून मधुर सूर काढावयाचे, मला वाजवावयाचें, हें कसें व्हावें? मुरली व्हावयाचें म्हणजे पोकळ व्हावयाचें. पण मी तर विकारांनी, वासनांनी खच्चून भरलो आहे. माझ्यातून मधुर आवाज निघावयाचा कसा? माझा आवाज बद्द आहे. मी घन वस्तु आहे. माझ्यात अहंकार भरलेला आहे. मला निरहंकार झालें पाहिजे. मी पूर्ण मोकळा, पोकळ जेव्हा होईन तेव्हा परमेश्वर मला वाजवील. परंतु परमेश्वराच्या ओठांतील मुरली होणें धाडसाचें आहे. त्याच्या पायांतील वहाण बनू म्हटलें तरीहि तें सोपें नाही. परमेश्वराच्या पायाला जखम होऊ नये अशी ती मृदु वहाण असावी. परमेश्वराचे पाय व कांटे यांच्यामध्ये मला पडावयाचें आहे. मला स्वत:ला कमवून घेतलें पाहिजे. माझी चामडी सोलून तें कांतडें सारखें कमावलें पाहिजे, मऊ केले पाहिजे. तेव्हा परमेश्वराच्या पायांतील जोडा व्हावयाचें हेंहि सोपें नाही. परमेश्वराच्या हातातील हत्यार व्हावयाचें तर मी दहा शेर वजनाचा लोखंडी गोळा बनून चालणार नाही. तपश्चर्येच्या सहाणेवर मी स्वत:ला धार लावून घेतली पाहिजे. ईश्वराच्या हातात माझ्या जीवनाची तलवार झळकली पाहिजे. असा हा आवाज माझ्या बुद्धीवर उठत राहतो. देवाच्या हातातील हत्यार व्हावयाचें, या विचारातच फार लक्ष लागून जातें.

**16** हें कसें करावयाचें, कसें व्हावयाचें, तें शेवटच्या श्लोकात भगवंतांनी स्वत:च सांगितलें आहे. शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात या श्लोकाला 'सर्वार्थ-सार' – सर्व गीतेचें सार, असें म्हटलें आहे. तो कोणता श्लोक?

> **'मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्त: सङ्गवर्जित:।**
> **निर्वैर: सर्वभूतेषु य: स मामेति पाण्डव।।'**
>
> *('माझ्या कर्मांत जो मग्न भक्तीनें भरला असे*
> *जगीं नि:संग निर्वैर मिळे तो मज मत्पर।।' )*

ज्याचें जगात कोणाशी वैर नाही, जो तटस्थ राहून जगाची निरपेक्ष सेवा करीत आहे, जें जें करील तें तें मला जो देत आहे, माझ्या भक्तीने भरला आहे, क्षमावान्, नि:संग, विरक्त, प्रेमळ, असा जो भक्त तो परमेश्वराच्या हातातील हत्यार बनतो. असें हें सार आहे.

*रविवार, 1-5-'32*

# अध्याय 12

# सगुण-निर्गुण भक्ति

### 59. अध्याय सहा ते अकरा – एकाग्रतेपासून समग्रता

**1** गंगेचा ओघ सर्वत्र पावन व पवित्र. परंतु हरिद्वार, काशी, प्रयाग, अशीं स्थानें अधिक पवित्र आहेत. त्यांनी सर्व संसार पावन केला आहे. भगवद्गीतेची तशीच स्थिति आहे. भगवद्गीता आरंभापासून अंतापर्यंत सर्वच पवित्र आहे. परंतु मध्यंतरी काही अध्याय तीर्थक्षेत्रें झालीं आहेत. ज्या अध्यायाबद्दल आज बोलावयाचें आहे तो अध्याय मोठा पावन तीर्थ झालेला आहे. प्रत्यक्ष भगवानच या अध्यायाला अमृतधार असें म्हणत आहेत. **'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।'** हा लहानसा वीस श्लोकांचा अध्याय; परंतु अमृताची धार आहे. अमृताप्रमाणे मधुर आहे, संजीवन आहे. या अध्यायात भगवंतांच्या मुखातून भक्तिरसाच्या महिम्याचें तत्त्व गाईलें गेलें आहे.

**2** वास्तविक सहाव्या अध्यायापासून भक्तीच्या तत्त्वाला प्रारंभ झाला आहे. पांचव्या अध्यायाच्या समाप्तीपर्यंत जीवनाचें शास्त्र पाहिलें. स्वधर्माचरणाचें कर्म, त्याला साहाय्यक असें मानसिक साधनारूप विकर्म, या दोहोंच्या साधनेने संपूर्ण कर्म भस्म करणारी अंतिम अकर्माची भूमिका, या गोष्टींचा पहिल्या पांच अध्यायांपर्यंत विचार झाला. येथे जीवनाचें शास्त्र संपून गेलें. पुढे सहाव्या अध्यायापासून एका अर्थाने भक्ति-तत्त्वाचाच विचार अकराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत झाला. एकाग्रतेपासून सुरुवात झाली. सहाव्या अध्यायात चित्ताची एकाग्रता कशी होईल, त्याचीं साधनें कोणतीं, चित्ताच्या एकाग्रतेची आवश्यकता कशी आहे, हें सांगितलें आहे. अकराव्या अध्यायात समग्रता सांगितली. एकाग्रतेपासून समग्रतेपर्यंत एवढी मोठी मजल आपण कसकशी गांठली तें पाहिलें पाहिजे.

चित्ताच्या एकाग्रतेपासून सुरुवात झाली. ही एकाग्रता झाल्यावर कोणत्याहि विषयाचा विचार मनुष्य करू शकेल. चित्ताच्या एकाग्रतेचा उपयोग – माझ्या आवडीचा विषय घेतला तर – गणिताच्या अभ्यासास होऊ शकेल. अवश्य फललाभ होईल. परंतु चित्ताच्या एकाग्रतेचें हें सर्वोत्तम साध्य नव्हे. गणिताच्या अभ्यासाने एकाग्रतेची पूर्ण कसोटी होत नाही. गणितात किंवा अशाच एखाद्या ज्ञान-प्रांतात चित्ताच्या एकाग्रतेने यश मिळेल. परंतु ही खरी परीक्षा नव्हे. म्हणून सातव्या अध्यायात ही नजर देवाच्या चरणांकडे पाहिजे असें सांगितलें. आठव्या अध्यायात ईश्वरचरणीं एकाग्रता सारखीं रहावी; वाणी, कान, डोळे, सतत त्याच्या ठिकाणीं रहावें, म्हणून आमरण प्रयत्न करावे असें सांगितलें. आपल्या सर्व इंद्रियांना हा अभ्यास झाला पाहिजे. **'पडिलें वळण इंद्रियां सकळां। भाव तो निराळा नाहीं दुजा।।'** असें झालें पाहिजे. सर्व इंद्रियांना भगवंताचें वेड लागलें पाहिजे. जवळ कोणी विलाप करीत असो वा भजन करीत असो, कोणी वासनांचीं जाळीं विणीत असो किंवा विरक्त अशा सज्जनांचा, संतांचा समागम असो, सूर्य असो वा अंधार असो, मरणकाळीं परमेश्वर चित्तासमोर उभा राहील अशा तऱ्हेने जन्मभर सर्व इंद्रियांस वळण लावून घेणें ही सातत्याची शिकवण आठव्या अध्यायात दिलेली आहे. सहाव्या अध्यायात एकाग्रता, सातव्यात ईश्वराभिमुख एकाग्रता, म्हणजेच 'प्रपत्ति', आठव्यात सातत्ययोग, नवव्यात समर्पणता शिकविली आहे. दहाव्या अध्यायात क्रमिकता सांगितली आहे. पायरीपायरीने ईश्वराचें रूप कसें पचनीं पाडावें, मुंगीपासून तो ब्रह्मदेवापर्यंत भरून राहिलेला परमात्मा हळूहळू कसा जिरवावा हें सांगितलें. अकराव्या अध्यायात समग्रता सांगितली. विश्वरूप-दर्शनालाच मी समग्रतायोग म्हणतो. विश्वरूप-दर्शन म्हणजे एखाद्या लहानशा धुळीच्या कणातहि सबंध विश्व भरलेलें आहे याचा अनुभव घेणें. हेंच विराट् दर्शन होय. अशी ही सहाव्या अध्यायापासून अकराव्या अध्यायापर्यंत भक्तिरसाची निरनिराळ्या रीतीने केलेली छाननी आहे.

### 60. सगुण-उपासक आणि निर्गुण-उपासक

**3** बाराव्या अध्यायात भक्तितत्त्वाची समाप्ति करावयाची आहे. समाप्तीचा प्रश्न अर्जुनाने विचारला. पांचव्या अध्यायातील जीवनाच्या सर्व शास्त्राचा विचार संपतांना अर्जुनाने जसा प्रश्न विचारला होता तसाच प्रश्न त्याने येथेहि

विचारला आहे. अर्जुन प्रश्न विचारतो की, 'काही सगुणाचें भजन करतात तसें काही निर्गुणाची उपासना करतात; तेव्हा ह्या दोहोंतून कोणता भक्त, देवा, तुला प्रिय आहे?'

**4** भगवान् काय उत्तर देणार? जशी एखादी आई असावी व तिला तिच्या दोन मुलांच्या बाबतीत प्रश्न विचारावा, तसेंच हें आहे. आईचा एक लहान मुलगा असावा. त्याला आईचा फार लळा असावा. आईला पाहताच त्याला आनंद व्हावा व ती जरा डोळ्यांआड होताच त्याने कावरेंबावरें व्हावें. आईपासून तो दूर जाऊच शकत नाही. तिला सोडू शकत नाही. तिचा वियोग त्याला सहन होत नाही. आई नसेल तर सर्व संसार त्याला शून्यवत् आहे. असा हा लहान बच्चा आहे. दुसरा मोठा मुलगा आहे. तोहि परम प्रेमाने भरलेला आहे. पण समंजस झाला आहे. आईपासून तो दूर राहू शकतो. तिचें दर्शन वर्ष सहा महिन्यांत नाही झालें तरी त्याला चालतें. तो आईची सेवा करणारा आहे. सर्व ओझें शिरावर घेऊन काम करीत आहे. उद्योगात गुंतल्यामुळे आईचा वियोग तो सहन करू शकतो. लोकांमध्ये तो मान्य झालेला आहे व त्याचें नांव सर्वत्र झालेलें ऐकून आईला सौख्य होत आहे. असा हा दुसरा मुलगा आहे. अशा ह्या दोन मुलांच्या आईला तुम्ही प्रश्न विचारा. ती काय उत्तर देईल? तिला तुम्ही म्हणा, ''हे माते, ह्या दोन मुलांतील एकच मुलगा तुला देणार आहोत, पसंत कर.'' माता काय उत्तर देईल? कोणता मुलगा ती पत्करील? तराजूत दोन्ही मुलें घालून ती का तुलना करीत बसेल? आईची भूमिका तुम्ही लक्षात घ्या. ती स्वाभाविक काय उत्तर देणार? ''वियोगच घडावयाचा असेल तर मोठ्या मुलाचा मी सहन करीन'' असें ती बिचारी आई म्हणेल. लहानाला तिने छातीशी धरलें आहे. त्याला ती दूर करू शकणार नाही. लहानाचा विशेष ओढा ती लक्षात घेईल व मोठा दूर गेला तरी चालेल, असें काहीतरी ती उत्तर देईल. परंतु तिला अधिक प्रिय कोण, ह्या प्रश्नाचें तें उत्तर समजता येणार नाही. काहीतरी भाषा बोलायची म्हणून ती चार शब्द बोलेल. परंतु त्या शब्दांतून फोडून फोडून अर्थ काढला तर तें योग्य होणार नाही.

**5** त्या मातेची जशी त्या प्रश्नाला उत्तर देतांना धांदल उडेल, हुबेहूब तशीच धांदल भगवंतांच्या मनाची झालेली आहे. अर्जुन म्हणतो, ''देवा, एक तुझ्याविषयी अत्यंत प्रेम बाळगणारा, तुझें सतत स्मरण करणारा, असा आहे. त्याच्या डोळ्यांना तुझी भूक, कानांनी तुला पिण्याची तृष्णा, हातापायांना तुझी सेवा, तुझी पूजा, असा हा तुझा भक्त आहे. दुसरा स्वावलंबी, सतत इंद्रियनिग्रह करणारा, सर्वभूतहितात मग्न, रात्रंदिवस समाजाची निष्काम सेवा करतांना तुझें परमेश्वराचें जणू स्मरणहि त्याला होत नाही, असा हा अद्वैतमय झालेला तुझा दुसरा भक्त. या दोहोंत तुला कोण प्रिय हें मला सांग.'' अर्जुनाचा भगवंतास हा प्रश्न. त्या आईने जसें उत्तर दिलें, हुबेहूब तसेंच उत्तर भगवंतांनी दिलें आहे – तो सगुण भक्त मला प्रिय आहे; तो दुसराहि माझाच आहे. देवाची धांदल उडाली आहे. उत्तर द्यावयाचें म्हणून दिलें आहे.

**6** आणि खरोखर वस्तुस्थिति अशीच आहे. अक्षरशः दोघेहि भक्त एकरूप आहेत. दोघांची योग्यता सारखीच. त्यांची तुलना करणें म्हणजे मर्यादेचें अतिक्रमण करणें होय. पांचव्या अध्यायात कर्माच्या बाबतीत अर्जुनाचा जो प्रश्न तोच येथे भक्तीच्या बाबतीत विचारलेला आहे. पांचव्या अध्यायात कर्म व विकर्म यांच्या साहाय्याने अकर्माच्या भूमिकेवर मनुष्य येतो. ही अकर्मदशा दोन रूपांनी प्रकट होते. एक रात्रंदिवस काम करीत असूनहि लेशमात्र कर्म करीत नाही असा, व दुसरा चोवीस तासांत एकहि कर्म न करता सर्व विश्वाची उलाढाल करणारा, अशा रूपांनी अकर्मदशा प्रकट होते. यांची तुलना कशी करावयाची? वर्तुळाच्या एका बाजूशी दुसऱ्या बाजूची तुलना करा. एकाच वर्तुळाच्या दोन बाजू. यांची तुलना कशी करावयाची? दोन्ही बाजू समान योग्यतेच्या आहेत, एकरूप आहेत. अकर्म-भूमिकेच्या विवेचनात भगवंतांनी एकाला संन्यास व दुसऱ्याला योग असें म्हटलें आहे. शब्द दोन असले तरी अर्थ एकच. संन्यास व योग यांत शेवटीं सोपेपणाच्या मुद्द्यावरच प्रश्न सोडवला आहे.

**7** सगुण-निर्गुणाचा प्रश्नहि तसाच आहे. एक सगुण-भक्त इंद्रियांच्या द्वारा परमेश्वराची सेवा करतो. दुसरा निर्गुण-भक्त मनाने विश्वाचें हित चिंतितो. पहिला जो आहे तो बाह्य सेवेत मग्न दिसत आहे; पण आंतून त्याचें सारखें चिंतन चाललेलेंच आहे. दुसरा जो आहे तो प्रत्यक्ष काही सेवा करतांना दिसत नाही; परंतु आंतून महासेवा त्याची चाललीच आहे. अशा प्रकारच्या दोन भक्तांत श्रेष्ठ कोण? रात्रंदिवस कर्म करूनहि लेशमात्र कर्म न करणारा तो सगुण-भक्त आहे. निर्गुण-उपासक आंतून सर्वांच्या हिताचें चिंतन, काळजी करीत आहे. हे दोघे भक्त आंतून एकरूपच आहेत.

कदाचित् बाहेरून निराळे दिसत असतील. ते दोघे सारखे आहेत. परमेश्वराचे लाडके आहेत. पण सगुण-भक्ति जास्त सुलभ आहे. जें उत्तर पांचव्या अध्यायात दिलें तेंच येथेहि दिलें.

## 61. सगुण हें सुलभ आणि सुरक्षित

**8** सगुण-भक्तियोगात प्रत्यक्ष इंद्रियांना राबवता येतें. इंद्रियें साधनें आहेत, विघ्नें आहेत, किंवा उभयरूप आहेत; तीं मारणारीं आहेत वा तारणारीं आहेत, हें पाहणाऱ्याच्या दृष्टीवर अवलंबून आहे. समजा एखाद्याची आई मरणशय्येवर पडली आहे व त्याला आईला भेटावयाचें आहे. मध्यंतरीं पंधरा मैलांचा रस्ता आहे. ही वाट मोटार चालेल अशी नाही. आपली मोडकीतोडकी पाऊलवाट आहे. अशा वेळीं ही वाट साधन आहे का विघ्न आहे? कोणी म्हणेल, ‘‘कशाला हा अभद्र रस्ता मध्यंतरीं आला? हें अंतर नसतें तर आईला ताबडतोब भेटलो असतो.’’ अशा माणसाला तो रस्ता दुष्मन आहे. रस्ता तुडवीत तुडवीत तो जातो. त्याला रस्त्याचा राग आला आहे. काही झालें तरी आईला भेटण्यासाठी झरझर पावलें टाकीत त्याला गेलेंच पाहिजे. रस्ता दुष्मन म्हणून तो जर तेथेच खाली बसेल तर दुष्मन वाटणारा रस्ता त्याला जिंकून घेईल. तो झरझर चालेल तरच त्या दुष्मनाला तो जिंकील. दुसरा मनुष्य म्हणेल, ‘‘हें जंगल आहे; परंतु एवढी तरी चालत जाण्यास वाट आहे. हा रस्ता आहे म्हणून बरे. हा मला आईकडे घेऊन जाईल. हा रस्ता नसता तर या पहाडातून मी कसा गेलो असतो?’’ असें म्हणून ती पाऊलवाट साधन मानून तो झरझर पावलें टाकीत जात आहे. रस्त्याबद्दल तो मनात प्रेम बाळगील. त्याला मित्र मानील. रस्त्याला दुष्मन माना किंवा दोस्त माना, अंतर पाडणारा म्हणा किंवा अंतर तोडणारा म्हणा, पावलें झरझर टाकण्याचें काम केलेंच पाहिजे. रस्ता विघ्नरूप किंवा साधनरूप हें मनुष्याच्या चित्ताची जी भूमिका, जी दृष्टि, तिजवर अवलंबून आहे. इंद्रियांचें असेंच आहे. तीं विघ्नरूप कीं साधनरूप हें तुमच्या दृष्टीवर अवलंबून आहे.

**9** सगुण उपासकाला इंद्रियें हीं साधनरूप आहेत. इंद्रियें हीं फुलें आहेत. तीं फुलें परमात्म्याला वहावयाचीं आहेत. डोळ्यांनी हरिरूप पहावें, कानांनी हरिकथा ऐकावी, जिभेने नाम उच्चारावें, पायांनी तीर्थयात्रा कराव्या, हातांनी सेवा करावी. अशा तऱ्हेने तो सर्व इंद्रियें परमेश्वराला वाहतो. तीं इंद्रियें भोगासाठी राहत नाहीत. फुलें देवाला वहावयाचीं असतात. फुलांच्या माळा स्वत:च्या गळ्यांत घालावयाच्या नसतात. त्याचप्रमाणे इंद्रियांचा उपयोग ईश्वराच्या सेवेत करावयाचा. ही झाली सगुणोपासकाची दृष्टि. परंतु निर्गुणोपासकाला इंद्रियें विघ्नरूप वाटतात. तो त्यांना संयमात ठेवतो, कोंडतो. इंद्रियांचा आहार तोडतो. इंद्रियांवर पहारा ठेवतो. सगुणोपासकाला असें करावें लागत नाही. तो सर्व इंद्रियें हरिचरणीं अर्पण करतो. दोन्हीहि तऱ्हा इंद्रियनिग्रहाच्याच आहेत. इंद्रियदमनाचेच हे दोन प्रकार आहेत. काहीहि माना, परंतु इंद्रियांना ताब्यात ठेवा. ध्येय एकच. त्यांना विषयांत भटकू द्यावयाचें नाही. एक तऱ्हा सुलभ तर दुसरी कठिण आहे.

**10** निर्गुण-उपासक हा सर्वभूतहितरत आहे ही गोष्ट सामान्य नाही. सर्व विश्वाचें कल्याण करणें ही गोष्ट बोलावयाला सोपी दिसली तरी करावयाला फार कठिण आहे. ज्याला समग्र विश्वाच्या कल्याणाची चिंता आहे त्याला ह्या चिंतनाशिवाय दुसरें काहीहि करता येणार नाही. म्हणून निर्गुण-उपासना कठिण आहे. सगुण-उपासना नाना प्रकारें आपापल्या शक्तीप्रमाणे करता येईल. जेथे आपला जन्म झाला त्या लहानशा खेड्याची सेवा करणें किंवा आईबापांची सेवा करणें, ही सगुण पूजा आहे. ती तुमची सेवा जगाच्या हिताशी विरोधी नसावी म्हणजे झालें. तुम्ही कितीहि लहान प्रमाणात सेवा करा, ती जर इतरांच्या हिताच्या आड येत नसेल तर भक्तीच्या दर्जाला खात्रीने पोहोचेल. नाही तर ती सेवा आसक्ति होईल. आई, बाप, आपले मित्र, आपले दु:खी बंधु, संत, यांनाच परमेश्वर मानून सेवा करावयाची. तेथे तेथे परमेश्वराची मूर्ति कल्पावयाची, आणि संतोष मानावयाचा. ही सगुण-पूजा सुलभ आहे. निर्गुण-पूजा कठिण आहे. बाकी दोहोंचा अर्थ एकच. सौलभ्याच्या दृष्टीने सगुण हें श्रेयस्कर आहे इतकेंच.

**11** सुलभतेचा एक मुद्दा झाला. तसाच दुसराहि मुद्दा आहे. निर्गुणात भय आहे. निर्गुण हें ज्ञानमय आहे. सगुण हें प्रेममय, भावनामय आहे. सगुणामध्ये ओलावा आहे. येथे भक्त जास्त सुरक्षित आहे. निर्गुणात जरा धोका आहे. एक काळ असा होता की ज्ञानावर माझी फार भिस्त होती. परंतु केवळ ज्ञानाने माझें कार्य होत नाही असा मला अनुभव

आलेला आहे. ज्ञानाने मनाचे स्थूल मळ जळून खाक होतात. सूक्ष्म मळ धुऊन टाकण्याचें सामर्थ्य त्यात नाही. स्वावलंबन, विचार, विवेक, अभ्यास, वैराग्य, हीं सर्व साधनें जरी घेतलीं तरीहि त्यांनी मनाचे सूक्ष्म मळ पुसून टाकता येत नाहीत. भक्तीच्या पाण्याशिवाय हे मळ धुतले जात नाहीत. भक्तीच्या पाण्यात ही शक्ति आहे. याला तुम्ही परावलंबन म्हणा. परंतु 'पर' म्हणजे 'दुसरा' असा अर्थ न घेता 'तो श्रेष्ठ परमात्मा', त्याचें अवलंबन असा त्याचा अर्थ घ्या. परमात्म्याचा आधार घेतल्याशिवाय चित्ताचे मळ नाहीसे होत नाहीत.

**12** कोणी म्हणेल, ''ज्ञान ह्या शब्दाचा अर्थ येथे कमी केला आहे. ज्ञानाने जर चित्ताचे मळ धुतले जात नाहीत तर ज्ञान कमदर्जाचें ठरतें.'' हा आक्षेप मी मान्य करतो. परंतु माझें असें म्हणणें आहे की शुद्ध ज्ञान ह्या मातीच्या पुतळ्यात होणें कठिण आहे. या देहात राहून उत्पन्न झालेलें ज्ञान कितीहि शुद्धरूप असलें तरी तें थोडेसें कमअस्सलच राहणार. या देहात उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाची शक्ति मर्यादित असते. शुद्ध ज्ञान जर निर्माण झालें तर सर्व खळमळाची तें राखरांगोळी करील यात मला बिलकुल शंका नाही. चित्तासकट सारे मळ जाळून टाकण्याचें सामर्थ्य ज्ञानात आहे. परंतु ह्या विकारी देहात ज्ञानाचें बळ तोकडें पडतें. म्हणून त्याने सूक्ष्म मळ धुतले जात नाहीत. भक्तीचा आश्रय केल्याशिवाय सूक्ष्म मळ पुसून टाकता येत नाहीत. म्हणून भक्तीमध्ये मनुष्य अधिक सुरक्षित आहे. 'अधिक' हा शब्द माझ्या पदरचा म्हणून समजा. सगुण-भक्ति सुलभ आहे. येथे परमेश्वरावलंबन आहे. निर्गुणात स्वावलंबन आहे. ह्यातील 'स्व'चा तरी काय अर्थ आहे? स्वावलंबन म्हणजे स्वत:च्या अंत:करणातील परमात्म्याचा आधार हाच येथेहि अर्थ आहे. केवळ बुद्धीच्या आधाराने शुद्ध झालेला असा कोणी मिळणार नाही. स्वावलंबनाने, म्हणजे अंत:करणातील आत्मज्ञानाने, शुद्ध ज्ञान मिळेल. सारांश, निर्गुण-भक्तीच्या स्वावलंबनातहि आत्मा हाच आधार आहे.

## 62. निर्गुणाच्या अभावीं सगुणहि सदोष

**13** सगुण-उपासनेच्या बाजूने सुलभता व सुरक्षितता हीं वजनें मी टाकलीं, तशीं निर्गुणाच्या बाजूनेहि मला टाकता येतील. निर्गुणामध्ये मर्यादा राहते. उदाहरणार्थ, आपण निरनिराळीं कार्यें करण्यासाठी, सेवेसाठी संस्था स्थापन करतो. संस्था स्थापन होते ती प्रथम व्यक्तीमुळे होते. ती व्यक्ति मुख्य आधार असते. संस्था प्रथम व्यक्तिनिष्ठ असते. परंतु जसजसा संस्थेचा विकास होत जाईल तसतशी ती संस्था व्यक्तिनिष्ठ न राहता तत्त्वनिष्ठ झाली पाहिजे. जर अशी तत्त्वनिष्ठा उत्पन्न झाली नाही, तर ती स्फूर्ति देणारी व्यक्ति लोपताच त्या संस्थेत अंधार पडतो. माझा आवडता दृष्टांत द्यावयाचा झाला तर चरख्याची माळ तुटताच सूत कातणें तर राहोच, परंतु कातलेलें सूत गुंडाळीन म्हणेन तर तेंहि शक्य होत नाही. त्याप्रमाणेच त्या व्यक्तीचा आधार तुटताच संस्थेची दशा होते. ती संस्था पोरकी होते. व्यक्तिनिष्ठेतून तत्त्वनिष्ठा उत्पन्न झाली तर असें होणार नाही.

**14** सगुणाला निर्गुणाची मदत पाहिजे. केव्हा तरी व्यक्तीतून, आकारातून बाहेर जावयास शिकलें पाहिजे. गंगा हिमालयातून, शंकराच्या जटाजूटातून निघाली; परंतु तेथेच राहिली नाही. तो जटाजूट सोडून ती हिमालयाचीं दरींखोरीं, वनें जंगलें सोडून सपाट मैदानावर खळखळ वाहत आली तेव्हा विश्वजनांच्या उपयोगात ती येऊ शकली. त्याप्रमाणे व्यक्तीचा आधार सुटला तरी तत्त्वाच्या खंबीर आधारावर संस्था उभी राहण्यास तयार असली पाहिजे. कमान बांधीत असतांना तिला आधार देतात; परंतु आधार काढून घ्यावयाचा असतो. आधार काढून घेतल्यावर ती कमान टिकली तरच तो आधार खरा होता असें समजावयाचें. प्रथम स्फूर्तीचा झरा सगुणातून निर्माण झाला हें खरें, परंतु शेवटीं परिपूर्णता तत्त्वनिष्ठेत, निर्गुणात झाली पाहिजे. भक्तीच्या पोटातून ज्ञान निर्माण झालें पाहिजे. भक्तीच्या वेलीला ज्ञानाचीं फुलें लागलीं पाहिजेत.

**15** बुद्धदेवांनी ही गोष्ट ओळखली होती. म्हणून त्यांनी तीन प्रकारच्या निष्ठा सांगितल्या आहेत. प्रथम व्यक्तिनिष्ठा असली तरी तीतून तत्त्वनिष्ठा, एकदम तत्त्वनिष्ठा जरी नाही तरी निदान संघनिष्ठा, उत्पन्न झाली पाहिजे. एका व्यक्तीबद्दल जो आदर होता तो दहा-पंधरा व्यक्तींबद्दल वाटू लागावा. संघाबद्दल जर सामुदायिक प्रेम नसेल तर बेबनाव होतील, भांडणें होतील. व्यक्ति-शरणता सुटून संघशरणता निर्माण झाली पाहिजे. आणि पुढे सिद्धांत-शरणता आली पाहिजे. म्हणून बौद्धांत **'बुद्धं शरणं गच्छामि। संघं शरणं गच्छामि। धर्मं शरणं गच्छामि।'** अशा तीन प्रकारच्या शरणागति

सांगितल्या आहेत. प्रथम व्यक्तीबद्दल प्रीति, नंतर संघाबद्दल प्रीति. परंतु या दोन्ही निष्ठाहि डळमळीतच आहेत. शेवटीं सिद्धांतनिष्ठा उत्पन्न झाली पाहिजे. तरच संस्था लाभदायी होईल. स्फूर्तीचा झरा जरी सगुणातून निर्माण झाला तरी तो निर्गुणाच्या सागरास जाऊन मिळाला पाहिजे. निर्गुणाच्या अभावीं सगुण सदोष होतें. निर्गुणाची मर्यादा सगुणाला समतोल ठेवते याबद्दल सगुण निर्गुणाचें आभारी आहे.

**16** हिंदु, ख्रिश्चन, इस्लाम इत्यादि सर्वच धर्मांत कोणत्या ना कोणत्या प्रकारची मूर्तिपूजा आहे. मूर्तिपूजा जरी खालच्या पायरीची मानली गेली तरी ती मान्य आहे, थोर आहे. जोंपर्यंत मूर्तिपूजेला निर्गुणाची मर्यादा असते तोंपर्यंत ती निर्दोष राहते. परंतु ही मर्यादा सुटताच सगुण सदोष होतें. सर्व धर्मांतील सगुण, निर्गुणाच्या मर्यादेच्या अभावीं, अवनत दशेला येऊन पोहोचलें आहे. पूर्वी यज्ञयागात पशुहत्या होत. आजहि शक्तिदेवीला बळी देतात. मूर्तिपूजेचा हा अत्याचार झाला. मर्यादा सोडून मूर्तिपूजा भलतीकडे गेली. निर्गुण-निष्ठेची मर्यादा असल्यास ही धास्ती राहत नाही.

## 63. दोन्ही परस्पर पूरक : रामचरित्रातील दृष्टांत

**17** सगुण सुलभ व सुरक्षित आहे. परंतु सगुणाला निर्गुणाची आवश्यकता आहे. सगुण वाढीला लागून त्याला निर्गुणाचा, तत्त्वनिष्ठेचा फुलोरा आला पाहिजे. निर्गुण-सगुण ही परस्परपूरक आहेत, परस्परविरुद्ध नाहीत. सगुणातून निर्गुणापर्यंत मजल गांठली पाहिजे व निर्गुणालाहि चित्ताचा सूक्ष्म मळ धुण्यासाठी सगुणाचा ओलावा पाहिजे. एकमेकांस एकमेकांमुळे शोभा आहे.

**18** ह्या दोन्ही प्रकारच्या भक्ति रामायणात फार सुंदर तऱ्हेने दाखविल्या गेल्या आहेत. अयोध्याकांडात हे दोन्ही भक्तीचे प्रकार दिसतात. आणि ह्याच दोन भक्तींचा रामायणात विस्तार आहे. भरताच्या भक्तीचा पहिला प्रकार व लक्ष्मणाच्या भक्तीचा दुसरा प्रकार. सगुण भक्ति आणि निर्गुण भक्ति ह्यांचें स्वरूप ह्या उदाहरणांवरून दिसून येईल.

**19** राम वनात जावयास निघाले त्या वेळीं लक्ष्मणास ते बरोबर नेण्यास तयार नव्हते. लक्ष्मणास बरोबर नेण्याचें काही कारण नाही असें रामास वाटलें. ते लक्ष्मणास म्हणाले, ''लक्ष्मणा, मी वनात जातो. मला पित्याची आज्ञा झाली आहे. तू घरींच रहा. माझ्याबरोबर येऊन दु:खी माता-पितरांस आणखी दु:खी करू नकोस. आईबापांची व प्रजेची सेवा कर. तू त्यांच्याजवळ असलास म्हणजे मला चिंता वाटणार नाही. माझा प्रतिनिधि म्हणून तू रहा. मी वनात म्हणजे संकटात जात नाही. मी ऋषींच्या आश्रमात जात आहे.'' अशा प्रकारें रामचंद्र लक्ष्मणास समजावून सांगत होते. परंतु लक्ष्मणाने रामाचें सर्व सांगणें एका तडाख्यासरशी एका शब्दाने पुसून टाकलें. एक घाव, दोन तुकडे केले. तुलसीदासांनी मोठें सुंदर रंगविलें आहे तें चित्र. लक्ष्मण म्हणाला, ''तुम्ही मला उत्कृष्ट निगमनीति सांगत आहात. ही नीति वास्तविक मी पाळावी; परंतु मला हें राजनीतीचें ओझें सहन होणार नाही. तुमचा प्रतिनिधि होण्याचें बळ माझ्यात नाही. मी तर मूल आहे.

**'दीन्ही मोहि सिख नीकि गुसांई। लागि अगम अपनी कदराई।**
**नरवर धीर धरमधुरधारी। निगम-नीतिके ते अधिकारी।**
**मैं शिशु प्रभुसनेह प्रतिपाला। मंदर-मेरु कि लेहिं मराला।।'**

– हंसपक्षी का मेरुमंदराचा भार उचलील? रामचंद्रा, मी तुमच्या प्रेमावर पोसलेला आहे. तुमची ती राजनीति दुसऱ्यास सांगा. मी बच्चा आहे.'' असें म्हणून लक्ष्मणाने तो सर्व विषय पटकन् तोडून टाकला.

**20** मासा ज्याप्रमाणे पाण्यापासून निराळा राहू शकत नाही, तसें लक्ष्मणाचें. रामापासून दूर राहण्याची त्याची शक्ति नव्हती. त्याच्या रोमरोमात सहानुभूति भरलेली होती. राम निजले असता आपण जागरण करावें, त्यांची सेवा करावी, यातच त्याचा आनंद होता. ज्याप्रमाणे आपल्या डोळ्यावर कोणी दगड फेकला तर हात पुढे होतो व तो घाव घेतो, त्याप्रमाणे रामाचा हात लक्ष्मण झाला होता. रामावर होणारा घाव प्रथम लक्ष्मणाने पुढे होऊन झेलावा. तुलसीदासांनी लक्ष्मणास एक सुंदर दृष्टांत दिला आहे. तो झेंडा वर फडकत असतो. सर्व गाणें त्या झेंड्याचें. त्याचा तो रंग, तो आकार, याचें वर्णन केलें जातें. परंतु त्या ताठ उभ्या असलेल्या काठीला कोण विचारतो? रामाच्या यशाची जी पताका फडकत राहिली तिला लक्ष्मण हा दंडाप्रमाणे आधार होता. ताठच्या ताठ उभा होता. दंड वांकणार नाही,

त्याप्रमाणे रामाचें यश फडकण्यासाठी लक्ष्मण कधीच वांकला नाही. यश कोणाचें? तर रामाचें! जगाला पताका दिसते. दंडाचें विस्मरण असतें. कळस दिसतो, पाया दिसत नाही. रामाचें यश फडकून राहिलें आहे. लक्ष्मणाचा पत्ताच नाही. चौदा वर्षेंपर्यंत हा दंड वांकला नाही. स्वत: मागे राहून रामाचें यश तो फडकवीत राहिला. रामाने अत्यंत कठिण कठिण कामें लक्ष्मणाकडून करवून घ्यावीत. सीतेला वनात सोडण्याचें काम शेवटीं लक्ष्मणावरच सोंपविलें. बिचारा लक्ष्मण सीतेला पोहोचवून आला. लक्ष्मणाला स्वत:चें अस्तित्वच राहिलें नाही. रामाचे डोळे, रामाचे हात, रामाचें मन तो झाला होता. नदी समुद्रात मिळून जावी त्याप्रमाणे लक्ष्मणाची सेवा रामात मिळून गेली होती. तो रामाची छाया बनला होता. लक्ष्मणाची सगुण-भक्ति होती.

**21** भरत हा निर्गुण-भक्ति करणारा होता. त्यालाहि तुलसीदासजींनी चांगलें रंगविलें आहे. राम वनात गेले तेव्हा भरत अयोध्येत नव्हता. भरत आला तों दशरथ मरून गेला होता. वसिष्ठगुरु 'राज्य कर' असें त्याला सांगत होते. भरत म्हणाला, ''मला रामाला भेटलें पाहिजे.'' रामाला भेटण्याची त्याला आंतून तळमळ लागून राहिली होती, परंतु राज्याची व्यवस्था तो लावून राहिला होता. रामाचें हें राज्य आहे आणि त्याची व्यवस्था ठेवणें म्हणजे रामाचेंच काम आहे, अशी त्याची भावना होती. सारी संपत्ति स्वामींची होती, तिची व्यवस्था लावणें हें त्याला कर्तव्य वाटलें. लक्ष्मणाप्रमाणे भरतास मोकळें होता येत नव्हतें. अशी ही भरताची भूमिका होती. रामाची भक्ति, म्हणजे रामाचें कार्य केलें पाहिजे; नाही तर ती भक्ति काय कामाची? सर्व व्यवस्था नीट लावून भरत वनात रामाच्या भेटीस आला आहे. ''रामा, तुमचें हें राज्य आहे. तुम्ही ...'' असें तो सांगत आहे तोच राम त्याला म्हणाले, ''भरता, तूच राज्य चालव.'' भरत संकोचाने उभा राहतो व म्हणतो, ''तुमची आज्ञा मला प्रमाण आहे.'' राम सांगेल तें प्रमाण. त्याने सर्व रामावर सोंपविलें होतें.

**22** तो गेला व राज्य करू लागला. परंतु त्यातील मौज पहा. अयोध्येपासून दोन मैलांवर तो तपस्या करीत राहिला. तपस्वी राहून त्याने राज्य चालविलें. शेवटीं राम जेव्हा भरताला भेटले तेव्हा वनात गेलेला खरा तपस्वी कोण हें ओळखता आलें नसतें. असें जर चित्र एखाद्याने काढलें की दोघांचे तोंडवळे सारखे, थोडा वयाचा फरक, तोंडावर तपस्या तीच, ओळखताहि येत नाही की राम कोणता व भरत कोणता; तर मोठें पावन चित्र होईल तें! अशा रीतीने भरत देहाने रामापासून दूर होता, परंतु मनाने रामापासून तो क्षणभरहि दूर नव्हता. जरी एका बाजूला तो राज्य चालवून राहिला होता तरी तो मनाने रामाजवळ होता. निर्गुणात सगुण भक्ति खच्चून भरलेली असते. तेथे वियोगाची भाषा बोलावी कशी? म्हणून भरताला वियोग वाटत नव्हता. देवाचें कार्य तो करून राहिला होता.

**23** ''रामाचें नाम, रामाची भक्ति, रामाची उपासना, हें काही आम्हांला समजत नाही. आम्ही देवाचें काम करू'' असें अलीकडचे तरुण म्हणतात. देवाचें काम कसें करावें हें भरत दाखवीत आहे. देवाचें काम करून भरताने वियोग जिरवून टाकला आहे. देवाचें काम करून देवाचा वियोग भासण्यासहि वेळ नसणें ही गोष्ट निराळी, व देवाची ज्याला ओळख ना देख त्याचें बोलणें निराळें. देवाचें कार्य करीत संयमपूर्ण जीवन जगणें ही फार दुर्लभ वस्तु आहे. भरताची ही वृत्ति जरी निर्गुण कार्य करीत राहण्याची होती, तरी सगुणाचा आधार तेथे तुटला नाही. ''रामा, तुमचा शब्द मला प्रमाण आहे. तुम्ही सांगाल त्याबद्दल मला शंका नाही'' असें म्हणून भरत जावयास निघाला तरी तो माघारा वळला व रामाला म्हणाला, ''रामा, समाधान नाही वाटत. काहीतरी हुरहुर वाटते.'' रामाने तें ओळखलें व म्हटलें, ''या पादुका ने.'' सगुणाबद्दलचा आदर शेवटीं राहिलाच. निर्गुणाला सगुणाने शेवटीं ओलें केलेंच. लक्ष्मण त्या पादुकांवर समाधान न मानता. त्याच्या दृष्टीने तें दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखें झालें असतें. भरताची भूमिका निराळी होती. तो बाहेरून दूर राहून कर्म करीत होता, परंतु मनाने राममय होता. भरत जरी कर्तव्य करण्यात रामभक्ति मानीत होता तरी पादुकांची त्याला गरज भासलीच. त्या पादुकांच्या अभावीं तो राज्यकारभार हाकू शकता ना. त्या पादुकांची आज्ञा म्हणून तो कर्तव्य करीत राहिला. लक्ष्मण हा रामाचा जसा भक्त तसाच भरतहि आहे. दोघांच्या भूमिका बाहेरून निराळ्या. भरत जरी कर्तव्यनिष्ठ होता, तत्त्वनिष्ठ होता, तरी त्याच्या तत्त्वनिष्ठेलाहि पादुकांच्या ओलाव्याची गरज भासली.

## 64. दोन्ही परस्पर पूरक : कृष्णचरित्रातील दृष्टांत

**24** हरिभक्तीचा ओलावा अवश्य पाहिजे. म्हणून अर्जुनालाहि **'मय्यासक्तमना: पार्थ'** – अर्जुना! माझ्या ठिकाणीं आसक्त रहा, माझा ओलावा ठेव व मग कर्म कर – असें भगवंतांनी पुन:पुन्हा सांगितलें आहे. ज्या भगवद्‌गीतेला आसक्ति हा शब्द सुचत नाही, रूचत नाही; ज्या भगवद्‌गीतेचें अनासक्त राहून कर्म कर, रागद्वेष सोडून कर्म कर, निरपेक्ष कर्म कर, असें पुन:पुन्हा सांगणें आहे; अनासक्ति, नि:संगता हें जिचें ध्रुपद व पालुपद सारखें चालू आहे, ती भगवद्‌गीताहि सांगते, ''अर्जुना, माझी आसक्ति ठेव.'' परंतु लक्षात ठेवलें पाहिजे की भगवंतांच्या ठिकाणची आसक्ति ही फार उंच वस्तु आहे. ती पार्थिव वस्तूबद्दलची आसक्ति थोडीच आहे? सगुण व निर्गुण एकमेकात गुंतून राहिलेलीं आहेत. सगुणाला निर्गुणाचा आधार सर्वस्वी तोडता येत नाही व निर्गुणाला सगुणाचा ओलावा हवा असतो. सदैव कर्तव्यकर्म करणारा हा कर्मरूपाने पूजाच करीत आहे. परंतु पूजेबरोबर ओलावा पाहिजे. **'मामनुस्मर युध्य च'** – माझें स्मरण ठेवून कर्म कर. कर्म ही स्वयं पूजाच आहे. परंतु अंतरंगीं भावना जिवंत पाहिजे. नुसतीं फुलें डोक्यावर ठेवलीं ही काही पूजा नव्हे. तेथे भावना पाहिजे. डोक्यावर फुलें ठेवणें हा पूजेचा एक प्रकार. सत्कर्मांनी पूजा करणें हा दुसरा प्रकार. परंतु उभय ठिकाणीं भावाचा ओलावा पाहिजे. फुलें वाहून भाव नसेल तर तीं दगडावर फुलें वाहिलीं. तेव्हा हा भावनेचा प्रश्न आहे. सगुण व निर्गुण, कर्म व प्रीति, ज्ञान व भक्ति, या सर्व वस्तु एकरूपच आहेत. दोहींचा अंतिम अनुभव एकच आहे.

**25** उद्धव आणि अर्जुन यांची गोष्ट पहा. रामायणामधून मी महाभारताकडे उडी मारून चाललो. अशी उडी मारावयाचा मला अधिकार आहे. कारण राम व कृष्ण एकरूपच आहेत. भरत व लक्ष्मण तसे अर्जुन व उद्धव आहेत. जेथे कृष्ण तेथे उद्धव असावयाचा. उद्धवाला कृष्णाचा वियोग क्षणभरहि सहन व्हावयाचा नाही. कृष्णाजवळ त्याने सतत सेवा करीत रहावें. कृष्णाशिवाय सारा संसार त्याला फिका वाटे. अर्जुनहि कृष्णाचा सखा होता; परंतु तो दूर दिल्लीला राहत असे. अर्जुन कृष्णाचें काम करणारा होता; परंतु कृष्ण द्वारकेत तर हा हस्तिनापूरला, असे दोघे होते.

**26** भगवंतांना जेव्हा देह सोडावयाची जरूरी वाटली, तेव्हा त्यांनी उद्धवाला सांगितलें, ''उद्धवा, मी जाणार आहे.'' उद्धव म्हणाला, ''मला बरोबर नाही का नेत? आपण एकत्रच जाऊ या!'' परंतु कृष्ण म्हणाले, ''हें मला पसंत नाही. सूर्य आपलें तेज अग्नीच्या ठिकाणीं ठेवून जातो, त्याप्रमाणे माझी ज्योत तुझ्या ठिकाणीं ठेवून मी जाणार आहे.'' अशी भगवंतांनी निरवानिरव केली आणि उद्धवाला ज्ञान देऊन रवाना केलें. पुढे उद्धवाला प्रवासात मैत्रेय ऋषींकडून कळलें की भगवान् निजधामास गेले. त्याच्या मनावर यत्किंचित्‌हि परिणाम झाला नाही, जसें काही घडलेंच नाही. **'मरका गुरु रडका चेला, दोहींचा बोध वायां गेला'** तसें हें नव्हतें. जणू वियोग झालाच नाही. तो जन्मभर सगुण-उपासना करीत होता. परमेश्वराच्या संनिध होता. त्याला आता निर्गुणात आनंद वाटू लागला. निर्गुणाची मजल त्याला गांठावी लागली. सगुण पुढे; परंतु निर्गुण त्याच्या मागून आलेंच पाहिजे. एरवी परिपूर्णता नाही.

**27** याच्या उलट अर्जुनाचें. कृष्णाने त्याला काय करावयास सांगितलें होतें? आपल्यामागे सर्व स्त्रियांच्या संरक्षणाचें काम त्याने अर्जुनावर सोंपविलें होतें. अर्जुन दिल्लीहून आला व द्वारकेहून श्रीकृष्णाच्या स्त्रिया घेऊन चालला. वाटेत हिसारच्याजवळ पंजाबमधील चोरांनी त्याला लुटलें. जो अर्जुन त्या काळात एकच एक नर, उत्कृष्ट वीर म्हणून प्रसिद्ध होता; ज्याला पराजय म्हणून माहीतच नाही म्हणून 'जय' या नांवाने जो ख्यात झाला; प्रत्यक्ष शंकराबरोबर ज्याने झुंज घेतली व त्यास नमविलें, असा तो अर्जुन अजमीराजवळ पळता पळता वांचला. कृष्ण निघून गेला याचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला. जणू त्याच्यातील जीवच निघून गेला व त्याचें निस्त्राण व निष्प्राण असें शरीरच राहिलें. सारांश, कर्म सदोदित करणारा, कृष्णापासून दूर राहणारा निर्गुण-उपासक अर्जुन, त्याला वियोग शेवटीं फार जाणवला. त्याच्या निर्गुणाला शेवटीं तोंड फुटलें. त्याचें कर्मच संपलें सारें. त्याच्या निर्गुणाला शेवटीं सगुणाचा अनुभव आला. सारांश, सगुणाला निर्गुणात जावें लागतें. निर्गुणाला सगुणात यावें लागतें. एकमेकांनी एकमेकांना परिपूर्णता येते.

## 65. सगुण-निर्गुणाच्या एकरूपतेविषयी स्वानुभव-कथन

**28** म्हणून सगुण-उपासक व निर्गुण-उपासक यांच्यात काय फरक आहे हें सांगावयाचें म्हटलें तर भाषा कुंठित होते. सगुण व निर्गुण शेवटीं एकत्र येतात. भक्तीचा झरा प्रथम सगुणातून निघाला तरी तो निर्गुणाला जाऊन पोहोचतो. मागे मी वायकमचा सत्याग्रह पाहण्यास गेलो होतो. मलबारच्या किनाऱ्यावर शंकराचार्यांचे जन्मग्राम आहे हें मी भूगोलात लक्षात ठेवलें होतें. मी जात होतो तेथे जवळच तो भगवान् शंकराचार्यांचा 'कालडी' ग्राम असेल असें मला वाटलें, व मी बरोबरच्या मल्याळी गृहस्थास विचारलें. ते म्हणाले, ''येथून दहा-बारा मैलांवरच तो गांव आहे. आपणांस जावयाचें आहे का?'' मी नकार दिला. मी सत्याग्रह पाहण्यासाठी आलो होतो. म्हणून वाटेत अन्यत्र न जाणें मला योग्य वाटलें व त्या वेळेस तें गांव पहावयास गेलो नाही. हें योग्य केलें असें अजूनहि मला वाटतें. परंतु रात्रीं मी निजण्यासाठी पडलो म्हणजे तो कालडी गांव व ती शंकराचार्यांची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी रहावयाची. मला झोप यावयाची नाही. तो अनुभव मला अजून ताजा वाटत आहे. शंकराचार्यांचा तो ज्ञानाचा प्रभाव, ती त्यांची दिव्य अद्वैतनिष्ठा, समोर पसरलेली दुनिया रद्दी ठरविणारे त्यांचें अलौकिक व धगधगीत वैराग्य, त्यांची गंभीर भाषा, व त्यांचें माझ्यावर झालेले अनंत उपकार, ह्या सर्व कल्पना मनात भरून येत. रात्रीं हें सर्व भाव प्रकट होत. निर्गुणात सगुण कसें भरलेलें आहे त्याचा मला अनुभव आला. प्रत्यक्ष भेटीतहि इतकें प्रेम नाही. निर्गुणातहि सगुणाचा परमोत्कर्ष दाट भरून राहिला आहे. मी कधी फारशीं कुशल-पत्रें वगैरे लिहीत नाही; पण एखाद्या मित्राला पत्र न लिहिलें तरी आंतून सारखें स्मरण होत असतें. पत्र न लिहिता मनात स्मरण दाटून राहिलेलें असतें. निर्गुणात याप्रमाणे सगुण गुप्त असतें. सगुण व निर्गुण हीं एकरूपच आहेत. प्रत्यक्ष मूर्ति घेऊन पूजा करणें, प्रकट सेवा करणें, आणि आंतून सतत जगाच्या कल्याणाचें चिंतन असून बाहेर पूजा न दिसणें, ह्या दोन्ही वस्तु समान किंमतीच्या व योग्यतेच्या आहेत.

## 66. सगुण-निर्गुण केवळ दृष्टिभेद, म्हणून भक्त-लक्षणें जिरवावीं हेंच सार

**29** मला शेवटीं सांगावयाचें आहे की सगुण कोणतें आणि निर्गुण कोणतें हें निश्चित ठरविणेंहि सोपें नाही. एका दृष्टीने जें सगुण, तें दुसऱ्या दृष्टीने निर्गुण ठरू शकतें. सगुणाची सेवा करावयाची ती एक दगड घेऊन करतात. त्या दगडाच्या ठिकाणीं परमात्मा कल्पून बसतात; पण आईच्या ठिकाणीं, संतांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष चैतन्य प्रकट झालें आहे. तेथे ज्ञान, प्रेम, जिव्हाळा प्रकट आहे. तेथे परमात्मा लक्षून पूजा करीत नाहीत. सर्वांना चैतन्यमय असे हे लोक दिसत आहेत. त्यांची सेवा करावी, तेथे सगुण परमात्मा पहावा, तर तें न करता दगडाच्या ठिकाणीं परमात्मा पाहतात! आता दगडात देव पाहणें ही एकपरी निर्गुणाची पराकाष्ठा आहे. संत, आईबाप, शेजारी, यांच्या ठिकाणीं ज्ञान, प्रेम, उपकार-बुद्धि प्रकट झालीं आहेत. तेथे ईश्वर मानणें सोपें आहे. दगडात ईश्वर मानणें कठिण आहे. तो नर्मद्या गणपति देव मानतात. ही निर्गुण पूजाच नव्हे काय?

**30** उलटपक्षीं असें वाटतें की दगडाच्या ठिकाणीं देव कल्पावयाचा नाही तर कोणाच्या ठिकाणीं? देवाची मूर्ति व्हावयास तो दगडच लायक आहे. तो निर्विकार आहे, शांत आहे. अंधार असो, प्रकाश असो, ऊन असो, थंडी असो, तो दगड तसाच आहे. असा हा निर्विकार दगड हाच परमेश्वराचें प्रतीक व्हावयास लायक आहे. आईबाप, जनता, शेजारी-पाजारी, हे सारे विकाराने भरलेले आहेत. म्हणजे यांच्यात काही ना काही विकार आढळेलच. तेव्हा दगडाच्या पूजेपेक्षा त्यांची सेवा करणें एका दृष्टीने कठिण आहे.

**31** सारांश, सगुण व निर्गुण परस्पर-पूरक आहेत. सगुण सुलभ आहे, निर्गुण कठिण आहे. परंतु सगुणहि कठिण आहे व निर्गुणहि सोपें आहे. दोहोंनी एकच ध्येय प्राप्त होतें. पांचव्या अध्यायात जसें सांगितलें की चोवीस तास कर्म करूनहि लेशमात्र कर्म न करणारा, व चोवीस तास कर्म न करूनहि सर्व कर्मे करणारा, असे योगी व संन्यासी एकरूपच आहेत, तसेंच येथेहि आहे. सगुण कर्मदशा व निर्गुण संन्यासयोग एकरूपच आहेत. संन्यास श्रेष्ठ का योग श्रेष्ठ, याचें उत्तर देतांना भगवंतांना जशी अडचण पडली तशीच अडचण येथेहि पडली. शेवटीं सुलभता व कठिणता तारतम्याने लक्षात घेऊन उत्तर दिलें. नाही तर योग व संन्यास, सगुण व निर्गुण, हीं एकरूपच आहेत.

**32** शेवटीं भगवान् सांगतात – ''अर्जुना, तू सगुण ऐस कीं निर्गुण ऐस, भक्त ऐस म्हणजे झालें, गोटा राहू नकोस.'' असें सांगून भगवंतांनी शेवटीं भक्ताचीं लक्षणें दिलीं आहेत. अमृत मधुर असेल, परंतु त्याची माधुरी आपण चाखली नाही. हीं लक्षणें प्रत्यक्ष मधुर आहेत. येथे कल्पनेची जरूरी नाही. ह्या लक्षणांचा अनुभव घ्यावा. बाराव्या अध्यायातील हीं भक्तलक्षणें स्थितप्रज्ञाच्या लक्षणांप्रमाणे आपण रोज सेवन करावीं, मनन करावीं, त्यांतील थोडीं थोडीं आपल्या आचरणात आणून पुष्टि प्राप्त करून घ्यावी. अशा तऱ्हेने जीवन हळूहळू परमेश्वराकडे न्यावें.

*रविवार, 8-5-'32*

# अध्याय 13

# आत्मानात्म-विवेक

### 67. कर्मयोगास उपकारक देहात्म-पृथक्करण

**1** व्यासांनी आपल्या जीवनाचें सार भगवद्गीतेत ओतलें आहे. व्यासांनी विस्तारपूर्वक इतर लिखाण पुष्कळ लिहिलें आहे. महाभारताची संहिताच लाख सवालाख आहे. संस्कृतात 'व्यास' या शब्दाचा अर्थच मुळीं 'विस्तार' असा झाला आहे. परंतु भगवद्गीतेत विस्तार करण्याची त्यांची वृत्ति नाही. भूमितीमध्ये युक्लिडने जशीं तत्त्वें सांगून दिलीं, सिद्धांत सांगून दिले, त्याप्रमाणे जीवनाला उपयोगी अशीं तत्त्वें व्यासदेव नमूद करून राहिले आहेत. भगवद्गीतेत विशेष चर्चा नाही. विस्तार पसारा काही नाही. याचें मुख्य कारण असें की गीतेमध्ये ज्या वस्तु मांडल्या आहेत त्या जीवनामध्ये प्रत्येकाला पडताळून पाहता येणें शक्य आहे. त्या तशा पडताळून घ्यावयासाठी सांगितल्या आहेत. जीवनाला उपयोगी जेवढ्या वस्तु, तेवढ्याच गीतेत सांगितल्या आहेत. सांगावयाचा उद्देश तेवढाच होता म्हणून थोडक्यात तत्त्वें नमूद करून व्यासांनी संतोष मानला आहे. या त्यांच्या संतोषवृत्तीत सत्यावर व आत्मानुभवावर असलेला त्यांचा महान् विश्वास आपणांस दिसून येतो. जी वस्तु सत्य आहे तिच्या मंडनासाठी विशेष युक्ति वापरण्याची आवश्यकता नाही.

**2** आपण गीतेकडे पाहून राहिलो आहोत. त्यातील मुख्य उद्देश हाच की जीवनात ज्या ज्या वेळेस आपणांस मदतीची आवश्यकता भासेल त्या त्या वेळेस गीतेपासून ती मिळावी. अशी मदत आपणांस सदैव मिळण्यासारखी आहे. गीता हें जीवनोपयोगी शास्त्र आहे. म्हणूनच गीतेमध्ये स्वधर्मावर जोर दिला आहे. मनुष्याच्या जीवनाचा मोठा पाया स्वधर्माचरण करणें हा आहे. सर्व इमारत या स्वधर्माचरणरूप पायावर उभारावयाची आहे. हा पाया जितका भक्कम होईल तेवढी इमारत टिकाव धरील. या स्वधर्माचरणाला गीता 'कर्म' म्हणते. या स्वधर्माचरणरूप कर्माभोंवती पुष्कळ वस्तु उभ्या केलेल्या आहेत. त्यांच्या रक्षणासाठी अनेक विकर्में रचलीं आहेत. स्वधर्माचरण सजविण्यासाठी, तें साजरें सुंदर करण्यासाठी, तें सफळ करण्यासाठी ज्या ज्या मदतीची अपेक्षा असेल ती ती सर्व मदत, तो तो सर्व पाठपुरावा या स्वधर्माचरणरूप कर्माला देणें जरूर आहे. म्हणून आतापर्यंत आपण पुष्कळ वस्तु पाहिल्या. त्यांतील बऱ्याचशा वस्तु भक्तीच्या स्वरूपाच्या होत्या. आज तेराव्या अध्यायात जी वस्तु पहावयाची आहे तीहि स्वधर्माचरणास फार उपयोगी आहे. ही वस्तु विचाराच्या बाजूची आहे.

**3** स्वधर्माचरण करणाऱ्याने फळाचा त्याग करावा ही प्रधान गोष्ट गीतेत सर्वत्र सांगितली आहे. कर्म करावें व त्याचें फळ टाकावें. झाडास पाणी घालावें, त्याला वाढवावें; परंतु त्याच्या छायेची, फुलाची, फळाची स्वत:साठी अपेक्षा ठेवू नये. असा हा स्वधर्माचरणरूप कर्मयोग आहे. कर्मयोग म्हणजे केवळ कर्म करणें एवढाच अर्थ नाही. कर्म या सृष्टीत सर्वत्र चाललेंच आहे. तें सांगण्याची जरूरी नाही. परंतु स्वधर्माचरणरूप कर्म – नुसतें कर्म नव्हे – नीट करून त्याचें फळ सोडणें, हें बोलावयास सोपें, समजावयास सोपें असेल; परंतु आचरण्यास कठिण आहे. कारण कार्याला प्रेरकशक्तिच मुळीं फलवासना मानलेली आहे. फलवासना सोडून कर्म करणें हा उलटा पंथ आहे. व्यवहारातील, संसारातील जें वागणें आहे त्याच्या विपरीत ही करणी आहे. जो कोणी पुष्कळ कर्म करतो त्याच्या जीवनात गीतेतील कर्मयोग आहे, असें बरेच वेळा आपण म्हणतो. पुष्कळ कर्म करणाऱ्याचें जीवन कर्मयोगमय आहे असें आपण बोलतो. परंतु हा प्रयोग भाषेच्या ढिलाईने आपण करतो. गीतेच्या व्याख्येप्रमाणे हा कर्मयोग नाही. लाखों कर्म करणाऱ्यांमध्ये, नुसतें कर्मच नव्हे तर स्वधर्माचरणरूप कर्म करणाऱ्या लाखों लोकांमध्येहि, गीतेतील कर्मयोग आचरणारा एखादाच सांपडणार. कर्मयोगाच्या सूक्ष्म व खऱ्या अर्थाने पाहिलें तर असा संपूर्ण कर्मयोगी आढळणें विरळा. कर्म करणें व त्याचें फळ टाकणें ही वस्तु केवळ असामान्य आहे. गीतेत आतापर्यंत हेंच पृथक्करण मांडलें आहे.

**4** त्या पृथक्करणालाच उपयोगी असें दुसरें एक पृथक्करण या तेराव्या अध्यायात सांगितलें आहे. कर्म करावें व फलाची आसक्ति सोडावी हें जें पृथक्करण, त्याला उपयोगी असें दुसरें महान् पृथक्करण 'देह व आत्मा' यांचें. हें

पृथक्करण या तेराव्या अध्यायात केलें आहे. डोळ्यांनी आपण रूप पाहतो. त्या रूपाला आपण मूर्ति, आकार, देह म्हणतो. बाह्य मूर्तीचा परिचय जरी डोळ्यांनी झाला तरी वस्तूच्या अंतरातहि आपणांस प्रवेश करावा लागतो. फळाचें टरफल काढून आंतील गर चाखावा लागतो. नारळ जरी झाला तरी तो फोडून आंत काय आहे तें पहावें लागतें. फणसाला वरून कांटे दिसले तरी आंत सुंदर व रसाळ गरे असतात. स्वत:कडे पहावयाचें असो किंवा दुसऱ्याकडे पहावयाचें असो, हें आंतील व बाहेरील पृथक्करण करणें अवश्य असतें. टरफल बाजूस सारावयाचें, याचा अर्थ काय? याचा अर्थ असा की प्रत्येक वस्तूचें बाह्यरूप व आंतील गाभा यांचें पृथक्करण करावयाचें. बाह्य देह व आंतील आत्मा, याप्रमाणे प्रत्येक वस्तूचें दुहेरी रूप आहे. कर्मामध्येहि असेंच. बाहेरचें फळ हा कर्माचा देह आहे, व कर्मामुळे जी चित्तशुद्धि होते ती त्या कर्माचा आत्मा आहे. स्वधर्माचरणाचें बाहेरचें फळ असा जो हा देह तो टाकावा व आंतील चित्तशुद्धिरूप, सारभूत जो आत्मा त्याचा स्वीकार करावा, तो जीवीं धरावा. याप्रमाणे पहावयाची सवय, देहाला दूर करून प्रत्येक वस्तूतील सार घेण्याची सारग्राही दृष्टि आपण लावून घेतली पाहिजे. डोळ्यांना, मनाला, विचाराला अशा प्रकारचें शिक्षण, अशी सवय, असा अभ्यास आपण लावून दिला पाहिजे. दरेक ठिकाणीं देह अलग करावा व आत्म्याची पूजा करावी. हें पृथक्करण विचारासाठी तेराव्या अध्यायात मांडलें आहे.

## 68. सुधारणेचा मूलाधार

**5** सारग्राही दृष्टि ठेवण्याचा विचार फार महत्त्वाचा आहे. बालपणापासून जर ही सवय लावली तर किती बरें होईल! हा विषय पचनीं पाडण्यासारखा आहे, ही दृष्टि घेण्यासारखी आहे. पुष्कळांना असें वाटतें की अध्यात्मविद्येचा जीवनाशी काही संबंध नाही. असा संबंध असला तरी नसावा असेंहि कित्येकांना वाटतें. देहापासून आत्मा अलग करावा हें शिक्षण बाळपणापासून देण्याची जर योजना करण्यात आली तर फार आनंदाची गोष्ट होणार आहे. हा शिक्षणाचा विषय आहे. हल्ली कुशिक्षणाने फार वाईट संस्कार होऊन राहिले आहेत. 'केवळ देहरूप मी आहे,' यातून हें शिक्षण आपणांस बाहेर आणीतच नाही. सर्व देहाचेच चोचले चालले आहेत. इतके देहाचे चोचले करूनहि त्या देहाला जें स्वरूप आलें पाहिजे, जें स्वरूप दिलें पाहिजे, तें कोठे दिसत नाही तें नाहीच. या देहाची अशी ही वृथा पूजा चालली आहे. आत्म्याच्या गोडीकडे लक्षच नाही. शिक्षणामुळे अशी ही स्थिति झालेली आहे. देहाचे देव्हारे मांडावयाचा अभ्यास रात्रंदिवस शिकविला जात आहे.

अगदी लहानपणापासून या देह-देवाची पूजा-अर्चा करण्याचें शिक्षण देण्यास आरंभ होतो. जरा कोठे पायाला ठेंच लागली तर माती टाकली की भागेल. मुलाचें एवढ्यावरहि भागतें. किंवा माती टाकण्याचीहि त्याला जरूर भासत नाही. जरा खरचटलें तर त्याची तो चिंताहि करणार नाही. परंतु त्या मुलाचा जो वाली आहे, पालक आहे, त्याचें चालत नाही. तो मुलाला जवळ घेईल. ''कसें रे आहे, किती लागलें, बरेंच लागलें वाटतें, रक्त निघालें'' असें सुरू करून तो मुलगा रडत नसला तर त्याला रडावयाला लावील. न रडणाऱ्या मुलास रडावयास लावण्याचीं जीं हीं लक्षणें त्याला काय म्हणावें? उड्या मारू नको, खेळू नको, तुला लागेल, खरचटेल, असलें एक बाजूचें, फक्त देहाकडे पाहण्याचें शिक्षण देण्यात येतें.

**6** बाळाचें कौतुक करावयाचें तेंहि फक्त देहाच्या बाजूने. त्याची निंदा करावयाची तीहि देहाच्याच बाजूने. ''काय रे शेंबड्या'' असें त्याला म्हणतात. त्या मुलावर तो केवढा आघात होतो! केवढा मिथ्या आरोप आहे तो! शेंबूड आहे ही गोष्ट खरी, व तो दूर केला पाहिजे हीहि गोष्ट खरी. परंतु तो सहज दूर न करता त्या मुलावर केवढा आघाताचा प्रयोग करण्यात येतो! त्या मुलाला तो आघात सहन होत नाही. त्याला खेद होतो. त्या मुलाच्या अंतरंगात, आत्म्यात स्वच्छता, निर्मलता भरलेली असता, हा केवढा बिचाऱ्यावर वृथा आरोप! वास्तविक तो मुलगा शेंबडा नाही. जो अत्यंत सुंदर, मधुर, पवित्र, प्रिय परमात्मा, तो तो आहे. त्याचा अंश त्याच्या ठिकाणीं आहे. परंतु त्याला म्हणतात 'शेंबडा.' त्या शेंबडाशी त्याचा एवढा काय संबंध आहे? त्या मुलाला हें कळतहि नाही, अशी त्याची स्थिति असते. म्हणून तो आघात त्याला सहन होत नाही. त्याच्या चित्तात क्षोभ उत्पन्न होतो व क्षोभ उत्पन्न झाला म्हणजे सुधारणा होत नाही. त्याला नीट समजावून स्वच्छ केलें पाहिजे.

**7** याच्या उलट कृति करून आपण त्या मुलाच्या मनावर 'तू देह आहेस' हें ठसवितो. शिक्षणशास्त्रात हा महत्त्वाचा सिद्धांत मानला पाहिजे. मी ज्याला शिकवून राहिलो आहे तो सर्वांगसुंदर आहे अशी गुरूला भावना हवी. गणित चुकला तर तोंडात मारतात. त्याच्या तोंडात मारणें आणि गणित चुकणें याचा संबंध काय? शाळेत उशीरा आला तर थोबाडीत देतात. त्याच्या तोंडात मारल्यामुळे त्याच्या गालावरच्या रक्ताचें अभिसरण जोराने व्हावयास लागतें म्हणून काय तो लवकर येईल? तें अभिसरण किती वाजलें तें सांगेल असें काही आहे काय? वास्तविक त्या मारण्याने त्या मुलाची पशुवृत्ति मी वाढवून राहिलो आहे. हा देह म्हणजे तू, ही भावना पक्की करीत आहे. त्याचें जीवन धास्तीवर उभें केलें जात आहे. वास्तविक सुधारणा जर व्हावयाची असेल तर ती अशा जबरदस्तीने, देहासक्ति वाढवून कधीहि होणार नाही. देहाहून मी वेगळा आहे हें जेव्हा मला समजेल तेव्हा मला सुधारणा करता येईल.

**8** देहात किंवा मनात असलेल्या दोषांची जाणीव असणें काही वाईट नाही. त्याने ते दोष दूर करण्यासाठी मदत मिळते. परंतु मी म्हणजे देह नव्हे, हें स्पष्ट कळलें पाहिजे. 'मी' जो आहे तो या देहापासून अगदी भिन्न, अत्यंत सुंदर, सोज्वळ, पवित्र, अव्यंग असा आहे. स्वत:चे दोष सुधारण्यासाठी जो आत्मपरीक्षण करतो तो तरी देहाला स्वत:पासून अलग पाडूनच आत्मपरीक्षण करतो. कोणी आपला दोष दाखविला तर त्याचा त्याला राग येत नाही. राग न येता, या शरीररूपी, या मनोरूपी यंत्रात दोष आहे कीं काय, याचा तो विचार करून दोष दूर करतो. जो देहाला स्वत:पासून अलग मानणार नाही, त्याला सुधारणा करताच येणार नाही. हा देह, हा गोटा, ही माती, म्हणजेच मी अशी ज्याची कल्पना असणार तो सुधारणा कशी करणार? देह हें एक मला मिळालेलें साधन आहे, असें लक्षात येईल तेव्हाच सुधारणा होईल. चरख्यातील दोष कोणी दाखवला तर मला राग का येतो? दोष असला तर तो मी दूर करतो. तसेंच या देहाचें आहे. जसें शेतीचें अवजार तसा हा देह. परमेश्वराच्या घरची शेती करण्याचें देह एक अवजार आहे. हें अवजार बिघडलें तर त्यात सुधारणा करावयास पाहिजेच. देह हा साधनरूपाने उभा आहे. या देहापासून अलग राहून दोषापासून मुक्त होण्याचा मी प्रयत्न केला पाहिजे. या देहरूपी साधनापासून मी निराळा आहे, मी स्वामी आहे, मालक आहे, या देहाला राबवून घेणारा, त्याच्यापासून उत्कृष्ट काम करून घेणारा आहे. लहानपणापासून अशी ही देहापासून अलग होण्याची वृत्ति शिकविली पाहिजे.

**9** खेळाच्या बाहेर असलेला त्रयस्थ ज्याप्रमाणे खेळातील गुणदोष चांगले पाहू शकतो, त्याप्रमाणे देहमनोबुद्धीपासून अलग राहूनच आपणांस त्यांच्यातील गुणदोष समजतील. एखादा मनुष्य म्हणतो, ''हल्ली माझें स्मरण जरा बिघडलें आहे, याला काय उपाय करावा?'' मनुष्य जेव्हा असें म्हणतो तेव्हा त्या स्मरणशक्तीपासून तो निराळा आहे हें स्पष्टच होतें. तो म्हणतो, ''माझी स्मरणशक्ति बिघडली आहे.'' म्हणजे त्याचें काहीतरी साधन, त्याचें हत्यार, बिघडलेलें असतें. कोणाचा मुलगा हरवतो, कोणाचें पुस्तक हरवतें, परंतु स्वत: कोणी हरवला आहे असें होत नाही. शेवटीं मरणाचे घडीलाहि त्याचा देह सर्वतोपरी बिघडलेला होतो, रद्दी होतो, परंतु तो स्वत: लेशमात्रहि आंतून बिघडलेला नसतो. तो अव्यंग असतो, निरोगी असतो. ही वस्तु समजण्यासारखी आहे. आणि जर ही समजली तर बऱ्याचशा भानगडी मिटतील.

## 69. देहासक्तीमुळे जीवन अडगळीचें

**10** देह म्हणजेच मी, ही जी सर्वत्र भावना पसरून राहिली आहे, त्यामुळे काहीहि विचार न करता या देहाच्या वर्धनासाठी मनुष्याने नाना प्रकारचीं साधनें निर्माण केलीं आहेत. तीं पाहून मनाला भीति वाटते. हा देह जुना झाला, जीर्ण झाला, तरी काहीतरी करून तो शाबूत ठेवावा असें सारखें मनुष्यास वाटतें. परंतु हा देह, हें टरफल कोठपर्यंत जपून ठेवणार? तर मरेपर्यंत! मरणाची घडी आली की एक क्षणभरहि देह टिकविता येत नाही. मृत्यूपुढे सर्व ऐट थांबते. या तुच्छ देहासाठी नाना प्रकारचीं साधनें मनुष्य निर्माण करतो. या देहाची रात्रंदिवस चिंता वाहतो. आता म्हणे देहरक्षणासाठी मांस खाण्यास हरकत नाही. हा मनुष्याचा देह म्हणजे मोठा किमती. त्याला बचावण्यासाठी मांस खा. पशूचा देह म्हणजे किंमतीने कमी. कां रे कमी? मनुष्याचा देह किमती कशाने ठरला? कोणत्या कारणामुळे ठरला? अरे, हे पशु वाटेल त्याला खातात. स्वार्थाशिवाय विचारच करीत नाहीत. तसें मनुष्य करीत नाही. मनुष्य आपल्या

भोंवतालच्या सृष्टीचें संरक्षण करतो, म्हणून मनुष्याचा देह मोलाचा, म्हणून किमती. परंतु ज्या कारणाने मनुष्याचा देह किमती ठरला, तें कारणच तू मांस खाण्याने खोडून टाकीत आहेस. भल्या माणसा, तू संयमाने राहतोस, सर्व जीवांसाठी झटतोस, सर्वांचा सांभाळ करण्याची वृत्ति तुझ्या ठिकाणीं आहे, त्यावर तुझा मोठेपणा अवलंबून आहे. ही जी पशुहून तुझ्या ठिकाणीं विशेषता आहे, तीवरूनच मनुष्य श्रेष्ठ आहे. म्हणूनच मानवदेह दुर्लभ म्हटला आहे. परंतु ज्या आधारावर मनुष्य मोठा आहे तोच आधार जर माणूस उखडून टाकू लागला तर त्याच्या मोठेपणाची इमारत राहणार कशी? सामान्य पशु अन्य जीवांचें मांस खाण्याची जी क्रिया करतो तीच क्रिया करावयास जेव्हा मनुष्यहि नि:शंकपणें उद्युक्त होतो, तेव्हा त्याच्या मोठेपणाचा आधारच काढून घेतल्यासारखें होतें. ज्या खांदीवर मी बसलो आहे तीच तोडण्याचा मी प्रयत्न करावा तसें हें आहे.

**11** वैद्यकशास्त्र तर नाना प्रकारचे चमत्कार करून राहिलें आहे. पशूवर शस्त्रक्रिया करून त्याच्या शरीरात, त्या जिवंत पशूच्या शरीरात, रोगजंतु निर्माण करतात व त्या रोगांनी काय काय परिणाम होतात तें पाहतात! जिवंत पशूचे असे हाल हाल करून जें ज्ञान मिळवायचें त्याचा उपयोग हा रद्दी देह वांचविण्यासाठी. भूतदयेच्या नांवाखाली हें सर्व चालतें. त्या पशूच्या अंगात जंतु निर्माण करून त्याची लस काढून ती माणसाच्या अंगात टोंचावयाची. असे नाना प्रकारचे भीषण प्रकार केले जात आहेत. ज्या देहासाठी हें सर्व चालतें तो देह तर एका क्षणात फुटणाऱ्या कांचेसारखा आहे. तो केव्हा फुटेल याचा काडीमात्र भरवसा नाही. मनुष्याचा देह राखून ठेवण्याचे हे सारे प्रयत्न होत आहेत. तरी शेवटीं अनुभवास काय येत आहे? जसजसा हा तकलादी देह सांभाळण्याचा प्रयत्न होत आहे तसतसा त्याचा नाश होऊन राहिला आहे. ही प्रतीति येत आहे तरीसुद्धा देहाला वाढविण्याचाच माणसांचा प्रयत्न चालू आहे.

**12** कोणता आहार केल्याने बुद्धि सात्त्विक होईल ही गोष्ट नाही कधी लक्षात येत. मन चांगलें व्हावयास, बुद्धि निर्मळ रहावयास काय केलें पाहिजे, कशाचें साहाय्य घेतलें पाहिजे, हें मनुष्य पाहतच नाही. शरीराचें वजन कसें वाढेल एवढेंच तो बघतो. पृथ्वीवरची ती माती तेथून उठून या शरीरावर कशी थापटली जाईल, ते मातीचे गोळे, लोथे या शरीरावर कसे थापले जातील, याचीच तो काळजी करून राहिला आहे. परंतु थापथापून ठेवलेला शेणगोळा वाळून जसा खाली पडतो, त्याप्रमाणे शरीरावर चढविलेले मातीचे गोळे, ही चरबी, शेवटीं गळून हें शरीर पुन्हा पूर्वस्थलावर येतेंच. बाहेरची माती या अंगावर ओतून घ्यावी, अंगावर चोपडावी व अंगाचें वजन देहाला झेपत नाही इतकें वाढवावें, याचें प्रयोजन काय? हा प्रचंड थलथलीतपणाचा बोजा कां वाढवावा? हा देह माझ्या हातातील एक साधन आहे. तें साधन नीट ठेवण्यासाठी ज्या गोष्टी करायला हव्या त्या मी कराव्या. यंत्रापासून काम करून घ्यावयाचें. यंत्राचा काही अभिमान, ‘यंत्राभिमान,’ काही असतो की काय? मग या देहयंत्रासंबंधीहि तीच स्थिति कां असू नये?

**13** सारांश, देह हें साध्य नसून साधन आहे. ही बुद्धि दृढावली तर वृथा अवडंबर जें मनुष्य माजवून राहिला आहे तें माजवणार नाही. जीवन निराळेंच भासू लागेल. मग या देहाला शृंगारण्यात त्याला कौतुक वाटणार नाही. वस्तुत: या देहाला साधा कपडा असला म्हणजे पुरे. पण नाही. तो मऊ पाहिजे. त्याच्यावर नक्षी पाहिजे. त्यावर वेलबुट्टी पाहिजे. फुलें व नक्षीकाम पाहिजे. त्याच्यासाठी नाना लोकांना मी श्रम करावयास लावतो. हें सारें कशासाठी? त्या देवाला का अक्कल नव्हती? देहाला जर सुंदर चट्टेपट्टे, नक्षी यांची जरूरी असती तर वाघाच्या अंगावर त्याने ठेवले आहेत तसे पट्टे तुझ्या शरीरावरहि नसते का त्याने ठेवले? त्याला का तें अशक्य होतें? त्याने मोराला जसा पिसारा दिला आहे तसा तुला दिला असता. परंतु ईश्वराने माणसें एकरंगीच ठेवलीं आहेत. जरा डाग पडला तर सौंदर्य जातें. मनुष्य आहे तसाच सुंदर आहे. मानवदेह शृंगारावा असा परमेश्वराचा उद्देशच नाही. सृष्टीत का सामान्य सौंदर्य आहे? तें डोळ्यांनी पहावयाचें एवढेंच मानवाचें काम आहे. परंतु त्याला भूल पडली. म्हणे जर्मनीने आमचा रंग मारला. अरे, तुझ्या मनाचा रंग आधी मेला, मग तुला या कृत्रिम रंगाची हौस वाटू लागली. त्यासाठी परावलंबी झालास. विनाकारण देह शृंगारण्याच्या तू नादीं लागलास. मन शृंगारावें, बुद्धीचा विकास करावा, हृदय सुंदर करावें, हें सारें बाजूलाच राहिलें.

## 70. तत्त्वमसि

**14** म्हणून भगवान् या तेराव्या अध्यायात जो विचार सांगून राहिले आहेत तो फार मोलाचा आहे. ''तू देह नाहीस, तू आत्मा आहेस.'' **'तत्त्वमसि'** – तें आत्मरूप तू आहेस, हा फार मोठा पवित्र उद्‌गार आहे, पावन व उदात्त उच्चार आहे. संस्कृत साहित्यात हा फार मोठा विचार गोंवला गेला आहे. ''हें वरचें पांघरूण, हें टरफल, तू नाहीस. तें निखळ अविनाशी फळ तें तू आहेस.'' ज्या क्षणीं 'तें तू आहेस' हा विचार मनुष्याच्या अंत:करणात स्फुरेल; हा देह मी नाही, तो परमात्मा मी आहे हा विचार मनात येईल, त्या क्षणीं एक प्रकारचा अननुभूत आनंद मनामध्ये निर्माण होईल. त्या माझ्या रूपाचा नाश करणें या सृष्टीतील कोणत्याहि वस्तूला शक्य नाही. तें सामर्थ्य कोणामध्येहि नाही. हा सूक्ष्म विचार त्या उद्‌गारात भरलेला आहे.

**15** देहाच्या पलीकडचें अविनाशी निष्कलंक आत्मतत्त्व तें मी आहे. त्या आत्मतत्त्वासाठी हा देह मला मिळाला आहे. ज्या ज्या वेळेस परमेश्वरी तत्त्व दूषित होत असेल त्या त्या वेळेस त्याच्या बचावासाठी मी हा देह फेकून देईन. परमेश्वरी तत्त्वाला उज्ज्वल राखण्यासाठी देहाचा होम करावयास मी सदैव तयार असेन. मी या देहावर स्वार होऊन आलो आहे तो माझे धिंडवडे काढण्यासाठी नाही. माझी देहावर सत्ता चालली पाहिजे. मी देह वापरीन व हित-मंगल यांची समृद्धि करीन. **'आनंदें भरीन तिन्ही लोक.'** हा देह थोर तत्त्वासाठी मी फेकून देईन व ईश्वराचा जयजयकार करीन. श्रीमंत मनुष्य एक वस्त्र मळताच फेकून देतो आणि दुसरें घेतो, त्याप्रमाणे मीहि करीन. कामासाठी या देहाचा उपयोग आहे. ज्या वेळेस हा देह काम देईनासा होईल त्या वेळेस तो फेकून देण्यास मला प्रत्यवाय नाही.

**16** सत्याग्रहात आपणांस हेंच शिक्षण मिळत आहे. देह व आत्मा या अलग वस्तु आहेत. ही वस्तु ज्या दिवशीं मनुष्याच्या लक्षात येईल, यातील स्वारस्य जेव्हा कळेल, त्या वेळेसच खरें शिक्षण, खरा विकास यांची सुरुवात होईल. त्या वेळेसच सत्याग्रह साधेल. म्हणून ही भावना प्रत्येकाने ठसवून घ्यावी. देह हें निमित्तमात्र साधन आहे, परमेश्वराने दिलेलें हत्यार आहे. ज्या दिवशीं त्याचा उपयोग संपेल त्या दिवशीं हा देह फेकून द्यावयाचा आहे. थंडीतील गरम कपडे उन्हाळ्यात फेकतो, रात्रीं पांघरलेल्या घोंगड्या सकाळीं टाकून देतो, सकाळचे कपडे दुपारला काढतो, त्याप्रमाणेच या देहाचें आहे. जोंपर्यंत या देहाचें काम आहे तोंपर्यंत तो राखू. ज्या दिवशीं काम मिळणार नाही त्या दिवशीं हा देहरूपी कपडा काढून फेकून देऊ. आत्म्याच्या विकासासाठी ही युक्ति भगवान् सांगून राहिले आहेत.

## 71. जुलमी लोकांची सत्ता गेली

**17** देहाहून मी अलग आहे ही गोष्ट जोंपर्यंत लक्षात येणार नाही तोंपर्यंत जुलमी लोक आमच्यावर जुलूम करतील, आम्हांला बंदे गुलाम करतील, आमचे हाल हाल करतील. जुलमाची शक्यता भीतीमुळेच आहे. एक राक्षस होता व त्याने एका माणसास पकडलें होतें. तो त्याचेपासून सारखें काम करून घेत असे. जर त्याने काम केलें नाही तर तो राक्षस म्हणे, ''खाऊन टाकीन, तुझा चट्टामट्टा करून टाकीन.'' प्रथम प्रथम तो मनुष्य भीत असे. परंतु पुढे जेव्हा फार होऊ लागलें तेव्हा तो माणूस म्हणाला, ''टाक खाऊन. खाणार तर खा.'' परंतु तो राक्षस का खाणार होता? त्या राक्षसाला तर बंदा नोकर पाहिजे होता. खाऊन टाकील तर त्याचें काम कोण करील? दर वेळेस खाऊन टाकण्याची धास्ती तो राक्षस घाली. परंतु 'खाऊन टाक' असें उत्तर मिळताच जुलूम थांबला. जुलूम करणाऱ्यांना माहीत असतें की हे लोक देहाला कवटाळणारे आहेत. यांच्या देहाला कष्ट दिले की हे गुलाम होतील. परंतु ही देहाची आसक्ति तुम्ही सोडा की लगेच तुम्ही सम्राट् व्हाल, स्वतंत्र व्हाल. सर्व सामर्थ्य तुमच्या हातात येईल. तुमच्यावर कोणाचीहि सत्ता मग चालणार नाही. जुलूम करणाऱ्याचा मग आधारच तुटतो. त्यांचा आधारच मुळीं ''देह मी'' ही भावना. त्यांना वाटतें की यांच्या देहाला पीडा दिली की हे ताब्यात येतील. म्हणून ते धमकावणीची भाषा बोलतात.

**18** ''मी देह आहे'' ही जी माझी भावना तिच्यामुळेच दुसऱ्याला जुलूम करण्याची, सतावण्याची इच्छा होते. परंतु इंग्लंडमधील हुतात्मा क्रॅन्मर काय म्हणाला? ''मला जाळता? जाळा. हा उजवा हात आधी जाळा.'' किंवा ते रिड्ले व लॅटिमर म्हणाले, ''आम्हांला जाळता? आम्हांला कोण जाळणार? आम्ही तर धर्माची अशी ज्योत पेटवून राहिलो आहोत

की जी कधी विझणार नाही. देहाची ही मेणबत्ती, ही चरबी पेटवून सत्‌तत्त्वांची ज्योत पेटत ठेवणें हें तर आमचें काम. देह जाईल. तो जावयाचाच आहे.''

**19** सॉक्रेटिसास विष देऊन मारावें अशी शिक्षा देण्यात आली. तेव्हा तो म्हणाला, ''मी आता वृद्ध झालो आहे. चार दिवसांनी देह मरणारच होता. जो मरणार होता, त्याला मारून तुम्ही काय पुरुषार्थ साधलात, तो तुम्हांसच माहीत. विचार तर करून पहाल कीं नाही? देह मरणार हें नक्कीच होतें. मर्त्य वस्तूला तुम्ही मारलेत यात कोणती प्रौढी?'' ज्या दिवशीं सॉक्रेटिस मरावयाचा होता त्याच्या आदल्या रात्रीं तो आत्म्याच्या अमरत्वाविषयी शिष्यांना सांगून राहिला होता. स्वत:च्या शरीरात विष भिनल्यावर कशा वेदना होतील हें तो मौजेने सांगत होता. त्याची त्याला फिकीरच नव्हती. आत्म्याच्या अमरत्वाविषयी चर्चा संपल्यानंतर त्याच्या एका शिष्याने विचारलें, ''तुम्ही मेल्यावर तुम्हांला कसें पुरावयाचें?'' तेव्हा सॉक्रेटिस म्हणाला, ''अहा रे शहाण्या! ते मला मारणार व तू मला पुरणार होय? तो मारणारा माझा दुष्मन, आणि तू पुरणारा माझ्यावर मोठा प्रेम करणारा वाटतें! तो शहाणपणाने मला मारणार, तू शहाणपणाने पुरणार! तू रे कोण मला पुरणार? मी तुम्हां सर्वांस पुरून उरणार आहे. कशात मला पुरणार? मातीत कीं तपकिरीत? मला कोणी मारू शकत नाही. कोणी पुरू शकत नाही. मी इतका वेळ काय सांगून राहिलो आहे? आत्मा हा अमर आहे. त्याला कोण मारणार, कोण पुरणार?'' आणि खरोखरच आज दोन-अडीच हजार वर्षें तो महान् सॉक्रेटिस सर्वांना पुरून उरला आहे.

## 72. परमात्म-शक्तीवर विश्वास

**20** सारांश, जोंपर्यंत देहाची आसक्ति आहे, भीति आहे, तोंपर्यंत खरें रक्षण मिळणार नाही; तोंपर्यंत एकसारखी भीति राहील. जरा निजलो तर साप येऊन तर दंश नाही करणार, चोर येऊन तर माझा निकाल नाही करणार, असें वाटत राहील. मनुष्य उशाशी सोटा ठेवतो. कशासाठी? तो म्हणतो, ''जवळ पाहिजे. चोरबीर आला तर?'' अरे भल्या माणसा, चोराने तो बडगा तुझ्या डोक्यात घातला तर? चोर सोटा विसरून आला तर त्याच्यासाठी तू आधीच तयार करून ठेवला आहेस. अरे, कोणाच्या भरवशावर तू निजतोस? केवळ दुनियेच्या हातात तू त्या वेळेस असतोस. तू जागृत असलास तर बचाव करणार ना? झोपेत तुझा बचाव कोण करणार?

**21** मी कोणत्या तरी शक्तीवर विश्वास ठेवून निजतो. ज्या शक्तीवर विसंबून वाघ, गाई इत्यादि सर्व निजतात त्याच शक्तीवर विसंबून मीहि झोपतो. वाघालासुद्धा झोप येते. सर्व जगाशी ज्याने वैर बांधलें व हरघडी जो पाठीमागे बघतो असा सिंहहि झोपतो. त्या शक्तीवर विश्वास नसता तर काही सिंहांनी निजावें, काहींनी जागें राहून पहारा करावा, अशी व्यवस्था त्यांना करावी लागली असती. ज्या शक्तीवर विश्वास ठेवून क्रूर असे वृक, व्याघ्र, सिंहहि झोपतात, त्याच विश्वव्यापक शक्तीच्या मांडीवर मीहि निजलेला आहे. आईच्या अंकावर बालक सुखाने झोपतो. तो बालक त्या वेळेस जणू दुनियेचा बादशहा असतो. ह्या विश्वंभरमातेच्या अंकावर तुम्ही-आम्हीहि असेंच प्रेमपूर्वक, विश्वासपूर्वक आणि ज्ञानपूर्वक निजण्यास शिकलें पाहिजे. जिच्या आधारावर माझें हें सारें जीवन आहे, त्या शक्तीचा मला अधिकाधिक परिचय करून घेतला पाहिजे. ती शक्ति उत्तरोत्तर मला प्रतीत झाली पाहिजे. ह्या शक्तीबद्दल मला जितकी खात्री पटेल तितकें माझें रक्षण अधिक होईल. जसजसा ह्या शक्तीचा अनुभव येत जाईल तसतसा विकास होईल. ह्या तेराव्या अध्यायात याचा किंचित् क्रमहि दिग्दर्शित केला आहे.

## 73. परमात्म-शक्तीचा उत्तरोत्तर अनुभव

**22** जोंपर्यंत देहात असलेल्या आत्म्याचा विचारच नसतो तोंपर्यंत मनुष्य सामान्य क्रियेतच गुरफटलेला असतो. भूक लागली म्हणजे खावें, तहान लागली म्हणजे पाणी प्यावें, झोप आली म्हणजे निजावें, याहून जास्त त्याला माहीत नसतें. यासाठी तो भांडेल, यासाठी तो लोभ करील. अशा प्रकारें दैहिक क्रियांतच तो मग्न राहतो. विकासाला यापुढे सुरुवात व्हावयाची. ह्या वेळपर्यंत आत्मा फक्त पाहत असतो. विहिरीकडे रांगत जाणाऱ्या लहान लेकराच्या पाळतीवर जशी पाठीमागे आई उभी असते त्याप्रमाणे आत्मा उभा असतो. शांतपणें तो सर्व क्रिया पाहतो. या स्थितीला 'उपद्रष्टा' – साक्षीरूपाने सर्व बघणारा, असें म्हटलें आहे.

**23** आत्मा पाहतो, परंतु अजून संमति देत नसतो. परंतु स्वत:ला केवळ देहरूप समजून क्रिया करणारा हा जीव पुढे जागा होतो. आपण पशूसारखें जीवन कंठीत आहोत याची त्याला जाणीव होते. जीव या विचारावर आला म्हणजे नैतिक भूमिका सुरू होते. मग योग्यायोग्य हा प्रश्न पदोपदी उभा राहतो. मनुष्य विवेक करू लागतो. पृथक्करणात्मक बुद्धि जागृत होते. स्वैर क्रिया थांबतात. स्वच्छंद जाऊन संयम येतो.

**24** या नैतिक भूमिकेवर जीव आला म्हणजे मग आत्मा नुसता स्वस्थ बसून पाहत नाही. तो आंतून अनुमोदन देतो. ''शाबास'' असा धन्यतेचा आवाज आंतून येतो. आत्मा केवळ उपद्रष्टा न राहता आता 'अनुमंता' होतो.

भुकेलेला अतिथि दारात यावा व तुम्ही आपल्यापुढचें ताट त्याला द्यावें, म्हणजे मग रात्रीं जेव्हा ती सत्कृति स्मराल त्या वेळेस पहा कसा आनंद होतो तो! आंतून आत्मा हळूच म्हणतो, ''चांगलें केलेंस.'' आईने मुलाच्या पाठीवरून हात फिरवून ''चांगलें केलेंस बाळ'' असें म्हटलें तर दुनियेतील सारी थोर बक्षिसी आपणांस मिळाली असें त्याला वाटतें. त्याप्रमाणेच हृदयस्थ परमात्म्याचा ''शाबास मुला'' हा शब्द आपणांस उत्तेजन देतो, उत्साह देतो. भोगमय जीवन सोडून नैतिक जीवनाच्या भूमिकेवर जीव या वेळेस उभा असतो.

**25** यापुढची भूमिका अशी. नैतिक जीवनात कर्तव्य करीत असतांना मनाचे सारे मळ धुण्यासाठी मनुष्य प्रयत्न करतो. परंतु असे प्रयत्न करता करता मनुष्य थकतो. अशा वेळेस ''देवा, माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा झाली. मला अधिक शक्ति दे, अधिक बळ दे.' अशी जीव प्रार्थना करतो. जोंपर्यंत सारे प्रयत्न होऊन आपण एकाकी पुरे पडत नाही हें अनुभवास येत नाही, तोंपर्यंत प्रार्थनेचें स्वारस्य मनुष्याच्या लक्षात येत नाही. आपली सारी शक्ति वेंचून, ती पुरी पडत नाही असें पाहून, आर्त होऊन देवाला द्रौपदीप्रमाणे हाक मारावी, त्याचा धावा मांडावा. परमेश्वरी कृपेचा व साहाय्याचा झरा वाहूनच राहिला आहे. ज्याला ज्याला तहान असेल त्याने हक्काने येऊन पाणी प्यावें. ज्याला तूट पडेल त्याने मागून घ्यावें. अशा तऱ्हेचें नातें या तिसऱ्या भूमिकेवर असतें. परमात्मा अधिकच जवळ येतो. आता केवळ शाब्दिक शाबासकी न देता तो साहाय्य करावयास धावतो.

**26** प्रथम परमेश्वर दूर उभा होता. गुरु शिष्याला 'गणित सोडव' असें सांगून दूर उभा राहतो. त्याप्रमाणे भोगमय जीवनात जीव गुंतला असता परमात्मा दूर राहतो व म्हणतो, ''ठीक आहे, चालू दे धडपड.'' यानंतर नैतिक भूमिकेवर जीव येतो. या वेळेस परमात्म्यास केवळ तटस्थ राहवत नाही. जीवाच्या हातून सत्कर्म होत आहे असें पाहताच देव हळूच डोकावतो व ''शाबास'' म्हणतो. अशा रीतीने सत्कर्मे होत होत चित्ताचे स्थूल मळ जाऊन सूक्ष्म मळ धुण्याची जेव्हा वेळ येते, आणि जेव्हा सारे प्रयत्न त्या बाबतीत अपुरे पडतात, त्या वेळेस आपण देवास हाक मारतो व तो 'ओ' देतो. तो धावून येतो. भक्ताचा उत्साह अपुरा पडताच तो उभा राहतो. जगाचा सेवक सूर्यनारायण तुमच्या दाराशी उभाच आहे. सूर्य बंद दार फोडून आंत शिरणार नाही, कारण तो सेवक आहे. तो स्वामीची मर्यादा पाळतो. तो दाराला धक्के देणार नाही. आंत स्वामी निजलेला असला तरी हा सूर्यरूपी सेवक दाराबाहेर उभा असतो. जरा दार किलकिलें करा की सगळाच्या सगळा प्रकाश घेऊन तो आंत शिरतो व अंधार दूर करतो. परमात्मा असाच आहे. त्याच्याजवळ मदत मागा की आलाच बाहु उभारून. कमरेवर हात ठेवून भीमातीरीं तो सज्ज होऊन उभाच आहे.

**'उभारोनि बाहे । विठो पालवीत आहे'**

– अशीं वर्णनें तुकारामादिकांनी केलीं आहेत. नाक उघडें ठेवा की हवा आंत शिरलीच. दार किलकिलें करा की प्रकाश आंत आलाच. हवा व प्रकाश यांचेहि दृष्टांत मला अपुरे वाटत आहेत. त्यांच्यापेक्षाहि परमेश्वर अधिक संनिध, अधिक उत्सुक आहे. तो उपद्रष्टा, अनुमंता न राहता 'भर्ता' – सर्वस्वी मदत करणारा – होतो. मनाचें खळमळ धुण्याचे वेळेस अगतिक होऊन **'मारी नाड तमारे हाथे प्रभु संभाळजो रे'** असें आपण म्हणतो. **'तू ही एक मेरा मददगार है, तेरा आसरा मुझको दरकार है'** अशी आपण प्रार्थना करतो. मग का तो दयाघन दूर राहील? भक्ताचा साहाय्यकारी परमात्मा, उणें पुरें करणारा तो प्रभु, पुढे होतो. मग तो रोहिदासाचीं चामडीं धुईल, सजन कसायाचें मांस विकील, कबीराचे शेले विणील, जनाबाईस दळू लागेल.

**27** याच्या पुढची पायरी म्हणजे परमेश्वराच्या कृपाप्रसादाने कर्माचें जें फळ मिळालें तें फळहि आपण न घेता देवाला दिलें पाहिजे, अशी भूमिका येते. जीव देवाला म्हणतो, ''तुझें फळ तूच घे.'' देवाने दूध प्यावें म्हणून नामदेवाने हट्ट धरला. त्यात फार गोडी आहे. हें सारें कर्मफलरूपी दूध नामदेव देवाला अर्पण करणार. अशा प्रकारें जीवनाची सारी पुंजी, सारी कमाई ज्याच्या कृपेने प्राप्त झाली त्यालाच अर्पावयाची. धर्मराज स्वर्गात आता पाऊल टाकणार तोंच त्याच्याबरोबरच्या कुत्र्याला मज्जाव होताच जीवनातील सर्व पुण्याईचें फळ म्हणून लाभलेला तो स्वर्ग-लाभ धर्मराजाने एका क्षणात दूर लोटला. त्याप्रमाणेच भक्तहि सारा फल-लाभ एकदम ईश्वरार्पण करतो. उपद्रष्टा, अनुमंता, भर्ता, अशा स्वरूपात प्रतीत होणारा तो परमात्मा आता 'भोक्ता' होतो. शरीरात तो परमात्माच भोग भोगून राहिला आहे, अशा भूमिकेवर जीव चढतो.

**28** याच्यापुढे संकल्प करणेंहि सोडून द्यावयाचें. कर्मामध्ये तीन पायऱ्या आहेत. प्रथम आपण संकल्प करतो, मग कार्य करतो, व मग फळ येतें. कर्मासाठी प्रभूची मदत घेऊन जें फळ मिळालें तें फळहि त्याला अर्पिलें. कर्म करणारा परमेश्वर, फळ चाखणारा परमेश्वर; आता त्या कर्माचा संकल्प करणाराहि परमेश्वरच होऊ दे. अशा प्रकारें कर्माच्या आदिमध्यांतीं सर्वत्र प्रभु राहू दे. ज्ञानदेवांनी म्हटलें आहे –

**'माळियें जेउतें नेलें। तेउतें निवांत चि गेलें**
**तया पाणिया ऐसें केलें। होआवें गा'**

माळ्याला पाणी जेथे जेथे न्यावयाचें असेल, तेथे तेथे तें बिनतक्रार जातें. माळ्याच्या आवडीचीं फुलझाडें, फळझाडें तें पाणी वाढवितें. त्याप्रमाणे माझ्या हातून काय व्हावें, हें त्यालाच ठरवू दे. माझ्या चित्तातील सर्व संकल्पांची जबाबदारी त्याचेवरच सोंपवू दे. मी जर माझा भार घोड्यावर घातलाच आहे तर माझें ओझें मी आणखी डोक्यावर घेऊन कशाला बसू? तेंहि घोड्याच्याच पाठीवर ठेवू दे. माझ्या डोक्यावर ओझें घेऊन मी घोड्यावर बसलो तरी त्या घोड्यालाच तो त्रास आहे. मग साराच बोजा घालू दे त्याचें पाठीवर. अशा प्रकारें सर्वतोपरी जीवनाची चाळवाचाळव, नाचवानाचव, फुलवाफुलव करणारा सर्व काही परमेश्वरच शेवटीं होतो. माझ्या जीवनाचा तो 'महेश्वर' होतो. अशा प्रकारें विकास होता होता सारें जीवनच ईश्वरमय होतें. फक्त हा देहाचा पडदा राहतो. तो उडून गेला म्हणजे जीव व शिव, आत्मा व परमात्मा, एकच होतात.

**29** अशा प्रकारें **'उपद्रष्टाऽनुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वर:'** अशा स्वरूपात आपण परमात्म्याचा उत्तरोत्तर अधिकाधिक अनुभव घ्यावयाचा आहे. प्रभु प्रथम केवळ तटस्थपणें बघतो. मग नैतिक जीवनास आरंभ झाल्यावर हातून सत्कर्म होऊ लागतें व तो शाबासकी देतो. नंतर चित्ताचे सूक्ष्म मळ धुऊन काढण्यासाठी स्वत:चे प्रयत्न अपुरे पडल्यास भक्त जेव्हा हाक मारतो तेव्हा तो अनाथनाथ साहाय्यास धावतो. त्यानंतर फळहि देवाला अर्पण करून त्यालाच भोक्ता करावयाचें. आणि शेवटीं सारे संकल्पहि त्यालाच वाहून सारें जीवन हरिमय करावयाचें. असें हें मानवाचें अंतिम साध्य आहे. कर्मयोग व भक्तियोग या दोन पंखांनी उडत साधकाने अशी ही शेवटची मजल गांठावयाची.

## 74. नम्रता, निर्दंभता इत्यादि मूलभूत ज्ञान-साधना

**30** हें सारें करावयास नैतिक साधनेचा खंबीर पाया पाहिजे. सत्य-असत्य यांचा विवेक करून सत्य घ्यावयाचें. सारासार पाहून सार घ्यावयाचें. शिंपला टाकून मोती घ्यावयाचें. अशा प्रकारें जीवनास सुरुवात करावयाची. पुढे आत्म-प्रयत्न व परमेश्वरी कृपा यांच्या जोरावर वर चढत जावयाचें. या सर्व साधनेत जर देहापासून आत्मा अलग करावयास आपण शिकलेले असू तर फार साहाय्य होणार आहे. अशा वेळेस मला ख्रिस्ताचें बलिदान आठवतें. त्याला खिळे ठोकून मारीत होते. त्या वेळेस ख्रिस्ताच्या तोंडातून ''देवा, असे हे कां रे छळतात?'' असा उद्गार बाहेर पडला म्हणतात. परंतु लगेच भगवान् ख्रिस्तांनी आपला तोल सांभाळला व ते म्हणाले, ''देवा, तुझी इच्छा पूर्ण होवो. त्यांना क्षमा कर. आपण काय करतो तें त्यांना कळत नाही.'' ख्रिस्ताच्या या उदाहरणात फार मोठें स्वारस्य भरून राहिलें आहे. देहापासून आत्मा किती अलग केला पाहिजे त्याची ही खूण आहे. कोठपर्यंत मजल मारली पाहिजे व मारता येणें शक्य आहे, हें ख्रिस्ताच्या जीवनावरून कळून येतें. देह टरफलाप्रमाणे गळून पडत आहे, येथपर्यंत ही मजल येऊन पोंचली. जेव्हा जेव्हा

आत्मा देहापासून अलग करण्याचा विचार माझ्या मनात येतो तेव्हा ख्रिस्ताचें जीवन डोळ्यांसमोर उभे राहतें. देहापासून साफ अलग होणें, त्याचा संबंध सुटल्यासारखें होणें, ही गोष्ट ख्रिस्ताचें जीवन दाखवीत आहे.

**31** देह आणि आत्मा यांचें हें पृथक्करण सत्यासत्य-विवेकाखेरीज शक्य नाही. हा विवेक, हें ज्ञान अंगीं बाणलें पाहिजे. 'ज्ञान' ह्याचा अर्थ आपण 'जाणणें' करतो. परंतु 'बुद्धीने जाणणें' म्हणजे ज्ञान नव्हे. तोंडात बोकाणा भरला एवढ्याने जेवण होत नाही. तोंडात भरलेलें चर्वण करून गळीं उतरलें पाहिजे. तेथून पोटात गेलें पाहिजे, तेथे तें पचून त्याचा रस होऊन सर्व शरीरास रक्तरूपाने पुष्टि मिळाली पाहिजे. एवढें होईल तर तें खरें जेवण. त्याप्रमाणे बुद्धीने जाणून भागत नाही. जाणून जीवनात भिनलें पाहिजे, हृदयात मुरलें पाहिजे. तें ज्ञान हात, पाय, डोळे यांतून प्रकट झालें पाहिजे. सर्व ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें विचारपूर्वकच कर्म करीत आहेत असें झालें पाहिजे. म्हणून या तेराव्या अध्यायात भगवंतांनी ज्ञानाची फार सुंदर व्याख्या केली आहे. स्थितप्रज्ञाच्या लक्षणांप्रमाणेच हीं ज्ञानाचीं लक्षणें आहेत. **'नम्रता दंभ-शून्यत्व अहिंसा ऋजुता क्षमा'** वगैरे वीस गुण भगवंतांनी दिले आहेत. या गुणांना 'ज्ञान' म्हणूनच भगवान् थांबले नाहीत, तर त्याच्या उलट जें जें तें तें सारें अज्ञान असें त्यांनी स्वच्छ सांगितलें आहे. ज्ञानाची जी साधना सांगितली ती साधना म्हणजेच ज्ञान. सॉक्रेटिस म्हणे, ''सद्गुणालाच मी ज्ञान मानतो.'' साधना व साध्य एकरूपच आहेत.

**32** गीतेतील हीं वीस साधनें ज्ञानदेवांनी अठराच केलीं आहेत. ज्ञानदेवांनी हीं साधनें फार कळकळीने वर्णिलीं आहेत. या साधनांचे, या गुणांचे, पांचच श्लोक भगवद्गीतेत आहेत. परंतु ज्ञानदेवांनी विस्तार करून त्या पांच श्लोकांवर सातशें ओव्या लिहिल्या आहेत. सद्गुणांचा विकास समाजात व्हावा, सत्यस्वरूप परमात्म्याचा महिमा समाजात वाढावा, याची ज्ञानदेवांस तळमळ होती. ज्ञानदेवांनी या गुणांचें वर्णन करतांना आपला सारा अनुभव त्या ओव्यांत ओतला आहे. मराठी भाषा बोलणाऱ्यांवर त्यांचे हे अनंत उपकार आहेत. ज्ञानदेवांच्या रोमरोमामध्ये हे गुण भिनले होते. रेड्यावर मारलेल्या चाबकाचा वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उठला. भूतमात्राबद्दल असा त्यांना कळवळा होता. अशा कारुण्याने भरलेल्या हृदयातून ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी प्रकट केली. त्या गुणांचें त्यांनी विवेचन केलें. त्यांनी लिहिलेलें तें गुणवर्णन वाचावें, त्याचें मनन करावें, अंतरीं ठसवावें. ज्ञानदेवांची गोड भाषा मला चाखावयास मिळाली याची मला धन्यता वाटते. ज्ञानदेवांची गोड भाषा माझ्या तोंडात बसावी म्हणून पुन्हा मला जन्म प्राप्त झाला तरी धन्यता वाटेल. असो, उत्तरोत्तर विकास करून घेत, आत्म्यापासून देह अलग करीत करीत सर्वांनी सारें जीवन परमेश्वरमय करण्याचा प्रयत्न करावा.

***रविवार, 15-5-'32***

# अध्याय 14

# गुणोत्कर्ष आणि गुणनिस्तार

## 75. प्रकृतीची चिकित्सा

**1** बंधूंनो, आजचा चौदावा अध्याय एका अर्थी मागच्या अध्यायाचीच पूर्तता करणारा आहे. आत्म्याला खरोखर काही करून घ्यावयाचें आहे असें नाही. आत्मा स्वयंपूर्ण आहे. आपल्या आत्म्याची स्वाभाविकच ऊर्ध्वगामी गति आहे. परंतु एखाद्या वस्तूला जड वजन लावलें म्हणजे ती जशी खाली खेंचली जाते, त्याप्रमाणे या देहाचें ओझें आत्म्याला खाली खेंचतें. गेल्या अध्यायात आपण पाहिलें की कोणत्याहि उपायाने जर देह व आत्मा हे आपणांस पृथक् करता आले तर प्रगति करणें शक्य आहे. ही गोष्ट कठिण असली तरी त्यामुळे मिळणारें फळहि फार मोठें आहे. आत्म्याच्या पायातील देहाची बेडी जर आपण तोडू शकलो तर फार मोठा आनंद प्राप्त होणार आहे. मग मनुष्य देहाच्या दुःखाने दुःखी होणार नाही, तो स्वतंत्र होईल. ही एक देहरूपी वस्तु जिंकून घेतली तर मनुष्यावर कोण सत्ता चालविणार? जो स्वतःवर राज्य करतो तो विश्वाचा सम्राट होतो. देहाची आत्म्यावरील सत्ता दूर करा. देहाचीं सुखदुःखें हीं विदेशी आहेत, तीं परकीय आहेत. त्यांचा आत्म्याशी काडीइतका संबंध नाही.

**2** हीं सुखदुःखें किती प्रमाणात अलग करावयाचीं याची कल्पना भगवान् ख्रिस्ताच्या उदाहरणाने मी मागील वेळीं दिली होती. देह तुटून पडत असताहि अगदी शांत, आनंदमय राहणें हें ख्रिस्त दाखवीत आहे. परंतु देहाला आत्म्यापासून अलग करणें हें जसें एका बाजूने विवेकाचें काम आहे तसेंच तें दुसऱ्या बाजूने निग्रहाचें काम आहे. **'विवेकासहित वैराग्याचें बळ'** असें तुकारामांनी म्हटलें आहे. विवेक, वैराग्य, दोन्ही गोष्टी हव्यात. वैराग्य म्हणजेच एक प्रकारें निग्रह, तितिक्षा. या चौदाव्या अध्यायात निग्रहाची दिशा दाखविली आहे. होडी वल्हविण्याचें काम वल्हीं करतात. परंतु दिशा ठरविण्याचें काम सुकाणूं करतें. वल्हीं व सुकाणूं, दोन्ही गोष्टी हव्यात. त्याप्रमाणेच देहाच्या सुखदुःखापासून आत्म्याला अलग करण्याचें कामीं विवेक व निग्रह, दोहोंची जरूरी आहे.

**3** वैद्य ज्याप्रमाणे प्रकृति तपासून उपचार सांगतो, त्याप्रमाणे भगवंतांनी या चौदाव्या अध्यायात तमाम प्रकृति तपासून, पृथक्करण करून कोणते रोग जडले आहेत तें दाखविलें आहे. प्रकृतीची नीट विभागणी येथे केली आहे. राजनीतिशास्त्रात विभागणीचें मोठें सूत्र असतें. जो शत्रु समोर असेल त्याच्यात जर भाग पाडता आले, भेद पाडता आले, तर शत्रु लवकर जमीनदोस्त करता येतो. भगवंतांनी येथे तेंच केलें आहे.

माझी, तुमची, सर्व जंतूंची, सर्व चराचराची जी प्रकृति, तिच्यात तीन वस्तु आहेत. ज्याप्रमाणे आयुर्वेदात कफ, पित्त, वात, त्याप्रमाणे इकडे सत्त्व, रज, तम, हे तीन गुण प्रकृतीत भरून राहिले आहेत. सर्वत्र या तीन वस्तूंचा मसाला आहे. कोठे कमी, कोठे अधिक, एवढाच फरक. या तिन्हींपासून जेव्हा आत्म्याला अलग करू तेव्हाच देहापासून आत्म्याला अलग करता येईल. देहापासून आत्मा अलग करावयाचा मार्ग म्हणजे हे तिन्ही गुण तपासून त्यांना जिंकून घेणें. निग्रहाने एकेक वस्तु जिंकीत जिंकीत मुख्य वस्तूकडे जाऊन पोंचावयाचें.

## 76. तमोगुण आणि त्यावर उपाय : शरीर-परिश्रम

**4** प्रथम तमोगुण पाहू या. हल्लीच्या समाजस्थितीमध्ये तमोगुणाचे फारच भेसूर परिणाम दिसत आहेत. या तमोगुणाचा मुख्य परिणाम आळस. त्यातूनच पुढे झोप व प्रमाद. या तिन्ही गोष्टी जर जिंकता आल्या तर तमोगुण जिंकला असें म्हणता येईल. तमोगुणाच्या या तीन प्रकारांतील आळस ही एक फारच भयानक वस्तु आहे. उत्तमोत्तम माणसेंहि या आळसामुळे बिघडून जातात. समाजातील सर्व सुखशांतीचा नायनाट करणारा हा रिपु आहे. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना हा बिघडवितो. या शत्रूने सर्वांस व्यापिलें आहे. हा शत्रु आमच्यात शिरण्यासाठी टपलेला असतो. जरा संधि सांपडली की शिरलाच आंत. जरा दोन घास जास्त खा की लावलेंच लोळायला त्याने. जरा जास्त झोपा म्हणजे डोळ्यांवरून आळस जणू निथळतो आहे असें दिसतें. असा हा आळस जोंपर्यंत नाहीसा होत नाही तोंपर्यंत सारें व्यर्थ

आहे. परंतु आपण तर आळसासाठी उत्सुक असतो. भराभरा काम करून एकदा पैसे मिळवावे म्हणजे मग विश्रांति मिळेल अशी इच्छा असते. पुष्कळ पैसे मिळवावयाचे म्हणजे पुढच्या आळसाची तयारी करून ठेवायची! आपली अशी समजूत आहे की म्हातारपणीं विश्रांति हवीच. परंतु ही खोटी समजूत आहे. आपण जर नीट वागू तर म्हातारपणींहि काम देऊ. म्हातारपणीं तर आपण अनुभवी असल्यामुळे अधिक उपयोगी पडणार. तर त्या वेळेसच म्हणे विश्रांति!

**5** आळसास संधि न देणें यासाठी दक्ष राहिलें पाहिजे. एवढा मोठा नळ राजा, परंतु पाय धुतांना जरा त्याचा पाय कोरडा राहिला तर म्हणे तेथून तो कलि आंत शिरला! नळ राजा तर अत्यंत शुद्ध, सर्वतोपरी स्वच्छ. परंतु जरा अंग कोरडें राहिलें, तेवढा आळस राहिला, तर शिरलाच आंत कलि. आपलें तर सगळेंच अंग उघडें पडलेलें आहे. कोठूनहि आळसाने आंत शिरावें. शरीर आळसावलें म्हणजे मग मनोबुद्धिहि आळसावतात. आज समाजाची उभारणी या आळसावरच झाली आहे. यामुळे अनंत दु:खें आहेत. हा आळस जर आपण काढू शकलो तर, सगळीं नाही तरी निदान बरींचशीं दु:खें दूर करता येतील.

**6** हल्ली समाजसुधारणेची चर्चा सर्वत्र सुरू आहे. सामान्य माणसालाहि कमीत कमी इतकें सुख मिळालें पाहिजे व म्हणून समाजरचना कशी असावी इत्यादि चर्चा होत आहे. एकीकडे अतिशय सुख तर दुसरीकडे अत्यंत दु:ख आहे. एकीकडे संपत्तीचे ढीग तर दुसरीकडे दारिद्र्याचे खोल खड्डे. ही सामाजिक विषमता दूर कशी करावयाची? जरूर तेवढें सर्व सुख सहज मिळविण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे सर्वांनी आळस सोडून श्रम करावयास तयार होणें हा होय. मुख्य दु:ख आळसामुळेच आहे; शारीरिक श्रम करण्याचा जर सर्वांनी निश्चय केला तर हें दु:ख दूर होईल.

परंतु समाजात काय दिसतें? एका बाजूस गंजून गंजून निरुपयोगी होणारे लोक दिसतात. श्रीमंतांचे अवयव गंजून चालले आहेत. त्यांच्या शरीराला वापरच नाही. आणि दुसरीकडे इतकें काम चालू आहे की सर्व शरीर झिजून झिजून गळून गेलें आहे. सर्व समाजात शारीरिक श्रम टाळण्याची प्रवृत्ति आहे. मरेमरेतों ज्यांना काम करावें लागतें ते काही खुशीने श्रम नाही करीत. सुटकाच नाही म्हणून ते करतात. शहाणे लोक श्रम टाळण्यासाठी सबबी सांगतात. कोणी म्हणतात, ''उगीच शारीरिक श्रम करण्यात वेळ कां फुकट दवडावयाचा?'' परंतु हे असें मात्र म्हणणार नाहीत, ''ही झोप कशाला उगीच? हा जेवणात वेळ कां दवडावा?'' भूक लागते म्हणून खातो. झोप लागते म्हणून झोपतो. परंतु शारीरिक श्रमाचा प्रश्न उभा राहिला म्हणजे मात्र म्हणतो, ''उगीच शारीरिक श्रमात वेळ कां दवडावयाचा? काय म्हणून हें काम आम्ही करावें? कां राबावें? आम्ही मानसिक काम करून राहिलो आहोत!'' भल्या माणसा, मानसिक काम करतोस तर अन्न मानसिक खा व झोपहि मानसिक घे. मनोमय झोप व मनोमय अन्न घेण्याची योजना कर.

**7** समाजात अशा तऱ्हेने हे दोन भाग आहेत. एक मरमर मरणारे व दुसरे इकडची काडी तिकडे न करणारे. माझे एक मित्र म्हणाले, ''काही डोकीं व काही खोकीं.'' एकीकडे फक्त धड आहे व दुसरीकडे मुंडकें. धडाने फक्त झिजावयाचें, डोक्याने फक्त विचार करावयाचा. असे राहु, केतु, धडें व मुंडकीं हे प्रकार समाजात झाले आहेत. परंतु खरोखरच केवळ मुंडकीं व धडें असतील तरी बरें होईल. मग अंध-पंगु-न्यायाने काही व्यवस्था तरी करता येईल. आंधळ्याला पांगळ्याने रस्ता दाखवावा, पांगळ्याला आंधळ्याने खांद्यावर घ्यावें. परंतु धडें व मुंडकीं यांचे असे केवळ अलग गट नाहीत. प्रत्येकाला धड आहे व मुंडकें आहे. रुंडमुंडांची ही जोडगोळी सर्वत्र आहे. याला काय करावयाचें? म्हणून प्रत्येकाने आळस सोडलाच पाहिजे.

**8** आळस सोडावयाचा म्हणजे शरीर-परिश्रम करावयाचा. आळस जिंकण्याचा हाच उपाय आहे. हा उपाय अंमलात आणला नाही तर त्याची शिक्षाहि निसर्ग भोगावयास लावील. रोगाच्या किंवा अन्य कोणत्या तरी रूपाने शिक्षा भोगणें सुटत नाही. शरीर ज्या अर्थीं आम्हाला दिलेलें आहे, त्या अर्थीं श्रम हे करावे लागणारच. शरीर-श्रमात गेलेला वेळ फुकट जात नाही. त्याचा मोबदला मिळतो. आरोग्य उत्तम लाभतें. बुद्धि सतेज, तीव्र व शुद्ध होते. पुष्कळ विचारवंतांच्या विचारांतहि त्यांच्या पोटदुखीचें व डोकेंदुखीचें प्रतिबिंब उमटतें. विचारवंत जर उन्हात, मोकळ्या हवेत, सृष्टीच्या सान्निध्यात मेहनत करील तर त्याचे विचारहि तेजस्वी होतील. शारीरिक रोगाचा जसा मनावर परिणाम होतो, त्याप्रमाणे शारीरिक आरोग्याचाहि परिणाम होतो, ही अनुभवाची गोष्ट आहे. पुढे क्षयरोग जडल्यावर पांचगणीला

टेकडीवर हवा खावयास जावयाचें किंवा सूर्यकिरणांचे प्रयोग करावयाचे, त्याच्या आधीच जर बाहेर कुदळी घेऊन खणले, बागेला पाणी घातलें, लाकडें फोडलीं तर काय वाईट?

## 77. तमोगुणावर आणखी उपाय

**9** आळस जिंकणें ही एक गोष्ट. दुसरी गोष्ट म्हणजे झोप जिंकणें. झोप ही वस्तुत: पवित्र गोष्ट आहे. सेवा करून थकलेल्या साधुसंतांची झोप म्हणजे तो योगच आहे. अशा प्रकारची शांत व गाढ झोप महाभाग्यवंताला लाभते. झोप खोल असावी. झोपेचें महत्त्व लांबी-रुंदीवर नाही. बिछाना किती लांब व माणूस त्यावर किती वेळ होता यावर झोप अवलंबून नाही. विहीर खोल असेल तर पाणी अधिक स्वच्छ व मधुर असतें. त्याप्रमाणे झोप जरी थोडी असली पण खोल असली तर उत्तम कार्य होतें. अर्धा तास मन लावून केलेला अभ्यास चंचल वृत्तीने केलेल्या तीन तास अभ्यासापेक्षा अधिक फळ देतो. झोपेचें तसेंच आहे. लांबलचक झोप हितपरिणामी असतेच असें नाही. रोगी चोवीस तास बिछान्यावर असतो. बिछान्याची व त्याची सारखी गांठ असते. परंतु झोपेशी गांठ पडत नाही. खरी झोप ही गाढ, नि:स्वप्न अशी असते. मेल्यावर यमयातना काय असतील त्या असोत, परंतु झोप न येणाऱ्याला, दु:स्वप्नांनी घेरलेल्याला, कोण यमयातना! वेदामध्ये तो ऋषि त्रस्त होऊन म्हणतो – ‘‘**परा दु:स्वप्न्यं सुव**’’ – ‘‘नको नको ती अशी दुष्ट झोप!’’ झोप ही विश्रांतीसाठी असते. परंतु झोपेतहि नाना स्वप्नें व विचार छातीवर बसतील तर कोठली विश्रांति?

**10** गाढ व खोल झोप कशी मिळावी? जो उपाय आळसावर सांगितला तोच येथेहि योजावयाचा. देह सारखा वापरला पाहिजे, म्हणजे मग अंथरुणावर पडताच मनुष्य मेल्यासारखा पडेल. झोप म्हणजे लहानसा मृत्युच. अशी सुंदर झोप लागावी म्हणून दिवसा पूर्वतयारी चांगली पाहिजे. शरीर थकून गेलें पाहिजे. त्या इंग्रज कवि शेक्सपिअरने म्हटलें आहे, ‘‘राजाच्या डोक्यावर मुकुट आहे, परंतु डोक्यात चिंता आहे!’’ त्या राजाला झोप येत नाही. त्याचें एक कारण म्हणजे शारीरिक श्रम तो करीत नाही. जागृतीत जो झोप घेतो तो झोपेच्या वेळेस जागा राहणार. दिवसा बुद्धि व शरीर न वापरणें म्हणजे झोपच ती. मग झोपेच्या वेळीं बुद्धि विचार करीत हिंडते व शरीरासहि खरें निद्रासुख लाभत नाही. मग लांबलचक निजत पडायचें. ज्या जीवनात परम पुरुषार्थ साधावयाचा तें जीवन जर झोपेने खाल्लें तर पुरुषार्थ संपादावयाचा केव्हा? निम्में आयुष्य जर झोपेतच गेलें तर मग काय मिळवावयाचें?

**11** पुष्कळ वेळ झोपेतच गेला की तमोगुणाची तिसरी गोष्ट जी ‘प्रमाद’ ती सहजच घडते. झोपाळु मनुष्याचें चित्त दक्ष व सावध नसतें. त्याने अनवधान उत्पन्न होतें. फार झोपेने पुन्हा आळस उद्भवतो व आळसाने विसर पडतो. विस्मरण ही परमार्थाचा नाश करणारी वस्तु आहे. व्यवहारातहि विस्मरणाने हानि होते. परंतु आमच्या समाजात विस्मरण ही स्वाभाविक क्रिया होऊन गेली आहे. विस्मरण म्हणजे महान् दोष असें कोणाला वाटतच नाही. कोणाला भेटावयास जाण्याचें ठरविलें असावें, परंतु भेटावयाला जात नाही. आणि विचारलें तर म्हणतो, ‘‘विसरलो बुवा!’’ असें सांगणाऱ्यालाहि काही मोठी चूक झाली असें वाटत नाही व ऐकणारालाहि समाधान होतें. विस्मरणावर इलाजच नाही अशी समजूत झाल्यासारखी दिसते. परंतु असा हा बेभानपणा परमार्थात वा प्रपंचात, उभयत्र हानिकारकच आहे. विस्मरण हा मोठा रोग आहे. त्याने बुद्धीला कीड लागते. जीवन पोखरलें जातें.

**12** मनाचा आळस हें विस्मरणाचें कारण. मन जागृत असेल तर तें विसरणार नाही. लोळणाऱ्या मनाला विस्मरणाचा रोग जडलाच समजा. म्हणूनच भगवान् बुद्ध म्हणत असत – ‘**पमादो मच्चुनो पदं**’. विस्मरण म्हणजे मरणच होय.

या प्रमादाला जिंकण्यासाठी आळस, निद्रा जिंकून घ्या, शरीर-परिश्रम करा, व सतत सावध रहा. जी जी कृति करावयाची ती विचारपूर्वक करा. कृति उगीच सहजासहजी होता कामा नये. कृतीच्या आधी विचार, मागून विचार. पुढून मागून सर्वत्र विचाररूप परमेश्वर उभा असावा. अशी सवय लावीत जाऊ तर अनवधानतेचा रोग दूर होईल. सारा वेळ नीट बांधून ठेवा. क्षणाक्षणाचा हिशेब राखा, म्हणजे आळसाला बोट शिरकावण्यास जागा राहणार नाही. अशा रीतीने सर्व तमोगुण जिंकावयाचा प्रयत्न केला पाहिजे.

## 78. रजोगुण आणि त्यावर उपाय : स्वधर्म-मर्यादा

**13** नंतर रजोगुणाकडे मोर्चा वळवावयाचा. रजोगुणहि एक भयानक शत्रु आहे. तमोगुणाचीच ही दुसरी बाजू. दोन्ही पर्यायशब्दच आहेत असें म्हटलें पाहिजे. शरीर खूप निजून राहिलें म्हणजे मग तें चळवळ करूं लागतें. आणि खूप धावपळ करणारें शरीर पडू इच्छितें. तमोगुणातून रजोगुण भेटतो व रजोगुणातून तमोगुणाची भेट होते. एक आहे तेथे दुसरा आहेच. ज्याप्रमाणे पोळी एकीकडे आग व दुसरीकडे फुपाटा यांत सांपडते, त्याप्रमाणे मनुष्याच्या मागे पुढे हे रजस्तमोगुण लागलेलेच आहेत. रजोगुण म्हणतो, ''इकडे ये, तुला तमोगुणाकडे उडवतो.'' तमोगुण म्हणतो, ''माझ्याकडे ये की रजोगुणाकडे फेकतो.'' असे हे रजोगुण व तमोगुण परस्पर साहाय्यक होऊन माणसाचा नाश करतात. फुटबॉलचा जन्म लाथा खाण्यासाठी, तद्वत् रजोगुणाच्या व तमोगुणाच्या लाथा खाण्यातच माणसाचा जन्म जातो.

**14** रजोगुणाचें प्रधान लक्षण म्हणजे नाना प्रकारचीं कार्यें करण्याचा हव्यास. अचाट कर्मांची अपार आसक्ति. रजोगुणामुळे अपरंपार कर्मसंग जडतो. लोभात्मक कर्मासक्ति उत्पन्न होते. मग वासनाविकारांचा वेग आवरत नाही. इकडचा डोंगर तिकडे रचावा व तिकडचा खळगा भरून काढावा असें वाटतें. समुद्रात माती ओतून समुद्र बुजवावा आणि सहारा वाळवंटात पाणी सोडून तेथे समुद्र करावा असें वाटतें. इकडे सुवेजचा कालवा खणू, तिकडे पनामा बनवू, अशी ही उठाठेवीची हौस असते. हें मोडू तें जोडू. लहान मुलगा चिंधी घेतो, ती फाडतो, तिचे दुसरें काही करतो, तसेंच हें. हें त्यात मिसळ, तें ह्यात मिसळ. तें बुडव, हें उडव. असे हे रजोगुणाचे अनंत खेळ असतात. पक्षी आकाशात उडतो, आपणांसहि उडता आलें पाहिजे. मासा पाण्यात राहतो, आपणांसहि पाणबुडी काढून तसें केलें पाहिजे. अशा प्रकारें नरदेहात येऊन पक्ष्यांची व माशांची बरोबरी करण्यात त्याला कृतार्थता वाटते. परकाया-प्रवेशाचे, दुसऱ्या देहांचीं कौतुकें अनुभवायचे हे डोहाळे त्याला नरदेहात सुचत असतात. कोणाला वाटते, मंगळावर उडावें व तेथील वस्ती पहावी. चित्त सारखें भ्रमण करीत असतें. नाना वासनांचें जसें काही भूत शिरतें अंगात. जें जेथे आहे, तें तेथे पाहवतच नाही. घडामोड पाहिजे. मी एवढा मनुष्यप्राणी जिवंत असतांना ही सृष्टि तशीच कशी राहणार, असें त्याला वाटतें. जसा एखादा पहिलवान असतो, त्याच्या अंगात खुमखुमी असते. ती जिरवण्यासाठी तो भिंतीलाच तडाखे देतो, झाडाला धक्के देतो. तशी रजोगुणाची उसळी असते. ही उसळी आली म्हणजे पृथ्वीला खणून तो काही दगड बाहेर काढतो व त्यांना हिरे-माणकें अशीं नांवें देतो. या उसळीसरशी तो समुद्रात बुडी घेतो. तळचा कचरा वर आणतो व त्याला मोतीं हें नांव देतो. परंतु त्या मोत्याला नसतें भोंक. मग त्या मोत्यांना भोकें पाडतात. परंतु तीं मोतीं कोठे घालावयाचीं? मग नाकाकानांसहि सोनाराकडून भोंकें पाडून घेतात. असे हे सारे प्रकार माणूस कां करतो? हा सारा रजोगुणाचा प्रभाव आहे.

**15** रजोगुणाचा दुसरा परिणाम म्हणजे माणसात स्थिरता राहत नाही. रजोगुणाला फळ तत्काळ हवें असतें. म्हणून जरा अडथळा येताच मनुष्य घेतलेला मार्ग सोडतो. रजोगुणी मनुष्य हें सोड, तें धर अशी सारखी धरसोड करतो. रोज नवीन निवडानिवड. याचा परिणाम, शेवटीं हातीं काहीच पडत नाही.

**'राजसं चलमध्रुवम्'**

– रजोगुणाची कृतिच चल व अनिश्चित आहे. लहान मुलें गहूं पेरतात व लगेच उपटून पाहतात. रजोगुणी मनुष्याचें असेंच असतें. भराभर सारें पदरात पडलें पाहिजे. तो अधीर होतो. त्याला संयम राहत नाही. एके ठिकाणीं पाय रोवणें त्याला माहीत नाही. येथे थोडें काम केलें, जरा तेथे बोलबाला झाला, की चालला दुसरीकडे. आज मद्रासला मानपत्र, उद्या कलकत्त्याला, परवा मुंबई-नागपूरला! जेवढ्या म्युनिसिपालिट्या असतील तेवढीं मानपत्रें मिळावीं अशी त्याला हाव सुटते. मान ही एकच वस्तु त्याला दिसते. एके ठिकाणीं स्थिरपणें काम करण्याची त्याला सवयच नसते. यामुळे रजोगुणी माणसाची फार भयानक स्थिति होते.

**16** रजोगुणामुळे मनुष्य नाना धंद्यांत लुडबुड करतो. त्याला स्वधर्म राहत नाही. वास्तविक स्वधर्माचरण म्हणजे इतर नाना कर्मांचा त्याग करणें. गीतेतील कर्मयोग हा रजोगुणावर तोडगा आहे. रजोगुणात सारेंच चंचळ. पर्वताच्या माथ्यावर पडणारें पाणी जर नाना दिशांनी वाहत गेलें तर तें कोठेच राहत नाही, सारें नाहीसें होतें. परंतु तेंच सारें पाणी जर एका दिशेने वाहत जाईल तर त्या पाण्याची पुढे नदी होईल. तिच्यात शक्ति उत्पन्न होईल. तिचा देशाला उपयोग होईल. त्याप्रमाणेच मनुष्य जर आपली सारी शक्ति नाना प्रकारच्या उद्योगांत न दवडता ती एकत्र करून एकाच कार्यात सुव्यवस्थितपणें ओतील, तरच त्याच्या हातून काही कार्य होईल. म्हणून स्वधर्मास महत्त्व आहे.

स्वधर्माचें सतत चिंतन करून त्यातच सर्व शक्ति वेचली पाहिजे. अन्य वस्तूकडे लक्षच जाता कामा नये. हीच स्वधर्माची कसोटी आहे. कर्मयोग म्हणजे अति किंवा अचाट कर्म नव्हे. केवळ पुष्कळ कर्म करणें म्हणजे कर्मयोग नव्हे. गीतेचा कर्मयोग निराळी वस्तु आहे. फळाकडे लक्ष न ठेवता केवळ स्वभावप्राप्त अपरिहार्य असा स्वधर्म आचरणें व तद्द्वारा चित्तशुद्धि करीत राहणें हा कर्मयोगाचा विशेष आहे. नाही तर कर्म करणें सृष्टीत सारखें चाललेंच आहे. कर्मयोग म्हणजे विशिष्ट मनोवृत्तीने सारें करणें. शेतात धान्य पेरणें व मूठभर घेऊन कोठे तरी फेकणें या दोन्ही गोष्टी फार निराळ्या आहेत. या दोहींमध्ये महदंतर आहे. धान्य पेरलें तर केवढें फळ मिळतें आणि फेकलें तर कसें नुकसान होतें हें आपण पाहतोच. गीता जें कर्म सांगते तें पेरणीप्रमाणे आहे. अशा स्वधर्मरूप कर्तव्यात फार शक्ति असते. तेथे सर्व परिश्रम अपुरे पडतात. त्यामुळे धावपळीस अवसरच राहत नाही.

## 79. स्वधर्म कसा ठरवावा

**17** हा स्वधर्म ठरवायचा कसा, असा जर कोणी प्रश्न करील तर 'तो स्वाभाविक असतो' हेंच त्याला उत्तर. स्वधर्म सहज असतो. तो शोधण्याची कल्पनाच चमत्कारिक वाटते. मनुष्य जन्मला त्याच वेळीं त्याचा स्वधर्महि जन्मला. मुलाला आई जशी शोधावी लागत नाही त्याचप्रमाणे स्वधर्म शोधावा लागत नाही. तो अगाऊच मिळालेला आहे. आपल्यापूर्वी दुनिया होती, आपल्यानंतर राहील. आपल्यामागे मोठा प्रवाह होता व पुढेहि तो आहे. अशा प्रवाहात आपण जन्मतो. ज्या आईबापांच्या पोटीं जन्मलो त्यांची सेवा, ज्या शेजाऱ्यांमध्ये जन्मतो त्यांची सेवा, या गोष्टी निसर्गत:च मला मिळाल्या. शिवाय माझ्या वृत्ति तर माझ्या अनुभवाच्याच आहेत ना? मला भूक लागते, तहान लागते. तर भुकेलेल्याला जेवू घालणें, तहानेल्याला पाणी पाजणें, हा धर्म मला ओघानेच लाभला. अशा प्रकारचा हा सेवारूप, भूतदयारूप स्वधर्म आपणांस शोधावा लागत नाही. जेथे स्वधर्माचा शोध चालला आहे तेथे काहीतरी परधर्म किंवा अधर्म चालला आहे असें निश्चित समजावें.

सेवकाला सेवा धुंडाळावी लागत नाही, ती आपण होऊन त्याच्याकडे येते. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की अनायासें लाभलेलें नेहमी धर्म्यच असतें असें नाही. एखाद्या शेतकऱ्याने जर मला रात्रीं म्हटलें, ''चल, तें पलीकडचें कुंपण आपण चार-पांच हात पुढे सारू. माझें शेत वाढेल. बिनबोभाट काम होईल.'' तें काम जरी शेजारी मला सांगत आहे, तें ओघाने आलेंसें दिसलें, तरी तें असत्य असल्यामुळे माझें कर्तव्य ठरत नाही.

**18** चातुर्वर्ण्याची व्यवस्था मला गोड वाटते, याचें कारण हेंच की तीत स्वाभाविकता आणि धर्म आहे. हा स्वधर्म टाळून चालणार नाही. जे आईबाप मला लाभले तेच माझे आईबाप. ते मला पसंत नाहीत असें म्हणून कसें चालेल? आईबापांचा धंदा स्वभावत:च मुलाला प्राप्त होत असतो. जो धंदा पूर्वापार चालत आला तो जर नीति-विरुद्ध नसेल तर तो करणें, तोच उद्योग पुढे चालविणें, हा चातुर्वर्ण्यातील एक मोठा विशेष आहे. चातुर्वर्ण्य आज बिघडलें आहे. त्याची अंमलबजावणी करणें कठिण झालें आहे. परंतु त्याची घडी जर नीट बसवता आली तर फार सुंदर होणार आहे. नाही तर हल्ली पहिलीं पंचवीस-तीस वर्षें नवीन धंदा शिकण्यातच जातात. धंदा शिकल्यावर मग सेवेचीं, कर्माचीं क्षेत्रें मनुष्य धुंडाळतो. अशा प्रकारें पहिलीं पंचवीस वर्षें शिकतच असतो. ह्या शिकण्याचा जीवनाशी संबंधच नाही. तो म्हणे पुढच्या जगण्याची तयारी करीत आहे. म्हणजे शिकतांना जगत नसतो एकूण! जगायचें नंतर. आधी म्हणे सारें शिकावयाचें व मागाहून जगावयाचें. जगणें व शिकणें ह्या वस्तु जशा अलगच केल्या गेल्या आहेत! परंतु जेथे जगण्याचा संबंध नाही तें मरणेंच म्हणावयाचें. हिंदुस्थानातील सरासरी आयुर्मर्यादा तेवीस वर्षें, आणि पंचवीस वर्षांपर्यंत हा तयारीच करीत

असतो. अशा प्रकारें प्रथम नवीन धंदा शिकण्यात दिवस जातात. मग कोठे तो धंदा करावयाचा. यामुळे उमेदीचीं व महत्त्वाचीं वर्षें फुकट जातात. जो उत्साह, जी उमेद जनसेवेत खर्च करून देहाचें सार्थक करावयाचें तीं अशीं फुकट जातात. जीवन म्हणजे खेळ नाही, परंतु जीवनाचा धंदा हुडकण्यातच पहिलें मोलाचें आयुष्य निघून जातें ही दु:खाची गोष्ट आहे. हिंदुधर्माने एवढ्याचसाठी वर्णधर्माची युक्ति काढली.

**19** पण चातुर्वर्ण्याची कल्पना जरी बाजूस ठेवली तरीहि सर्व राष्ट्रांत, सर्वत्र, जेथे चातुर्वर्ण्य नाही तेथेहि, स्वधर्म सर्वांना प्राप्त झालेला आहे. आपण सारे एका प्रवाहात, काही एका परिस्थितीसह जन्मलो असल्यामुळे स्वधर्माचरणरूप कर्तव्य आपोआपच प्राप्त झालेलें असतें. म्हणून दूरचीं कर्तव्यें – तीं कर्तव्यें म्हणणें गौणच – कितीहि चांगलीं दिसलीं तरी तीं घेता कामा नयेत. पुष्कळ वेळा दूरचें चांगलें दिसतें. मनुष्य दूरच्यावर भुलतो. मनुष्य उभा असतो तेथेहि दाट धुकें असतें. परंतु तें जवळचें त्याला दिसत नाही व तो दूर बोट करून म्हणतो, ''तेथे धुकें दाट आहे.'' तिकडचा मनुष्य ह्याच्याकडे बोट करून म्हणतो, ''तिकडे धुकें दाट आहे.'' धुकें सर्वत्रच आहे. परंतु जवळचें दिसत नाही. मनुष्यास दूरचें आकर्षण वाटत असतें. जवळचें कोपऱ्यात बसतें व लांबचें स्वप्नात दिसतें. परंतु हा मोह आहे. हा टाळलाच पाहिजे. प्राप्तस्वधर्म साधा असला, कमी वाटला, नीरस भासला, तरी जो मला प्राप्त तोच भला, तोच सुंदर. समुद्रात बुडणाऱ्याला समजा एखादा ओबडधोबड ओंडका मिळाला, तो जरी पॉलिश केलेला गुळगुळीत सुंदर नसला तरी तोच तारील. सुताराच्या कारखान्यात पुष्कळ रेखीव व नक्षीचे ठोकळे असतील. परंतु ते राहिले कारखान्यात व हा येथे समुद्रात बुडतो आहे. ह्याला तो ओंडकाच जसा तारक, तोच त्याने धरला पाहिजे; त्याप्रमाणेच जी सेवा मला प्राप्त झाली – ती जरी गौण वाटली तरी – तीच मला उपयोगी. तिच्यातच मग्न होऊन राहणें मला शोभतें. त्यातच माझा उद्धार आहे. दुसरी सेवा शोधायला जाईन तर तीहि जायची व पहिलीहि जायची. अशामुळे सेवावृत्तीलाच मी आंचवतो. म्हणून स्वधर्मरूप कर्तव्यात मग्न राहिलें पाहिजे.

**20** स्वधर्मात मग्न झालें म्हणजे रजोगुण फिका पडतो. कारण चित्त एकाग्र होतें. स्वधर्माव्यतिरिक्त तें कोठेहि जात नाही. त्यामुळे चंचल रजोगुणाचा सारा जोरच जिरून जातो. नदी शांत व खोल असली म्हणजे कितीहि पाणी आलें तरी ती तें आपल्या पोटात जिरवून घेते. स्वधर्माची नदी मनुष्याचें सारें बळ, सारा वेग, सारी शक्ति जिरवू शकते. स्वधर्मात जितकी शक्ति वेचाल तितकी थोडीच आहे. स्वधर्मात शक्तिसर्वस्व ओता म्हणजे रजोगुणाची धावपळ करण्याची वृत्ति नाहीशी होईल. चंचलत्वाची नांगीच मोडल्यासारखी होईल. अशा तऱ्हेने रजोगुण जिंकावयाचा.

## 80. सत्त्वगुण आणि त्यावर उपाय

**21** आता उरला सत्त्वगुण. याच्याशी फार जपून वागलें पाहिजे. याच्यापासून आत्म्याला अलग कसें करावयाचें? सूक्ष्म विचाराची ही गोष्ट आहे. सत्त्वगुणाचा अजीबात निकाल नाही लावायचा. रज-तमांचा संपूर्ण उच्छेदच करावा लागतो. परंतु सत्त्वगुणाची भूमिका जरा निराळी आहे. पुष्कळ समुदाय जमला आहे आणि त्याला काढून लावायचें आहे, तर 'कमरेच्या वर गोळ्या न झाडता खालीं पायांवर गोळ्या झाडा' असा शिपायांना हुकूम देतात. यामुळे मनुष्य मरत नाही, परंतु घायाळ होतो. त्याप्रमाणे सत्त्वगुणाला घायाळ करावयाचें, ठार मारायचें नाही. रजोगुण व तमोगुण गेल्यावर शुद्ध सत्त्वगुण राहतो. शरीर आहे तोंपर्यंत कोठल्या तरी भूमिकेवर राहणें प्राप्त आहे. रज-तम गेल्यावर जो सत्त्वगुण राहणार त्याच्यापासून अलग व्हावयाचें म्हणजे काय?

सत्त्वगुणाचा अभिमान जडतो. तो अभिमान शुद्ध स्वरूपापासून आत्म्याला खाली पाडतो. एखाद्या कंदिलातील ज्योतीची प्रभा स्वच्छपणें बाहेर पडावी म्हणून आंतील काजळी पुसून टाकावी लागते. काजळी तर पुसून टाकली, परंतु कांचेवर धूळ बसली आहे तर तीहि पुसून टाकावी लागते. त्याप्रमाणे आत्म्याच्या प्रभेभोंवती जी तमोगुणाची काजळी असते ती झडझडून दूर केलीच पाहिजे. नंतर रजोगुणाची धूळहि साफ केली पाहिजे. तमोगुण धुतला, रजोगुण साफ केला. आता शुद्ध सत्त्वगुणाची कांच राहिली. हा सत्त्वगुणहि दूर करावयाचा म्हणजे का कांच फोडावयाची? नाही. कांच फोडल्याने दिव्याचें कार्य होणार नाही. ज्योतीचा प्रकाश फांकण्यासाठी कांच तर पाहिजेच. ही शुद्ध चकचकीत कांच फोडून न टाकता, डोळे तिच्यामुळे दिपून जाऊ नयेत म्हणून लहानसा कागदाचा तुकडा आड धरावयाचा. डोळे दिपू

द्यायचे नाहीत. सत्त्वगुण जिंकणें म्हणजे त्याबद्दलचा अभिमान, त्याबद्दलची आसक्ति दूर करणें. सत्त्वगुणापासून काम तर करून घ्यायचें, परंतु जपून युक्तीने घ्यायचें. सत्त्वगुणाला निरहंकारी करावयाचें.

**22** हा सत्त्वगुणाचा अहंकार कसा जिंकावयाचा? याला एक उपाय आहे. सत्त्वगुण आपल्या ठिकाणीं स्थिर करावयाचा. सत्त्वगुणाचा अभिमान सातत्याने जातो. सत्त्वगुणाचीं कर्में सतत करून तो स्वभावच करायचा. सत्त्वगुण कोणी घटकाभर आलेला पाहुणा असें न होता, तो घरचा करून टाकावयाचा. जी क्रिया कधीमधी आपल्या हातून होते तिचा आपणांस अभिमान वाटतो. आपण रोज झोपतो हें दुसऱ्यास सांगत बसत नाही. परंतु एखाद्या आजाऱ्याला पंधरा दिवसांत झोप आली नाही व मग जर थोडी आली तर तो सर्वांना सांगतो, ''काल थोडी झोप लागली बुवा.'' त्याला ती गोष्ट महत्त्वाची वाटते. किंवा याहून चांगलें उदाहरण घ्यायचें तर श्वासोच्छ्वासाचें घेता येईल. चोवीस तास सारखा श्वासोच्छ्वास चालला आहे, परंतु आपण ते येणाऱ्या-जाणाऱ्याला सांगत नाही. ''मी श्वासोच्छ्वास करणारा थोर प्राणी'' अशी प्रौढी कोणी सांगत नाही. हरिद्वारला गंगेत सोडलेली काडी कलकत्त्यापर्यंत पंधराशें मैल वाहत गेली तर त्याची ऐट ती काडी मारणार नाही. ती सहज प्रवाहाबरोबर वाहत आली. परंतु कोणी भर पुरात प्रवाहाविरुद्ध जर दहा हात पोहून गेला तर तो केवढी ऐट मारील? सारांश, जी स्वाभाविक वस्तु आहे तिचा अहंकार वाटत नाही.

**23** एखादे चांगलें कृत्य हातून झालें तर अभिमान वाटतो. कां? कारण ती गोष्ट सहज झालेली नाही म्हणून. बाळ्याच्या हातून एखादी चांगली गोष्ट झाली तर आई त्याच्या पाठीवरून हात फिरवितें. नाही तर त्याच्या पाठीची व आईच्या काठीचीच सदा गांठ असावयाची. रात्रीच्या गाढ अंधारात एखादाच काजवा असावा. मग त्याची ऐट काय विचारता? तो सारी चमक एकदम दाखवीत नाही. मधेच लुकलुकतो, मग थांबतो. पुन: लुकलुकतो. प्रकाशाची उघडझांप तो करीत असतो. त्याचा प्रकाश सतत राहील तर त्यात ऐट राहणार नाही. सातत्यात विशेष वाटेनासें होतें. त्याप्रमाणे सत्त्वगुण आपल्या क्रियांतून जर सतत प्रकट होऊ लागला तर पुढे तो आपला स्वभावच होईल. सिंहाला शौर्याचा अभिमान नसतो. त्याला त्याची जाणीवहि नसते. त्याप्रमाणे सात्त्विक वृत्ति इतकी सहज होऊ दे की आपण सात्त्विक आहोत याची स्मृतिहि होणार नाही. प्रकाश देणें ही सूर्याची नैसर्गिक क्रिया. तिच्याबद्दल त्याला अभिमान नसतो. सूर्याला जर त्याबद्दल मानपत्र द्यावयास गेलात तर तो म्हणेल, ''मी विशेष तें काय करतो? मी प्रकाश देतो म्हणजे काय करतो? प्रकाश देणें म्हणजेच माझें जगणें. प्रकाश न देईन तर मी मरेन. मला दुसरें माहीतच नाही.'' हें जसें त्या सूर्याचें, तसें सात्त्विक मनुष्याचें झालें पाहिजे. सत्त्वगुण सर्व रोमरोमांत भिनवून घ्यावयाचा. सत्त्वगुणाचा असा स्वभावच बनला म्हणजे मग त्याचा अहंकार वाटणार नाही. सत्त्वगुण फिका पाडण्याची, सत्त्वगुण जिंकण्याची, ही एक युक्ति झाली.

**24** आता दुसरी युक्ति म्हणजे सत्त्वगुणाची आसक्तिसुद्धा सोडावयाची. अहंकार व आसक्ति या दोन निरनिराळ्या वस्तु आहेत. हा जरा सूक्ष्म विचार आहे. दृष्टांताने लवकर समजेल. सत्त्वगुणाचा अहंकार गेला तरी आसक्ति राहते. श्वासोच्छ्वासाचेंच उदाहरण घेऊ. श्वासोच्छ्वासाचा अभिमान नाही वाटत. परंतु तेथे फार मोठी आसक्ति असते. पांच मिनिटें श्वासोच्छ्वास करू नका म्हटलें तर होत नाही. नाकाला श्वासोच्छ्वासाचा अभिमान नसेल वाटत, परंतु हवा सारखी तें घेत असतें. सॉक्रेटिसाची गंमत आहे ना. सॉक्रेटिसाचें नाक होतें फेंदरें. लोक त्याला हसत. परंतु विनोदी सॉक्रेटिस म्हणे, ''माझेंच नाक सुंदर आहे. मोठ्या नाकपुड्यांचें नाक भरपूर हवा आंत ओढून घेतें म्हणून तेंच सुंदर.'' तात्पर्य, नाकाला श्वासोच्छ्वासाचा अहंकार नाही, परंतु आसक्ति आहे. सत्त्वगुणाचीहि अशीच आसक्ति वाटते. उदाहरणार्थ – भूतदया. हा गुण अत्यंत उपयुक्त आहे. परंतु त्याच्याहि आसक्तीपासून दूर होता आलें पाहिजे. भूतदया हवी, परंतु आसक्ति नको.

संत सत्त्वगुणामुळे इतरांना मार्गदर्शक होतात. त्यांचा देह भूतदयेमुळे सार्वजनिक झालेला असतो. माशा ज्याप्रमाणे गुळाला झांकोळून टाकतात त्याप्रमाणे सारी दुनिया संतांवर प्रेमाचें पांघरूण घालते. संतांच्या ठायीं प्रेमाचा इतका प्रकर्ष होतो की अवघें विश्व त्यांच्यावर प्रेम करतें. संत आपल्या देहाची आसक्ति सोडतात, परंतु सर्व जगाची आसक्ति त्यांच्या ठिकाणीं जडते. सर्व जग त्यांच्या देहाला सांभाळू लागतें. परंतु हीहि आसक्ति संतांनी दूर केली पाहिजे. हें जें जगाचें प्रेम, हें जें थोर फळ, त्यापासून आत्मा अलग केला पाहिजे. मी कोणी विशेष, असें कधी वाटता कामा नये. अशा प्रकारें सत्त्वगुण अंगीं पचवून टाकावा.

**25** प्रथम अहंकार जिंकावा, मग आसक्ति जिंकावी. सातत्याने अहंकार जिंकता येईल. फलासक्ति सोडून सत्त्वगुणामुळे मिळणारें फळहि ईश्वरार्पण करून आसक्ति जिंकावयाची. जीवनात सत्त्वगुण स्थिर केल्यावर कधी सिद्धीच्या रूपाने तर कधी कीर्तीच्या रूपाने फळ पुढे उभें राहतें. परंतु तें फळहि तुच्छ लेखा. आंब्याचें झाड एकहि फळ स्वत: खात नाही. तें फळ कितीहि मोहक असो, रसाळ असो. तें फळ खाण्यापेक्षा न खाणेंच त्याला मधुरतर असतें. उपभोगापेक्षा त्याग गोड आहे.

**26** धर्मराजाने जीवनातील सर्व पुण्याईचें मिळणारें तें थोर स्वर्गसुखाचें फळहि शेवटीं लाथाडलें. जीवनातील सर्व त्यागावर तो त्याने कळस चढविला. तीं मधुर फळें चाखण्याचा त्याला हक्क होता. परंतु तो तीं चाखता तर संपतीं. **'क्षीणें पुण्यें मृत्यु-लोकास येती'** हें चक्र पुन: त्याच्या पाठीस लागतें. धर्मराजाचा केवढा हा त्याग! तो सदैव माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. अशा रीतीने सत्त्वगुणाचें सतत आचरण करून त्याचा अहंकार जिंकून घ्यावा. तटस्थ राहून सर्व फळें ईश्वराला अर्पून त्याची आसक्ति जिंकून घ्यावी, म्हणजे सत्त्वगुण जिंकला असें होईल.

## 81. शेवटची गोष्ट : आत्मज्ञान आणि भक्तीचा आश्रय

**27** आता शेवटची गोष्ट सांगावयाची. तुम्ही जरी सत्त्वगुणी बनलात, अहंकार जिंकलात, फलासक्तिहि सोडलीत, तरी जोंपर्यंत हा देह चिकटलेला आहे तोंपर्यंत मधून मधून हे रज-तमांचे हल्ले येतच राहतील. हे गुण जिंकले असें घटकाभर वाटेल, तरी ते परत जोर करून येतील. म्हणून सतत जागृत राहिलें पाहिजे. समुद्राचें पाणी जोराने आंत शिरून ज्याप्रमाणे आखातें निर्माण होतात, त्याप्रमाणे रज-तमांचे जोरदार प्रवाह मनोभूमीत शिरून आखातें निर्माण करतात. म्हणून जराहि छिद्र ठेवू नका. कडेकोट पहारा ठेवा. आणि कितीहि दक्षता बाळगली तरी जोंपर्यंत आत्मज्ञान नाही, आत्मदर्शन नाही, तोंपर्यंत धोकाच आहे. म्हणून काहीहि करा पण तें आत्मज्ञान प्राप्त करून घ्या.

**28** केवळ जागृतीच्या कसरतीने हें होणार नाही. मग कशाने होईल? अभ्यासाने होईल? नाही. एकच उपाय आहे. तो म्हणजे ''भगवंताची अत्यंत जिव्हाळ्याने, कळकळीने भक्ति करणें.'' रजस्तमोगुणांना जिंकाल, सत्त्व-गुणाला स्थिर करून त्याची फलासक्तिहि जिंकून घ्याल; परंतु तेवढ्यानेहि भागणार नाही. जोंपर्यंत आत्मज्ञान नाही तोंपर्यंत निभावणार नाही. शेवटीं त्या परमेश्वराची कृपा पाहिजे. त्याच्या कृपेस जिव्हाळ्याच्या भक्तीने पात्र झालें पाहिजे. याशिवाय दुसरा उपाय मला दिसत नाही. या अध्यायाचे शेवटीं अर्जुनाने हा प्रश्न विचारला व भगवंतांनी उत्तर दिलें, ''अत्यंत एकाग्र मनाने निष्कामपणें माझी भक्ति कर. माझी सेवा कर. जो अशी सेवा करतो तो या मायेच्या पलीकडे जाऊ शकतो. एरवी ही गहन माया तरता येणार नाही.'' हा भक्तीचा सोपा उपाय आहे. हा एकच मार्ग आहे.

***रविवार, 22-5-'32***

# अध्याय 15

# पूर्णयोग : सर्वत्र पुरुषोत्तम-दर्शन

## 82. प्रयत्नमार्गाहून भक्ति वेगळी नाही

**1** आज एका अर्थाने आपण गीतेच्या टोकाला आलो आहोत. पंधराव्या अध्यायात सर्व विचारांची परिपूर्णता झालेली आहे. सोळावा, सतरावा अध्याय हे परिशिष्टरूप आहेत व अठराव्यात उपसंहार आहे. म्हणून भगवंतांनी या अध्यायाचे अखेरीस शास्त्र ही संज्ञा या अध्यायाला दिली.

**'अत्यंत गूढ हें शास्त्र निर्मळा तुज बोलिलों'**

– असें भगवान् शेवटीं म्हणत आहेत. भगवान् असें म्हणतात तें हा शेवटचा अध्याय म्हणून नव्हे, तर आतापर्यंत जीवनाचें जें शास्त्र, जे सिद्धांत सांगितले त्यांची पूर्णता या अध्यायात केलेली आहे म्हणून. या अध्यायात परमार्थ पुरा झाला. वेदांचें सारें सार यात येऊन गेलें. परमार्थाचें भान मनुष्याला करून देणें हेंच वेदांचें काम. तें या अध्यायात आहे म्हणून याला 'वेदांचें सार' अशी गौरवाची पदवी मिळालेली आहे.

तेराव्या अध्यायात देहापासून आत्मा अलग करण्याची आवश्यकता पाहिली. चौदाव्यात तत्संबंधी थोडा प्रयत्नवाद तपासला. रजोगुण व तमोगुण यांचा निग्रहाने त्याग करायचा. सत्त्वगुणाचा विकास करून त्याची आसक्ति जिंकावयाची, त्याच्या फळाचा त्याग करावयाचा. अशा रीतीने प्रयत्न चालवावयाचे. हे प्रयत्न संपूर्णपणें फलद्रूप होण्यास आत्मज्ञानाची आवश्यकता आहे असें शेवटीं सांगितलें. आत्मज्ञान हें भक्तीशिवाय शक्य नाही.

**2** परंतु भक्तिमार्ग म्हणजे प्रयत्नमार्गाहून काही निराळा नाही. ही गोष्ट सुचविण्यासाठी या पंधराव्या अध्यायाचे आरंभींच संसाराला एका महान् वृक्षाची उपमा दिली आहे. त्रिगुणांनी पोसलेल्या प्रचंड खांद्या या वृक्षाला आहेत. अनासक्ति व वैराग्य या शस्त्रांनी हा वृक्ष छेदावा असें आरंभींच सांगितलें. गेल्या अध्यायात जो साधनमार्ग सांगितला तोच येथे आरंभीं पुन्हा सांगितला हें स्पष्ट आहे. रज-तम मारावयाचे व सत्त्वगुणाचें पोषण करून विकास करावयाचा. एक विनाशक काम, एक विधायक काम. दोन्ही मिळून एकच मार्ग होतो. गवत काढणें व बीं पेरणें हीं एकाच क्रियेचीं दोन अंगें. तसेंच हें.

**3** रामायणात रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे तिघे भाऊ आहेत. कुंभकर्ण तमोगुण आहे, रावण रजोगुण आहे, बिभीषण सत्त्वगुण आहे. आपल्या शरीरात या तिघांचें रामायण रचलें जात आहे. या रामायणात रावण-कुंभकर्णांचा नाशच विहित आहे. फक्त बिभीषण-तत्त्व, जर तें हरिचरण-शरण होईल तर, उन्नतीला साधक व पोषक होऊ शकेल म्हणून संग्राह्य. आपण चौदाव्या अध्यायात ही गोष्ट पाहिली. या पंधराव्याच्या आरंभीं पुन्हा तीच आहे. सत्त्व-रज-तमांनी भरलेला संसार असंगशस्त्राने छेदून टाका. रज-तमांचा निरोध करा. सत्त्वगुणाचा विकास करून पवित्र व्हा व त्याची आसक्ति जिंकून अलिप्त रहा. हा कमळाचा आदर्श भगवद्गीता मांडीत आहे.

**4** भारतीय संस्कृतीत जीवनातील आदर्श वस्तूंस, उत्तमोत्तम वस्तूंस, कमळाची उपमा दिलेली असते. कमळ हें भारतीय संस्कृतीचें प्रतीक आहे. उत्तमोत्तम विचार प्रकट करण्याचें चिह्न म्हणजे कमळ. कमळ स्वच्छ व पवित्र असून अलिप्त असतें. पवित्रता व अलिप्तता अशी दुहेरी शक्ति कमळाजवळ आहे. भगवंताच्या निरनिराळ्या अवयवांना कमळाची उपमा देतात. नेत्रकमल, पदकमल, करकमल, मुखकमल, नाभिकमल, हृदयकमल, शिरकमल. सर्वत्र सौंदर्य व पावित्र्य असून अलिप्तता आहे हें दाखवावयाचें व आपल्या मनावर ठसवावयाचें.

**5** मागील अध्यायात सांगितलेल्या साधनेला पूर्णता आणण्यासाठी हा अध्याय आहे. प्रयत्नात भक्ति व आत्मज्ञान मिसळलीं गेलीं की ही पूर्णता येईल. प्रयत्नमार्गाचाच भक्ति हाहि एक भाग. आत्मज्ञान, भक्ति, हीं त्याच साधनेतील अंगें. वेदामध्ये ऋषि म्हणतो –

**'यो जागार तं ऋच: कामयन्ते**
**यो जागार तमु सामानि यन्ति'**

– ''जो जागृत असतो त्याच्यावर वेद प्रेम करतात, त्याच्या भेटीसाठी ते येतात.'' म्हणजे जो जागृत आहे त्याच्याकडे वेदोनारायण येतो. त्याच्याकडे ज्ञान येतें, भक्ति येते. प्रयत्नमार्गाहून भक्ति व ज्ञान अलग नाहीत. प्रयत्नालाच गोडी आणणारीं हीं तत्त्वें आहेत, असें या अध्यायात सांगावयाचें आहे. एकाग्र चित्ताने भक्तिज्ञानाचें हें स्वरूप श्रवण करा.

## 83. भक्तीने प्रयत्न सुकर होतो

**6** जीवनाचे तुकडे मी करू शकत नाही. कर्म, ज्ञान व भक्ति हीं माझ्याच्याने निराळीं करवत नाहीत व तीं निराळीं नाहीतहि. उदाहरणार्थ, या जेलमधील स्वयंपाकाचें काम पहा. पांचशें-सातशें माणसांची रसोई करण्याचें काम आपल्यांतील काही मंडळी पार पाडतात. रसोईचें नीट ज्ञान नसणारा माणूस जर या कामात असेल तर तो रसोई बिघडवून टाकील. भाकऱ्या कच्च्या राहतील, नाही तर करपून जातील. परंतु रसोईचें नीट ज्ञान आहे असें आपण मानू. तरी जर त्या माणसाच्या हृदयात त्या कर्मासंबंधी प्रेम नसेल, भक्तीची भावना नसेल, या भाकऱ्या माझ्या बंधूंना म्हणजे नारायणालाच खावयाच्या आहेत, त्या नीट करू दे, ही प्रभुसेवा आहे, अशी भावना जर त्याच्या हृदयात नसेल, तर ज्ञान असूनहि त्या कामाला तो लायक ठरणार नाही. त्या रसोईच्या कामात ज्ञान पाहिजे, तसेंच प्रेमहि हवें. भक्तितत्त्वाचा रस हृदयात असल्याशिवाय रसोई सुरस होणार नाही. म्हणून तर आईशिवाय हें काम होत नाही. आईशिवाय हें काम आस्थेने, प्रेमळपणें कोण करील? शिवाय या कामासाठी तपस्याहि हवीच. ताप सहन केल्याशिवाय, कष्टाशिवाय, हें काम होणार कसें? म्हणजे एकाच कार्यात प्रेम, ज्ञान व कर्म या वस्तु लागतात असें दिसून येतें. जीवनातील सारीं कर्में या तीन गुणांवर उभीं आहेत. तिपाई असते, तिचा एखादा पाय पडला तर ती उभी राहणार नाही. तिन्ही पाय हवेत. तिच्या नांवातच तिचें स्वरूप आहे. जीवनाचें तसेंच आहे. ज्ञान, भक्ति व कर्म, म्हणजे श्रम-सातत्य, हे जीवनाचे तीन पाय आहेत. या तीन खांबांवर जीवनाची द्वारका उभारावयाची. हे तीन पाय मिळून एकच वस्तु होते. तिवईचा दृष्टांत अक्षरश: लागू पडतो. तर्काने तुम्ही भक्ति-ज्ञान-कर्म अलग माना, परंतु प्रत्यक्ष त्यांना अलग करता येणार नाही. तिन्ही मिळून एकच विशाल वस्तु बनते.

**7** असें जरी असलें तरी भक्तीचा असा विशेष गुण नाही असें नाही. कोणत्याहि कर्मात भक्तितत्त्व जर दाखल होईल तर तें कर्म सुलभ वाटेल. सुलभ वाटेल म्हणजे कष्ट पडणार नाहीत असें नाही; परंतु ते कष्ट, कष्ट आहेत असें वाटणार नाही. कष्ट आनंदरूप वाटतील. ते कष्ट फुलासारखे वाटतील. भक्तिमार्ग सोपा या म्हणण्यातील रोख काय? याचा रोख असा की भक्तीमुळे कर्माचा बोजा वाटत नाही. कर्माचें काठिण्य जातें. कितीहि काम केलें तरी न केल्यासारखें वाटतें. भगवान् ख्रिस्त एके ठिकाणीं म्हणतात, ''तू उपवास करशील तर तुझा चेहरा उपवास केल्यासारखा दिसता कामा नये. गालाला उटणें लावल्याप्रमाणे चेहरा प्रफुल्लित व आनंदी दिसू दे. उपवासाचे कष्ट पडत आहेत असें नाही दिसता कामा.'' सारांश, वृत्ति इतकी भक्तिमय हवी की कष्टांचा विसर पडावा. आपण म्हणतो ना की शूर देशभक्त हसत फांशी गेला. सुधन्वा तेलाच्या कढईत हसत होता. मुखाने कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद म्हणत होता. या म्हणण्याचा अर्थ हाच की अपार कष्ट झाले तरी ते भक्तीमुळे भासले नाहीत. पाण्यावर असलेली होडी लोटणें कठिण नाही. परंतु ती जमिनीवरून, खडकावरून ओढीत न्यावयाची असेल तर किती श्रम होतो पहा! होडीच्या खाली पाणी असेल तर सहजतेने आपण तरून जातो. त्याप्रमाणे आपल्या जीवननौकेच्या खाली जर भक्तीचें पाणी असेल तर ही नौका आनंदाने वल्हवून नेता येईल. परंतु जीवन जर शुष्क असेल, वाटेत वाळवंट असेल, दगडधोंडे असतील, खांचखळगे असतील, तर ही नौका ओढून नेण्याचें काम फार बिकट होऊन जाईल. भक्तितत्त्व जीवननौकेला पाण्याप्रमाणे सुलभता प्राप्त करून देतें.

भक्तिमार्गाने साधनेला सुलभता येते, परंतु आत्मज्ञानाशिवाय त्रिगुणांच्या पलीकडे कायमचें जावयाची आशा नाही. तर मग आत्मज्ञानाला साधन कोणतें? सत्त्वसातत्याने सत्त्वगुण अंगीं पचवून त्याचा अहंकार व त्याच्या फलाची आसक्ति जिंकण्याचा भक्तीचा प्रयत्न, हेंच तें साधन. या साधनाने सतत अव्याहत प्रयत्न करता करता एक दिवस

आत्मदर्शन होईल. तोंपर्यंत प्रयत्नाला शेवट नाही. परमपुरुषार्थाची ही गोष्ट आहे. आत्मदर्शन ही गमतीची गोष्ट नाही. सहज मौजेने आत्मदर्शन होईल असें नाही. त्यासाठी सतत प्रयत्नधारा सुरू हवी. परमार्थाच्या मार्गातील शर्तच मुळीं ही की ''मी एक क्षणहि निराशेला जागा देणार नाही. एक क्षणहि निराश होऊन स्वस्थ बसणार नाही.'' परमार्थाचें दुसरें साधन नाही. एखादे वेळेस साधकाला थकवा येऊन त्याच्या तोंडातून **'तुमकारन तप संयम किरिया, कहो कहां लौं कीजे!'** ''देवा, कोठवर तुझ्यासाठी ही तपस्या करू?'' असे उद्‌गार बाहेर पडतात. परंतु हा उद्‌गार गौण आहे. तपस्या व संयम इतकी अंगवळणीं पडू देत की तो स्वभावच होईल. कोठपर्यंत साधना करू, हा शब्द भक्तीमध्ये शोभत नाही. अधीरभाव, निराशाभाव भक्ति कधीहि उत्पन्न होऊ देणार नाही. असा कंटाळा कधी न वाटावा, भक्तीत उत्तरोत्तर उल्हास व उत्साह वाटावा, यासाठी फार सुंदर विचार या अध्यायात मांडला आहे.

## 84. सेवेची त्रिपुटी : सेव्य, सेवक, सेवासाधनें

**8** या विश्वात आपणांस अनंत वस्तु दिसत आहेत. या सर्व वस्तूंचे तीन भाग करावयाचे. एखादा भक्त सकाळीं उठला की तीनच वस्तु त्याच्या डोळ्यांसमोर दिसतात. त्याचें आधी लक्ष देवाकडे जातें. मग देवाच्या पूजेची तो तयारी करतो. मी सेवक भक्त. तो सेव्य असा देव, स्वामी. या दोन वस्तु त्याच्याजवळ सदैव हजर असतातच. उरलेली सारी सृष्टि म्हणजे पूजेचीं साधनें. फुलें, गंध, धूपदीप, यासाठी सारी सृष्टि. तीनच वस्तु. सेवक भक्त, सेव्य परमात्मा, व सेवासाधनें म्हणून ही सृष्टि. ही शिकवण या अध्यायात आहे. परंतु एखाद्या मूर्तीची पूजा करणारा जो सेवक असतो त्याला सृष्टीतील सर्वच वस्तु पूजेचीं साधनें वाटत नाहीत. तो बगिच्यातून चार फुलें तोडून आणतो. कोठली उदबत्ती आणतो, काहीतरी नैवेद्य दाखवितो. त्याला निवडानिवड करावीशी वाटते. परंतु पंधराव्या अध्यायात जी विशाल शिकवण आहे तिच्यात निवडानिवड नाही. जीं जीं तपस्येचीं साधनें, कर्माचीं साधनें, तीं सारीं परमेश्वराच्या सेवेचीं. त्यांतील काहींस फुलें म्हणू या, काहींस गंध म्हणू या, काहींस नैवेद्य संबोधू या. अशा प्रकारें यच्चयावत् सर्व कर्में पूजाद्रव्यें करावयाचीं, अशी ही दृष्टि आहे. जगात फक्त तीनच वस्तु. जो वैराग्यमय साधनमार्ग गीता आपल्या मनावर ठसवू पाहत आहे, त्या मार्गाला गीता भक्तिमय स्वरूप देत आहे. त्यातील कर्मपणा काढून टाकीत आहे व त्यामुळे सुलभता आणीत आहे.

**9** आश्रमात एखाद्याला जर खूप काम पडलें तर 'मलाच जास्त काम कां पडलें' असा त्याच्या मनात विचारच येत नाही. यात मोठें सार आहे. पूजा करणाऱ्यास दोन तासांऐवजी चार तास पूजा करावयास मिळाली, तर ''काय बुवा, आज चार तास पूजा करावी लागत आहे'' असें तो कंटाळून म्हणेल का? त्याला अधिकच त्याचा आनंद होईल. आश्रमात हा अनुभव येतो. तो अनुभव सर्व जीवनात सर्वत्र आला पाहिजे. जीवन सेवापरायण झालें पाहिजे. सेव्य असा तो पुरुषोत्तम, त्याच्या सेवेसाठी सदैव उभा असा मी अक्षर पुरुष. अक्षर पुरुष म्हणजे कधीहि न भागणारा, सृष्टीच्या आरंभापासून सेवा करणारा, सनातन सेवक. जसा हनुमान रामासमोर सदैव हात जोडून उभाच. त्याला आळस माहीत नाही. त्या हनुमानाप्रमाणे चिरंजीव असा हा सेवक उभा आहे.

असा आजन्मसेवक म्हणजे अक्षर पुरुष. परमात्मा ही संस्था जिवंत आहे व मी सेवकहि सदैव आहे. प्रभु कायम तर मीहि कायम. तो सेवा घेऊन दमतो कीं मी सेवा करून दमतो, पाहूच या मौज. त्याने दहा अवतार घेतले तर माझेहि दहा. तो राम झाला तर मी हनुमान, तो कृष्ण झाला तर मी उद्धव. जितके त्याचे अवतार तितके माझे. लागू दे अशी गोड चढाओढ. परमेश्वराची अशी युगानुयुगें सेवा करणारा, कधीहि नाश न पावणारा, असा हा जीव, हा अक्षर पुरुष. तो पुरुषोत्तम स्वामी व मी त्याचा बंदा सेवक, अशी भावना सारखी हृदयात धरावयाची. आणि ही हरघडी बदलणारी, अनंत रूपांनी नटणारी सृष्टि, हीं सारीं पूजेचीं साधनें, सेवेचीं साधनें करावयाचीं. प्रत्येक क्रिया म्हणजे पुरुषोत्तमाची पूजा.

**10** सेव्य परमात्मा पुरुषोत्तम, सेवक जीव हा अक्षर पुरुष. परंतु ही साधनरूप सृष्टि क्षर आहे. ती क्षर आहे यात मोठा अर्थ आहे. सृष्टीचें हें दूषण नसून भूषण आहे. त्यामुळे सृष्टीत नित्य नवीनता आहे. कालचीं फुलें आज चालावयाचीं नाहीत. तीं निर्माल्य झालीं. सृष्टि नाशिवंत आहे हें मोठें भाग्य आहे. हें सेवेचें वैभव आहे. रोज नवीन फुलें सेवेला,

त्याप्रमाणेच हें शरीरसुद्धा नवीन नवीन धारण करून परमेश्वराची सेवा करीन. माझ्या साधनांना रोज नवीन स्वरूप देईन व त्याने त्याची पूजा करीन. नाशिवंतामुळे सौंदर्य आहे.

**11** चंद्राची कला आजची उद्या नाही. चंद्राचें रोज निराळें लावण्य. द्वितीयेचा तो वर्धमान चंद्र पाहिला म्हणजे केवढा आनंद होतो! शंकराच्या भालप्रदेशावर ती द्वितीयेची चंद्रशोभा प्रकट झाली आहे. अष्टमीच्या चंद्राचें सौंदर्य विशेष असतें. अष्टमीस आकाशात वेंचक मोत्येंच दिसत असतात. पौर्णिमेला चंद्राच्या तेजाने तारका दिसतच नाहीत. पौर्णिमेला परमेश्वराचा मुखचंद्र दिसतो. अमावास्येचा आनंद तर फार गंभीर असतो. अमावास्येच्या रात्रीं केवढी नि:स्तब्ध शांतता असते! चंद्राचा जुलमी प्रकाश नसल्यामुळे लहानमोठे अगणित तारे पूर्ण स्वातंत्र्याने चमचम करीत असतात. अमावास्येला स्वातंत्र्याचा पूर्ण विलास असतो. आपल्या तेजाने दिमाख दाखविणारा चंद्र आज येथे नसतो. स्वत:ला प्रकाश देणाऱ्या सूर्याशी त्या दिवशीं तो एकरूप झालेला असतो, परमेश्वरात मिळून गेलेला असतो. जीवाने स्वात्मार्पण करून आपणापासून जगाला यत्किंचित्हि त्रास पोंचू नये असें जणू त्या दिवशीं तो दाखवीत असतो. चंद्राचें स्वरूप क्षर आहे, बदलतें आहे, परंतु तें निरनिराळा आनंद देतें.

सृष्टीचा नाशिवंतपणा म्हणजेच तिची अमरता. सृष्टीचें रूप झुळझुळ वाहून राहिलें आहे. ही रूपगंगा जर वाहत नसेल तर तिचें डबकें होईल. नदीचें पाणी अखंड वाहत असतें. पाणी सारखें बदलतें आहे. हा थेंब गेला, दुसरा आला. तें पाणी जिवंत राहतें. वस्तूतील आनंद नवीनपणामुळे वाटतो. ग्रीष्मऋतूत देवाला निराळींच फुलें. पावसाळ्यात त्या हिरव्यागार दुर्वा वहावयाच्या. शरदऋतूत तीं रमणीय कमळें वहावयाचीं. तत्तत् ऋतुकालोद्भव फलपुष्पांनी देवाची पूजा करायची. यामुळे ती पूजा टवटवीत, नित्य नवीन वाटते; कंटाळा येत नाही. लहान मुलांना ‘क’ काढून देतात व म्हणतात, ‘‘गिरव, जाड कर.’’ ती ‘क’ ची कटकट मुलाला कंटाळा आणते. अक्षर जाडें कां करायचें, त्याला समजत नाही. तो पेन्सिल आडवी धरून तें अक्षर लवकर जाडें करतो. परंतु पुढे नवीन अक्षरें, त्यांचें समुदाय तो पाहतो. निरनिराळीं पुस्तकें तो वाचू लागतो. साहित्यातील नानाविध सुमनमालांचा अनुभव तो घेतो. त्याला अपार आनंद होतो. तसेंच सेवाप्रांतात आहे. नवीन नवीन साधनांमुळे सेवेची हौस वाढते. सेवावृत्तीचा विकास होतो.

**12** सृष्टीचा नाशिवंतपणा रोज नवीं फुलें फुलवून राहिला आहे. गांवाजवळ स्मशान आहे म्हणून गांवाला रमणीयता आहे. जुनीं माणसें जात आहेत, नवीन बाळें जन्मत आहेत, सृष्टि नवीन वाढत आहे. बाहेरचें तें स्मशान जर नाहीसें कराल तर तें घरात येऊन बसेल. तुम्ही कंटाळाल तींच तीं माणसें अखंड पाहून. उन्हाळ्यात उन्हाळा असतो. पृथ्वी तापते. परंतु यामुळे त्रस्त होऊ नका. हें रूप बदलेल. पावसाचें सुख अनुभवण्यासाठी तापलें पाहिजे. जमीन जर खूप तापून निघालेली नसेल तर पाऊस पडताच केवळ चिखल होईल. तृणधान्यें नटणार नाहीत. मी एकदा उन्हाळ्यात हिंडत होतो. डोकें तापत होतें. आनंद वाटत होता. मला एक मित्र म्हणाला, ‘‘डोकें तापेल, त्रास होईल.’’ मी म्हटलें, ‘‘ही खालची माती तापत आहे. हा मातीचा गोळाहि तापू दे जरा.’’ डोकें तापलेलें असावें व मग ती पावसाची धार यावी. कसा आनंद असतो! परंतु जो उन्हात तापत नाही, तो पाऊस आला तरीहि पुस्तकात डोकें खुपसून बसेल. घरातील खोलीत, त्या थडग्यातच बसून राहील. बाहेरच्या या विशाल अभिषेकपात्राखाली उभा राहून नाचणार नाही. परंतु तो आमचा महर्षि मनु, तो मोठा रसिक व सृष्टिप्रेमी. तो स्मृतीत लिहितो, ‘‘पाऊस पडू लागला म्हणजे सुट्टी द्यावी.’’ पाऊस पडत असतांना आश्रमात का घोकीत बसावयाचें? पावसात नाचावें, गावें, सृष्टीशी एकरूप व्हावें. पावसात पृथ्वी व आकाश एकमेकांस भेटत असतात. तें थोर दृश्य केवढें आनंददायी असतें! ही सृष्टि स्वत: शिक्षण देऊन राहिली आहे.

सारांश, सृष्टीची क्षरता, नाशिवंतता म्हणजे साधनांची नवीनता. अशी नवनवप्रसवा साधनदात्री ही सृष्टि, कमर कसून सेवेसाठी उभा असा तो सनातन सेवक व तो सेव्य परमात्मा. आता चालू दे खेळ. तो परमपुरुष पुरुषोत्तम निरनिराळीं सेवासाधनें देऊन माझ्याकडून प्रेममूलक सेवा घेऊन राहिला आहे. तो मला नाना साधनें देऊन खेळवून राहिला आहे. निरनिराळे प्रयोग माझ्याकडून करवून राहिला आहे. अशी ही दृष्टि जर जीवनात आली तर केवढा आनंद लाभणार आहे!

## 85. अहंशून्य सेवा म्हणजेच भक्ति

**13** आपली प्रत्येक कृति भक्तिमय व्हावी अशी गीतेची इच्छा आहे. घटका अर्ध घटका परमेश्वराची पूजा करतात, ती ठीकच आहे. सकाळीं व सायंकाळीं सुंदर सूर्यप्रभा रंगली असता चित्त स्थिर करून तास अर्धा तास संसार विसरणें व अनंताचें चिंतन करणें हा उत्कृष्ट विचार आहे. हा सदाचार नयेच सोडू. परंतु गीतेला एवढ्याने समाधान नाही. सकाळपासून सायंकाळ-पर्यंत यच्चयावत् ज्या तमाम क्रिया हातून होतील, त्या सर्व भगवंताच्या पूजेनिमित्त व्हाव्या. स्नान करतांना, जेवतांना, झाडतांना त्याचें स्मरण असावें. मी हें माझ्या प्रभूचें, जीवन-राजाचें अंगण झाडून राहिलो आहे, असें झाडतांना वाटावें. सारीं कर्में अशा दृष्टीने पूजाकर्में व्हावीं. ही दृष्टि आली तर पहा वर्तनात कसा फरक पडतो तो. पूजेसाठी फुलें कशी काळजीने वेंचतो, तीं परडीत नीट ठेवतो, तीं दाबलीं जाऊ नयेत म्हणून जपतो. तीं मलिन होऊ नयेत म्हणून नाकासहि लावीत नाही. त्याप्रमाणे जीवनातील दैनंदिन सर्व कर्मांत दृष्टि यावी. हा माझा गांव, येथे शेजाऱ्यांच्या रूपाने माझा नारायण नांदतो. हा गांव मी स्वच्छ करीन, निर्मळ ठेवीन. गीतेला अशी ही दृष्टि द्यावयाची आहे. तमाम कर्में म्हणजे प्रभुपूजा, या गोष्टीची गीतेला हौस आहे. गीतेसारख्या ग्रंथराजाला घटका अर्ध घटका पूजेने समाधान नाही. सारें जीवन हरिमय व्हावें, पूजारूप व्हावें, हा गीतेला हव्यास आहे.

**14** पुरुषोत्तमयोग सांगून कर्ममय जीवनाला गीता पूर्णता देत आहे. तो सेव्य पुरुषोत्तम, मी त्याचा सेवक, व सेवेचें साधन अशी ही सृष्टि. या गोष्टीचें एकदा दर्शन झालें म्हणजे मग आणखी काय पाहिजे? तुकाराम म्हणून राहिले आहेत – **'झालिया दर्शन करीन मी सेवा, आणीक ही देवा न लगे दुजें।'**

मग अखंड सेवाच हातून होईल. मी म्हणून कोणी नाही असें होईल. 'मी-माझेपणा' पुसून जाईल. सारें त्या भगवंतासाठी. परार्थ झिजावें याहून अन्य विषयच राहणार नाही. माझ्यातील 'मी' काढून टाकून हरिपरायण असें मी माझें जीवन रचावें, भक्तिमय जीवन करावें, असें गीता परोपरीने सांगत आहे. सेव्य परमात्मा, मी सेवक, व साधन-रूप ही सृष्टि. परिग्रहाचें नांवच पुसून टाकलें. जीवनात दुसऱ्या कशाची चिंताच नाही.

## 86. ज्ञान-लक्षण : मी पुरुष, तो पुरुष, हाहि पुरुष

**15** अशा प्रकारें कर्मात भक्ति मिसळावयाची हें आतापर्यंत आपण पाहिलें; परंतु त्यात ज्ञानहि पाहिजे. एरवी गीतेला समाधान नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की या वस्तु वेगवेगळ्या आहेत. बोलण्यासाठी म्हणून आपण अलग अलग भाषा वापरतो इतकेंच. कर्म म्हणजेच भक्ति. भक्ति निराळी कर्मात मिसळावयाची असें नाही. तीच गोष्ट ज्ञानाची. हें ज्ञान कशाने मिळेल? गीता सांगते, ''सर्वत्र पुरुष-दर्शनाने हें ज्ञान मिळेल.'' तू सेवा करणारा सनातन सेवक, तू सेवापुरुष; तो पुरुषोत्तम, सेव्य पुरुष; आणि नानारूपधारिणी, नाना साधनें पुरविणारी ही वाहती सृष्टि, हीहि पुरुषच.

**16** ही दृष्टि ठेवायची म्हणजे काय? सर्वत्र अव्यंग निर्मळ सेवाभाव ठेवायचा. तुझ्या पायातील चप्पल करकर वाजत आहे, थोडें तेल दे तिला. तेथे परमात्म्याचाच अंश आहे. ती चप्पल नीट राख. तो सेवासाधन चरखा. त्याला तेल घाल. तो ओरडत आहे, ''नेति नेति'' – 'सूत कातणार नाही.' तो चरखा, तें सेवासाधन म्हणजेहि पुरुषच. त्याची माळ, त्याचें तें जानवें, नीट ठेव. सारी सृष्टि चैतन्यमय मान. ती जड नको समजू. ओंकाराचें सुंदर गाणें गाणारा तो चरखा. तो का जड? परमात्म्याची मूर्तीच तो आहे. पोळ्याच्या दिवशीं अहंकार सोडून बैलाची पूजा आपण करतो. फार थोर आहे ही गोष्ट. पोळ्याची कल्पना रोज मनात राखून, बैलाला चांगलें राखून, त्यापासून योग्य तें काम घ्या. पोळ्याच्या दिवशींची भक्ति त्याच दिवशीं संपली असें न होवो. बैल म्हणजे परमात्म्याचीच मूर्ति. तो नांगर, तीं शेतीचीं अवजारें, तीं नीट राखा. सेवेचीं सर्व साधनें पवित्र आहेत. केवढी विशाल आहे ही दृष्टि. पूजा करणें म्हणजे गुलाल, गंधाक्षत, फुलें वाहणें नव्हे. तीं भांडीं आरशासारखीं ठेवणें ही भांड्यांची पूजा. दिवा स्वच्छ पुसावयाचा ही त्याची पूजा. विळ्याला धार लावून शेतीच्या कामासाठी तयार ठेवायचा, ही त्याची पूजा. दाराचें बिजागर गंजून गेलें, त्याला तेल लावून संतुष्ट करणें ही त्याची पूजा. जीवनात सर्वत्र ही दृष्टि आणावयाची. सेवाद्रव्य उत्कृष्ट व निर्मळ राखावयाचें. सारांश, मी अक्षर पुरुष, तो पुरुषोत्तम, व ही साधनरूप सृष्टि; सर्व पुरुषच, परमात्माच. सर्वत्र एकच चैतन्य खेळून राहिलें आहे. ही दृष्टि आली म्हणजे आपल्या कर्मात ज्ञानहि आलें.

**17** कर्मामध्ये भक्ति ओतली, आता ज्ञानहि ओतलें, व अपूर्व असें जीवनाचें दिव्य रसायन बनविलें. गीतेने शेवटीं अद्वैतमय सेवेच्या मार्गावर आपणांस आणलें. सर्व सृष्टीत तीन पुरुष उभे आहेत. एकाच पुरुषोत्तमाने हीं तिन्हीं रूपें घेतलेलीं आहेत, तिन्हीं मिळून एकच पुरुष आहे. केवळ अद्वैतच आहे. गीतेने परमोच्च शिखरावर येथे आपणांस आणून सोडलें. कर्म, भक्ति, ज्ञान एकरूपच झालीं. जीव, शिव, व सृष्टि एकरूप झालीं. कर्म, भक्ति व ज्ञान यांत विरोधच राहिला नाही.

**18** ज्ञानदेवांनी अमृतानुभवात महाराष्ट्राला आवडता दृष्टांत दिला आहे.

**'देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु**
**तैसा भक्तीचा वेव्हारु । कां न होआवा ।'**

एकच दगड पोखरला, तेथे दगडाचेंच मंदिर, त्या मंदिरात दगडाचाच कोरलेला देव व देवासमोर दगडाचाच एक भक्त, व त्याच्याजवळ दगडातच कोरलेलीं फुलें; हें जसें सारें त्या एका दगडाच्याच लेण्यात करतात, एकच अखंड दगड तेथे सर्व रूपांनी नटलेला असतो, तसें भक्तीच्या व्यवहारातहि कां होऊ नये? स्वामि-सेवक संबंध राहूनहि ऐक्य कां होणार नाही? ही बाह्यसृष्टि, हें पूजाद्रव्य, निराळें असूनहि तें आत्मरूप कां न व्हावें? तिन्ही पुरुष एकच आहेत. ज्ञान, कर्म, भक्ति, तिन्ही मिळून एक विशाल जीवन-प्रवाह करावयाचा. असा हा परिपूर्ण पुरुषोत्तमयोग आहे. सेवक, स्वामी, व सेवाद्रव्य एकरूपच असून भक्तिप्रेमाचा खेळ खेळावयाचा.

**19** असा हा पुरुषोत्तमयोग ज्याच्या ह्रदयात बिंबला तोच खरी भक्ति करतो.

**'सर्वज्ञ तो सर्वभावें सर्वरूपी भजे मज'**

असा पुरुष ज्ञानी असूनहि संपूर्ण भक्त असतो. ज्याच्या ठिकाणीं ज्ञान आहे त्याच्या ठिकाणीं प्रेम आहेच. परमेश्वराचें ज्ञान व परमेश्वराचें प्रेम या अलग गोष्टी नाहीत. 'कारलें कडू' असें ज्ञान उत्पन्न झालें तर प्रेम उत्पन्न होत नाही. एखादा अपवाद असेल; परंतु कडूपणा कळला की त्याचा कंटाळा आलाच. पण खडीसाखरेचें ज्ञान होताच तें विरघळू लागतें. लगेच प्रेमाचा झरा उत्पन्न होतो. परमेश्वराच्या बाबतीत ज्ञान होणें आणि प्रेम उत्पन्न होणें या गोष्टी एकरूप आहेत. परमेश्वराच्या रूपाची गोडी, त्याला का रद्दी साखरेची उपमा द्यावयाची? त्या मधुर परमेश्वराचें ज्ञान झालें की तत्क्षणींच प्रेमभावहि उत्पन्न होईल. ज्ञान होणें व प्रेम होणें – दोन भिन्न क्रियाच जणू नाहीत. अद्वैतात भक्ति आहे कीं नाही याचा वाद घालीत नका बसू. ज्ञानदेवांनी म्हटलें आहे – **'हें चि भक्ति हें चि ज्ञान। एक विठ्ठल चि जाण।।'** भक्ति व ज्ञान हीं एकाच वस्तूचीं दोन नांवें आहेत.

**20** परमभक्ति जीवनात आली म्हणजे मग होणारें कर्म हें भक्ति व ज्ञान यांपासून वेगळें असत नाही. कर्म, भक्ति व ज्ञान मिळून एकच रमणीय रूप होतें. या रमणीय रूपातून अद्‌भुत, प्रेममय व ज्ञानमय सेवा सहजच निर्माण होते. आईवर माझें प्रेम आहे; परंतु हें प्रेम कर्मात प्रकट झालें पाहिजे. प्रेम हें सदैव राबत असतें, सेवेत प्रकट होत असतें. प्रेमाचें बाह्यरूप म्हणजे सेवा. प्रेम अनंत सेवाकर्माने नटून नाचतें. प्रेम असलें म्हणजे ज्ञानहि तेथे येतें. ज्याची सेवा करावयाची त्याला कोणती सेवा आवडेल याचें ज्ञान मला पाहिजे. नाही तर सेवा ही गैरसेवा व्हावयाची. सेव्य वस्तूचें ज्ञान प्रेमाला पाहिजे. प्रेमाचा प्रभाव कार्यद्वारा फाकण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. परंतु मुळात प्रेम पाहिजे. तें नसेल तर ज्ञान निरुपयोगी. प्रेमाने होणारें कर्म साध्या कर्माहून निराळें असतें. शेतावरून थकून आलेल्या मुलाकडे म्हातारी आई प्रेमाने बघते, 'थकलास हो बाळ' म्हणते; परंतु त्या लहानशा कर्मात केवढें सामर्थ्य असतें! जीवनातील सर्व कर्मांत ज्ञान व भक्ति ओता. याला पुरुषोत्तमयोग म्हणतात.

## 87. सर्व वेद-सार माझ्याच हातात

**21** हें सर्व वेदांचें सार. वेद अनंत आहेत; परंतु अनंत वेदांचें सुटसुटीत सार म्हणजे हा पुरुषोत्तमयोग. हा वेद कोठे आहे? वेदांची मोठी मौज आहे. वेदांचें सार कोठे आहे? अध्यायाच्या आरंभींच सांगितलें आहे, **'ज्याच्या पानांमधें वेद'**. अरे, तो वेद या झाडाच्या पानापानांत भरलेला आहे. वेद त्या संहितेत, तुझ्या पोथीत लपलेला नाही. तो विश्वात सर्वत्र

फाकलेला आहे. तो इंग्रज कवि शेक्सपिअर सांगून राहिला आहे – ‘‘वाहत्या झऱ्यांत सद्ग्रंथ भेटतात, पाषाणांतून प्रवचनें ऐकू येतात.’’ सारांश, वेद संस्कृतात नाहीत, संहितेत नाहीत. ते सृष्टीत आहेत. सेवा करा म्हणजे दिसतील.

**22** **‘प्रभाते करदर्शनम्’** – उठल्याबरोबर आपला तळहात पहावा. सर्व वेद त्या हातात आहेत. ‘‘सेवा कर’’ असें तो वेद म्हणतो. काल हात श्रमला आहे कीं नाही, आज श्रमावयास तयार आहे कीं नाही, त्याला घट्टे पडले आहेत कीं नाहीत, तें पहा. सेवा करून हात झिजले म्हणजे ब्रह्मलिखित उघडतें, असा **‘प्रभाते करदर्शनम्’** चा अर्थ आहे.

**23** वेद म्हणे आहे कोठे? अरे, तुझ्याजवळच आहे तो. तुम्हां-आम्हांस हा जन्मत:च वेद प्राप्त झालेला आहे. मीच जिवंत वेद आहे. सर्व परंपरा आतापर्यंतची माझ्यात जिरली आहे. त्या परंपरेचें मी फळ आहे. त्या वेदबीजाचें फळ तेंच तर मी. माझ्या फळात अनंत वेदांचें बीज मी सांठवलें आहे. माझ्या पोटात वेद पांचपन्नास पट मोठा झाला आहे.

**24** सारांश, वेदांचें सार आपल्या हातात आहे. सेवा, प्रेम व ज्ञान यांवर जीवन रचावयाचें आहे. म्हणजेच हातात वेद आहे. मी अर्थ करीन तोच वेद. वेद बाहेर नाहीत. **‘वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा’** असें सेवामूर्ति संत म्हणतात. ‘‘सर्व वेद मलाच जाणतात. मीच सर्व वेदांचा अर्क पुरुषोत्तम’’ असें भगवान् सांगून राहिले आहेत. असें हें वेदांचें सार, हा पुरुषोत्तमयोग, आपण जर जीवनात मुरवू शकलो तर केवढा आनंद आहे! मग तो पुरुष जें करतो त्यातून वेदच प्रकट होतो असें गीता सुचवीत आहे. या अध्यायात सर्व गीतेचें सार आहे. गीतेची शिकवण येथे पूर्णपणें प्रकट झाली आहे. ती जीवनात उतरविण्यासाठी सर्वांनी रात्रंदिवस झटावें, दुसरें काय?

*रविवार, 29-5-’32*

# अध्याय 16

# परिशिष्ट 1 : दैवी आणि आसुरी वृत्तींचा झगडा

## 88. पुरुषोत्तम-योगाची पूर्व प्रभा : दैवी संपत्ति

**1** गीतेच्या पहिल्या पांच अध्यायांत जीवनाची एकूण योजना काय आहे आणि आपला जन्म कसा सफल होईल, तें आपण पाहिलें. त्यानंतर सहाव्या अध्यायापासून अकराव्या अध्यायापर्यंत भक्तीचा निरनिराळ्या प्रकारें विचार केला. अकराव्या अध्यायात भक्तीचें दर्शन झालें. बाराव्या अध्यायात सगुण व निर्गुण भक्ति यांची तुलना करून भक्तांची थोर लक्षणें पाहिलीं. बाराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत कर्म व भक्ति हीं दोन तत्त्वें तपासून झालीं. तिसरा ज्ञानाचा विभाग राहिला होता तो आपण तेरा, चौदा व पंधरा या अध्यायांत पाहिला. आत्मा देहापासून अलग करणें, त्यासाठी तिन्ही गुण जिंकून घेणें व शेवटीं सर्वत्र प्रभु पाहणें. पंधराव्या अध्यायात जीवनाचें संपूर्ण शास्त्र पाहिलें. पुरुषोत्तमयोगात जीवनाची पूर्णता होते. त्याच्या पलीकडे काही उरत नाही.

**2** कर्म, ज्ञान व भक्ति यांचा अलगपणा मला सहन होत नाही. काही साधकांची निष्ठा अशी असते की त्यांना फक्त कर्मच सुचतें. कोणी भक्तीचा स्वतंत्र मार्ग कल्पितात व त्यावरच सारा भर देतात. काहींचा कल ज्ञानाकडे असतो. जीवन म्हणजे केवळ कर्म, केवळ भक्ति, केवळ ज्ञान, असा केवलवाद मी मानू इच्छीत नाही. उलटपक्षीं कर्म, भक्ति व ज्ञान, यांची बेरीज असा समुच्चयवादहि मी मानीत नाही. काही भक्ति, काही ज्ञान, काही कर्म, असा उपयुक्ततावादहि मला पटत नाही. आधी कर्म, मग भक्ति, मग ज्ञान, अशासारखा क्रमवादहि मी स्वीकारीत नाही. तिन्ही वस्तूंचा मेळ घालावा, असला सामंजस्यवादहि मला पसंत नाही. मला असें अनुभवावेसें वाटतें की, कर्म म्हणजेच भक्ति, म्हणजेच ज्ञान. बर्फीच्या तुकड्यातील गोडी, तिचा आकार, तिचें वजन, या गोष्टी निरनिराळ्या नाहीत. ज्या क्षणीं बर्फीचा तुकडा तोंडात टाकला, त्याच क्षणीं तिचा आकारहि खाल्ला, तिचें वजनहि पचविलें, तिची गोडीहि चाखली. तिन्ही गोष्टी एकत्र आहेत. बर्फीच्या प्रत्येक कणाकणात आकार, वजन व गोडी आहेत. अमक्या तुकड्यात आकारच आहे, अमक्या तुकड्यात गोडीच आहे, अमक्या तुकड्यात वजनच आहे, असें नाही. त्याप्रमाणेच जीवनातील प्रत्येक क्रियेत परमार्थ भरून रहावा, प्रत्येक कृत्य सेवामय, प्रेममय व ज्ञानमय व्हावें, जीवनातील सर्व अंगप्रत्यंगांत कर्म, भक्ति व ज्ञान भरून रहावीं; याला पुरुषोत्तमयोग म्हणतात. सारें जीवन केवळ परमार्थमय करावयाचें ही गोष्ट उच्चारावयास सोपी आहे; परंतु या उच्चारातील जो भाव, त्याचा जर विचार करू लागलो, तर केवळ निर्मळ अशी सेवा व्हावयास अंत:करणात शुद्ध ज्ञानभक्तीचा जिव्हाळा गृहीत धरला पाहिजे. म्हणून कर्म, भक्ति व ज्ञान अक्षरश: एकरूप आहेत. या परम दशेला पुरुषोत्तमयोग म्हणतात. जीवनाची अंतिम सीमा येथे गांठली गेली.

**3** आता आज या सोळाव्या अध्यायात काय सांगितलें आहे? ज्याप्रमाणे सूर्योदय व्हावयाचा असला म्हणजे आधी प्रभा फाकते, त्याप्रमाणे जीवनात कर्म, भक्ति व ज्ञान यांनी पूर्ण असा पुरुषोत्तम-योग उदय पावण्यापूर्वी सद्गुणांची प्रभा बाहेर फाकू लागते. परिपूर्ण जीवनाची ही जी आगामी प्रभा, त्या प्रभेचें वर्णन या सोळाव्या अध्यायात केलें आहे. ही प्रभा कोणत्या अंधाराशी झगडून प्रकट होते त्या अंधाराचेंहि वर्णन केलें आहे. एखाद्या वस्तूचा पुरावा म्हणून काही प्रत्यक्ष वस्तु पहावयास आपण मागतो. सेवा, भक्ति व ज्ञान जीवनात आलीं आहेत हें कशावरून समजावयाचें? आपण शेतात कष्ट करतो व धान्याची रास शेवटीं मोजून घेतो. त्याप्रमाणे आपण जी साधना करतो त्यातून आपल्या अनुभवास काय आलें, किती सद्वृत्ति खोल गेल्या, किती सद्गुण अंगीं बाणले, जीवन सेवामय खरोखर किती झालें, हें तपासावयास हा अध्याय सांगत आहे. जीवनाची कला किती चढली तें पहावयास हा अध्याय सांगत आहे. जीवनाच्या या वाढत्या कलेला गीता दैवी संपत्ति ही संज्ञा देते. याच्याविरुद्ध ज्या वृत्ति, त्यांना आसुरी म्हटलें आहे. सोळाव्या अध्यायात दैवी व आसुरी संपत्ति यांचा झगडा दाखविला आहे.

## 89. अहिंसेची आणि हिंसेची सेना

**4** ज्याप्रमाणे पहिल्या अध्यायात एकीकडे कौरव व दुसरीकडे पांडव समोरासमोर उभे केले आहेत, त्याप्रमाणे सद्‌गुणांची दैवी सेना व दुर्गुणांची आसुरी सेना येथे समोरासमोर उभ्या केल्या आहेत. फार प्राचीन काळापासून मानवी मनात सदसत्-प्रवृत्तींचा जो झगडा चालत असतो त्याचें रूपकात्मक वर्णन करण्याची पद्धति पडलेली आहे. वेदांत इंद्र व वृत्र, पुराणांत देव व दानव, तसेंच राम व रावण, पारशांच्या धर्मग्रंथात अहुरमज्द आणि अहरिमान, ख्रिस्ती धर्मात प्रभु व सैतान, मुसलमानी धर्मात परमेश्‍वर व इब्लीस; अशा प्रकारचे झगडे सर्व धर्मांतून आहेत. काव्यामध्ये स्थूल व ढोबळ विषयाचें वर्णन सूक्ष्म वस्तूंच्या रूपकाने करतात, तर धर्मग्रंथांत सूक्ष्म मनोभावांना ठसठशीत स्थूल रूप देऊन वर्णितात. काव्यात स्थूलाचें सूक्ष्माने वर्णन, तर येथे सूक्ष्माचें स्थूलाने वर्णन केलें जातें. यावरून असें सुचवावयाचें नाही की गीतेच्या आरंभीं जें युद्धाचें वर्णन आहे तें केवळ काल्पनिक आहे. ती ऐतिहासिक घटनाहि असेल, परंतु कवि त्या घटनेचा स्वत:च्या इष्ट हेतूसाठी उपयोग करून घेत आहे. कर्तव्यासंबंधी मोह पडला असता कसें वागावें, ही गोष्ट युद्धाचें रूपक देऊन मांडली आहे. या सोळाव्या अध्यायात चांगल्याचा व वाईटाचा झगडा दाखविला आहे. गीतेमध्ये युद्धाचें रूपकहि आहे.

**5** कुरुक्षेत्र बाहेरहि आहे व आपल्या मनातहि आहे. सूक्ष्म रीतीने पाहिलें तर जो झगडा मनात असतो तोच बाहेर आपणांस मूर्तिमंत दिसत असतो. बाहेर जो शत्रु उभा आहे, तो माझ्याच मनातील विकार साकार होऊन उभा आहे. आरशात ज्याप्रमाणे माझेंच बरे-वाईट प्रतिबिंब दिसेल, त्याप्रमाणे माझ्या मनातील बरे-वाईट विचार बाहेर शत्रुमित्ररूपाने मला दिसतात. मी जागृतीतील स्वप्नात पाहतो, त्याप्रमाणे मनातील बाहेर पाहतो. आंतील युद्ध व बाहेरील युद्ध यांत मुळीच फरक नाही. जें खरें युद्ध आहे तें आंतच आहे.

**6** आपल्या अंत:करणात एका बाजूस सद्‌गुण तर दुसऱ्या बाजूस दुर्गुण उभे आहेत. त्यांनी आपली रचना नीट केली आहे. सैन्यात ज्याप्रमाणे सेनापति लागतो, त्याप्रमाणे येथेहि सद्‌गुणांनी एक सेनापति नेमला आहे. या सेनापतीचें नांव – ‘अभय’. या अध्यायात अभयाला पहिलें स्थान दिलेलें आहे. ही गोष्ट सहजासहजीं झालेली नाही. हेतुपुरस्सरच अभय शब्द प्रथम योजिला असावा. कोणत्याहि गुणाची अभयाशिवाय वाढ नाही. खरेपणाशिवाय सद्‌गुणाला किंमत नाही. खरेपणाला निर्भयता लागते. भयभीत वातावरणात सद्‌गुण फोफावत नाहीत. भयभीत वातावरणात सद्‌गुणहि दुर्गुण होतील, सत्-प्रवृत्तिहि दुबळ्या होतील. निर्भयता सर्व सद्‌गुणांचा मुख्य नायक आहे. पण सैन्याला आघाडी व पिछाडी, दोन्हीकडे पहावें लागतें. सरळ हल्ला समोरून येतो, परंतु पाठीमागून चोरटा हल्ला येण्याचाहि संभव असतो. सद्‌गुणांच्या आघाडीस ‘निर्भयता’ ठाण मांडून उभी आहे, तर पिछाडी ‘नम्रता’ सांभाळीत आहे. अशी ही मोठी सुंदर रचना केली आहे. एकंदर सव्वीस गुण येथे दिले आहेत. यांतील पंचवीस गुण अंगीं ठसले, व जर का त्याचा अहंकार जडला, तर एकदम पाठीमागून हल्ला होऊन, मिळवलेलें सारें जावयाचें. म्हणून पाठीमागचे बाजूस ‘नम्रता’ हा सद्‌गुण ठेवला आहे. जर नम्रता नसेल तर जयाचें पराजयात केव्हा रूपांतर होईल तें कळणारहि नाही. अशा रीतीने पुढे ‘निर्भयता’ व मागे ‘नम्रता’ ठेवून सर्व सद्‌गुणांचा विकास करून घेणें शक्य होईल. या दोन गुणांच्यामधे जे चोवीस गुण आहेत, ते बहुतेक अहिंसेचेच पर्याय आहेत असें म्हटलें तरी चालेल. भूतदया, मार्दव, क्षमा, शांति, अक्रोध, अहिंसा, अद्रोह हे निरनिराळे अहिंसेचेच पर्याय-शब्द आहेत. अहिंसा व सत्य या दोन गुणांत सारे येऊन जातात. सर्व सद्‌गुणांना संक्षेप दिला तर शेवटीं अहिंसा व सत्य, दोनच वस्तु राहतील. त्यांच्या पोटात बाकी सारे सद्‌गुण येतात. परंतु निर्भयता व नम्रता यांची गोष्ट वेगळी आहे. निर्भयतेने प्रगति करून घेता येते व नम्रतेने बचाव होतो. सत्य व अहिंसा या दोन गुणांचें भांडवल घेऊन निर्भयपणें पुढें गेलें पाहिजे. जीवन विशाल आहे. त्यात अनिरुद्ध संचार करीत गेलें पाहिजे. पाऊल चुकू नये म्हणून नम्रता बरोबर असली म्हणजे झालें. मग चला सत्य-अहिंसेचे सर्वत्र प्रयोग करीत निर्भयपणें पुढे! तात्पर्य, सत्य व अहिंसा यांचा विकास निर्भयता व नम्रता यांनी होतो.

**7** एका बाजूने सद्‌गुणांची फौज उभी आहे, तशी इकडे दुर्गुणांचीहि उभी आहे. दंभ, अज्ञान वगैरे दुर्गुणांबद्दल फार बोलावयास नको. या गोष्टी आपल्या परिचयाच्या आहेत. दंभ तर अंगवळणीं पडल्यासारखा आहे. सर्व जीवन दंभावर

उभारल्यासारखें झालें आहे. अज्ञानासंबंधी बोलायचें म्हणजे अज्ञान ही एक गोजिरवाणी सबब आपण पदोपदी पुढे मांडीत असतो. जणू अज्ञान म्हणजे फारसा मोठा गुन्हाच नाही. परंतु भगवान् सांगतात, ''अज्ञान हें पाप आहे.'' सॉक्रेटिस याच्या उलट म्हणाला होता. खटल्याच्या वेळीं तो म्हणाला, ''ज्याला तुम्ही पाप समजता तें अज्ञान आहे. व अज्ञान क्षम्य आहे. अज्ञानाशिवाय पाप कसें संभवेल व अज्ञानाला शिक्षा कशी देणार?'' परंतु भगवान् सांगतात, ''अज्ञान हेंहि पापच आहे.'' कायद्याचें अज्ञान ही काही बचावाची गोष्ट होऊ शकत नाही, असें कायद्यामध्ये सांगतात. ईश्वराच्या कायद्याचें अज्ञानहि फार मोठा गुन्हा आहे. भगवंतांचे सांगणें व सॉक्रेटिसाचें सांगणें यांतील भावार्थ एकच आहे. स्वत:च्या अज्ञानाकडे कोणत्या दृष्टीने पहावें हें भगवान् सांगत आहेत, तर दुसऱ्याच्या पापाकडे कोणत्या दृष्टीने पहावें हें सॉक्रेटिस सांगत आहे. दुसऱ्याच्या पापाबद्दल क्षमा करावी. परंतु स्वत:च्या अज्ञानालाहि क्षमा करणें पाप आहे. स्वत:चें अज्ञान शिल्लक नाहीच ठेवता कामा.

## ९०. अहिंसेच्या विकासाचे चार टप्पे

**8** अशा रीतीने एकीकडे दैवी संपत्ति व दुसरीकडे आसुरी संपत्ति, अशा दोन सेना उभ्या आहेत. त्यांतील आसुरी संपत्ति टाळावी व दैवी संपत्ति कवटाळावी. सत्य, अहिंसा इत्यादि दैवी गुणांचा विकास अनादिकालापासून होत आहे. मध्यंतरी जो काळ गेला त्या काळातहि पुष्कळ विकास झाला. तरी अद्याप विकासास पुष्कळ अवसर आहे. विकासाची मर्यादा संपली असें नाही. जोंपर्यंत सामाजिक शरीर आपणांस आहे, तोंपर्यंत विकासास अनंत अवकाश आहे. वैयक्तिक विकास झाला तरी सामाजिक, राष्ट्रीय, जागतिक विकास राहतोच. व्यक्तीने आपल्या विकासाचें खत घालून मग समाज, राष्ट्र, यांतील लाखों व्यक्तींच्या विकासास सुरुवात करावयाची असते. उदाहरणार्थ, मानवाने अहिंसेचा विकास अनादिकाळापासून चालविला असला तरी आजहि तो विकास सुरूच आहे.

**9** अहिंसेचा विकास कसा होत गेला तें पाहण्यासारखें आहे. त्यावरून पारमार्थिक जीवनाचा विकास उत्तरोत्तर कसा होत आहे व त्याला अजून पूर्ण अवकाश कसा आहे हें दिसून येईल. हिंसकांच्या हल्ल्यापासून बचाव कसा करावा याचा अहिंसक माणूस विचार करू लागला. आधी समाजरक्षणार्थ क्षत्रियवर्ग ठेवला, परंतु तोच पुढे समाजभक्षण करू लागला. तेव्हा या उन्मत्त क्षत्रियांपासून बचाव कसा करावा याचा अहिंसक ब्राह्मण विचार करू लागले. परशुरामाने स्वत: अहिंसक असूनहि हिंसेचा अवलंब केला व तो क्षत्रियांचा नि:पात करू लागला. क्षत्रियांनी हिंसा सोडावी म्हणून तो स्वत: हिंसक बनला. हा अहिंसेचाच प्रयोग होता; परंतु तो यशस्वी झाला नाही. एकवीस वेळा क्षत्रियांचा संहार करूनहि ते उरलेच. कारण, हा प्रयोग मुळातच चुकीचा होता. ज्या क्षत्रियांत त्यांचा नायनाट करण्यासाठी म्हणून मी भर घातली तो क्षत्रिय-वर्ग कसा नष्ट व्हावा? मी स्वत:च हिंसक क्षत्रिय बनलो. हें बीज कायमच राहिलें. बीज कायम ठेवून झाडें तोडणारास पुन्हा पुन्हा झाडें उत्पन्न झालेलीं दिसणारच. परशुराम भला माणूस होता. परंतु प्रयोग मोठा विचित्र झाला. स्वत: क्षत्रिय होऊन तो पृथ्वी नि:क्षत्रिय करू पाहत होता. वास्तविक स्वत:पासूनच त्याने प्रयोग सुरू केला पाहिजे होता. स्वत:चेंच डोकें त्याने प्रथम उडविलें पाहिजे होतें. परशुरामाचा मी दोष दाखवितो, तो त्याच्यापेक्षा मी शहाणा म्हणून नव्हे. मी बालक आहे, परंतु त्याच्या खांद्यावर उभा आहे. म्हणून मला साहजिकच जास्त दिसत आहे. परशुरामाच्या प्रयोगाचा आधारच चुकीचा होता. हिंसामय होऊन हिंसेला दूर करणें शक्य नाही. उलट त्यामुळे हिंसकांची संख्या मात्र वाढते. परंतु त्या वेळेस ही गोष्ट लक्षात आली नाही. त्या वेळच्या भल्या माणसांनी, थोर अहिंसामय माणसांनी, विचार सुचला त्याप्रमाणे प्रयोग केले. परशुराम हा त्या वेळचा थोर अहिंसावादी. हिंसेच्या उद्देशाने त्याने हिंसा केली नाही. अहिंसा स्थापण्यासाठी ती हिंसा होती.

**10** तो प्रयोग फसला. पुढे रामाचें युग आलें. त्या वेळेस पुन्हा ब्राह्मणांनी विचार सुरू केला. त्यांनी हिंसा सोडली होती. स्वत: हिंसा नाहीच करावयाची असें त्यांनी ठरविलें. परंतु राक्षसांचे हल्ले कसे परतवावयाचे? त्यांनी असें पाहिलें की क्षत्रिय हिंसा करणारे आहेतच. त्यांच्याकडून परभारें राक्षसांचा संहार करवावा. कांट्याने कांटा काढावा. आपण स्वत: नामानिराळे रहावें. विश्वामित्राने यज्ञरक्षणार्थ रामलक्ष्मणांस बोलावून त्यांच्याकरवीं राक्षस संहारिलें. ''जी अहिंसा स्वसंरक्षित नाही, ज्या अहिंसेला स्वत:चे पाय नाहीत, असली लुळीपांगळी अहिंसा उभी कशी रहावयाची?'' असा

विचार आज आपण करतो; परंतु वसिष्ठ-विश्वामित्रासारख्यांस क्षत्रियांच्या बळावर स्वत:चा बचाव करून घेण्यात कमीपणा वाटला नाही. परंतु रामासारखा क्षत्रिय न भेटता तर? विश्वामित्र म्हणता, ''मी मरेन, परंतु हिंसा करणार नाही.'' हिंसक होऊन हिंसा दूर करण्याचा प्रयोग होऊन गेला होता. आता स्वत:ची अहिंसा तर नाहीच सोडावयाची, हें ठरून गेलें होतें. क्षत्रिय न लाभला तर अहिंसक मरून जातील, अशी आता भूमिका होती. अरण्य-कांडात एक प्रसंग आहे. रामाने विचारलें, ''हे ढीग कसले?'' ऋषि म्हणाले, ''हे ब्राह्मणांच्या हाडांचे ढीग आहेत. अहिंसक ब्राह्मणांनी हल्ला करणाऱ्या हिंसक राक्षसांचा प्रतिकार केला नाही. ते मेले. त्यांच्या हाडांचे हे ढीग.'' ब्राह्मणांच्या या अहिंसेत त्याग होता. परंतु दुसऱ्यापासून संरक्षणाची अपेक्षा होती. असल्या दुबळेपणाने अहिंसेची पूर्णता होत नाही.

**11** संतांनी पुढे तिसरा प्रयोग केला. संतांनी असें ठरविलें, ''दुसऱ्याची मदत मागावयाचीच नाही. माझी अहिंसाच माझा बचाव करील. असा जो बचाव होईल तोच खरा.'' संतांचा हा प्रयोग व्यक्तिनिष्ठ होता. हा व्यक्तिगत प्रयोग त्यांनी पूर्णत्वास नेला. परंतु या प्रयोगात व्यक्तिगतता राहिली. समाजावर हिंसकांचा हल्ला आला असता जर तो समाज संतांकडे येऊन विचारता, ''आम्ही काय करावें?'' तर त्या प्रश्नाला संतांना निश्चित उत्तर कदाचित् देता आलें नसतें. व्यक्तिगत जीवनात परिपूर्ण अहिंसा असणारे संत समाजाला सल्ला देतांना म्हणाले असते, ''आम्ही दुबळे आहोत.'' संतांना मी दोष देतो हें बालसाहस आहे. मी त्यांच्या खांद्यावर आहे म्हणून जें दिसतें तें सांगतो. त्यांनी मला क्षमा करावी. ते करतीलच. कारण, त्यांची क्षमा थोर आहे. अहिंसेच्या साधनाने सामुदायिक प्रयोग करावे असें संतांस वाटत नसेल असें नाही. पण त्यांना परिस्थिति तितकी अनुकूल वाटली नाही. त्यांनी स्वत:पुरते अलग अलग प्रयोग केले. परंतु अलग अलग केलेल्या प्रयोगांतूनच शास्त्र रचलें जातें. संमिलित अनुभवातून शास्त्र बनतें.

**12** संतांच्या प्रयोगानंतरचा चौथा प्रयोग आज आपण करीत आहोत. सर्व समाजाने अहिंसात्मक साधनांनी हिंसेचा प्रतिकार करण्याचा आजचा प्रयोग आपण चालविला आहे. अशा प्रकारें चार प्रयोग आपण पाहिले. प्रत्येक प्रयोगात अपूर्णता होती आणि आहे. विकासक्रमात ही गोष्ट अपरिहार्यच आहे. परंतु त्या त्या काळात ते ते प्रयोग पूर्णच होते असें म्हटलें पाहिजे. आणखी दहा हजार वर्षांनी आजच्या आपल्या अहिंसक युद्धातहि पुष्कळ हिंसा दिसून येईल. शुद्ध अहिंसेचे प्रयोग आणखी होत जातील. ज्ञान, कर्म व भक्ति यांचाच नव्हे तर सर्व सद्गुणांचा विकास होऊन राहिला आहे. एक वस्तु पूर्ण आहे. ती म्हणजे परमात्मा. भगवद्गीतेतील पुरुषोत्तमयोग पूर्ण आहे. परंतु व्यक्ति आणि समुदाय, यांच्या जीवनात त्याचा पूर्ण विकास व्हावयाचा आहे. वचनांचाहि विकास होतो. ऋषि मंत्राचे द्रष्टे समजले जात, कर्ते नव्हेत. कारण त्यांना मंत्राचा अर्थ दिसला. पण तोच त्याचा अर्थ असें नव्हे. त्यांना एक दर्शन झालें. यापुढे आपणांस त्याचा विकसित अर्थ दिसू शकतो. त्यांच्यापेक्षा आपणांस जास्त दिसतें हा काही आपला विशेष नव्हे. त्यांच्याच आधारावर आपण पुढे जातो. मी येथे अहिंसेच्याच विकासावर बोलत आहे याचें कारण, सर्व सद्गुणांचें सरासरीने सार काढलें तर अहिंसा हेंच निघेल. आणि त्या युद्धात आपण आज पडलोहि आहोत. म्हणून या तत्त्वाचा कसा विकास होत आहे तें पाहिलें.

## 91. अहिंसेचा एक महान् प्रयोग : मांसाहार-परित्याग

**13** हिंसकांचा हल्ला आला असता अहिंसकांनी बचाव कसा करावा, ही अहिंसेची एक बाजू आपण पाहिली. माणसा-माणसांतील झगड्यात अहिंसेचा कसा विकास होत आहे तें आपण पाहिलें. परंतु माणसांचा व पशूंचाहि झगडा आहे. माणसांनी अद्याप आपसांतील झगडे मिटविले नाहीत व पोटात पशु कोंबून ते जगत आहेत. मनुष्याला स्वत:चे झगडे अद्याप मिटविता येत नाहीत व आपल्याहून हीन दुबळे जे पशु त्यांना खाल्ल्याशिवाय त्याला जगता येत नाही. हजारों वर्षें जगून कसें जगावें याचा विचार अद्याप माणसाने केला नाही. माणसाला माणसासारखें जगता येत नाही. परंतु याहि गोष्टीचा विकास होत आहे. आदिमानव बहुधा कंदमूळफलाहारीच असेल. पण पुढे दुर्मतिवशात् पुष्कळसा मानव-समाज मांसाहारी बनला. शहाण्या उत्तम लोकांस हें पटलें नाही. मांस खावयाचेंच झालें तर यज्ञातील मारलेल्या पशूंचेंच खावें, असा त्यांनी निर्बंध घातला. हिंसेला आळा बसावा हा हेतु. कित्येकांनी तर मांसाचा संपूर्ण त्याग केला. परंतु ज्यांना संपूर्णत: त्याग करवत नव्हता, त्यांनी यज्ञात परमेश्वरास अर्पून, काही तपस्या करून मांस खावें अशी परवानगी

दिली. यज्ञातच मांस खा, असें सांगण्यात हिंसेला आळा बसेल, असें वाटत होतें; परंतु पुढे यज्ञ ही सामान्य वस्तु होऊन बसली. वाटेल त्याने उठावें, यज्ञ करावा, मांस खावें, असें सुरू झालें. तेव्हा भगवान् बुद्ध पुढे आले. ते म्हणाले, ''मांस खावयाचेंच असेल तर खा; परंतु देवाच्या नांवाने तरी नका खाऊ.'' या दोन्ही वचनांत हेतु एकच, हिंसेला आळा बसावा. गाडी कोठूनहि संयमाच्या मार्गावर यावी. यज्ञ-याग करा कीं करू नका. दोन्हींतून मांसाशनत्यागच आपण शिकलो. अशा रीतीने हळूहळू आपण मांसाशन सोडीत गेलो.

**14** जगाच्या इतिहासात भारतवर्षातच हा मोठा प्रयोग झाला. कोट्यवधि लोकांनी मांस सोडलें. आणि आपण आज मांस खात नाही यात आपली मोठी फुशारकी नाही. पूर्वजांच्या पुण्याईने आपल्या तें अंगवळणीं पडलें आहे. परंतु पूर्वीचे ऋषि मांस खात होते असें जर आपण म्हटलें किंवा वाचलें तर आपणांस आश्चर्य वाटेल. ऋषि आणि मांस? छे, काहीतरी भलतेंच! परंतु मांसाशन करीत असता संयमाने त्यांनी त्याग केला, याचें श्रेय त्यांना आहे. ते कष्ट आपणांस नाहीत. त्यांची पुण्याई आयती आपणांस मिळाली. पूर्वी ते मांसाशन करीत व आज आपण करीत नाही, म्हणून त्यांच्यापेक्षा आपण मोठे असा अर्थ नव्हे. त्यांच्या अनुभवाचा फायदा आपणांस आयता मिळाला. त्यांच्या अनुभवाचा आपण विकास केला पाहिजे. अजीबात दूध सोडण्याचे प्रयोगहि केले पाहिजेत. माणसाने अन्य प्राण्यांचें दूध पिणें हेंहि गौणच आहे. दहा हजार वर्षांनी येणारे लोक आमच्याविषयी म्हणतील, ''काय, त्यांना दूध न पिण्याचें व्रत घ्यावें लागे? दूध कसें बा तें पीत? इतके कसे ते रानटी?'' सारांश, निर्भयतेने व नम्रतेने आपण प्रयोग करीत सारखें पुढे गेलें पाहिजे. सत्याचें क्षितिज विशाल करीत गेलें पाहिजे. विकासास पुष्कळ अवकाश आहे, कोणत्याहि गुणाचा पूर्ण विकास झालेला नाही.

## 92. आसुरी संपत्तीची तिहेरी महत्त्वाकांक्षा : सत्ता, संस्कृति आणि संपत्ति

**15** दैवी संपत्तीचा विकास करावयाचा व आसुरी संपत्तीपासून दूर रहावयाचें. दूर राहण्यासाठी या आसुरी संपत्तीचें वर्णन भगवान् करून राहिले आहेत. या आसुरी वर्णनात तीनच मुख्य गोष्टी आहेत. असुरांच्या चरित्राचें सार 'सत्ता, संस्कृति व संपत्ति' या तीन वस्तूंत आहे. आपलीच संस्कृति काय ती उत्कृष्ट व तीच साऱ्या जगावर लादली जावी, ही महत्त्वाकांक्षा. आपलीच संस्कृति कां लादली जावी? तर ती म्हणे चांगली आहे. ती चांगली कां? तर ती आपली आहे म्हणून. आसुरी व्यक्ति काय किंवा अशा व्यक्तींनी बनलेलीं साम्राज्यें काय, त्यांना या तीन गोष्टी पाहिजे असतात.

**16** ब्राह्मणांना वाटतें ना की आपली संस्कृति सर्वश्रेष्ठ. सारें ज्ञान आपल्या वेदांत आहे. वैदिक संस्कृतीचा विजय सर्व जगभर व्हावा. **'अग्रतश्चतुरो वेदान् पृष्ठतः सशरं धनुः'** असें होऊन सर्व पृथ्वीवर आपल्या संस्कृतीचे झेंडे नाचवावेत. परंतु पाठीमागे **'सशरं धनुः'** असलें की पुढच्या बिचाऱ्या वेदांचा निकालच लागतो. मुसलमानांस असेंच वाटतें की कुराणात जें काही आहे तेवढेंच खरें. ख्रिस्ताच्या अनुयायांना तसेंच वाटतें. इतर धर्मांतील मनुष्य कितीहि वर गेलेला असो, त्याचा जर ख्रिस्तावर विश्वास नसेल तर त्याला स्वर्ग मिळणार नाही! देवाच्या घराला त्यांनी एकच दरवाजा ठेवला आहे व तो म्हणजे ख्रिस्ताचा! लोक आपल्या घरांना तर खूप दरवाजे व खिडक्या लावतात. परंतु बिचाऱ्या देवाच्या घराला एकच दरवाजा राखतात.

**17** **'कुलीन मी चि संपन्न माझी जोडी कुठें असे'** असें सर्वांना वाटत असतें. मी म्हणे भारद्वाज कुळातला! ती परंपरा माझी अव्याहत चालली आहे. पाश्चात्यांतहि असेंच आहे. आमच्या नसांत म्हणे नॉर्मन सरदारांचें रक्त आहे! आपल्याकडे गुरुपरंपरा असते ना. मूळ आदिगुरु म्हणजे शंकर. मग ब्रह्मदेव किंवा कोणी तरी गांठावयाचा. मग नारद, मग व्यास. मग आणखी एखादा ऋषि. मग आणखी मध्ये दहा-पांच लोक घालून मग स्वतःचा गुरु, मग मी – अशी परंपरा दाखवावयाची. आपण मोठे, आपली संस्कृति श्रेष्ठ, असें वंशावळीवरून सिद्ध करावयाचें. अरे, तुझी संस्कृति उत्तम असेल तर तुझ्या कृतीतून ती दिसू दे. तिची प्रभा आचरणातून फाकू दे. परंतु तें नाही. जी संस्कृति स्वतःच्या जीवनात नाही, स्वतःच्या घरात नाही, ती जगभर फैलावू पाहणें या विचारसरणीला आसुरी म्हणतात.

**18** ज्याप्रमाणे माझी संस्कृति सुंदर, त्याप्रमाणे जगातील सारी संपत्ति घ्यावयास लायक मीच. सारी संपत्ति मला पाहिजे व मी ती मिळविणारच. ती संपत्ति कां मिळवावयाची? तर बरोबर वांटणी करण्यासाठी! यासाठी स्वत:स संपत्तीत पुरून घ्यावयाचें! तो अकबर म्हणत असे ना, ''अजून रजपूत माझ्या साम्राज्यात कां दाखल होत नाहीत? एक साम्राज्य होईल, शांति नांदेल!'' अकबरास असें प्रामाणिकपणें वाटत होतें. हल्लीच्या असुरांस असेंच वाटतें की संपत्ति सारी एकत्र करावयाची. कां? तर ती पुन्हा वांटण्यासाठी.

**19** त्यासाठी मला सत्ता हवी. सारी सत्ता एका हातीं केंद्रीभूत झाली पाहिजे. ही तमाम दुनिया माझ्या तंत्राखाली राहिली पाहिजे. स्व-तंत्राप्रमाणे, माझ्या तंत्राप्रमाणे चालली पाहिजे. माझ्या ताब्यात जें असेल, माझ्या तंत्राप्रमाणे जें चालेल, तेंच स्व-तंत्र. अशा प्रकारें संस्कृति, सत्ता व संपत्ति या मुख्य तीन गोष्टींवर भर आसुरी संपत्तीत दिला जातो.

**20** एक काळ असा होता की ब्राह्मणांचें वर्चस्व समाजावर असे. त्यांनी शास्त्रें लिहावीं, कायदे करावे, राजांनी त्यांना नमावें. तें युग पुढे ओसरलें. क्षत्रियांचें युग आलें. घोडे सोडावयाचे, दिग्विजय करावयाचे. क्षत्रियसंस्कृतिहि आली व गेली. ब्राह्मण म्हणे, ''मी शिकविणारा, बाकी शिकणारे. माझ्याशिवाय गुरू कोण?'' ब्राह्मणांना संस्कृतीचा अभिमान होता. क्षत्रियांचा भर सत्तेवर होता. ''याला आज मी मारलें, त्याला उद्या मारीन'' या गोष्टीवर यांचा सारा जोर. पुढे वैश्यांचें युग आलें. ''पाठीवर मारा, परंतु पोटावर मारू नका'' यात वैश्यांचें सारें तत्त्वज्ञान आहे. सारें पोटाचें शहाणपण शिकवायचें. ''हें धन माझें आहे, आणि तेंहि माझें होईल'' हाच जप, आणि हाच संकल्प. इंग्रज आपणांस म्हणतात ना, ''स्वराज्य पाहिजे तर घ्या. फक्त आमचा पक्का माल येथे खपण्याच्या सवलती ठेवा म्हणजे झालें. मग तुमच्या संस्कृतीचा तुम्ही खूप अभ्यास करा. लंगोटी लावा व संस्कृति सांभाळा.'' आजकाल होणारीं युद्धें हीं व्यापारी असतात. हेंहि युग जाईल, जाण्यास आरंभहि झाला आहे. असे हे सारे आसुरी संपत्तीचे प्रकार आहेत.

## 93. काम-क्रोध-लोभ-मुक्तीचा शास्त्रीय संयम-मार्ग

**21** आसुरी संपत्ति दूर सारण्याचा प्रयत्न करावा. आसुरी संपत्ति म्हणजे थोडक्यात 'काम, क्रोध, लोभ.' सर्व जगाला हे काम-क्रोध-लोभ नाचवीत आहेत. हा नाच आता पुरे. हे सोडलेच पाहिजेत. क्रोध व लोभ कामातून उत्पन्न होतात. कामाला अनुकूल परिस्थिति प्राप्त झाली म्हणजे लोभ उत्पन्न होतो व प्रतिकूल परिस्थिति असली म्हणजे क्रोध उत्पन्न होतो. गीतेत पदोपदी या तिघांपासून दूर रहा असें सांगितलें आहे. सोळाव्या अध्यायाचे शेवटीं हेंच सांगितलें. काम-क्रोध-लोभ हे नरकाचे तीन भव्य दरवाजे आहेत. या दरवाजांतून पुष्कळ रहदारी आहे. अनेक लोक जातात, येतात. नरकाचा रस्ता ऐसपैस रुंद आहे. तेथून मोटारी जातात. वाटेत पुष्कळ सोबतीहि भेटतात. परंतु सत्याचा रस्ता अरुंद आहे.

**22** अशा या काम-क्रोधांपासून बचाव कसा करावयाचा? संयमाचा मार्ग स्वीकारून शास्त्रीय संयमाची कास धरली पाहिजे. संतांचे अनुभव म्हणजेच शास्त्र. प्रयोग करून संतांना जे सिद्धांत लाभले त्यांचें शास्त्र होतें. या संयमाच्या सिद्धांताची कास धरा. उगीच शंका काढीत नका बसू. काम-क्रोध जगातून गेले तर जगाचें कसें होईल, जग तर चाललेंच पाहिजे, थोड्या प्रमाणात तरी काम-क्रोध राखावयास नकोत का, असल्या शंका कृपा करून काढू नका. काम-क्रोध भरपूर आहेत, तुम्हांला जरूर आहे त्याहून जास्त आहेत. उगीच बुद्धिभेद कां निर्माण करता? काम-क्रोध-लोभ तुमच्या इच्छेहून कांकणभर जास्तच आहेत. काम मेला तर संतति कशी निर्माण होणार, अशी नको चिंता. वाटेल तेवढी संतति तुम्ही निर्माण केलीत तरी एक दिवस असा उजाडणार आहे की मनुष्याचें नांव पृथ्वीवरून साफ पुसून जाईल. शास्त्रज्ञ ही गोष्ट सांगत आहेत. पृथ्वी हळूहळू थंड होत आहे. एके काळीं पृथ्वी अत्यंत उष्ण होती. तेव्हा तिच्यावर जीव नव्हता. एक काळ असा येईल की पृथ्वी अत्यंत थंड होईल व जीवसृष्टि सारी लयाला जाईल. या गोष्टीला लाखों वर्षें लागतील. तुम्ही संतति कितीहि वाढवा, परंतु शेवटीं हा प्रलय व्हावयाचा आहे हें निश्चित. परमेश्वर जो अवतार घेतो, तो धर्मरक्षणार्थ घेतो, संख्यारक्षणार्थ नव्हे. धर्मपरायण असा एक तरी मनुष्य जोंपर्यंत आहे, जोंपर्यंत एक तरी पापभीरू व सत्यनिष्ठ मनुष्य आहे, तोंपर्यंत काळजी नाही. ईश्वराची त्याच्याकडे नजर राहील. ज्यांचा धर्म मेलेला आहे असे हजारों लोक असून-नसून सारखेच.

**23** हें सारें लक्षात घेऊन सृष्टीत बेताने रहा, संयमपूर्वक वागा. बेताल वागू नका. लोक-संग्रह करणें याचा अर्थ, लोक म्हणतील तसें वागणें हा नव्हे. माणसांचें संघ वाढविणें, संपत्तीचे ढीग जमा करणें म्हणजे सुधारणा नव्हे. संख्येवर विकास अवलंबून नाही. समाज जर बेसुमार वाढेल तर माणसें एकमेकांचे खून करतील. प्रथम पशु-पक्ष्यांना खाऊन मनुष्यसमाज माजेल. मग स्वत:च्या पोरांबाळांना तोडून खावें लागेल. काम-क्रोधांत सार आहे हें म्हणणें जर स्वीकारलें तर शेवटीं मनुष्य मनुष्याला फाडफाडून खाईल यात तिळमात्र शंका नको. लोकसंग्रह म्हणजे सुंदर व विशुद्ध नीतीचा मार्ग लोकांस दाखविणें. कामक्रोधांतून मुक्त झाल्यामुळे पृथ्वीवरचा मनुष्य जर नाहीसा झाला तर मंगळावर उत्पन्न होईल. म्हणून ती चिंता नको. अव्यक्त परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. तो तुमची काळजी घेईल. प्रथम तू मुक्त हो. पुढचें फार नको पाहू. सृष्टि व मानवजात यांची नको काळजी. तुझी नैतिक शक्ति वाढव. काम-क्रोध झडझडून टाक. **'आपुला तूं गळा घेईं उगवूनि'** – तुझी मान सांपडली आहे ती आधी वांचव. इतकें केलेंस तरी पुष्कळ झालें.

**24** संसार-समुद्रापासून दूर कांठावर उभें राहून समुद्राची गंमत पाहण्यात आनंद आहे. जो समुद्रात गटांगळ्या खात आहे, ज्याच्या नाकातोंडात पाणी जात आहे, त्याला समुद्राचा काय आनंद? संत समुद्र-तीरावर उभे राहून आनंद लुटतात. संसारापासून अलिप्त राहण्याची ही जी संतांची वृत्ति, ती अंगीं मुरल्याशिवाय आनंद नाही. कमलपत्राप्रमाणे अलिप्त रहा. बुद्धाने म्हटलें आहे, ''संत उंच पर्वताच्या शिखरावर उभे असतात व तेथून ते खालीं संसाराकडे पाहतात. मग हा संसार त्यांना क्षुद्र दिसतो.'' तुम्हीहि वर चढून पहा, म्हणजे हा अफाट पसारा क्षुद्र दिसेल. संसारात मग लक्षच लागणार नाही.

सारांश, भगवंतांनी आसुरी संपत्ति दूर करून दैवी संपत्ति जवळ करावी असें या अध्यायात कळकळीने सांगितलें आहे. त्याप्रमाणे यत्न करावा.

***रविवार, 5-6-'32***

# अध्याय 17

# परिशिष्ट 2 : साधकाचा कार्यक्रम

## 94. सुबद्ध वर्तनाने वृत्ति मोकळी राहते

**1** माझ्या प्रिय बंधूंनो! आपण हळूहळू टोकाकडे येत चाललो आहोत. पंधराव्या अध्यायात जीवनाचें संपूर्ण शास्त्र पाहिलें. सोळाव्या अध्यायात एक परिशिष्ट पाहिलें. मनुष्याच्या मनात व त्याच्या मनाचें प्रतिबिंब जो समाज त्या समाजात दोन वृत्तींचा, किंवा दोन संस्कृतींचा, किंवा दोन संपत्तींचा झगडा चालला आहे. त्यांतून दैवी संपत्तीचा विकास करावा ही शिकवण सोळाव्या अध्यायातील परिशिष्टात मिळाली. आज सतराव्या अध्यायात दुसरें परिशिष्ट पहावयाचें आहे. या अध्यायात कार्यक्रम-योग सांगितला आहे असें एका दृष्टीने म्हणता येईल. गीता या अध्यायात रोजचा कार्यक्रम सुचवीत आहे. नित्यक्रिया आजच्या अध्यायात पहावयाच्या आहेत.

**2** आपली वृत्ति प्रसन्न व मोकळी रहावी असें वाटत असेल तर आपण आपलें वर्तन बांधून घेतलें पाहिजे. आपला नित्य कार्यक्रम कोणत्या तरी ठराविक भूमिकेवरून चालला पाहिजे. त्या मर्यादेने, त्या एका निश्चित नियमित रीतीने आपलें जीवन चाललें तरच मन मोकळें राहू शकेल. नदी मोकळेपणें वाहते. परंतु तिचा प्रवाह बांधलेला आहे. जर बांधलेला नसेल तर तिचा मोकळेपणा वाया जाईल. ज्ञानी पुरुषाचें उदाहरण आपण डोळ्यांसमोर घेऊ या. सूर्य हा ज्ञानी पुरुषांचा आचार्य आहे. भगवंतांनी प्रथम कर्मयोग सूर्यास शिकविला व सूर्यापासून मनूस, म्हणजे विचार करणाऱ्या मनुष्यास प्राप्त झाला. सूर्य स्वतंत्र व मोकळा आहे. तो नियमित आहे यातच त्याच्या स्वतंत्रतेचें सार आहे. आपल्या अनुभवाची गोष्ट आहे की ठराविक रस्त्याने फिरावयास जाण्याची जर आपणांस सवय असेल तर रस्त्याकडे लक्ष न देता मनाने आपणांस विचार करीत फिरता येतें. रोज नवीन नवीन रस्ता जर फिरण्यासाठी आपण काढू, तर सारें लक्ष त्या मार्गाकडेच द्यावें लागेल. मनाला मग मोकळीक राहणार नाही. सारांश, जीवनाचा बोजा न वाटता जीवनात आनंद वाटावा, यासाठी आपण वर्तन बांधून घेतलें पाहिजे.

**3** यासाठी या अध्यायात भगवान् कार्यक्रम सांगून राहिले आहेत. आपण जन्मताच तीन संस्था बरोबर घेऊन जन्मत असतो. या तीन संस्थांचें कार्य मनुष्याने उत्तम रीतीने चालवून संसार सुखमय करावा यासाठी गीता कार्यक्रम सांगत आहे. कोणत्या या तीन संस्था? आपल्याभोंवती गुंडाळलेलें हें शरीर ही एक संस्था; आपल्या आसपास पसरलेलें हें विशाल ब्रह्मांड, ही अपार सृष्टि, जिचा आपण एक अंश आहोत, ती दुसरी संस्था; आणि ज्या समाजात आपण जन्मलो तो समाज, आपल्या जन्माची वाट पाहत असलेले ते आईबाप, बहीणभाऊ, आसपासचे शेजारीपाजारी, ही तिसरी संस्था. या तिन्ही संस्था आपण रोज वापरतो, झिजवतो. गीतेची अशी इच्छा आहे की, या संस्थांची आपल्यासाठी जी झीज होते ती भरून काढण्यासाठी आपण सतत प्रयत्न करावा व जीवन सफल करावें. अहंकार दूर ठेवून या संस्थांसंबंधीचें हें जन्म-प्राप्त कर्तव्य आपण केलें पाहिजे.

हें कर्तव्य करावयाचें खरें, पण त्याची योजना कोणती? यज्ञ, दान व तप या तिहींनी मिळून ही योजना होते. हे शब्द आपल्या परिचयाचे असले तरी त्यांतील अर्थ आपणांस नीट समजत नसतो. अर्थ समजून घेऊन जर जीवनात त्या गोष्टी भरून राहतील तर तिन्ही संस्थांचें साफल्य होऊन आपलें जीवनहि मोकळें व प्रसन्न राहील.

## 95. त्यासाठी त्रिविध क्रियायोग

**4** हा अर्थ समजून घेण्यासाठी प्रथम यज्ञ म्हणजे काय तें पाहू. सृष्टि-संस्था आपण रोज वापरतो. शंभर माणसें एके ठिकाणीं राहिलीं तर दुसऱ्या दिवशीं तेथील सृष्टि बिघडलेली दिसते. तेथील हवा आपण बिघडवितो, जागा गलिच्छ करतो. अन्न खातो व सृष्टिहि झिजवितो. सृष्टि-संस्थेची ही झीज भरून काढली पाहिजे. यासाठी यज्ञसंस्था निर्माण झाली. यज्ञाचा उद्देश काय? सृष्टीची जी झीज होते ती भरून काढणें म्हणजे यज्ञ. आज हजारों वर्षें आपण जमिनीची मशागत करीत आहोत. भूमीचा कस कमी होत आहे. आपण तिला झिजवीत आहोत. यज्ञ म्हणतो, ‘‘पृथ्वीचा कस परत

दे. जमीन नांगर. सूर्याची उष्णता तिच्यात सांठू दे. खत घाल.'' झीज भरून काढणें हा यज्ञातील एक हेतु. दुसरा हेतु म्हणजे वापरलेल्या वस्तूंचें शुद्धीकरण करणें. आपण विहीर वापरतो. आजूबाजूस घाण होते. पाणी सांचतें. विहिरीजवळची ही जी सृष्टि बिघडली, ती शुद्ध करावयाची. तेथील पाणी काढून लावावयाचें. चिखल दूर करावयाचा. झीज भरून काढणें, शुद्धि करणें, या गोष्टींबरोबरच प्रत्यक्ष काही निर्माण करावयाचें, ही तिसरी गोष्टहि यज्ञात आहे. कापड वापरलें, रोज पुन्हा सूत कांतून तें निर्मावयाचें. कापूस पिकविणें, धान्य निर्माण करणें, सूत कांतणें, हीहि यज्ञक्रियाच. यज्ञात जें निर्माण करावयाचें तें स्वार्थासाठी नव्हे. आपण जी झीज केली ती भरून काढण्याची कर्तव्यभावना तेथे असली पाहिजे. हा परोपकार नाही. आपण आधीच ऋणी आहोत. जन्मत:च ऋण डोक्यावर घेऊन आपण आलो. हें ऋण फेडण्यासाठी जी निर्मिति करावयाची तो यज्ञ म्हणजे सेवा आहे, परोपकार नव्हे. त्या सेवेने ऋण फेडावयाचें आहे. पदोपदी सृष्टिसंस्था आपण वापरतो. तिची झीज भरून काढण्यासाठी, तिची शुद्धि करण्यासाठी, व नवीन उत्पन्न करण्यासाठी यज्ञ करावयाचा.

**5** दुसरी संस्था म्हणजे मनुष्य-समाज. आईबाप, गुरु, मित्र, हे आपल्यासाठी मेहनत करीत असतात. हें समाजाचें ऋण फेडण्यासाठी दान सांगितलें आहे. समाजाचें ऋण फेडण्यासाठी केलेला प्रयोग म्हणजे दान. दान म्हणजे परोपकार नव्हे. समाजापासून मी अपार सेवा घेतलेली आहे. मी या जगात असहाय व दुबळा होतो. या समाजाने मला लहानाचें मोठें केलें. यासाठी मी समाजाची सेवा करावयाची. दुसऱ्याचें काही न घेता केलेली सेवा म्हणजे परोपकार. परंतु येथे समाजापासून आधीच भरपूर घेतलेलें आहे. समाजाच्या या ऋणातून मुक्त होण्यासाठी जी सेवा करावयाची ती सेवा म्हणजेच दान. मनुष्यसमाजाला पुढे जाण्यासाठी मदत करणें म्हणजे दान. सृष्टीची झीज भरून काढण्यासाठी केलेली मेहनत म्हणजे यज्ञ. समाजाचें ऋण फेडण्यासाठी शरीराने, द्रव्याने, वा अन्य साधनाने केलेली मदत, तें दान होय.

**6** याशिवाय तिसरी एक संस्था आहे. ती म्हणजे शरीर. शरीराचीहि दिवसेंदिवस झीज होत असते. आपण मन, बुद्धि, इंद्रियें या सर्वांना वापरतो, झिजवितो. या शरीररूपी संस्थेत जे विकार, जे दोष उत्पन्न होतील, त्यांच्या शुद्धीसाठी तप सांगितलें.

**7** अशा तऱ्हेने सृष्टि, समाज व शरीर, या तिन्ही संस्थांचें काम उत्कृष्ट चालेल असें वागणें हें आपलें कर्तव्य आहे. आपण योग्य वा अयोग्य अनेक संस्था निर्माण करतो. परंतु या तीन संस्था आपण निर्मिल्या नाहीत. त्या स्वभावत:च आपणांस मिळाल्या आहेत. या संस्था कृत्रिम नाहीत. अशा या तीन संस्थांची यज्ञ-दान-तप या साधनांनी झीज भरून काढणें, हा माझा स्वभाव-प्राप्त धर्म आहे. या रीतीने आपण वागू लागू तर आपली असेल नसेल ती शक्ति येथे लागेल. इतर गोष्टी करण्यास अवांतर शक्ति शिल्लकच राहणार नाही. सृष्टि, समाज व हें शरीर, या तिन्ही संस्था सुंदर राहण्यासाठी आपली सारी शक्ति खर्च करावी लागेल. कबीरासारखें जर आपणांसहि म्हणता आले, ''देवा, तू मला जशी चादर दिलीस, तशी मी परत देऊन चाललो. नीट तपासून घे ही चादर,'' तर केवढी सफलता आहे ती! परंतु अशी सफलता प्राप्त व्हावी यास्तव यज्ञ-दान-तपांचा त्रिविध कार्यक्रम आचरला पाहिजे.

यज्ञ, दान व तप यांच्यात आपण भेद पाहिला, परंतु खरें म्हटलें तर भेद नाही. कारण सृष्टि, समाज व शरीर या तीन अजीबात निरनिराळ्या संस्था नाहीत. हा समाज सृष्टीबाहेर नाही. हें शरीरहि सृष्टीबाहेर नाही. तिन्ही मिळून एकच भव्य सृष्टिसंस्था होते. म्हणून जो उत्पादक परिश्रम करावयाचा, जें दान करावयाचें, जें तप आचरावयाचें, त्या सर्वांना व्यापक अर्थाने यज्ञच म्हणता येईल. गीतेने चौथ्या अध्यायात द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ वगैरे यज्ञ सांगितले आहेत. गीतेने यज्ञाचा अर्थ विशाल केला आहे.

या तिन्ही संस्थांसाठी जी जी सेवा करू, ती सेवा यज्ञरूपच असणार. ती सेवा निरपेक्ष असली म्हणजे झालें. या सेवेत फलाची अपेक्षा ठेवता येणारच नाही. कारण फल आपण आधीच घेऊन चुकलो आहोत. ऋण अगोदरच शिरावर आहे. घेतलेलें परत करावयाचें आहे. यज्ञाने सृष्टिसंस्थेत साम्यावस्था प्राप्त होते. दानाने समाजात साम्यावस्था प्राप्त होते. तपाने शरीरात साम्यावस्था राहते. अशा रीतीने तिन्ही संस्थांत साम्यावस्था ठेवण्याचा हा कार्यक्रम आहे. त्याने शुद्धि होईल, दूषित भाव नाहीसा होईल.

**8** ही जी सेवा करावयाची, त्यासाठी काही भोगहि घ्यावा लागेल. भोग हेंहि एक यज्ञाचेंच अंग आहे. या भोगाला गीता आहार म्हणते. या शरीररूपी यंत्राला अन्नरूपी कोळसा दिला पाहिजे. हा आहार जरी स्वत: यज्ञ नसला तरी यज्ञ सिद्ध होण्याचें तें अंग आहे. म्हणून **'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म'** असें आपण म्हणतो. बगिच्यातून फुलें तोडून आणून देवाच्या शिरीं वाहिलीं ही पूजा. परंतु फुलें निर्माण करण्यासाठी बगिच्यात मेहनत केली, तीहि पूजाच. यज्ञ पुरा करण्यासाठी जी जी क्रिया करावयाची, ती एक प्रकारची पूजाच होय. देहाला आहार दिला तरच देह उपयोगी पडेल. यज्ञ-साधन अशीं कर्में, तींहि यज्ञच. गीता या कर्मांना 'तदर्थीय कर्म', यज्ञार्थ कर्म, असें म्हणते. हें शरीर सेवेसाठी सदा उभें रहावें, म्हणून या शरीराला जी मी आहुति देईन, ती आहुति यज्ञरूप आहे. सेवार्थ केलेला आहार पवित्र आहे.

**9** या सर्व गोष्टींच्या मुळाशी पुन्हा श्रद्धा हवी. सर्व सेवा परमेश्वरार्पण करावयाची हा भाव हवा. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ईश्वरार्पण-बुद्धीशिवाय सेवामयता येऊ शकत नाही. ईश्वरार्पणता ही प्रधान वस्तु विसरून चालणार नाही.

## 96. साधनेचें सात्त्विकीकरण

**10** परंतु आपल्या क्रिया ईश्वराला केव्हा अर्पण करता येतील? त्या सात्त्विक होतील तेव्हा. आपलीं सर्व कर्में जेव्हा सात्त्विक होतील तेव्हाच तीं देवास अर्पण करता येतील. यज्ञ, दान, तप, सर्व सात्त्विक पाहिजेत. क्रिया सात्त्विक कशा करावयाच्या ह्याचें तत्त्व चौदाव्या अध्यायात आपण पाहिलें. या अध्यायात गीता त्या तत्त्वाचा विनियोग सांगून राहिली आहे.

**11** ही सात्त्विकतेची योजना करण्यात गीतेचा दुहेरी उद्देश आहे. बाहेरून यज्ञ-दान-तपाची जी माझी विश्व-सेवा चालली आहे, तिलाच आंतून आध्यात्मिक साधनेचें नांव देता यावें. सृष्टीची सेवा व साधना यांना दोन निरनिराळे कार्यक्रम नकोत. साधना व सेवा या दोन निरनिराळ्या गोष्टी नाहीतच मुळीं. दोहोंसाठी एकच प्रयत्न, एकच कर्म. असें केलेलें जें कर्म तें पुन्हा शेवटीं ईश्वरार्पण करावयाचें. सेवा + साधना + ईश्वरार्पणता हा योग एकाच क्रियेने साध्य झाला पाहिजे.

**12** यज्ञ सात्त्विक होण्यासाठी दोन गोष्टींची जरूरी आहे. निष्फलतेचा अभाव व सकामतेचा अभाव या दोन गोष्टी यज्ञात असाव्यात. यज्ञामध्ये जर सकामता असेल तर तो राजस यज्ञ होईल. निष्फलता असेल तर तो तामस यज्ञ होईल.

सूत कांतणें हा यज्ञ आहे. सूत कांततांना जर त्यात आत्मा ओतला नसेल, चित्ताची एकाग्रता नसेल, तर तो सूत्रयज्ञ जड होईल. बाहेरून काम चाललें असता आंतून मनाचा मेळ नसेल तर ती सारी क्रिया विधिहीन होईल. विधिहीन कर्म जड होतें. विधिहीन क्रियेत तमोगुण येतो. ती क्रिया उत्कृष्ट निर्मिति करू शकत नाही. फलाची निष्पत्ति तिच्यापासून होणार नाही. यज्ञात सकामता नसली तरी उत्कृष्ट फल त्यापासून मिळालें पाहिजे. कर्मात जर मन नसेल, आत्मा नसेल, तर तें कर्म बोजारूप होईल. त्यापासून मग कोठलें उत्कृष्ट फल? बाहेरचें काम बिघडलें तर आंत मनाचा मेळ नव्हता ही गोष्ट निश्चित. कर्मात आत्मा ओता. आंतून मेळ ठेवा. सृष्टि-संस्थेचें ऋण फेडण्यासाठी आपणांस उत्कृष्ट फलोत्पत्ति केली पाहिजे. कर्मात फलहीनता येऊ नये म्हणून ही आंतरिक मेळाची विधियुक्तता असली पाहिजे.

**13** अशा रीतीने निष्कामता अंगीं बाणून विधिपूर्वक यशस्वी कर्म हातून होईल, तेव्हाच चित्तशुद्धि होऊ लागेल. चित्तशुद्धीची कोणती कसोटी? बाहेरचें काम तपासून पहावें. तें जर निर्मळ व सुंदर नसेल तर चित्तहि मलिन समजण्यास हरकत नाही. कर्मात सौंदर्य तरी केव्हा निर्माण होतें? चित्तशुद्धिपूर्वक व परिश्रमपूर्वक केलेल्या कर्मावर परमेश्वर आपल्या पसंतीचा, आपल्या प्रसन्नतेचा शिक्का मारतो. प्रसन्न परमेश्वराने कर्माच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला म्हणजे तेथे सौंदर्य उत्पन्न होतें. सौंदर्य म्हणजे पवित्र श्रमाला मिळालेला परमेश्वरी प्रसाद. मूर्ति बनवितांना तन्मय झालेल्या शिल्पकाराला असा अनुभव येऊ लागतो की, ही सुंदर मूर्ति माझ्या हातून बनलेली नाही. मूर्तीचा आकार घडता घडता शेवटच्या क्षणीं आपोआप कोठून तरी सौंदर्य तेथे येऊन उभें राहतें. चित्तशुद्धीशिवाय ही ईश्वरी कला प्रकट होईल का? मूर्तीतील सारें स्वारस्य हेंच की, आपल्या अंत:करणातील सौंदर्य तेथे ओतलेलें असतें. मूर्ति म्हणजे आपल्या चित्ताची

प्रतिमा. आपलीं सारीं कर्में म्हणजे आपल्या मनाच्या मूर्ति होत. मन सुंदर असेल तर त्या कर्ममय मूर्तिहि सुंदर होतील. बाहेरच्या कर्माची शुद्धि मनातील शुद्धीवरून व मनाची शुद्धि बाहेरच्या कर्मावरून पडताळून घ्यावी.

**14** आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली. ती ही की, ह्या सर्व कर्मांत मंत्रहि पाहिजे. मंत्रहीन कर्म व्यर्थ होय. सूत काढतांना या सुताने मी गरीब जनतेशी जोडला जात आहे हा मंत्र आंत हवा. हा मंत्र हृदयात नसेल आणि तासन्तास क्रिया केली तरी ती व्यर्थ होय. ती क्रिया चित्त शुद्ध करणार नाही. त्या कापसाच्या पेळूतील अव्यक्त परमात्मा सूत्ररूपाने प्रकट होत आहे, असा मंत्र त्या क्रियेत ओतून मग त्या क्रियेकडे पहा; ती क्रिया अति सात्त्विक व सुंदर होईल. ती क्रिया पूजा होईल, यज्ञरूप सेवा होईल. त्या लहानशा धाग्याने समाजाशी, जनतेशी, जगदीश्वराशी बांधले जाल. बालकृष्णाच्या चिमुकल्या तोंडात यशोदामाईला सारें विश्व दिसलें. तुमच्या त्या मंत्रमय सुताच्या धाग्यातहि तुम्हांस विशाल विश्व दिसू लागेल.

## 97. आहार-शुद्धि

**15** अशी सेवा हातून व्हावी म्हणून आहारशुद्धिहि हवी. जसा आहार तसें मन. आहार परिमित असावा. आहार कोणता असावा यापेक्षाहि तो किती असावा ही वस्तु अधिक महत्त्वाची आहे. आहाराची निवड ही गोष्ट महत्त्वाची नाही असें नाही. परंतु आहार घेतो तो प्रमाणात घेतो कीं नाही ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे.

**16** आपण जें खातो त्याचा परिणाम होणारच. आपण कां खातो? सेवा हातून उत्कृष्ट व्हावी म्हणून. आहारहि यज्ञांग आहे. सेवारूप यज्ञ फलद्रूप व्हावा म्हणून आहार. आहाराकडे या भावनेने पहा. तो स्वच्छ व शुद्ध असावा. व्यक्ति आपल्या जीवनात आहारशुद्धि किती करील याला मर्यादाच नाही. परंतु आपल्या समाजाने आहारशुद्धीसाठी तपस्या केली आहे. आहारशुद्धीसाठी हिंदुस्थानात विशाल प्रयत्न झाले. त्या प्रयोगांत हजारों वर्षें गेलीं. त्या प्रयोगांत किती तपस्या खर्चीं पडली असेल तें सांगवत नाही. जगाच्या पाठीवर एक हिंदुस्थानच असा देश आहे की, जेथे जातीच्या जाति निवृत्तमांसाशन आहेत. ज्या जाति मांसाशन करतात त्यांच्याहि आहारात मांस ही नित्य वस्तु, मुख्य वस्तु असते असें नाही. आणि जे मांस खातात, त्यांनाहि त्यात उणेपणा वाटतो. मनाने त्यांनी मांसाचा त्याग केलेलाच असतो. मांसाशनाला आळा घालण्यासाठी यज्ञ रूढ झाला व तदर्थच यज्ञ बंद झाला. श्रीकृष्ण भगवंतांनी तर यज्ञाची व्याख्याच बदलली. कृष्णाने दुधाचा महिमा वाढविला. कृष्णाने असामान्य गोष्टी थोड्या नाही केल्या. परंतु हिंदी जनतेला कोणत्या कृष्णाचें वेड होतें? गोपालकृष्ण. गोपालकृष्ण हेंच नांव हिंदी जनतेस प्रिय आहे. तो कृष्ण, त्याच्याजवळ बसलेली ती गाय, ती अधरात धरलेली मुरली, असा तो गाईची सेवा करणारा गोपालकृष्णच आबालवृद्धांच्या ओळखीचा आहे. गोरक्षणाचा मोठा उपयोग मांसाशन बंद करण्याकडे झाला. गाईच्या दुधाचा महिमा वाढला व मांसाशन कमी झालें.

**17** तरी आहारशुद्धि संपूर्ण झाली आहे असें नाही, आपणांस ती पुढे न्यावयाची आहे. बंगाली लोक मासे खातात याचें कित्येकांस आश्चर्य वाटतें. पण त्यांना दोष देणें योग्य होणार नाही. बंगालमध्ये नुसता भात असतो. त्याने शरीराचें सर्वस्वी पोषण होऊ शकत नाही. ह्यासाठी प्रयोग करावे लागतील. मासे न खाता कोणती वनस्पति खाल्ल्याने तीच पुष्टि मिळेल याचा विचार सुरू होईल. असामान्य त्यागाच्या व्यक्ति निघतील व असे प्रयोग होतील. अशा व्यक्तिच समाजास पुढे नेतात. सूर्य जळत असतो, तेव्हा कोठे जगण्यापुरती अठ्याण्णव डिग्री उष्णता आपल्या अंगात राहते. समाजात वैराग्याचे धगधगीत जळते सूर्य जेव्हा निर्माण होतात, श्रद्धेने परिस्थिति झुगारून बिनपंखांनी ध्येयाकाशात जेव्हा ते भराऱ्या मारू लागतात, तेव्हा कोठे संसारोपयोगी अल्पस्वल्प वैराग्य आपणांत येतें. मांसाशन बंद करावयास ऋषींना किती तपस्या करावी लागली असेल, किती प्राणार्पणें करावीं लागलीं असतील, त्याचा अशा वेळीं माझ्या मनात विचार येतो.

**18** सारांश, आज आमची सामुदायिक आहारशुद्धि इतकी झालेली आहे. अनंत त्याग करून पूर्वजांनी मिळविलेली ही कमाई गमावू नका. हिंदी संस्कृतीतील ही गोष्ट बुडवू नका. आपणांस कसें तरी जगावयाचें नाही. कसें तरी ज्याला जगावयाचें आहे, त्याचें काम सोपें आहे. पशुसुद्धा कसे तरी जगतात. जसे पशु तसेच का आपण? पशूमध्ये व

आपणांमध्ये फरक आहे. तो फरक वाढविणें यालाच संस्कृतिवर्धन म्हणतात. आपल्या राष्ट्राने मांसाशन-त्यागाचा महान् प्रयोग केला. तो पुढे न्या. निदान ज्या भूमिकेवर आहात त्याच्या मागे तरी जाऊ नका.

ही सूचना देण्याचें कारण हें की हल्ली कित्येकांना मांसाशनाची इष्टता वाटू लागली आहे. आज पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींचा परस्परांवर परिणाम होत आहे. यातून शेवटीं भलेंच होईल अशी मला श्रद्धा आहे. पाश्चात्य संस्कृतीमुळे आपणांतील जड श्रद्धा ढासळून जात आहे. अंध श्रद्धा ढासळली तरी काही नुकसान नाही. जें चांगलें असेल तें टिकेल. वाईट जळून जाईल. अंध श्रद्धा जाऊन तिच्या जागीं अंध अश्रद्धा मात्र उत्पन्न होता कामा नये. श्रद्धाच फक्त आंधळी असते असें नाही. 'अंध' विशेषणाचा मक्ता श्रद्धेनेच फक्त घेतला असें नाही. अश्रद्धाहि आंधळी असू शकते.

मांसाहारासंबंधी आज पुन्हा विचार सुरू झाला आहे. काय असेल तें असो, काही नवीन विचार निघाला म्हणजे मला आनंद वाटतो. लोक जागे आहेत, धक्के देत आहेत, असें तरी समजतें. जागृतीचीं लक्षणें पाहून बरें वाटतें. परंतु जागृत होऊन डोळे चोळीत तसेंच चालू तर पडण्याचा संभव. म्हणून पुरती जागृति येईपर्यंत, डोळस जागृति येईपर्यंत, हातापायांस मर्यादा घातलेली बरी. खूप विचार करा. आडवे तिडवे चारी बाजूंनी विचार करा. धर्माला विचाराची कात्री लावा. या विचाररूप कात्रीने जो धर्म कातरला जाईल तो कुचकामाचाच होता असें समजलें पाहिजे. जे तुकडे असे तुटतील ते जाऊ देत. तुझ्या कात्रीने जो तुटणार नाही, उलट तुझी कात्रीच जेथे तुटेल, तोच धर्म खरा. धर्माला विचाराची भीति नाही. विचार करा; परंतु कृति एकदम नका करू. अर्धवट जागृतीत कृति कराल तर पडाल. विचार जोराने चालले तरी तूर्त आचार सांभाळा. कृतीवर संयम ठेवा. पूर्वीची पुण्याई गमावू नका.

## 98. अविरोधी जीवनाची गीतेची योजना

**19** आहारशुद्धीने चित्तशुद्धि राहील. शरीरासहि बळ लाभेल. समाजसेवा नीट करता येईल. चित्तात संतोष राहील. समाजात संतोष नांदेल. ज्या समाजात यज्ञ-दान-तप-क्रिया विधियुक्त व समंत्र चालल्या आहेत, त्या समाजात विरोध आढळणार नाही. जसे आरसे समोरासमोर असले तर याच्यातील त्याच्यात दिसतें, त्याच्यातील याच्यात दिसतें, त्याप्रमाणे व्यक्ति व समाज यांत बिंबप्रतिबिंबन्यायाने संतोष प्रकट होईल. माझा संतोष तो समाजाचा, व समाजाचा तो माझा. उभय संतोष पडताळून पाहता येतील व ते एकरूप आहेत असें दिसून येईल. सर्वत्र अद्वैताचा अनुभव येईल. द्वैत व द्रोह यांचा अस्त होईल. अशी सुव्यवस्था ज्या योजनेने समाजात राहू शकेल अशी योजना गीता मांडीत आहे. आपला रोजचा कार्यक्रम जर गीतेच्या योजनेप्रमाणे रचला तर किती सुरेख होईल!

**20** परंतु आज व्यक्तीचें जीवन व सामाजिक जीवन यांत झगडा आहे. हा झगडा कसा दूर करता येईल, याची चर्चा आज सर्वत्र चालली आहे. व्यक्ति व समाज यांच्या मर्यादा कोणत्या? व्यक्ति गौण कीं समाज गौण? श्रेष्ठ कोण? कोणी व्यक्तिवादाचे पुरस्कर्ते समाजाला जड समजतात. सेनापतीकडे एखादा शिपाई आला तर त्याच्याजवळ बोलतांना सेनापति सौम्य भाषा वापरतो. त्याला 'तुम्ही'हि म्हणेल. परंतु सैन्याला तो वाटेल तसे हुकूम सोडील. सैन्य अचेतन, जणू ठोकळाच. इकडून तिकडे हलवावा, तिकडून इकडे. व्यक्ति चैतन्यमय आहे. समाज जड आहे. याचा अनुभव येथेहि येत आहे. पहा, माझ्यासमोर दोन-तीनशें लोक आहेत, परंतु मी त्यांना रुचो वा न रुचो, बोलतच आहे. मला सुचेल तें मी सांगत आहे. जणू तुम्ही जडच आहात. परंतु माझ्यासमोर एक व्यक्ति आली तर त्या व्यक्तीचें म्हणणें ऐकून घ्यावें लागेल, विचारपूर्वक उत्तर द्यावें लागेल; परंतु येथे मी तास तास तुम्हांस तिष्ठत ठेवलें आहे.

समाज जड आहे व व्यक्ति चैतन्यमय आहे असा व्यक्तिचैतन्यवाद कोणी प्रतिपादतात, तर कोणी समुदायाला महत्त्व देतात. माझे केस गेले, हात तुटला, डोळा गेला, दांत पडला, एवढेंच काय पण एक फुफ्फुस गेलें तरीहि मी जगतो. एकेक अवयव जड आहे. त्या एखाद्या अवयवाच्या नाशाने सर्वनाश होत नाही, सामुदायिक शरीर चाललेंच आहे. अशा या दोन परस्परविरुद्ध विचारसरणी आहेत. तुम्ही ज्या दृष्टीने बघाल तसें अनुमान काढाल. ज्या रंगाचा चष्मा त्या रंगाची सृष्टि.

**21** कोणी व्यक्तीस महत्त्व देतो, कोणी समाजास. याचें कारण समाजात जीवनार्थ कलहाची कल्पना प्रसृत झाली आहे. पण जीवन का कलहासाठी आहे? त्यापेक्षा मरून कां जात नाही? कलह हा मरण्यासाठी आहे. यामुळेच स्वार्थ व परमार्थ यांत आपण भेद पाडतो. स्वार्थ व परमार्थ यांच्यात भेद आहे, ही कल्पना ज्या माणसाने प्रथम काढली त्याची धन्य होय! जी वस्तुच मुळीं नाही तिचें अस्तित्व भासविण्याचें सामर्थ्य ज्याच्या अकलेत होतें, त्याचें कौतुक करावेसें वाटतें. जो भेद नाही तो त्याने उभा केला व जनतेस शिकविला याचें आश्चर्य वाटतें. चिनी भिंतीचाच हा प्रकार आहे. क्षितिजाला मर्यादा घालावयाची व त्याच्या पलीकडे काही नाहीच असें मानावयाचें, त्यासारखें हें आहे. या सर्वांचें कारण, आज यज्ञमय जीवनाचा अभाव आहे. त्यामुळे व्यक्ति व समाज यांत भेद पडले आहेत.

व्यक्ति व समाज यांत वास्तविक भेद पाडता येणार नाही. एखाद्या खोलीचे दोन भाग करण्यासाठी पडदा लावावा व तो पडदा वाऱ्याने मागे पुढे झाला म्हणजे कधी हा भाग मोठा, कधी तो मोठा, असें वाटतें. वाऱ्याच्या लहरीवर त्या खोलीचे भाग अवलंबून असतात. ते भाग पक्के नाहीत. गीतेला हे झगडे माहीत नाहीत. हे काल्पनिक झगडे आहेत. अंत:शुद्धीचा कायदा पाळा असें गीता सांगत आहे. मग व्यक्तिहित व समाजहित यांत विरोध उत्पन्न होणार नाही. एकमेकांच्या हितास बाधा येणार नाही. ही बाधा दूर करणें, हा विरोध दूर करणें, ही तर गीतेची खुबी. गीतेचा हा कायदा अमलात आणणारी एक व्यक्ति निघाली तरी तिच्यामुळे राष्ट्र संपन्न होईल. राष्ट्र म्हणजेच राष्ट्रातील व्यक्ति. ज्या राष्ट्रात अशा ज्ञानसंपन्न व आचारसंपन्न व्यक्ति नाहीत त्याला राष्ट्र कसें मानावयाचें? हिंदुस्थान म्हणजे काय? हिंदुस्थान म्हणजे रवींद्रनाथ, हिंदुस्थान म्हणजे गांधी, किंवा अशींच पांच-दहा नांवें. हिंदुस्थानची कल्पना बाहेरचें जग या पांच-दहा व्यक्तींवरूनच करतें. प्राचीन काळच्या दोन-चार व्यक्ति, मध्यकाळातील चार-पांच, पांच-दहा आजच्या घ्यावयाच्या. त्यांत हिमालय व गंगा यांना घालावयाचें की झाला हिंदुस्थान. हीच हिंदुस्थानची व्याख्या. बाकी ह्या व्याख्येवरचें भाष्य. भाष्य म्हणजे सूत्राचा विस्तार. दुधाचें दही व दह्याचें ताक-लोणी. दूध, दही, ताक, लोणी यांचा झगडा नाही. दुधाचा कस त्यात किती लोणी आहे यावरून मापतात. त्याप्रमाणेच समाजाचा कस व्यक्तींवरून मापला जातो. व्यक्ति व समाज यांत विरोध नाही. विरोध कसा असू शकेल? व्यक्ति-व्यक्तींतहि विरोध असू नये. एका व्यक्तीहून दुसरी व्यक्ति संपन्न असली म्हणून तरी काय बिघडलें? कोणीहि विपन्न अवस्थेत नसो, आणि संपत्तिमानांची संपत्ति समाजासाठी वापरली जावो म्हणजे झालें. माझ्या उजव्या खिशात पैसे असले काय, डाव्या खिशात असले काय, दोन्ही खिसे माझेच आहेत. कोणतीहि व्यक्ति संपन्न झाली तर त्यामुळे मी संपन्न होतो, राष्ट्र संपन्न होतें, अशी युक्ति साधता येईल.

परंतु आपण भेद करतो. धडें, डोकीं अलग होतील तर दोन्ही मरतील. व्यक्ति व समाज यांत भेद नका करू. एकच क्रिया स्वार्थ व परमार्थ यांना अविरोधी कशी करावी हें गीता शिकवीत आहे. माझ्या खोलीतील हवा व बाहेरची अनंत हवा यांत विरोध नाही. मी विरोध कल्पून खोली बंद करीन तर मात्र गुदमरून मरेन. मला अविरोध कल्पून खोली मोकळी करू दे की अनंत हवा आंत येते. ज्या क्षणीं मी स्वत:ची जमीन, स्वत:च्या घराचा तुकडा निराळा करतो, त्याच क्षणीं मी अनंत संपत्तीस पारखा होतो. माझें तें लहानसें घर जळलें, पडलें, म्हणजे मी माझें सर्वस्व गेलें असें म्हणून रडतो. परंतु असें कां म्हणावें, कां रडावें? कोती कल्पना करावयाची व मग रडावयाचें! हे पांचशें रुपये माझे म्हटले, की सृष्टीतील अपार संपत्तीपासून मी दूर गेलो. हे दोन भाऊ माझे असें कल्पिलें की असंख्य भाऊ दूर गेले. याचें आपणांस भान नसतें. मनुष्य स्वत:चा किती संकोच करतो हा! मनुष्याचा स्वार्थ तोच परार्थ असला पाहिजे. व्यक्ति व समाज यांत उत्तम सहकार्य ज्यायोगे होईल असा साधा सुंदर मार्ग गीता दाखवीत आहे.

**22** जीभ व पोट यांत विरोध का आहे? पोटाला पाहिजे तेवढेंच अन्न जिभेने दिलें पाहिजे. पोटाने पुरे म्हटलें की जिभेने बंद केलें पाहिजे. पोट ही एक संस्था, जीभ एक संस्था. या सर्व संस्थांचा मी सम्राट् आहे. या सर्व संस्थांत अद्वैतच आहे. कोठून आणलात हा करंटा विरोध? एकाच देहातील या संस्थांत जसा वास्तविक विरोध नसून सहकार्य आहे, त्याप्रमाणेच समाजाचेंहि आहे. समाजातील हें सहकार्य वाढावें म्हणून गीता चित्तशुद्धि-पूर्वक यज्ञ-दान-तप-क्रिया सांगत आहे. अशा कर्माने व्यक्ति व समाज दोहोंचें कल्याण साधेल.

यज्ञमय जीवन ज्याचें आहे, तो सर्वांचा होतो. आईचें प्रेम आपणावर आहे असें प्रत्येक मुलास वाटतें. त्याप्रमाणे हा पुरुष सर्वांना आपला असें वाटतें. तमाम दुनियेला तो हवाहवासा वाटतो. असा पुरुष आपला प्राण आहे, मित्र आहे, सखा आहे, असें सर्वांस वाटतें. **'ऐसा पुरुष तो पहावा। जनांस वाटे हा असावा'** असें समर्थांनी म्हटलें आहे. असें जीवन करण्याची युक्ति गीतेने दिली आहे.

## 99. समर्पणाचा मंत्र

**23** यज्ञमय जीवन करून पुन: तें सारें ईश्वरार्पण करावयाचें, असें गीतेचें आणखी सांगणें आहे. जीवन सेवामय असल्यावर आणखी ईश्वरार्पणता कशाला? परंतु सर्व जीवन सेवामय होणें ही गोष्ट पटकन् आपण बोललो तरी होणें फार कठिण आहे. अनेक जन्मांतीं हें थोडेंफार साधेल. शिवाय जरी सर्व कर्में सेवामय, अक्षरश: सेवामय, झालीं तरी तीं पूजामय झालींच असें नाही. म्हणून, **'ॐ तत् सत्'** या मंत्राने सारें कर्म ईश्वरार्पण करावें.

सेवा-कर्म संपूर्णपणें सेवामय होणें कठिण. परार्थात स्वार्थ येऊनच जातो. केवळ परार्थ संभवतच नाही. लेशमात्रहि माझा स्वार्थ ज्यात नाही असें करताच येणार नाही. म्हणून दिवसेंदिवस अधिक निष्काम, अधिक नि:स्वार्थ सेवा हातून व्हावी असें इच्छीत जावें. सेवा उत्तरोत्तर अधिक शुद्ध व्हावी अशी इच्छा असेल तर क्रियाजात ईश्वरार्पण करा. ज्ञानदेवांनी म्हटलें आहे – **'नामामृत-गोडी वैष्णवां लाधली। योगियां साधली जीवन-कळा।'** नामामृतातील गोडी व जीवनकला अलग नाहीत. नामाचा आंतरिक घोष व बाह्य जीवनकला – दोहोंचा मेळ आहे. योगी, वैष्णव एकच आहेत. परमेश्वरास क्रिया अर्पिल्याने स्वार्थ, परार्थ व परमार्थ एकरूप होतील. प्रथम मी व तुम्ही निरनिराळे आहोत, ते एक करायचे. 'तुम्ही' व 'मी' मिळून 'आम्ही' झालो, आता 'आम्ही' आणि 'तो' यांना एक करायचें. प्रथम माझा या सृष्टीशी मेळ घालावयाचा व मग परमात्म्याशी घालावयाचा. हें **'ॐ तत् सत्'** या मंत्राने सुचविलें आहे.

**24** परमात्म्याचीं अनंत नांवें आहेत. त्याच्या नांवांचें व्यासांनी विष्णुसहस्रनाम केलें. जें जें नांव कल्पून घ्यावें तें त्याचें आहे. जें नांव मनात मानावें, त्या अर्थाने या सृष्टीत पहावें, आणि तदनुरूप जीवन रचावें. परमेश्वराचें नांव मनात भावावयाचें, तें सृष्टीत पहावयाचें व आपण त्याप्रमाणे व्हावयाचें, याला मी त्रिपदा गायत्री म्हणतो. उदाहरणार्थ, परमेश्वराचें 'दयामय' हें नांव घेतलें, तो रहीम आहे असें मानलें. तो दयाळु देव आता या सृष्टीत डोळे उघडे ठेवून पहावयाचा. परमेश्वराने प्रत्येक लेकराला त्याच्या सेवेसाठी माता दिली आहे, त्याला जगण्यासाठी हवा दिली आहे. अशा रीतीने त्या दयामयाची सृष्टीतील दयेची योजना पहावयाची व आपलें जीवनहि दयामय करावयाचें. भगवद्गीतेच्या काळीं परमेश्वराचें जें प्रसिद्ध नांव होतें तें भगवद्गीतेने सुचविलें. तें नांव म्हणजे **'ॐ तत् सत्'** हें होय.

**25** ॐ म्हणजे ''होय.'' परमात्मा आहे, या विसाव्या शतकातहि परमेश्वर आहे. **'स एव अद्य स उ श्व:'** – तोच आज आहे, तोच काल होता, तोच उद्या असेल. तो कायम आहे. सृष्टि कायम आहे व कमर कसून साधना करण्यासाठी मीहि तयार आहे. मी साधक आहे, तो देव आहे व ही सृष्टि पूजाद्रव्य, पूजासाधन आहे. अशा भावनेने मी भरून जाईन तेव्हा ॐ हें अक्षर गळीं उतरलें असें होईल. तो आहे, मी आहे व माझी साधनाहि आहे; असा हा ॐकारभाव अंतरीं मुरला पाहिजे. साधनेत उतरला पाहिजे. सूर्य केव्हाहि पहा, किरणांसह तो आहे. किरण दूर ठेवून तो कधी नसतो. तो किरणांना विसरत नाही. त्याप्रमाणे साधना आपल्याजवळ कोणत्याहि घडीला पाहिलें तरी दिसली पाहिजे. असें होईल तरच ॐ हें अक्षर आपण पचविलें असें म्हणता येईल.

नंतर 'सत्'. परमेश्वर सत् आहे, म्हणजे शुभ आहे, मंगल आहे, ही भावना मनात आणून त्याचें मांगल्य सृष्टीत अनुभवा. पहा ती पाण्याची पातळी! पाण्यातून एक पोहरा भरून घ्या. तेथे झालेला खळगा क्षणात भरून जातो. केवढी मंगलता ही! केवढी प्रीति ही! नदी खळगे सहन करीत नाही. खळगे भरायला धावते. **'नदी वेगेन शुद्ध्यति!'** सृष्टिरूप नदी वेगाने शुद्ध होत आहे. म्हणून सृष्टि सारी शुभ व मंगल आहे. माझेंहि कर्म तसेंच होऊ दे. परमेश्वराचें हें 'सत्' नाम पचविण्यासाठी आपल्या साऱ्या क्रिया निर्मळ व भक्तिमय असल्या पाहिजेत. सोमरस ज्याप्रमाणे पवित्रकातून गाळून घेत त्याप्रमाणे सर्व कर्मांचे, आपल्या साधनेचें नित्य परीक्षण करून त्यांत निर्दोषत्व आणावें.

उरलें 'तत्'. तत् म्हणजे तें, काहीतरी निराळें, या सृष्टीपासून अलिप्त. परमात्मा या सृष्टीपासून निराळा आहे, म्हणजे अलिप्त आहे. सूर्य उगवला म्हणजे कमळें फुलतात, पांखरें उडतात, अंधार नाहीसा होतो. परंतु सूर्य कोठे तरी दूर असतो. या सर्व परिणामांपासून तो नामानिराळा राहतो. आपल्या कर्मांमध्ये अनासक्ति राखावयाची, अलिप्तता आणावयाची, म्हणजे तें 'तत्' नाम जीवनात उतरलें.

**26** अशा प्रकारें **'ॐ तत् सत्'** हें वैदिक नांव घेऊन गीतेने सर्व क्रिया परमेश्वरास अर्पण करावयास शिकविलें आहे. सर्व कर्मे ईश्वरार्पण करण्याचा विचार मागे नवव्या अध्यायात आला आहे. **'यत्करोषि यदश्नासि'** या श्लोकात हेंच सांगितलें आहे. तीच गोष्ट सतराव्या अध्यायात विवरली आहे. परमेश्वरास अर्पण करावयाची क्रिया सात्त्विक पाहिजे; तरच ती परमेश्वरास अर्पण करता येईल हें येथे विशेष सांगितलें आहे.

## 100. पापापहारि हरिनाम

**27** हें सारें खरें. परंतु एक प्रश्न आहे. **'ॐ तत् सत्'** हें नांव पवित्र पुरुषाला पचावयाचें. पापी पुरुषाने कसें करावयाचें? पाप्याच्या मुखात शोभेल असें एखादें नांव आहे किंवा नाही? **'ॐ तत् सत्'** या नांवात तीहि शक्ति आहे. ईश्वराच्या कोणत्याहि नामात असत्यातून सत्याकडे नेण्याची शक्ति असते. पापातून निष्पापतेकडे तें नेऊ शकतें. जीवनाची हळूहळू शुद्धि केली पाहिजे. परमात्मा अवश्य मदत करील, तुझ्या दुबळेपणात तुझा हात धरील.

**28** एका बाजूस पुण्यमय पण अहंकारी जीवन व दुसऱ्या बाजूस पापमय पण नम्र जीवन, यांतून एक पसंत करा असें जर कोणी म्हणेल तर मी जरी तोंडाने बोलू शकलो नाही तरी अंत:करणात म्हणेन, ''ज्या पापाने परमेश्वराचें स्मरण मला राहील, तें पापच मला मिळू दे.'' पुण्यमय जीवनामुळे परमेश्वराची विस्मृति होणार असेल तर ज्या पापमय जीवनाने तो आठवेल तेंच जीवन घे, असें माझें मन म्हणेल. याचा अर्थ असा नाही की, पापमय जीवनाचें मी समर्थन करून राहिलो आहे. परंतु पाप तेवढें पाप नाही जेवढा पुण्याचा अहंकार पापरूप आहे. **'बहु भितों जाणपणा। आड न यो नारायणा'** असें तुकारामांनी म्हटलें आहे. तो मोठेपणा नको. त्यापेक्षा पापी, दु:खी असलो तरी बरा. **'जाणतें लेकरूं। माता लागें दूर धरूं।'** परंतु अजाण मुलाला आई पोटाशी धरील. स्वावलंबी पुण्यवान् होणें मला नको. परमेश्वरावलंबी पापी असणें हेंच मला प्रिय आहे. परमात्म्याचें पावित्र्य माझ्या पापाला पुरून उरण्यासारखें आहे. आपण पापें टाळण्याचा प्रयत्न करावा. तीं टाळता नाही आलीं तर हृदय रडेल, मन तडफडेल, मग परमेश्वराची आठवण होईल. तो कौतुक पाहत उभा आहे. त्याला म्हणा, ''मी पापी आहे व म्हणून तुझ्या दारीं आलो आहे.'' पुण्यवानाला ईश्वर-स्मरणाचा अधिकार आहे, कारण तो पुण्यवान् आहे. पाप्याला ईश्वर-स्मरणाचा अधिकार आहे, कारण तो पापी आहे.

*रविवार, 12-6-'32*

# अध्याय 18

# उपसंहार - फलत्यागाची पूर्णता : ईश्वर-प्रसाद

## 101. अर्जुनाचा शेवटचा प्रश्न

**1** माझ्या बंधूंनो! ईश्वराच्या कृपेने आज अठरावा अध्याय आपण पाहत आहोत. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या या जगात कोणताहि संकल्प तडीस नेणें हें ईश्वराच्या हातीं आहे. त्यातून जेलमध्ये तर पदोपदी अनिश्चितता अनुभवास येत असते. येथे आपण एखादें काम सुरू करू व पुरें झालेलें पाहू, अशी अपेक्षा करणें कठिण आहे. आपली ही गीता पुरी होईल अशी अपेक्षा सुरू करतांना नव्हती, परंतु ईश्वराची इच्छा होती म्हणून आज शेवटास येऊन आपण पोंचलो आहोत.

**2** चौदाव्या अध्यायात सात्त्विक, राजस व तामस असे जीवनाचे किंवा कर्माचे तीन प्रकार केले. त्यांतील राजस व तामस टाकून सात्त्विकाचा स्वीकार करावयाचा हें आपण पाहिलें. त्यानंतर सतराव्या अध्यायात तोच प्रकार निराळ्या रीतीने पाहिला. यज्ञ, दान, तप – किंवा एकाच शब्दात सांगावयाचें झालें तर यज्ञ – हें जीवनाचें सार आहे. यज्ञाला उपयोगी अशीं आहारादि कर्में, तींसुद्धा सात्त्विक व यज्ञरूप करूनच घ्यावयाचीं. यज्ञरूप व सात्त्विक तेवढींच कर्में स्वीकारावयाचीं, बाकीचीं सोडावयाचीं, असा ध्वनि सतराव्या अध्यायात आपण ऐकला. **ॐ तत् सत्** या मंत्राचें स्मरण कां ठेवावयाचें तेंहि आपण पाहिलें. ॐ म्हणजे सातत्य, तत् म्हणजे अलिप्तता, सत् म्हणजे सात्त्विकता. आपल्या साधनेत सातत्य, अलिप्तता व सात्त्विकता असली पाहिजे. तरच ती साधना परमेश्वरास अर्पण करता येईल. या सर्व गोष्टींवरून असें दिसून येतें की, काही कर्में टाळावयाचीं असतात, काही करावयाचीं असतात. गीतेची सर्व शिकवण जर पाहिली तर जागजागीं कर्माचा त्याग करू नका असा बोध आहे. कर्मफलाचा त्याग गीता सांगत आहे. कर्म सतत करावयाचें व फलाचा त्याग करावयाचा ही गीतेची शिकवण सर्वत्र पाहून घ्यावी. पण ही एक बाजू झाली. दुसरी बाजू अशी दिसते की काही कर्मांचा स्वीकार करावयाचा, काही कर्मांचा त्याग करावयाचा. म्हणून शेवटीं अठराव्या अध्यायाच्या आरंभीं अर्जुनाने प्रश्न केला, ''कोणतेंहि कर्म फलत्यागपूर्वक करावें ही एक बाजू. पुन्हा काही अवश्यमेव टाकावीं व काही करावीं ही दुसरी बाजू. यांचा मेळ कसा घालावा?'' जीवनाची दिशा स्पष्ट कळावी म्हणून हा प्रश्न आहे. फलत्यागाचें मर्म ध्यानीं येण्यासाठी हा प्रश्न आहे. ज्याला शास्त्र संन्यास म्हणतें त्यामध्ये कर्म स्वरूपत: सोडायचें असतें. कर्माचें जें स्वरूप त्याचा त्याग करायचा असतो. फलत्यागात कर्माचा फलत: त्याग करायचा असतो. गीतेच्या फलत्यागाला प्रत्यक्ष कर्मत्यागाची आवश्यकता आहे का? हा प्रश्न आहे. फलत्यागाच्या कसोटीत संन्यासाचा उपयोग आहे का? संन्यासाची मर्यादा कोठपर्यंत? संन्यास व फलत्याग या दोहोंच्या मर्यादा कशा व किती? असा हा अर्जुनाचा प्रश्न आहे.

## 102. फलत्याग सार्वभौम कसोटी

**3** उत्तर देतांना भगवंतांनी एक गोष्ट साफ सांगून टाकली की, फलत्यागाची कसोटी ही सार्वभौम वस्तु आहे. फलत्यागाचें तत्त्व सर्वत्र लावता येतें. सर्व कर्मांचा फलत्याग करायचा या गोष्टीचा राजस आणि तामस कर्मांचा त्याग करायचा या गोष्टीशी विरोध नाही. काही कर्मांचें स्वरूपच असें असतें की, फलत्यागाची युक्ति वापरली रे वापरली की तीं कर्में स्वत:च गळून पडतात. फलत्यागपूर्वक कर्म करावें याचा अर्थच हा होतो की, काही कर्में सोडलींच पाहिजेत. फलत्यागपूर्वक कर्म करण्यात प्रत्यक्ष काही कर्मांचा त्याग येऊनच जातो.

**4** या गोष्टीचा जरा खोल दृष्टि ठेवून विचार करू या. जीं काम्य कर्में आहेत, ज्यांच्या मुळाशी कामना आहे, तीं कर्में फलत्यागपूर्वक करा असें म्हणताच ढासळून जातात. फलत्यागासमोर काम्य व निषिद्ध कर्में उभींच राहू शकत नाहीत. फलत्यागपूर्वक कर्म करणें म्हणजे केवळ कृत्रिम, तांत्रिक, यांत्रिक क्रिया नाही. या कसोटीने कर्में कोणतीं करावीं व कोणतीं करू नयेत हें आपोआप ठरतें. कोणी असें म्हणतात की, ''गीता फलत्यागपूर्वक कर्में करा एवढेंच सुचविते. कोणतीं कर्में करा हें सुचवीत नाही.'' असें भासतें; परंतु तें वस्तुत: खरें नाही. कारण फलत्यागपूर्वक कर्म करा असें सांगण्यातच

कोणतें करावें व कोणतें करू नये हें समजून येतें. हिंसात्मक कर्में, असत्यमय कर्में, चोरीचीं कर्में, हीं फलत्यागपूर्वक करता येणारच नाहीत. फलत्यागाची कसोटी लावताच हीं कर्में गळून पडतात. सूर्याची प्रभा फाकताच सर्व वस्तु उजळ दिसू लागतात, परंतु अंधार उजळ दिसतो का? तो नाहीसाच होतो. तद्वत् निषिद्ध व काम्य कर्मांची स्थिति आहे. कर्में फलत्यागाच्या कसोटीवर घासून घ्यावींत. जें कर्म मी करू पाहत आहे, तें अनासक्तिपूर्वक, फलाची लेशमात्रहि अपेक्षा न ठेवता करणें मला शक्य आहे का हें आधीं पहावें. फलत्याग हीच कर्म करण्याची कसोटी. ह्या कसोटीप्रमाणे काम्य कर्में आपोआप त्याज्य ठरतात. त्यांचा संन्यासच योग्य. आता राहिलीं शुद्ध सात्त्विक कर्में. तीं अनासक्त रीतीने अहंकार सोडून करावयाचीं. काम्य कर्में त्यागावयाचीं हेंहि एक कर्मच झालें. फलत्यागाची कातर त्यासहि लावायची. काम्य कर्मांचा त्यागहि सहज झाला पाहिजे.

अशा रीतीने तीन गोष्टी आपण पाहिल्या. पहिली गोष्ट ही की, जीं कर्में करावयाचीं तीं फलत्यागपूर्वक करावयाचीं. दुसरी गोष्ट ही की, राजस व तामस कर्में, निषिद्ध व काम्य कर्में फलत्यागाची कातर लावताच आपोआप गळून पडतात. तिसरी गोष्ट ही की, तो जो त्याग होईल, त्या त्यागावरहि फलत्यागाची कातर लावावयाची; एवढा त्याग मी केला, असा अहंकार होऊ द्यावयाचा नाही.

**5** राजस व तामस कर्में त्याज्य कां? कारण तीं शुद्ध नाहीत. शुद्ध नसल्यामुळे तीं कर्म करणाऱ्याच्या चित्तावर लेप करतात. परंतु अधिक विचार केला म्हणजे असें आढळतें की, सात्त्विक कर्मेंहि सदोष असतात. जें जें कर्म म्हणून आहे त्यात काही ना काही दोष आहेच. शेतीचा स्वधर्म घेतला तर ती शुद्ध सात्त्विक क्रिया आहे. परंतु या यज्ञमय स्वधर्मरूप शेतीतहि हिंसा येते. नांगरतांना वगैरे कित्येक जीवजंतु मरतात. विहिरीजवळ चिखल होऊ नये म्हणून दगड बसवितांना जंतु मेले. सकाळीं दरवाजे उघडून सूर्याचा प्रकाश घरात येताच असंख्य जंतु मरून जातात. ज्याला आपण शुद्धीकरण म्हणतो ती मारणक्रिया होऊ पाहते. सारांश, सात्त्विक स्वधर्मरूप कर्मातहि दोष येतो, तर कसें करावयाचें?

**6** मी पूर्वी सांगितलें होतें की सर्व गुणांचा अद्याप विकास व्हावयाचा आहे. ज्ञान, भक्ति, सेवा व अहिंसा यांचा बिंदुमात्र अनुभव आला आहे. पूर्वी सारा अनुभव येऊन गेला असें नाही. अनुभव घेत जग पुढे जात आहे. मध्ययुगात अशी एक कल्पना निघाली की कृषिकर्मात हिंसा येते, म्हणून अहिंसक लोकांनी ती करू नये. त्यांनी व्यापार करावा. धान्य पिकविणें पाप, धान्य विकणें म्हणाले पाप नाही. परंतु अशा रीतीने क्रिया टाळून हित होत नाही. अशा रीतीने कर्मसंकोच करीत करीत जर मनुष्य वागू लागेल तर शेवटीं आत्मनाश होईल. कर्मातून सुटण्याचा मनुष्य जों जों विचार करील, तों तों अधिकच कर्माचा पसारा वाढेल. तुमच्या धान्याच्या व्यापारासाठी कोणी शेती करावयास नको का? त्या शेतातील हिंसेचे तुम्हीहि नाही का मग भागीदार होत? कापूस पिकविणें जर पाप, तर तो उत्पन्न झालेला विकणेंहि पाप. कापूस उत्पन्न करणें सदोष आहे म्हणून तें कर्म सोडणें हा बुद्धीचा दोष आहे. सर्व कर्मांवर बहिष्कार घालणें; हें कर्म नको, तें कर्म नको, काहीच करू नये, अशा रीतीने बघणाऱ्या दृष्टीत खरा दयाभाव उरला नसून दयाभाव मेला असें समजावें. पालवी खुडल्याने झाड मरत नाही, तें फोफावतें. क्रियेचा संकोच करण्यात आत्मसंकोच आहे.

## 103. क्रियेतून सुटण्याची खरी रीत

**7** मग प्रश्न असा की जर सर्व क्रियांत दोष आहेत तर सर्व क्रिया कां न सोडाव्या? याचें उत्तर एकदा पूर्वी दिलें आहे. सर्व कर्मांचा त्याग करणें ही कल्पना फार सुंदर आहे. हा विचार मोहक आहे. परंतु हीं असंख्य कर्में कशीं सोडावयाचीं? राजस व तामस कर्में सोडण्याची जी तऱ्हा, तीच सात्त्विक कर्में सोडण्याच्या बाबतीत आहे का? सदोष अशीं जीं सात्त्विक कर्में तीं कशीं टाळावयाचीं? गंमत अशी आहे की, **'इंद्राय तक्षकाय स्वाहा'** असें जेव्हा मनुष्य जगात करू लागतो, त्या वेळेस इंद्र अमर असल्यामुळे नाहीच मरत; परंतु तक्षकसुद्धा न मरता मजबूत होऊन बसतो. सात्त्विक कर्मात पुण्य आहे व थोडा दोष आहे, परंतु थोडा दोष म्हणून त्या दोषाबरोबर पुण्याचीहि आहुति देऊ पहाल, तर पुण्यक्रिया चिवट असल्यामुळे नाहीच मरणार; परंतु दोषक्रिया मात्र वाढू लागतील. या असल्या सरमिसळीच्या विवेकहीन त्यागाने पुण्यरूप इंद्र तर नाहीच मरत; परंतु दोषरूप तक्षक मरता, तोहि मरत नाही. मग त्याच्या त्यागाची रीत कोणती? मांजर हिंसा करते म्हणून तिचा त्याग केला तर उंदीर हिंसा करतील. साप हिंसा करतो म्हणून त्याला दूर

केला तर शेतीची शेंकडों जंतु हिंसा करतील. शेतातील पिकांचा नाश झाल्याने हजारों माणसें मरतील. यासाठी विवेकयुक्त त्याग पाहिजे.

**8** गोरखनाथास मच्छींद्रनाथ म्हणाले, ''या मुलास धुऊन आण.'' गोरखनाथाने मुलाचा पाय धरून चांगलें आपटलें व त्याला कुंपणावर वाळत टाकलें. मच्छींद्रनाथ म्हणाले, ''आणला का मुलगा धुऊन?'' गोरखनाथ म्हणाले, ''त्याला आपटून, धुऊन वाळत टाकलें आहे.'' मुलाला धुण्याची का ही तऱ्हा? कपडे धुण्याची व माणसें धुण्याची एक तऱ्हा नाही. त्या दोन प्रकारांत अंतर आहे. त्याप्रमाणे राजस व तामस कर्मांचा त्याग आणि सात्त्विक कर्मांचा त्याग यांत निराळेपणा आहे. सात्त्विक कर्में सोडण्याची तऱ्हा निराळी आहे.

विवेकहीन वागल्याने काहीतरी तिरपगडें होऊन बसावयाचें! तुकारामांनी म्हटलें आहे ना – **'त्यागें भोग माझ्या येतील अंतरा। मग मी दातारा काय करूं।।'** लहानसा त्याग करावयास जावें तर मोठा भोग उरावर येऊन बसतो. म्हणून तो अल्पसा त्यागहि मिथ्या होतो. बारीकशा त्यागाच्या पूर्तीसाठी मोठमोठीं इंद्रभवनें उभारावयाचीं, त्याऐवजी ती खोपटीच बरी होती. तीच पुरे. लंगोटी लावून सारा विलास भोंवती उभारावयाचा, त्याऐवजी सदरा बंडी अधिक बरीं. म्हणून भगवंतांनी सात्त्विक कर्मांचा जो त्याग करावयाचा त्याची तऱ्हाच निराळी सांगितली आहे. तीं सारीं सात्त्विक कर्में करावयाचीं, परंतु त्यांचीं फळें तोडून टाकावयाचीं. काही कर्में समूळ सोडावयाचीं असतात. काहींचीं फळें तोडावयाचीं असतात. अंगावर बाहेरून डाग पडला तर धुऊन काढता येईल, परंतु नैसर्गिक कातडीचा रंग काळा असेल तर त्याला व्हाइटवॉश (सफेदी) करून काय होणार? तो काळा रंग तसाच राहू दे. त्याच्याकडे पाहूच नको. तो अमंगळ म्हणू नको.

**9** एक मनुष्य होता. त्याला आपलें घर अमंगळ वाटलें. म्हणून तें सोडून तो एका खेड्यात गेला. त्या खेड्यातहि त्याला घाण दिसली. म्हणून तो जंगलात गेला. तेथे एका आंब्याच्या झाडाखाली तो बसला. वरून एका पक्ष्याने त्याच्या डोक्यावर घाण केली. हें जंगलहि अमंगळ असें म्हणून तो नदीत जाऊन उभा राहिला. नदीत मोठे मासे लहान माशांना खात होते. हें पाहून तर त्यास शिसारीच आली. सारी सृष्टि अमंगळ आहे, येथे मेल्याशिवाय गत्यंतरच नाही, असें मनात ठरवून तो बाहेर आला व त्याने होळी पेटवली. तिकडून एक गृहस्थ आले व म्हणाले, ''कां जीव देतोस?'' तो म्हणाला, ''हें जग अमंगळ आहे म्हणून.'' तो गृहस्थ म्हणाला, ''तुझें हें घाणेरडें शरीर, ही चरबी, येथे जळू लागली म्हणजे किती घाण सुटेल? आम्ही येथे जवळच राहतो. आम्ही कोठे जावें? एक केस जळला तर कोण घाण सुटते! तुझी तर सारी चरबी जळणार! येथे किती दुर्गंधि सुटेल याचा काही विचार कर.'' तो मनुष्य वैतागून म्हणाला, ''या जगात जगण्याची सोय नाही, व मरण्याचीहि सोय नाही. काय करावें?''

**10** सारांश, अमंगळ अमंगळ म्हणून सारेंच टाळाल तर जमणार नाही. तें लहान कर्म टाळू पहाल तर दुसरें मोठें बोकांडी येऊन बसेल. कर्म स्वरूपत: बाहेरून सोडल्याने सुटत नसतें. जीं कर्में ओघाने आलीं त्या कर्मांच्या विरुद्ध जाण्यात जर आपली शक्ति कोणी खर्चील, ओघाच्या विरुद्ध जर कोणी जाऊ पाहील, तर तो शेवटीं थकून ओघाबरोबर वाहून जाईल. ओघाला अनुकूल अशीच क्रिया करून त्याने आपला तरणोपाय पाहिला पाहिजे. त्यामुळे मनावरचा लेप कमी होत जाईल व चित्त शुद्ध होत जाईल. पुढे पुढे क्रिया आपोआप गळत जाईल. कर्मत्याग न होता क्रिया गळेल. कर्म सुटणारच नाही. क्रिया गळून जाईल.

**11** क्रिया आणि कर्म या दोन गोष्टींत अंतर आहे. उदाहरणार्थ, एखाद्या ठिकाणीं फार गोंगाट चालला आहे व तो बंद करावयाचा आहे असें समजा. एखादा शिपाई येतो व तो आरडाओरड बंद करण्यासाठी स्वत: मोठ्याने ओरडतो. तेथलें बोलणें बंद करण्यासाठी मोठ्याने बोलण्याची तीव्र क्रिया त्याला करावी लागली. दुसरा एखादा येईल, नुसता उभा राहील व बोट वर करील. तेवढ्यानेच लोक गप्प बसतील. तिसरा एखादा नुसता तेथे हजर झाला एवढ्यानेच सारे शांत बसतील. एकाला तीव्र क्रिया करावी लागली, दुसऱ्याची क्रिया जरा सौम्य झाली, तिसऱ्याची सूक्ष्म झाली. क्रिया कमी कमी झाली, परंतु लोकांना शांत राखण्याचें कर्म समानच झालें. जसजशी चित्तशुद्धि होत जाईल, तसतशी क्रियेची तीव्रता कमी होईल. तीव्रातून सौम्य, सौम्यातून सूक्ष्म व सूक्ष्मातून शून्य होत जाईल. कर्म निराळें व क्रिया निराळी. कर्माची व्याख्याच ही की कर्त्याला जें अत्यंत इष्ट तें कर्म. कर्माची प्रथमा, द्वितीया विभक्ति असते, तर क्रियेसाठी एक स्वतंत्र क्रियापद वापरावें लागतें.

कर्म निराळें व क्रिया निराळी हें समजून घ्या. एखादा रागावला असला तर तो फार बोलून किंवा मुळींच न बोलून राग प्रकट करील. ज्ञानी पुरुष लेशमात्रहि क्रिया करीत नाही, परंतु कर्म अनंत करतो. त्याचें केवळ अस्तित्वच अपार लोकसंग्रह करू शकतें. तो ज्ञानी पुरुष नुसता असो म्हणजे झालें. त्याचे हात पाय कार्य करीत नसतील तरीहि तो काम करतो. क्रिया सूक्ष्म होत जाते व कर्म उलट वाढत जातें. विचाराचा हा ओघ जर आणखी पुढे नेला तर चित्त परिपूर्ण शुद्ध झालें म्हणजे शेवटीं क्रिया शून्यरूप होऊन अनंत कर्म होत राहील असें म्हणता येईल. आधी तीव्र, पुढे तीव्रातून सौम्य, सौम्यातून सूक्ष्म, सूक्ष्मातून शून्य, असें ओघानेच क्रियाशून्यत्व प्राप्त होईल. परंतु मग अनंत कर्म आपोआपच होईल.

**12** वरून वरून कर्म दूर केल्याने तें दूर होणार नाही. निष्कामतापूर्वक करता करता हळूहळू त्याचा अनुभव येईल. ब्राउनिंग कवीने 'ढोंगी पोप' म्हणून एक कविता लिहिली आहे. त्या पोपाला एक मनुष्य म्हणाला, ''तू नटतोस काय? हे झगे कशाला? हें वरचें ढोंग कशाला? ही गंभीर मुद्रा कशाला?'' तेव्हा तो म्हणाला, ''हें मी कां करतो तें ऐक. हें नाटक करता करता श्रद्धेचा स्पर्श न कळत होण्याचा संभव आहे.'' म्हणून निष्काम क्रिया करीत रहावयाचें. हळूहळू निष्क्रियत्व अंगीं बाणेल.

## 104. साधकासाठी स्वधर्माचा उलगडा

**13** सारांश, राजस व तामस कर्में अजीबात सोडावयाचीं, सात्त्विक कर्में करावयाचीं, आणि हा विवेक करावयाचा की, जीं सात्त्विक कर्में सहज ओघाने प्राप्त झालीं तीं सदोष असलीं तरी टाकावयाचीं नाहीत. होऊ दे तो दोष. तो दोष टाळू पाहशील तर दुसरे असंख्य दोष पदरात पडतील. तुझें नकटें नाक तसेंच असू दे. तें कापून सुंदर करू पाहशील तर तें आणखीच भेसूर व विद्रूप दिसेल. तें आहे तसेंच ठीक आहे. सात्त्विक कर्में सदोष असलीं तरी तीं ओघप्राप्त आहेत, म्हणून सोडावयाचीं नाहीत. तीं करावयाचीं; परंतु त्यांचा फलत्याग करावयाचा.

**14** आणखी एक गोष्ट सांगावयाची. जें कर्म ओघाने आलें नसेल तें आपण चांगलें करू असें तुला कितीहि वाटत असलें तरी तें करू नकोस. ओघाने आलें तेवढेंच कर. आटाआटी करून दुसरें नवीन अंगावर ओढून घेऊ नकोस. जें कर्म मुद्दाम खटाटोप करून उभारावयाचें तें कर्म कितीहि चांगलें असलें तरी दूर राख, त्याचा मोह नको. जें ओघप्राप्त कर्म आहे, त्याच्या बाबतीतच फलत्याग संभवतो. हें कर्म चांगलें आहे, तें कर्म चांगलें आहे, अशा लोभाने मनुष्य सर्वत्र धावू लागला तर कोठला फलत्याग? जीवनाचा सारा विचका होईल. फळाच्या आशेनेच तो हीं परधर्मरूप कर्में करू पाहील आणि फळहि हातीं पडणार नाही. जीवनात कोठेच स्थिरता प्राप्त होणार नाही. त्या कर्माची आसक्ति चित्तावर जडेल. सात्त्विक कर्माचा लोभ वाटला तरी तो लोभहि दूर केला पाहिजे. तीं नाना प्रकारचीं सात्त्विक कर्में जर करू पाहशील तर त्यात राजसता व तामसता येईल. म्हणून तुझा जो सात्त्विक ओघप्राप्त स्वधर्म तोच तू कर.

**15** स्वधर्मात स्वदेशी धर्म, स्वजातीय धर्म व स्वकालीन धर्म येतो. या तिहींनी स्वधर्म बनत असतो. माझ्या वृत्तीला काय अनुकूल व अनुरूप आहे, कोणतें कर्तव्य मला प्राप्त झालेलें आहे, हें सर्व स्वधर्म पाहतांना येतेंच. तुमच्यात 'तुम्हीपणा' म्हणून काहीतरी आहे, म्हणून तुम्ही 'तुम्ही' आहात. प्रत्येकाचा काही विशेष असतो. बकरीचा विकास बकरी राहण्यातच आहे. बकरी राहूनच तिने विकास करून घेतला पाहिजे. बकरी जर 'मी गाय होईन' असें म्हणेल तर तें शक्य नाही. स्वयंप्राप्त बकरीपणाचा त्याग तिला करता येत नाही. त्यासाठी तिला शरीर सोडावें लागेल. नवीन धर्म, नवीन जन्म घ्यावा लागेल. परंतु या जन्मीं तो बकरीपणा, तोच पवित्र आहे. बैल व बेडकीची गोष्ट आहे ना? बेडकीच्या वाढीला मर्यादा आहे. ती बैलासारखी होऊ पाहील तर मरेल. दुसऱ्या रूपाची नक्कल करणें योग्य होत नाही. म्हणून परधर्म भयावह म्हटला आहे.

**16** पुन्हा स्वधर्मातहि दोन भाग आहेत. एक बदलणारा भाग व दुसरा न बदलणारा. आजचा मी उद्या नाही, उद्याचा परवा नाही. मी सारखा बदलत आहे. लहान मूल असतांनाचा स्वधर्म म्हणजे केवळ संवर्धन. तरुणपणात माझ्या ठिकाणीं कर्म-शक्ति भरपूर असेल तर तद्द्वारा समाजसेवा मी करीन, प्रौढपणात माझ्या ज्ञानाचा इतरांस लाभ मिळेल. असा काही स्वधर्म बदलणारा आहे, तर दुसरा काही न बदलणारा आहे. यांनाच पूर्वीच्या शास्त्रीय संज्ञा द्यावयाच्या

झाल्या तर आपण असें म्हणू, ''मनुष्याला वर्णधर्म आहे व आश्रमधर्म आहे. वर्णधर्म बदलत नाही. आश्रमधर्म बदलतात.''

आश्रमधर्म बदलतात; म्हणजे मी ब्रह्मचारिपद सार्थक करून गृहस्थ होतो, गृहस्थाचा वानप्रस्थ होतो, वानप्रस्थाचा संन्यासी होतो. आश्रमधर्म असा बदलत असला तरी वर्णधर्म बदलता येत नाही. माझी नैसर्गिक मर्यादा मला सोडता येणार नाही. तो प्रयत्न मिथ्या आहे. तुमच्यातील तुम्हीपणा तुम्हांला टाळता येणार नाही, या कल्पनेवर वर्णधर्माची योजना आहे. वर्णधर्माची कल्पना गोड आहे. वर्णधर्म अगदीच अटळ आहे का? बकरीचें जसें बकरीपण, गाईचें गायपण, तसें ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व, क्षत्रियांचें क्षत्रियत्व आहे का? वर्णधर्म इतका पक्का नाही ही गोष्ट मी मान्य करतो; परंतु ही गोष्ट स्वारस्याने घ्यावयाची. वर्णधर्म सामाजिक व्यवस्थेसाठी युक्ति म्हणून जेव्हा वापरला जातो, तेव्हा त्यात अपवाद येणारच. तो अपवाद गृहीत धरावाच लागतो. तो अपवाद गीतेने गृहीत धरला आहे. सारांश, हे दोन प्रकारचे धर्म ओळखून अवांतर धर्म सुंदर व मनमोहक दिसले तरी ते टाळा.

## 105. फलत्यागाचा एकूण फलितार्थ

**17** फलत्यागाच्या कल्पनेचा जो आपण विकास करीत आलो, त्यातून पुढील अर्थ निघाला –

1. राजस व तामस कर्मांचा सर्वस्वी त्याग.

2. त्या त्यागाचाहि फलत्याग. त्याचाहि अहंकार नको.

3. सात्त्विक कर्मांचा स्वरूपत: त्याग न करता फक्त फलत्याग.

4. सात्त्विक कर्मे जीं फलत्यागपूर्वक करावयाचीं तीं सदोष असलीं तरी करावयाचीं.

5. सतत फलत्यागपूर्वक तीं सात्त्विक कर्में करीत करीत चित्त शुद्ध होईल व तीव्राचें सौम्य, सौम्याचें सूक्ष्म व सूक्ष्माचें शून्य, अशा रीतीने सारें क्रियाजात गळून पडेल.

6. क्रिया गळून पडतील; परंतु कर्म, लोकसंग्रहरूप कर्म, होतच राहील.

7. सात्त्विक कर्महि जें ओघप्राप्त तेंच करावयाचें. जें ओघप्राप्त नाही, तें कितीहि चांगलें वाटलें तरी दूर राखावयाचें. त्याचा मोह नको.

8. सहजप्राप्त स्वधर्महि पुन्हा दोन प्रकारचा. बदलणारा व न बदलणारा. वर्णधर्म बदलत नाही. आश्रमधर्म बदलतो. बदलणारा स्वधर्म बदलत राहिला पाहिजे. त्यामुळे प्रकृति विशुद्ध राहील.

**18** प्रकृति वाहती पाहिजे. झरा वाहता नसेल तर त्याला दुर्गंधि येईल. तसेंच आश्रमधर्माचें आहे. मनुष्य प्रथम कुटुंबाचा स्वीकार करतो. स्वत:च्या विकासासाठी कुटुंबाच्या बंधनात स्वत:ला घालतो. तेथे बहुविध अनुभव घेतो. परंतु कुटुंबात आल्यावर जर कायमचा तेथेच जखडला जाईल तर विनाश होईल. जें कुटुंबात राहणें प्रथम धर्मरूप होतें तेंच अधर्मरूप होईल. कारण तो धर्म बंधनकर झाला. बदलणारा धर्म आसक्तीने सोडला नाही तर भयानक स्थिति होईल. चांगल्या वस्तूचीसुद्धा आसक्ति नको. आसक्तीमुळे घोर अनर्थ होतो. फुप्फुसांत क्षयाचे जंतु चुकून गेले तरी सारें जीवन पोखरून टाकतील. सात्त्विक कर्मात आसक्तीचे जंतु जर बेसावधपणें शिरू दिले तर स्वधर्म सडू लागेल. त्या सात्त्विक स्वधर्माला राजस व तामस घाण सुटेल. कुटुंब हा बदलणारा स्वधर्म, तो यथासमय सुटला पाहिजे. तसेंच राष्ट्रधर्माचें. राष्ट्रधर्मात आसक्ति आली, हें आपलें राष्ट्र एवढेंच पहावयाचें असें जर आपण ठरविलें, तर राष्ट्रभक्ति ही भयंकर वस्तु होईल. आत्मविकास अशाने थांबेल. चित्ताला आसक्ति जडेल व अध:पात होईल.

## 106. साधनेची पराकाष्ठा तीच सिद्धि

**19** सारांश, जीवनाचें फलित हातीं यावें असें वाटत असेल तर फलत्याग हा चिंतामणि हातीं घ्या. तो तुम्हांला रस्ता दाखवील. फलत्यागाचें तत्त्व स्वत:च्या मर्यादाहि सांगतें. हा दीप जवळ असेल तर कोणतें कर्म करावें, कोणतें टाकावें, कोणतें केव्हा बदलावें, हें सारें समजेल.

**20** परंतु आता दुसराच एक विषय विचारासाठी घेऊ. साधकाने, संपूर्ण क्रिया गळून पडणें ही जी शेवटची स्थिति तिच्याकडे लक्ष ठेवावयाचें का? क्रिया न होता ज्ञान्याच्या हातून कर्म होत राहील ही जी ज्ञानी पुरुषाची स्थिति, तिच्याकडे साधकाने दृष्टि ठेवावयाची का?

नाही. येथेहि फलत्यागाची कसोटीच हातीं घ्यावयाची. आपल्या जीवनाचें स्वरूप इतकें सुंदर आहे की आपणांस जें पाहिजे असतें तें लक्ष न ठेवताहि आपणांस मिळेल. जीवनाचें सर्वांत मोठें फलित म्हणजे मोक्ष. तो मोक्ष, ती अकर्मावस्था, तेथेहि लोभ नको. ती स्थिति न कळत अंगीं येईल. संन्यास ही वस्तु अशी नाही की अचानक दोन वाजून पांच मिनिटांनी यावयाची. संन्यास ही वस्तु यांत्रिक नाही. ती तुझ्या जीवनात कशी विकसित होत जाईल तें तुला समजणारहि नाही. म्हणून मोक्षाची चिंता सोड.

**21** भक्त देवाला नेहमी असेंच म्हणतो, ''ही भक्ति मला पुरे. तो मोक्ष, तें अंतिम फळ, तें मला नको.'' मुक्ति म्हणजे एक प्रकारची भुक्तिच ती. मोक्ष म्हणजे भोगच, एक फळच. या मोक्षरूपी फलावरहि फलत्यागाची कातर चालव. परंतु अशामुळे मोक्ष जाणार नाही. कातरी तुटेल, फळ अधिक मजबूत होईल. मोक्षाची आशा सोडाल, तेव्हाच मोक्षाकडे न कळत जाल. साधनाच इतकी तन्मयतेने होऊ दे, की मोक्षाचा विसर पडावा व मोक्ष तुला शोधीत तुझ्यासमोर येऊन उभा रहावा. साधकाने साधनेतच रंगून जावें. **'मा ते संगोऽस्त्वकर्मणि'** – अकर्मदशेची, मोक्षाची आसक्ति धरू नको, असें भगवंतांनी मागेच सांगितलें होतें. आता पुन्हा शेवटीं सांगत आहेत – **'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:।'** मोक्षदाता मी समर्थ आहे. तू मोक्षाची फिकीर करू नको. तू साधनेची फिकीर कर. मोक्षाला विसरल्यामुळे साधना उत्कृष्ट होईल व मोक्षच मोहून तुझ्याकडे येईल. मोक्षनिरपेक्ष वृत्तीने केवळ साधनेतच तल्लीन झालेल्याच्या गळ्यात मोक्ष-लक्ष्मी माळ घालते.

**22** जेथे साधनेची पराकाष्ठा होते तेथे सिद्धि हात जोडून उभी राहते. ज्याला घरीं जावयाचें आहे, तो ''घर घर'' असा जप करीत जर झाडाखालीच बसेल तर घर दूर राहून जंगलातच राहण्याची पाळी येईल. घराचें स्मरण ठेवून वाटेत विश्रांति घेईल तर त्या शेवटच्या विश्रांतीपासून तो दूर राहील. मी चालण्याचा उद्योग चालविला पाहिजे, म्हणजे घर एकदम पुढे येईल. मोक्षाच्या आळशी स्मरणाने माझ्या उद्योगात, माझ्या साधनेत, शिथिलता येऊन मोक्ष दुरावेल. मोक्षाला झुगारून देणें व सतत साधना सुरू ठेवणें हाच मोक्ष जवळ करण्याचा उपाय. अकर्मस्थिति, विश्रांति, या गोष्टींचा हव्यास नको. साधनेवरच प्रेम करा की मोक्ष अचूक साधेल. उत्तर, उत्तर, असें ओरडून उदाहरणाचें उत्तर निघत नाही. मला जी रीत कळली आहे, ती रीतच पायरी-पायरीने उत्तर मिळवून देईल. ती रीत जेथे संपेल तेथेच उत्तर ठरलेलें आहे. समाप्तीच्या आधी समाप्ति कशी व्हावयाची? रीतीच्या आधी उत्तर कसें मिळावयाचें? साधकाच्या अवस्थेत सिद्धावस्था कशी येणार? पाण्यात गटांगळ्या खात असता परतीरावरील मौज डोळ्यांसमोर ठेवून कसें चालेल? त्या वेळेस एकेक हात मारून पुढे जाण्यातच सारें लक्ष, सारी शक्ति असली पाहिजे. साधना पुरी कर, समुद्र ओलांड; मोक्ष आपोआपच भेटेल.

## 107. सिद्ध पुरुषाची तिहेरी भूमिका

**23** ज्ञानी पुरुषाच्या शेवटच्या अवस्थेत सर्व क्रिया गळून जातात, शून्यरूप होतात. परंतु म्हणून या अंतिम स्थितीत क्रिया होणार नाहीत असेंहि नाही. त्याच्या हातून क्रिया होतील किंवा होणार नाहीत. ही शेवटची दशा फार रमणीय व उदात्त आहे. त्या अवस्थेत जें जें होईल, त्याची चिंता त्याला नसते. जें जें होईल तें सारें शुभ व साजिरेंच होईल. साधनेच्या पराकाष्ठेच्या दशेवर तो उभा आहे. तेथे सर्व कर्मे करूनहि तो काही करणार नाही. संहार करूनहि संहार करणार नाही. कल्याण करूनहि कल्याण करणार नाही.

**24** ही अंतिम मोक्षावस्था म्हणजे साधकाच्या साधनेची पराकाष्ठा होय. साधकाच्या साधनेची पराकाष्ठा म्हणजे साधकाच्या साधनेची सहजावस्था. मी काही करीत आहे याची तिथे कल्पनाच नसते. किंवा या दशेला साधकाच्या साधनेची अनैतिकता मी म्हणेन. सिद्धावस्था ही नैतिक अवस्था नाही. लहान मुलगा सत्य बोलतो. परंतु तें नैतिक नाही, कारण त्याला असत्याची कल्पनाच नाही. असत्याची कल्पना असून सत्य बोलणें हें नैतिक कर्म होय. सिद्धावस्थेत

असत्य वस्तुच नसते. तेथे सत्यच आहे. म्हणून तेथे नीति नाही. निषिद्ध जें आहे तें तेथे वाऱ्याला उभें राहत नाही. जें ऐकावयास नको तें कानात शिरत नाही. जें पहावयास नको तें डोळे पाहत नाहीत. जें व्हावयास पाहिजे तेंच हातून होतें, तें करावें लागत नाही. जें टाळावयास हवें तें टाळावें लागत नाही, पण तें टळतें. अशी ही नीतिशून्य अवस्था आहे. ही जी साधनेची पराकाष्ठा, ही जी साधनेची सहजावस्था किंवा अनैतिकता किंवा अतिनैतिकता म्हणा, त्या अतिनैतिकतेत नीतीचा परमोत्कर्ष आहे. अतिनैतिकता शब्द मला चांगला सुचला. किंवा ही दशा म्हणजे सात्त्विक साधनेची निःसत्त्वता असेंहि म्हणता येईल.

**25** कोणत्या प्रकारांनी या दशेचें वर्णन करावें? जसा आधीच ग्रहणाचा वेध लागतो, त्याप्रमाणे देह गळून पडल्यावर पुढे येणारी जी मोक्षदशा तिचे डोहाळे देहपाताच्या आधीच सुरू होतात. देहाच्या स्थितीतच भावी मोक्षस्थितीचे अनुभव येऊ लागतात. अशी जी ही स्थिति तिचें वर्णन करतांना वाणी डळमळते. त्याने वाटेल तेवढी हिंसा केली तरी तो काही करीत नाही. त्याच्या क्रियांना आता कोणतें माप लावावयाचें? होईल तें सारें सात्त्विकच कर्म होईल. सारें क्रियाजात गळून पडलें तरी सर्व विश्वाचा तो लोकसंग्रह करील. कोणती भाषा वापरावी हें समजत नाही.

**26** या अंतिम अवस्थेत तीन भाव असतात. एक ती वामदेवाची दशा. त्याचा आहे ना तो प्रसिद्ध उद्गार – ''या विश्वात जें जें काही आहे तें मी आहे.'' ज्ञानी पुरुष निरहंकार होतो. त्याचा देहाभिमान गळतो. क्रिया सर्व गळून पडतात. अशा वेळेस त्यास एक भावावस्था प्राप्त होते. ती अवस्था एका देहात मावत नाही. भावावस्था म्हणजे क्रियावस्था नव्हे. भावावस्था म्हणजे भावनेच्या उत्कटतेची अवस्था. ही भावावस्था लहानशा प्रमाणात आपणां सर्वांस अनुभवता येते. मुलाच्या दोषाने माता दोषी होते, गुणाने गुणी होते. मुलाच्या दुःखाने दुःखी होते, सुखाने सुखी होते. आईची ही भावावस्था मुलापुरती असते. मुलाचे दोष स्वतः न करूनहि ती पत्करते. ज्ञानी पुरुषहि भावनेच्या उत्कटत्वाने सर्व जगाचे दोष पत्करतो. त्रिभुवनाच्या पापाने तो पापी होतो. पुण्याने पुण्यवान् होतो. आणि एवढें असूनहि तो त्रिभुवनाच्या पाप-पुण्याने यत्किंचित्‌हि स्पर्शिला जात नाही.

**27** त्या रुद्रसूक्तात ऋषि म्हणतो ना? **'यवाश्च मे तिलाश्च मे गोधूमाश्च मे'** – मला यव दे, तीळ दे, गहू दे, असें सारखें मागतच आहे. त्या ऋषीचें पोट आहे तरी केवढें? परंतु तो मागणारा साडेतीन हात देहातील नव्हता. त्याचा आत्मा विश्वाकार होऊन बोलत आहे. या गोष्टीला मी 'वैदिक विश्वात्मभाव' असें म्हणतो. वेदात या भावनेचा परमोत्कर्ष दिसून येतो.

**28** गुजरातमधील संत नरसी मेहता कीर्तन करतांना म्हणतो, **'बापजी पाप में कवण कीधां हशे, नाम लेतां तारूं निद्रा आवे'** – देवा, कोणतें असें पाप मी केलें आहे की कीर्तन करीत असता मला झोप यावी? आता झोप का नरसी मेहत्यास येत होती? झोप श्रोत्यांस येत होती. परंतु श्रोत्यांशी एकरूप होऊन नरसी मेहता विचारीत आहे. नरसी मेहत्याची ही भावावस्था आहे. ज्ञानी पुरुषाची अशी ही भावावस्था असते. या भावावस्थेत सर्व पाप-पुण्यें त्याच्या हातून होत आहेत असें तुम्हांस दिसेल. तो स्वतःहि तसें म्हणेल. तो ऋषि म्हणतो ना, ''करू नयेत अशा गोष्टी मी किती तरी केल्या, करतो, आणि करीन.'' ही भावावस्था प्राप्त झाली म्हणजे आत्मा पक्ष्यासारखा उडू लागतो. तो पार्थिवतेच्या पलीकडे जातो.

**29** या भावावस्थेप्रमाणे ज्ञानी पुरुषाची एक क्रियावस्थाहि आहे. ज्ञानी पुरुष स्वभावतः काय करील? तो जें जें करील तें तें सात्त्विकच असणार. जरी अजून मनुष्यदेहाची त्याला मर्यादा आहे, तरी त्याचा सारा देह, त्याचीं सारीं इंद्रियें सात्त्विक झालीं असल्यामुळे त्याचें सारें क्रियाजात सात्त्विकच होईल. व्यवहाराच्या बाजूने बघाल तर सात्त्विकतेची पराकोटी त्याच्या वर्तनात दिसेल. विश्वात्मभावाच्या दृष्टीने पहाल तर सर्व त्रिभुवनातील पाप-पुण्यें जणू तो करतो. आणि इतकें असूनहि तो अलिप्त असतो. कारण हा चिकटलेला देह त्याने उधडून फेकून दिलेला असतो. क्षुद्र देहाला फेकील तेव्हाच तो विश्वरूप होईल.

**30** भावावस्था व क्रियावस्था यांशिवाय ज्ञानी पुरुषाची तिसरी एक स्थिति आहे. ती म्हणजे ज्ञानावस्था. या अवस्थेत तो पापहि सहन करीत नाही, पुण्यहि सहन करीत नाही. झडझडून सारें फेकून देतो. या त्रिभुवनास काडी

लावून शिलगवण्यास तो तयार होतो. एकहि कर्म अंगावर घेण्यास तो तयार नसतो. त्याचा स्पर्शहि त्याला सहन होत नाही. अशा या तीन अवस्था ज्ञानी पुरुषाच्या मोक्षदशेत, साधनेच्या पराकाष्ठेच्या दशेत, संभवतात.

**31** ही जी अक्रियावस्था, शेवटची दशा, ती दशा अंगीं कशी बाणावयाची? आपण जीं जीं कर्मे करतो त्यांचें कर्तृत्व आपणांकडे घ्यावयाचें नाही असा अभ्यास करावा. मी केवळ निमित्तमात्र आहे, कर्माचें कर्तृत्व मजकडे नाही, असें मनन करावें. ही अकर्तृत्ववादाची भूमिका प्रथम नम्रतेने घ्यावयाची. परंतु अशाने संपूर्ण कर्तृत्व गेलें असें होणार नाही. हळूहळू या भावनेचा विकास होत जाईल. आधी मी म्हणजे केवळ तुच्छ आहे, त्याच्या हातातील बाहुलें आहे, तो मला नाचवीत आहे, असें वाटू दे. त्यानंतर सारें करून तें या देहाचें आहे, मला त्याचा स्पर्श नाही, हें सारें क्रियाजात या मढ्याचें आहे; परंतु मी मढें नाही, मी शव नसून शिव आहे असें भावीत देहाच्या लेपाने लेशमात्रहि लिप्त होऊ नको. असें झालें म्हणजे देहाशी जणू संबंधच नाही अशी मग ज्ञान्याची अवस्था प्राप्त होईल. त्या अवस्थेत पुन्हा वर सांगितलेल्या तीन अवस्था असतील. एक त्याची क्रियावस्था, जीत अत्यंत निर्मळ व आदर्श क्रिया त्याच्या हातून होईल. दुसरी भावावस्था, जीत त्रिभुवनातील सारीं पाप-पुण्यें मी करतो असें तो अनुभवील, परंतु त्याचा त्याला लेशमात्रहि स्पर्श होणार नाही. तिसरी त्याची ज्ञानावस्था. या अवस्थेत लेशमात्रहि कर्म तो आपल्याजवळ राहू देणार नाही, सर्व कर्में भस्मसात् करील. या तिन्ही अवस्थांनी ज्ञानी पुरुषाचें वर्णन करता येईल.

## 108. ''तुही...तुही...तुही''

**32** एवढें सारें सांगून भगवान् अर्जुनाला म्हणाले, ''अर्जुना, मी तुला हें जें सांगितलें, तें सारें नीट ऐकलेंस ना? आता पूर्ण विचार करून तुला सुचेल तसें कर.'' भगवंतांनी अर्जुनाला मोठेपणाने स्वातंत्र्य दिलें. भगवद्गीतेचा हा विशेष आहे. परंतु भगवंतांना पुन्हा कळवळा आला. दिलेलें इच्छास्वातंत्र्य त्यांनी पुन्हा काढून घेतलें. ''अर्जुना, तुझ्या इच्छा, तुझी साधना, सारें फेकून दे, व मला शरण ये.'' स्वत:ला शरण येण्यास सांगून, दिलेलें इच्छास्वातंत्र्य भगवंतांनी काढून घेतलें. याचा अर्थच हा की ''तुला स्वतंत्र अशी इच्छाच होऊ देऊ नको. स्वत:ची इच्छा नाही चालवायची, त्याची चालवायची, असें कर.'' स्वतंत्रपणा नको असेंच स्वतंत्रपणें मला वाटू दे. मी नाही, सारें तू, असें व्हावें. तें बकरें जिवंत असतांना ''में में में'' करीत असतें, ''मी मी मी'' म्हणत असतें. परंतु तें मरून त्याची तांत पिंजणाला लावली की – दादू म्हणतो, ''तुही तुही तुही --- तूच तूच तूच'' असें तें म्हणतें. आता सारें ''तुही...तुही...तुही''.

*रविवार, 19-6-'32*

# साम्यसूत्र-वृत्तिः

विनोबांनी 'गीता-प्रवचनें'ला 108 अधिकरणांमध्ये विभागले आहे. प्रत्येक अधिकरणावर एक, अशी 108 सूत्रेंहि त्यांनी लिहिली असून त्यांना 'साम्यसूत्रें' म्हटले आहे. पुस्तकाच्या 432 परिच्छेदांवरहि त्यांनी सूत्रें लिहिली असून या एकूण (108+432=) 540 सूत्रांना 'साम्यसूत्र-वृत्तिः' (वृत्ति= विवरण) असे नाव दिले आहे. 'गीता-प्रवचनें'चे सार सूत्रमय भाषेत या वृत्तीत प्रकट झाले आहे.

### अध्याय 1

***(1) अभिधेयं परम-साम्यम्   5***

1 अथ गीतानुशासनम्  2 दीपस्तंभवत्  3 रामायण-भारतयोर् वैशिष्ट्यम्  4 व्यासमुनेर् मननसारः  5 कृष्णत्रयी

***(2) संबंधेन   5***

6 अर्जुनस्य भूमिका 7 वीरवृत्तिः  8 अहिंसकवत् भाषते एव  9 मोहांध-न्यायाधीशवत्  10 प्रज्ञावादः

***(3) प्रयोजनवत्त्वात्   5***

11 अर्जुनस्य संन्यासो न स्वधर्मः  12 परधर्मः श्रेष्ठ इति न ग्राह्यः  13 सुकर इति न स्वीकार्यः

14 भगवान् भक्त-सापेक्षः  15 मोहमोचनमेव प्रयोजनम्

***(4) ऋजुबुद्धेस्तु   1***

16 ऋजुबुद्धिरर्जुनः

### अध्याय 2

***(5) छंदसि बहुलम्   3***

1 अर्जुनं निमित्तीकृत्य  2 नित्यनूतन-परिभाषा  3 'द'कारार्थवत्

***(6) देहेन स्वधर्मः  2***

4. स्वधर्मः सहजः सुकरः  5 देहबुद्ध्या तु दुष्करो भवति

***(7) मुक्तात्मा   7***

6 तत्त्वज्ञानं प्रथममावश्यकम्  7 नाहं देहः  8 देहो वस्त्रवत्  9 मरणशब्दमपि न सहते पामरः  10 आत्म-विस्तारः कर्तव्यः

11 आत्मा मोचनोत्सुकः  12 सारांशत्रयी

***(8) युक्त्या समन्वयः   3***

13 फलाशा त्यक्तव्या  14 समत्वं कुशलो गुणः  15 कर्मण्येवानंदनिर्झरः

***(9) भक्त-जनेषु   4***

16 तुकारामस्य दृष्टान्तः  17 पुंडलीकस्य च  18 'अपि' सिद्धान्तः  19 साधनैकपरता

***(10) ततः प्रज्ञालाभः   5***

20 स्थितप्रज्ञलक्षणानि  21 नित्यं पठितव्यानि  22 संयममूर्तिः  23 मत्परः  24 जीवनशास्त्रं संपूर्णम्

### अध्याय 3

***(11) कर्मयोगोऽनंतफलः   7***

1 अकामिनं कांक्षते लक्ष्मीः  2 अहो भारभृतां त्यागः!  3 मंत्रितं कर्म  4 गुरुदक्षिणातुल्यम्  5 गंगास्नानादि-सदृशम्

6 भावनाभेदादंतरम्  7 विश्वेन सामरस्यम्

***(12) बहुविध-प्रेरणैः   3***

8 स्व-पर-यात्रार्थम्  9 चित्तस्य शुद्धये  10 आदर्श-स्थापनाय च

***(13) जितांतरायस्य   2***

11 प्रसादसेवनमानुषंगिकम्  12 अंतरायजयः

## अध्याय 4

***(14) विकर्‌मणा संधानम्   3***

1 निष्कामता-सिद्धये चित्तं शोधयेत्  2 एतदर्‌थं विकर्‌म योजना  3 निष्कामकर्‌मणि विशेषणं वरीय:

***(15) तत: स्फोट:   6***

4 मंत्रेण तंत्रे शक्ति:  5 भावेन सेवा सार्‌द्रा  6 विकर्‌मणा कर्‌मणि चैतन्यम्  7 रामेक्षणमिव
8 निरुपद्रवं भस्म  9 न भारो न श्रम:

***(16) सच्छरणस्य   3***

10 विकर्‌मकला सत्संगेन 11 ज्ञानं निर्‌ग्रंथम्   12 अति-श्रुतस्य बुद्धिर् भ्रांता

## अध्याय 5

***(17) कर्‌ममातृकमकर्‌म   6***

1 गृहे वने संसार: समान:  2 राक्षसवत् यथेष्टाकार:   3 तज्जयाय विकर्‌मापेक्षा  4 कर्‌मणोऽप्युपकार:
5 गुहासीनस्य चित्तं क्षीणम्   6 अकर्‌मदर्‌शनमुभयसंयोगेन

***(18) द्विरूपं तु   5***

7 अक्लान्तमेकम्  8 स्वेनाज्ञातम्   9 अगणितम्   10 प्रेरकमपरम्  11 सहजधर्‌मरूपम्

***(19) व्यक्तलिंगमेकम्   3***

12 अकरणमपि कर्‌मप्रकार:   13 सुवर्‌णमंजूषान्यायेन   14 कर्‌मसातत्ये नैष्कर्‌म्यम्

***(20) अव्यक्तलिंगमपरम्   2***

15 संन्यासो गूढशक्ति:   16 आसीनो दूरं व्रजति

***(21) अनिर्‌वचनीयमुभयम्   3***

17 उभयकथा रम्या   18 सद्‌भि: सदा सेव्या   19 उदात्ता काव्यमयी

***(22) बिंदु-देवतादिवत्   4***

20 दृष्टान्ता अपूर्‌णा:   21 अमूर्‌तस्य भावनं मूर्‌तौ   22 यथा भूमिति-शास्त्रे  23 यथा च मीमांसा-दर्‌शने

***(23) शुकजनकयोरेक: पंथा:   4***

24 एकैव गुरु-परंपरा   25 शुकस्य ज्ञाननिष्ठा   26 ज्ञानिनोऽस्तित्वमेव स्फूर्‌ति:  27 वेगचालितं यंत्रं स्थिरं भासते

***(24) वैशेष्यं तु   5***

28 सौकर्‌येण विशिष्यते कर्‌मयोग:  29 सगुणोपासनवत्  30 प्रयत्नावकाशात्   31 अलिखित-पठनं तु संन्यास:
32 केवलं निष्ठैव

## अध्याय 6

***(25) आरोढुमिच्छेत्   3***

1 अथ विवरणारंभ:   2  गीता व्यवहार-शोधनाय  3 उच्चाकांक्षायामेव ध्यानादि-प्रयोजनम्

***(26) एकाग्रतया   4***

4 एकाग्रता प्राथमिकी  5 रणांगणेऽपि   6 न ज्ञातं शल्यमुद्धृतम्   7 वृद्धोऽपि तरुणायते

***(27) साभीष्टा शुद्धिपूर्‌विका   5***

8 अंतश्चक्रं निवर्‌तयेत्   9 क्षुद्र-विषयेषु ज्ञानशक्तिं न क्षपयेत्   10 शून्यमनेकं च वर्‌जयेत्
11 जीवनं शोधयेत्   12 परदोषं न पश्येत्

***(28) गणितं सहकारि   3***

13 युक्तं जीवेत्   14 आवृत्तचक्षु:   15 नातिमात्रं तु भुंजीत

***(29) साम्येन मंगलम्   7***

16 मंगलायतनं हरि:   17 विश्वं तद् भद्रं यदवन्ति देवा:   18 रामदासयोर् मतभेद:!   19 सृष्टिर् मातृसमा
20 अतिष्ठन्तीनामनिवेशनानाम्   21 हिमालयो हृदि स्थित:   22 समुद्रादूर्मिर् मधुमानुदारत्

***(30) बालवत्  2***

23 बलवान् बाल:   24 श्रद्धामूर्ति:

***(31) श्रद्धयोपेतस्य   4***

25 धनर्णयोगेन परिपूर्णता   26 रसतमास्वादने नीरसमन्यत्   27 योगसंस्कारो न नश्यति  28 ज्ञानदेव-कथने विशदम्

## अध्याय 7

***(32) मायिनो ग्रहणेन  4***

1 नूतनागारम्   2 द्विविधा प्रकृति:   3 परमात्मा ग्रहीतव्य:   4 प्रपत्ति-योगेन

***(33) भक्तिरसं लब्ध्वा   4***

5 भक्तिर् वास्तविको रस:   6 अन्ये रसा आभासिका:   7 आनंदाभासं निर्मिमीते निरानंद:   8 रामरसं को जानाति?

***(34) काम्यं क्षम्यं हरिस्पर्शात्   4***

9 अश्रुपूर्णो नामदेव:   10 व्रतपरायणा महिला:   11 युधिष्ठिरस्य कुक्कुर:   12 भाविको यात्रिक:

***(35) निष्कामाश्चतुर्विधा:   4***

13 आर्त: साधक:   14 जिज्ञासु: शोधक:   15 हितार्थी सेवक:   16 ज्ञानी परिपूर्ण:

## अध्याय 8

***(36) शुभं शनै: संचिनुयात्   3***

1 संस्कारसंचयो जीवनम्   2 तच्छेषोऽल्प:   3 अंत्यस्मृतिर् बलीयसी

***(37) मृति-स्मृति: शुद्धये   8***

4 अंत्यस्मृत्यनुसारि पुनर्जन्म   5 एकनाथेन सूचितम्   6 पास्कलस्य प्रतिभा   7 कालापसारिणो विद्यार्थिन:
8 सुक्राताय समर्पणम्!   9 सर्वेषामनिवार्यम्   10 अद्यप्रभृत्येव चिंतनीयम्   11 पितामह्या: स्मृतितंत्रम्

***(38) तद्भावभावित:   3***

12 सदा सावधानेन भाव्यम्   13 दैनिककर्तव्य-पूर्ति:   14 सत्-संस्कार-धारा

***(39) संनद्धश्च   3***

15 अखंडभगवत्स्मृति:   16 निरंतरं युद्ध-प्रसंग:   17 निराशा नैव

***(40) आप्रायणात्   3***

18 प्रयाणसाधनारूपकम्   19 रूपक-विवेचनम्   20 तच्चिंतनं पुन: पुन:

## अध्याय 9

***(41) प्रात्यक्षिकी   3***

1 प्रवचने जपभावना   2 नवमाध्यायमहिमा   3 पारत्रिकं को जानाति?

***(42) सुसुखं कर्तुम्   5***

4 वेदसारामृतं गीता   5 वेदविचारो गहन:   6 अयं तु मुक्तमार्ग:   7 न स्खलेन्न पतेदिह  8 हरिरेव जगत् जगदेव हरि:

***(43) अधिकार-सामान्यात्   3***

9 पापयोनीनामप्यधिकार:   10 व्यासस्य संमतम्   11 वधिकोदाहरणमात्यंतिकम्

***(44) समर्पणेन योग:   5***

12 सहानुभूति-रसायनम्   13 अपात्रं पात्रीभवति भावनेन   14 पात्रापात्रविवेक: सुबोध:   15 कामक्रोधौ समर्पितौ
16 इंद्रियाणि साधनानि

***(45) क्रियाविशेषानपेक्ष: 3***

17 यशोदावत् बालसंगोपनम्   18 कृषकस्य वृषभसेवा   19 पाकयज्ञो गृहलक्ष्म्या:

***(46) व्यापकत्वात् 9***

20 पुरुषसूक्तेन स्नानम्  21 वस्त्रेव भद्रा सुकृता   22 पांथिको नारायण:   23 वाल्मीकि-परिवर्तनम्
24 वस्तुतो न कश्चित् दुष्टो नाम  25 मातृकथिता कृष्णार्पणकथा   26 विठ्ठल-मिश्रितं स्वादु
27 मधुरेणोत्थापयेत्   28 गुरुशिष्यावन्योन्यदेवते

***(47) अकुतोभयम् 2***

29 पापं बिभेति हरिनाम्न:   30 बालोऽपि श्मशाने निर्भय:

***(48) स्वल्पेनापि 2***

31 भावनाया मूल्यम्   32 ईश्वरार्पितमुप्तमिव

## अध्याय 10

***(49) क्रमेण प्रतिपत्ति: 4***

1 अभितो ब्रह्मनिर्वाणम्   2 ध्यान-प्रपत्ति-सातत्यम्   3 राजविद्या राजगुह्यम्   4 बुभुक्षमाणो रुद्ररूप:

***(50) स्थूलात् सूक्ष्मं प्रपद्ये 2***

5 स्थूल-सूक्ष्म-सरल-कठिन-क्रमेण   6 सरलं न रोचते कठिनं न पच्यते

***(51) मानुषं सौम्यम् 2***

7 मातृपित्रादिषु सौम्यम्   8 बालकेषु च

***(52) सृष्टौ रम्यम् 6***

9 प्रदर्शनं पश्येम   10 आविर्कर् भुवनं विश्वमुषा:   11 सूर्य आत्मा जगतस् तस्थुषश्च   12 भगवती भागीरथी दृश्यते
13 द्वाविमौ वातौ वात:   14 अग्निमीळे पुरोहितम्

***(53) प्राणिषु चित्रम् 9***

15 वाश्रा इव धेनव: स्यंदमाना:   16 प्रामाणिक: स्वामिनिष्ठोऽश्व:   17 अक्रूर: कृतज्ञ: सिंह:   18 व्याजिघ्रतीति व्याघ्र:
19 सत्संनिधौ निर्वैर: सर्प:   20 रामदूता वानरा:   21 षड्जं रौति मयूर:   22 महिलानां कोकिलाव्रतम्
23 गोस्वामि-पूजित: काक:

***(54) दुरात्मसु चिंत्यं तदेव 1***

24 स्तेनानां पतये नमो नम:

## अध्याय 11

***(55) कृत्स्नं न कामयेत् 5***

1 किं नाम विश्वरूपम्?   2 अनंतं ब्रह्मांडम्   3 निरवधि: कालश्च   4 सखैतत् द्रष्टुमिच्छति   5 तस्मै दिव्यदृष्टिर् दत्ता

***(56) अंशेऽपि समावेशात् 4***

6 बिंदु-सिंधु-न्यायेन   7 मूर्तिपूजा-रहस्यम्   8 उपमारूपकादि-स्वारस्यम्   9 उपमान-विस्तार:

***(57) अनधिकृतत्वाच्च 4***

10 दिव्यदृष्टिरपि भीत:   11 कालविस्मरणं तारकम्   12 सामीप्ये नाधिकार:   13 चरण-सेवा पर्याप्ता

***(58) मत्कर्मादौ तात्पर्यम् 3***

14 विश्वगीतं गेयम्   15 सव्यसाचि-कार्यम्   16 सर्वसारं सेव्यम्

## अध्याय 12

***(59) एकाग्रं च समग्रं च 2***

1 इदं तु धर्म्यामृतम्   2 ध्यानादि-दर्शनान्तं विवृतम्

***(60) तुल्यं तु   5***

3 इदानीं क: प्रियतर इति पृच्छा   4 मातृ-हृदयं किं वदेत्?   5 तथैव स्थितिरभूत् भगवत:

6 योगि-संन्यासि-सदृशम्   7 सौलभ्येन समाधानम्

***(61) सगुणं साधकं देहभृत:   5***

8 मार्ग: साधको बाधको दृष्टिसापेक्ष:   9 सगुणं सेवामयं सुलभम्  10 निर्गुणं चिंतामयं कठिनम्

11 ज्ञानमक्षमं सूक्ष्म-शोधनाय   12 प्रायेण परोक्षं बौद्धिकं तत्

***(62) बाधकं तदप्यमर्यादम्   4***

13 सगुणमपि सदोषममर्यादं चेत्  14 तत्त्वनिष्ठया व्यक्तिनिष्ठा सुरक्षिता   15 एतदर्थं शरणत्रयी कल्पिता

16 अत्याचार: परिवर्जनीय:

***(63) बोध्यं रामानुजयोर् दृष्टान्तेन   7***

17 अन्योन्यशोभा   18 लक्ष्मण-भरतयो:   19 सख्यु: सखा लक्ष्मण:   20 ध्वजायै दंडवत्   21 रामकार्यदर्शी भरत:

22 महातपस्वी   23 पादुकाश्रयमपेक्षते

***(64) कृष्णसखयोश्च   4***

24 भक्तिरनासक्तिरेकैव   25 उद्धवार्जुनयो:   26 उद्धवो निर्गुणान्त:   27 अर्जुन: सगुणान्त:

***(65) आत्मप्रतीतेरभेद:   1***

28 स्वानुभवकथनम्

***(66) अमृतं पर्युपास्यम्   4***

29 स्यात् शिलामयार्चनं निर्गुणम्  30 स्यात् शिलामयार्चनं सगुणम्  31 उभे परस्परपूरके  32 लक्षणान्यभ्यस्यनीयानि

## अध्याय 13

***(67) शरीरात् प्रवृहेत्   4***

1 व्यास: समासो गीतायाम्  2 आचारशुद्धिर् विचारेण   3 फलवासना प्रेरकशक्तिर् मन्यते   4 तन्निरसनाय देहात्मपृथक्करणम्

***(68) अन्यथा संस्कारासंभव:   5***

5 देहपूजा व्यर्था  6 देहनिंदापि व्यर्थैव  7 आत्माधारं शिक्षणशास्त्रम्  8 'अहं' सर्वथा निर्मल:

9 साक्षित्वेन संस्कार: संभवेत्

***(69) क्लिष्ट-जीवितं च   4***

10 रक्ष्याणां भक्षणम्   11 भैषज्यातिरेक:   12 पिंडपोषणवृत्ति:   13 कृत्रिम-वेषभूषा

***(70) महावाक्यमनुचिंतयेत्   3***

14 तत्त्वमसि-सूत्रम्   15 तन्निदिध्यासेन देहस्वाम्यम्   16 वस्त्रवत् धारयेत् जह्याच्च

***(71) तत: शासनमुक्ति:   3***

17 'अश्नामि'-राक्षस:   18 हुतात्म-परंपरा   19 अजरामर: सुक्रात:

***(72) आत्मशक्तेर् भानात्   2***

20 किमाश्वस्तो निद्राति?   21 विश्वशक्तिमाश्वस्त:

***(73) आवि: संनिहिततरम्  8***

22 द्रष्टृ-भूमिका प्रथमा   23 नैतिकी द्वितीया   24 नैतिक्यामनुमन्ता   25 श्रांता तृतीया   26 श्रांतस्य सख्याय भर्ता

27 भोक्तृ-भूमिका चतुर्थी   28 माहेश्वरी पंचमी   29 एवं परमात्मशक्तेराविष्कार:

***(74) विंशत्या   3***

30 ख्रिस्तबलिदानमंत्र मननीयम्   31 सद्गुण-संवर्धनमेव ज्ञानम्   32 ज्ञानदेवेनाविष्कृतम्

## अध्याय 14

***(75) प्रकृतिः शोध्या 3***

1 शृंखला भेदनीया 2 विवेकवैराग्याभ्याम् 3 त्रिधातुका शोधनीया

***(76) श्रम-संजात-वारिणा 5***

4 शरीरस्थो महारिपुः 5 पादं प्रविष्टः कलिः 6 समाजश् छिन्नभिन्नः 7 रुंडमुंड-वर्गभेदेन 8 श्रमनिष्ठा रामबाणः

***(77) यन्ति प्रमादमतंद्राः 4***

9 गाढनिद्रा सुदुर्लभा 10 चक्री न सुखं शेते 11 विस्मृतिर् व्याधिः 2 प्रमादो मृत्युः

***(78) वेगस्य शमनं स्वधर्मेण 4***

13 तमःप्रतीपं रजः 14 रजोलक्षणं वेगः 15 सततं भ्रामयति 16 रजोमारणं स्वधर्मेण

***(79) स्वाभाविकत्वात् 4***

17 स्वधर्मः स्वभावनियतः 18 जन्म-जातः 19 प्रवाह-प्राप्तः 20 चांचल्य-मोचनः

***(80) सत्त्वस्य सत्त्वेन 6***

21 सत्त्वं जयेत् सावधानः 22 सातत्येन 23 निरहंकारेण 24 कारुण्यासक्ति-वर्जनेन
25 कीर्ति-परिहारेण 26 अंतिमफलत्यागेन

***(81) भक्त्यैव तु निस्तारः 2***

27 अखंड-जागरस् तारणः 28 हरिकृपा च

## अध्याय 15

***(82) पुरुषकारात् भक्तिरभिन्ना 5***

1 पूर्णयोगः 2 वृक्षरूपकम् 3 त्रैगुण्य-रामायणम् 4 निस्त्रैगुण्ये कमलवत् 5 यत्नवीरं कामयन्ते वेदाः

***(83) तया स सुकरः 2***

6 ज्ञानकर्मप्रेम्णस् त्रिपदी 7 प्रेम्णा तपः शीतलम्

***(84) त्रैतं सेवार्थम् 5***

8 सेव्य-सेवक-साधन-त्रिपुटी 9 सेव्य-सेवकौ सनातनौ 10 साधनरूपा सृष्टिर् नित्यनूतनी
11 चंद्रकला सुमनमाला 12 नवनव-प्रसवा

***(85) सैव भक्तिरनहंकृता चेत् 2***

13 दैनंदिनी सेवा 14 निरहंकृता भक्तिरूपा

***(86) ज्ञानं समरसम् 6***

15 जीवनं ज्ञानेन संस्कार्यम् 16 उपकरण-पूजा 17 जीव-शिव-सृष्टैक्यम् 18 देवालय-दृष्टान्तः
19 खंडशर्करासेवनवत् 20 समरसं रमणीयम्

***(87) अत्र वेदार्थः परिसमापतः 4***

21 वेदः सृष्टौ प्रकाशते 22 श्रमिकस्य कराग्रे च 23 अहमेव वेद-फलितम् 24 वेदविदव्यंगः

## अध्याय 16

***(88) एषा दिवो दुहिता 3***

1 पुरुषोत्तमयोगोऽन्तिमः 2 पंचवादातीतो निर्विवादः 3 पूर्व-प्रभा दैवी संपत्

***(89) सदसती पस्पृधाते 4***

4 अंतःसंग्रामो मूलम् 5 बहिर् दृश्यते प्रतिबिंबम् 6 अभयादि-नम्रतान्ता दैवी 7 दंभाद्यज्ञानान्ताऽऽसुरी

***(90) चतुष्पर्वाण्युत्तरोत्तरम् 5***

8 अहिंसाविकासपर्वाणि 9 परशुरामस्य प्रथमम् 10 विश्वामित्रादीनां द्वितीयम् 11 महतां सतां तृतीयम् 12 अस्माकं चतुर्थम्

***(91) अपूर्वं मानवस्य  2***

13 पश्वादीनामभयदानम्  14 भारतीयप्रयोगविशेष:

***(92) स्वाम्यादि परिहरेत्  6***

15 त्रिविध-महत्त्वाकांक्षा  16 संस्कृतिर् धार्मिकी मे  17 संस्कृतिर् वांशिकी मे  18 धनं मे  19 प्रभुत्वं मे
20 'मे'-मुक्तं भावि-युगम्

***(93) शास्त्रीय-संयमेन  4***

21 विस्तीर्णो नरकपंथा:  22 वंशवृद्धि-चिंतां मा कुरु  23 संयम-चिंतां कुरु  24 तीरानंदो भव

## अध्याय 17

***(94) संयतेन स्वैरम्  3***

1 कार्यक्रमयोग:  2 तेनैव निश्चिंतता  3 संस्थात्रयाधारितं जन्म

***(95) तदर्थं त्रिविधि:  6***

4 क्षतिपूर्णो यज्ञ:  5 ऋणमोचनं दानम्  6 दोषशोधनं तप:  7 एतै: संस्थात्रये साम्यं स्थापयेत्
8 आहारसेवनं तदर्थीयम्  9 मूलभूता श्रद्धा

***(96) सात्त्विकं संपादयेत्  5***

10 सात्त्विकमेव समर्पणीयम्  11 सेवा-साधना-सामरस्यम्  12 कामनामुक्तं साफल्ययुक्तं च
13 सौंदर्यं प्रतिबिंबम्  14 मंत्रेण पुष्टि:

***(97) आहारशुद्धौ  4***

15 मिताहारस्य महत्त्वम्  16 निरामिषं पूर्वज-पुण्यम्  17 मत्स्याशनत्याग: प्रयोगविषय:  18 पूर्वज-पुण्यं न हापयेत्

***(98) सर्वेषामविरोधेन  4***

19 अविरोधि-जीवनयोजना  20 द्वौ चैतन्यवादौ  21 विरोध: काल्पनिक:  22 देहांगवदद्वैतम्

***(99) नाम्ना साद्गुण्यम्  4***

23 नामामृतं सेवनीयम्  24 गुण-भाव्यानि नामानि  25 ॐतत्सदित्यस्य विवरणम्  26 ब्रह्मार्पणमस्तु

***(100) तद्धि पापापहारि  2***

27 पापापहारि हरिनाम  28 सदसतो: समानाधिकार:

## अध्याय 18

***(101) अथातस्त्यागमीमांसा  2***

1 अंतिमं प्रवचनम्  2 अर्जुनस्यांतिम: प्रश्न:

***(102) निकष: सार्वभौम:  4***

3 फलत्यागो निकष:  4 काम्य-निषिद्धानि वर्जनीयानि  5 कर्ममात्रं सदोषम्  6 कर्मसंकोचो निरर्थक:

***(103) क्रियोपरमे वीर्यवत्तरम्  6***

7 सेंद्राय तक्षकायेति न कुर्यात्  8 गोरक्ष-दृष्टान्तेन बोद्धव्यम्  9 देहदहनाय प्रवृत्तो मूर्ख:  10 अमंगलमिति न वक्तव्यम्
11 क्रियाकर्मणोर् भेद:  12 दांभिक-पोपवत् साधकस्य

***(104) अनेन स्वधर्मो विवृत:  4***

13 ओघप्राप्तं सदोषमपि न त्यजेत्  14 अप्राप्तं गुणवदपि न ग्राह्यम्  15 प्रतिव्यक्ति भिन्नं स्वत्वम्
16 स्वधर्म: स्थिर: परिवर्तनीयश्च

***(105) अष्टकं भावयेत्  2***

17 त्यागाष्टकम्  18 प्रकृति: प्रवाहिनी

***(106) काष्ठैव निष्ठा  4***

19 फलत्यागश्चिंतामणि:  20 मोक्षस्य नाकांक्षा  21 भक्ति-साधना पर्याप्ता  22 मार्गे नैव विश्रम:

***(107) तुरीयं त्रिकोणम्   9***

23 अंतिमावस्था परमोदात्ता रमणीया   24 अतिनैतिकी   25 अवर्णनीया   26 भावावस्था वामदेववत्   27 'च मे च मे'
28 नरसिंह–कथनम्   29 क्रियावस्था सात्त्विकी   30 ज्ञानावस्था त्रिभुवन–दहनी   31 शिवोऽहं नेदं शव:

***(108) अहंमुक्तिः शब्दात अहंमुक्तिः शब्दात्   1***

32 त्वमेव त्वमेव त्वमेव

**परिशिष्ट 1:**

# गीता-प्रवचनांच्या जन्मस्थानीं

*(भूदान-पदयात्रेदरम्यान दि. 14 ऑगस्ट 1958 रोजी*
*धुळे जेलमधील कैद्यांसमोर दिलेले भाषण)*

माणसाच्या जीवनामधे अनेक कामें होतात आणि अनेक अनुभव येतात. परंतु सगळींच कामें आणि सगळेच अनुभव माणूस लक्षात ठेवीत नाही, ते त्याच्या लक्षात राहतहि नाहीत. परंतु काही कामें आणि काही अनुभव असे असतात की माणसाने ते विसरायचे म्हटलें तरी त्याला विसरणें शक्य नसतें.

1932 सालीं आम्ही या जेलमधे होतो त्या वेळीं येथे सुमारे 300 स्वराज्याचे कैदी होते. त्या प्रत्येकाशीं माझा अगदी व्यक्तिगत परिचय झाला होता. म्हणजे माझ्या स्वभावात जी गोष्ट नाही असें सगळ्यांना माहीत होतें त्याच्या अगदी उलटी गोष्ट तेथे झाली. जेलमधील प्रत्येकाने आपल्या जीवनातल्या अगदी लहानसहान गोष्टी सुद्धा मला ऐकविल्या व मी त्या ऐकल्या.

**रणांगणावर सांगितलेलीं गीता-प्रवचनें**

साने गुरुजींनी 'गीता-प्रवचनें' लिहून घेतलीं हा त्यांचा जगावर फार मोठा उपकार आहे. त्या वेळीं कोणालाहि कल्पना नव्हती की हीं जेलमधे दिलीं जात असलेलीं प्रवचनें सबंध देशांत सगळ्या भाषांत पसरतील. परंतु जी गोष्ट ईश्वराला करायची असते तीच होत असते. नाही तर जेलच्या जीवनात निश्चितता काहीच नसते. कोणालाहि केव्हाहि कोठेहि पाठविलें जातें. सरकार मला कोठेहि पाठवू शकत होतें व साने गुरुजींनाहि पाठवू शकत होतें. मधून मधून याप्रमाणे माणसांना हलविलेंहि गेलें. परंतु मला किंवा साने गुरुजींना हलविलें गेलें नाही आणि या ठिकाणीं सबंध गीता-प्रवचनें झालीं. भगवद्गीता कुरुक्षेत्राच्या रणांगणावर सांगितली गेली म्हणून त्या गीतेला एक विशेष स्वरूप आलें, तें दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाला आलें नाही. भगवंतांनीच पुन्हा दुसऱ्यांदा गीता सांगितली ती अनुगीता या नांवाने प्रसिद्ध आहे, परंतु भगवद्गीतेमधे जी जादू आहे ती त्यामधे नाही. त्याचप्रमाणे मी जर स्वतंत्र रीतीने गीतेवर व्याख्यानें दिलीं असतीं किंवा काही लिहिलें असतें तर आजच्या गीता-प्रवचनांमधे जी जादू दिसते ती त्यांत दिसली नसती. अगदी कुरुक्षेत्राचें रणांगण आहे आणि त्यांत आम्ही सगळे सैनिक आहोत अशी आमची भावना होती. आम्ही एका युद्धात येथे आलो होतो आणि गीता प्रवचनें युद्धातील सैनिकांच्या समोर सांगितलीं गेलीं आहेत. ज्यांनी तीं प्रवचनें ऐकलीं ते त्यांची कधींहि आठवण विसरू शकणार नाहीत.

**जेलच्या गोड आठवणी**

त्या वेळीं सबंध जेल माझ्या हातात होता. जेलमधील सगळी शिस्त जर मी माझ्या हातात घेतलीं नसती तर तिथे काहीहि शिस्त राहिली नसती. लोक बंडखोर होते व हट्टाला पेटले होते, त्यामुळे कोणी कोणाचें ऐकत नव्हते. परंतु स्वराज्याच्या शिपायांकडून स्वराज्याची शिस्त म्हणून मी 21 पौंड पीठ रोज दळून घेत असे. त्या वेळीं 35 पौंडाचा टास्क होता. परंतु मी जेलच्या अधिकाऱ्यांना म्हणालों की हे लोक एवढा टास्क करणार नाहीत. तुम्ही दंडाबेडी घातली तरीहि कोणी ऐकणार नाही. जेलच्या अधिकाऱ्यांनी तें मान्य केलें आणि ज्या कैद्यांना साधी सजा झाली होती त्यांच्याकडून सुद्धा मी 21 पौंड दळून घेतलें. त्या वेळीं जेलची रसोई पण माझ्या हातात होती आणि उत्तम उत्तम माणसें त्या कामाला लागलीं होतीं. डाळ शिजवितांना आम्ही घोटत असू. जितका वेळ ती शिजायची तितका वेळ ती घोटली जायची, त्यामुळे सर्वांना त्या डाळीची आठवण राहिली. ती डाळ इतकी सुंदर बनायची की या जेलमधील लोक म्हणत की येथे जशीं गीतेवरचीं प्रवचनें झालीं तशीं दुसरीकडे ऐकायला मिळालीं नाहीत आणि येथे जशी डाळ खाल्ली तशी दुसरीकडे खायला मिळाली नाही! त्या वेळीं आमच्यांतले फक्त 10-12 लोक 'फिके' म्हणजे मिर्ची न खाणारे होते व बाकी सगळे 'तिखे' होते. परंतु हळूहळू परिणाम असा झाला की जितके स्वराज्याचे शिपाई होते ते सगळे फिके बनले आणि आमची 300 लोकांची एकच पंगत बसू लागली. नंतर दुसरे कैदी म्हणाले की आम्हाला पण हें जेवण पाहिजे. तेव्हा त्यांच्यातलेहि 5-50 लोक आमच्या पंगतीत येऊन बसू लागले. परंतु पुढे जेलरने मला सांगितलें की या कैद्यांचें आरोग्य राखण्याची जबाबदारी आमच्यावर असते. त्यांना किती रेशन द्यायचें तें ठरलेलें असतें. त्यांत अमुक अमुक इतकी मिर्ची द्यायची असते. तेव्हा तुम्ही हें काम घेऊ नका. त्यामुळे मी त्या दुसऱ्या कैद्यांना म्हणालो की घरीं गेल्यावर तुम्ही फिके व्हा, इथे तुमचें तिखेपण चालू द्या.

## स्त्रियांसमोर व अन्य कैद्यांसमोरहि प्रवचनें

गीता-प्रवचनें पुरुष कैद्यांसमोर होत होतीं तेव्हा स्त्री कैद्यांनी मागणी केली की आम्हांलाहि प्रवचनें ऐकण्याची संधि मिळावी. पुरुष कैद्याला स्त्री कैद्यांमध्ये जाण्याची परवानगी कधीहि मिळत नसते. परंतु त्या वेळचे वैष्णव नांवाचे जेलर म्हणाले की विनोबांची गणना पुरुषांप्रमाणे स्त्रियांतहि करायला हरकत नाही. असें म्हणून त्या धाडशी जेलरने मला स्त्री कैद्यांसमोर प्रवचनें देण्याची परवानगी दिली. मी त्यांना म्हटलें, तुम्ही स्वत: त्या वेळीं हजर रहा. त्याप्रमाणे ते स्वत: यायचे आणि बरोबर आपल्या पत्नीलाहि आणायचे. अशा रीतीने स्त्रियांमध्ये आठवड्यातून एकदा प्रवचनें सुरू झालीं. मग दुसऱ्या सामान्य कैद्यांनी पण मागणी केली की आम्हालाहि विनोबांचीं प्रवचनें ऐकायला मिळावीं. जेलरने मला विचारलें की तुम्ही तयार आहात का? मी म्हणालो, रविवारचा दिवस सोडून दुसऱ्या कोणत्याहि दिवशीं तुम्ही त्या कैद्यांना एक तास सुटी द्याल तर मी त्यांना काही सांगेन. त्या चळवळीच्या काळातहि त्या बहादुर जेलरने बुधवारीं एका तासाची सुट्टी देऊन माझीं प्रवचनें करविलीं. त्यांतले काही कैदी बगिच्यांत काम करीत असत. ते प्रेमाने फुलांच्या माळा करून आणीत व मला देत. त्यांत काही फाशीचेहि कैदी होते, त्यांना पण जेलरने प्रवचनें ऐकायला येऊ दिलें.

## चोर कैद्यांकडून दक्षिणा

त्या वेळीं जेलमधील सगळें वातावरण नुसत्या आध्यात्मिक भावनेने भरून गेलें होतें. त्याच वेळीं गीताई इथे धुळ्याला छापली जात असल्यामुळे मी येथे प्रुफें तपाशीत असे. ज्या वेळीं मी सुटणार असें जाहीर झालें तेव्हा कैद्यांनी सुपरिन्टेन्डेंटपाशीं मागणी केली की आम्ही श्रमाने मिळविलेल्या पैशांतून आम्हाला दोन आणे द्या. त्यांनी विचारलें की तुम्हाला पैसे कशाला हवेत? कैदी म्हणाले की आम्हाला गीताई विकत घ्यायची आहे. सुपरिन्टेन्डेंट म्हणाले की गीताईची किंमत तर एकच आणा आहे, मग दोन आणे कशाला? त्यावर कैदी म्हणाले की आम्हाला ते माहीत आहे, परंतु आम्हाला एका आण्याची गीताई घ्यायची आहे व एक आणा विनोबांना दक्षिणा द्यायची आहे. याप्रमाणे या जेलमधील चोर म्हणविले गेलेल्या कैद्यांकडून मला एक-एक आणा दक्षिणाहि मिळाली आहे!

चोर आणि इतर लोक असा फरक मी कधीहि करीत नाही. मी असें मानतो की जगात चोर कोणीच नसतो. विनाकारण काही लोकांना चोर म्हणून कैदेंत टाकलें जातें आणि काही चोर बाहेरहि असतात, पण त्यांची सावांत गणना होते. म्हणजे ते कायदेशीर चोर नसतात. मला असा अनुभव आला आहे की कैद्यांच्या हृदयांत खूप भक्तिभाव असतो.

## पवित्र स्थानाचें दर्शन

इतके सगळे पवित्र अनुभव मी कधीच विसरणें शक्य नाही. म्हणूनच मी येथे येण्याचें पतकरलें. नाही तर आज मी 10 मैल चालून आलो आहे, आणि येथे आलो त्यामुळे आणखी तीन मैल चालावें लागलें. पण हें सर्व मी गीता-प्रवचनांच्या स्थानाच्या दर्शनासाठी कष्ट घेतले.

***गीता-प्रवचनें सांगतांना माझी काय वृत्ति होती तें मी तुम्हाला सांगू शकत नाही. परंतु काही शब्द परमेश्वर मनुष्याकडून बोलवून घेत असेल तर असें मानलें जाईल की ते सगळे शब्द परमेश्वराने बोलविले.*** त्या वेळीं श्रोत्यांमध्ये जमनालालजी आणि आपटे गुरुजी होते. ते दोघेहि आता या लोकात नाहीत. तसेच प्यारेलालजी आणि खानदेशची पुष्कळ मंडळी होती. ***हीं प्रवचनें देतांना मला असा भास होत नव्हता की मी बोलत आहे व ऐकणाऱ्यांनाहि असा भास होत नव्हता की विनोबा बोलत आहे.*** अशा रीतीने हें पवित्र स्थान आहे आणि म्हणून त्याच्या दर्शनाकरता मी येथे आलो आहे. माझ्या व्याख्यानाचा लाभ मिळेल अशी तुम्ही कधीच अपेक्षा केली नव्हती. कारण तुम्ही कैदी आहात. त्याचप्रमाणे मलाहि कल्पना नव्हती की मला येथे येऊन बोलण्याला मिळेल.

गीता-प्रवचनांमुळे या जेलची आठवण सबंध भारताला होते.

तुम्ही आपलें एक वेळचें खाणें सर्वोदय-पात्रासाठी देत आहात. जेलमध्यें किती कठिण काम करावें लागतें तें मला माहीत आहे. अशा स्थितीत तुम्ही एक वेळचें खाणें देता, यात तुम्ही फार मोठें प्रेम प्रकट केलें आहे. मी अशी आशा करतो की यामुळे तुमच्या चित्ताची शुद्धि होईल आणि तुम्ही जेव्हा जेलमधून मुक्त होऊन बाहेर जाल त्या वेळीं अत्यंत शुद्ध आणि निर्मल बनून बाहेर जाल.

**परिशिष्ट 2 :**

# माझ्या जीवनाची गाथा

गीतेचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. रोज मी तिचा आधार घेतो आणि रोज मला तिची मदत मिळते. ---

येथे श्लोकांच्या अक्षरार्थाची चिंता नाही, एकेका अध्यायाच्या साराचें चिंतन आहे. शास्त्रदृष्टि कायम ठेवूनहि शास्त्रीय परिभाषेचा उपयोग कमीत कमी केला आहे. --- गीतेचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तिचा भावार्थ जसा मी समजलो, तसा या प्रवचनांतून समजावून देण्याचा प्रयत्न आहे.

'गीता-प्रवचनें' सारी वाचून पचवलीं पाहिजेत. त्यांची शैली लौकिक आहे, शास्त्रीय नाही. त्यांत पुनरुक्तिहि आहे. गायक इतर चरण गाऊन पुन्हा आपले प्रिय पालुपद आळवतो, तसे येथे आहे. ही कधी छापली जातील अशी माझ्या मनात कल्पनाहि आली नव्हती. साने गुरुजींसारखा सहृदय आणि 'लाँगहँड' ने शॉर्टहँड लिहू शकणारा लेखनिक नसता तर, जो बोलला आणि ज्यांनी ऐकलें त्यांच्यातच यांची परिसमाप्ति झाली असती. आणि माझ्यासाठी एवढेंहि पुरेसें होतें. माझी स्वत:ची भावना दृढ करण्यासाठी जप-भावनेने मी बोलत गेलो. त्यातून एवढें मोठें फळ निघालें. ही ईश्वरेच्छाच म्हटली पाहिजे. ---

माझा अनुभव आहे की या पुस्तकाने क्रांतिकार्य केलें आहे. जेथे कुठे हें पुस्तक पोचलें तेथे त्याने मोहाचा पडदा दूर सारण्याचें काम केलें आहे. ----

**'गीता-प्रवचनें' माझ्या जीवनाची गाथा आहे, आणि तोच माझा संदेश आहे.**

## गीता–प्रवचनांच्या मासिक पारायणाचे विभाग

*30 दिवसांत पारायण पूर्ण व्हावें, ह्या दृष्टीने विनोबांनी केलेले विभाग*

| | | अध्याय | अधिकरण |
|---|---|---|---|
| पहिला | दिवस | 1 | 1 ते 4 |
| दुसरा | ,, | 2 | 5 ते 7 |
| तिसरा | ,, | 2 | 8 ते 10 |
| चौथा | ,, | 3 | 11 ते 13 |
| पांचवा | ,, | 4 | 14 ते 16 |
| सहावा | ,, | 5 | 17 ते 20 |
| सातवा | ,, | 5 | 21 ते 24 |
| आठवा | ,, | 6 | 25 ते 27 |
| नववा | ,, | 6 | 28 ते 31 |
| दहावा | ,, | 7 | 32 ते 35 |
| अकरावा | ,, | 8 | 36 ते 40 |
| बारावा | ,, | 9 | 41 ते 44 |
| तेरावा | ,, | 9 | 45 ते 48 |
| चौदावा | ,, | 10 | 49 ते 51 |
| पंधरावा | ,, | 10 | 52 ते 54 |
| सोळावा | ,, | 11 | 55 ते 58 |
| सतरावा | ,, | 12 | 59 ते 62 |
| अठरावा | ,, | 12 | 63 ते 66 |
| एकोणिसावा | ,, | 13 | 67 ते 70 |
| विसावा | ,, | 13 | 71 ते 74 |
| एकविसावा | ,, | 14 | 75 ते 77 |
| बाविसावा | ,, | 14 | 78 ते 81 |
| तेविसावा | ,, | 15 | 82 ते 84 |
| चोविसावा | ,, | 15 | 85 ते 87 |
| पंचविसावा | ,, | 16 | 88 ते 90 |
| सव्विसावा | ,, | 16 | 91 ते 93 |
| सत्ताविसावा | ,, | 17 | 94 ते 96 |
| अठ्ठाविसावा | ,, | 17 | 97 ते 100 |
| एकोणतिसावा | ,, | 18 | 101 ते 104 |
| तिसावा | ,, | 18 | 105 ते 108 |